16-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

AJIT/ D/ RJW/ 10:00

**( सभापती स्थानी :माननीय उपसभापती )**

**अर्धातास चर्चा**

**पृ.शी.**:रायगड जिल्ह्यातील पत्रकार श्री.कोकण यांचेवर झालेला प्राणघातक हल्ला

**मु.शी.**:रायगड जिल्ह्यातील पत्रकार श्री.कोकण यांचेवर झालेला प्राणघातक हल्ला यासंबंधी श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"रायगड जिल्हयातील पत्रकार श्री. चंद्रकांत कोकणे यांच्यावर दिनांक 2-12-2005 वा त्यासुमारास श्री. बापू जागडे व इतर सात जणांनी प्राणघातक हल्ला केला. या गुन्ह्याचे तपासात तसेच आरोपींना अटक करण्यात पोलीस खात्याकडून दिरंगाई होत असल्यामुळे पत्रकारांवरील हल्ल्याचा जलदगतीने तपास व्हावा म्हणून कोकण क्षेत्रीय विशेष महानिरीक्षक श्री.सत्यपालसिंह यांना पत्रकार श्री. जनार्दन पाटील व श्री. जयंत धुळप यांनी दि.2-12-2005 रोजी निवेदन देण्याचा प्रयत्न केला. श्री. सत्यपाल सिंह यांनी निवेदने स्वीकारुन पत्रकारांना चौकशीबाबत माहिती देणे अपेक्षित असताना भेटीस गेलेल्या पत्रकारांना मानहानीकारक बोलून त्यांना दमदाटी केली. पत्रकार श्री. कोकणे यांचेवरील हल्ल्याची माहिती देण्यासाठी गेलेल्या कृषीवलचे पत्रकार यांचे समोर दैनिक कृषीवल व त्याचे मालक श्री. जयंत पाटील, विधानपरिषद सदस्य तसेच संस्थापक स्व. प्रभाकर पाटील यांचेबाबत सत्यपालसिंह यांनी अनाठाई वक्तव्य करुन त्यांचा उपमर्द केला. त्यामुळे सत्यपालसिंह यांचे विरुध्द जनतेत असंतोष व संताप पसरुन दि. 5-12-2005 रोजी जनतेने मोर्चा काढला होता. याबाबत शासनाने तात्काळ करावयाची वा केलेली उपाययोजना."

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील महाड शहरात एका शाळेच्या बसला अपघात झाला. त्यामध्ये काहीजण जखमी झाले. त्या घटनेची बातमी "लोकसत्ता" आणि "कृषीवल" या

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

वर्तमानपत्रात छापून आली. ज्यांच्याविरुध्द ही बातमी छापून आली त्यांनी कृषीवलच्या वार्ताहराला जीवे मारण्याची धमकी दिली. या विरुध्द कृषीवलचे वार्ताहर श्री.कोकणे यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. परंतु पोलिसांनी ज्या गतीने तपास करावयास पाहिजे होता त्या गतीने तपास केला नाही. तसेच या प्रकरणी कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. कोकण क्षेत्रीय विशेष महानिरीक्षक डॉ.सत्यपालसिंह हे अलिबाग येथे जनता दरबारासाठी आले असताना त्याचे औचित्य साधून त्यांना पत्रकार भेटले व यासंबंधी चौकशी करुन आरोपींना अटक व्हावी अशी मागणी केली. तेव्हा डॉ.सत्यपालसिंह यांनी पत्रकांराविरुद अपशब्द वापरले, त्यांच्याशी अरेरावीची भाषा केली आणि त्यांना सांगितले की, हे वर्तमानपत्र श्री.जयंत पाटील यांचे आहे. सभापती महोदय, आपल्याला माहीत असेलच की, वृत्तपत्र हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. या वर्तमानपत्राला परंपरा आहे. आदरणीय श्री.प्रभाकर पाटील यांनी शेतकरी चळवळीसाठी हे वर्तमानपत्र चालविले. या वृत्तपत्रास तीन पिढ्यांचा इतिहास आहे. डॉ.सत्यपालसिंह यांना मराठी कितपत समजते हे मला माहीत नाही. जिल्ह्यामध्ये जे रिजनल अधिकारी असतात, किंवा डी.एस.पी., एस.पी. यांनी त्या जिल्ह्यातील सर्व राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व भौगोलिक माहिती घ्यावी अशी अपेक्षा आहे. कारण त्या जिल्ह्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांचेवर असते. ज्यावेळी डॉ.सत्यपालसिंह पत्रकारांबद्दल अपशब्द वापरीत होते त्यावेळी तेथे उपस्थित असलेले एस.पी यांनी त्यांना सांगितले की, कृपया आपण असे बोलू नका. त्यावर ते पत्रकार मॅनेज होत असतात वगैरे वगैरे बोलले. हे सर्व झाल्यानंतर त्यांनी दिलगिरी व्यक्त करावयास पाहिजे होती, ती त्यांनी केली नाही. म्हणून रायगड जिल्ह्यातील हजारो पत्रकारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. आता तेथील वातावरण तप्त झालेले आहे. एस.पी. आणि त्यावरील अधिकाऱ्यांनी जनतेस कशाप्रकारची वागणूक द्यावी याच्या काही गाईड लाईन्स दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

त्याची अंमलबजावणी करावी. ज्या गाईडलाईन्स आहेत त्याप्रमाणे संबंधित अधिकारी वागत नसतील तर त्याबाबत चौकशी झाली पाहिजे. आपण त्यांना जाणीव करुन द्यावयास हवी की, जर तुम्ही लोकप्रतिनिधी वा अन्य व्यक्तींबरोबर वेडेवाकडे वागला तर योग्य होणार नाही. यासंदर्भात कोठेतरी दाद मागण्याची व्यवस्था आहे याची जाणीव अधिकाऱ्यांना करुन दिली पाहिजे. मी त्या अधिकाऱ्यांना निलंबित करा अशी आपल्याला मागणी करणार नाही. परंतु अशा प्रकाराबाबत आपण दखल घ्यावी अशी अपेक्षा करतो. पुन्हा या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासंदर्भात शासनाने काळजी घेतली पाहिजे एवढीच या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करतो व माझे मनोगत पूर्ण करतो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, दैनिक कृषीवलच्या पत्रकारांना मारहाण झाल्यामुळे या घटनेतील आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. कोकण क्षेत्रिय विशेष महानिरीक्षक श्री.सत्यपालसिंह रायगड जिल्हयामध्ये जनता दरबारच्या निमित्ताने आले असताना सर्व पत्रकारांनी त्यांची भेट घेतली आणि मारहाणीच्या घटनेची सविस्तर माहिती दिली. आताच सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्या चौथ्या स्तंभाची हेटाळणी होत असेल तर ते बरोबर नाही. शासन या घटनेकडे गांभीर्याने पाहत आहे. त्यामुळे लोकशाहीचे बूज राखण्याचे जसे आमचे काम आहे तसेच या चौथ्या स्तंभाचे सुध्दा आहे. त्यामुळे या चौथ्या स्तंभाची जाण ठेऊन, एस.पी. किंवा त्यावरील जे अधिकारी आहेत त्यांनी वार्तालाप कसा करावा, कसा संवाद साधावा, कसे वागावे याबाबत सक्त सूचना देण्यात येतील. या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत सुध्दा दक्षता घेतली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, मी स्वत: पत्रकार असून, वर्तमानपत्र चालवितो. पत्रकार संघाचा पदाधिकारी सुध्दा मी राहिलेलो आहे. त्याचबरोबर सद्य:स्थितीत मी आमदार म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे माझ्याबद्दल सत्यपालसिंह यांना अपशब्द बोलण्याची काय गरज होती ? मी आपल्याला सांगू इच्छितो की, रायगड जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांना मी अजून बघितलेले नाही. ते काळे आहेत की, गोरे आहेत हे सुध्दा माहीत नाही. असे असताना आमच्याबद्दल जर कोणी अपशब्द वापरत असेल तर ते बरोबर नाही. त्यामुळे या संपूर्ण घटनेची चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, या घटनेची चौकशी त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केली जाईल.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदय, केवळ चौकशी करुन न थांबता, त्यांनी जर खरोखरच तसे वक्तव्य केले असेल तर त्यांना सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची क्षमायाचना करावयास सांगावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे.

----------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रात्र शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना अर्धा पगार व अपुरे फायदे मिळत असल्याबाबत.

**मु.शी.**: रात्र शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना अर्धा पगार व अपुरे फायदे मिळत असल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील रात्र शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी बहुसंख्येने गरीब, दिवसा नोकरी करणारे असणे, त्यांच्या शिक्षणाची सोय रात्रशाळेच्या माध्यमातून होणे, कमवा आणि शिका या धोरणानुसार शाळा चालणे, रात्र शाळा ही काळाची गरज असणे, नोकरी करणारे विद्यार्थी शाळेत येत असल्याने उपस्थितीची व शालांत परिक्षेच्या निकालाची अट शिथिल होणे आवश्यक, बेरोजगार शिक्षकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून अन्यत्र सेवेत असलेल्यांना रात्रशाळेत सेवेची संधी देणे अयोग्य असणे, रात्र शाळेतील शिक्षक दिवसांच्या पुर्ण वेळ शिक्षकांचे काम करीत असूनही अर्धा पगार देणे, अन्य फायदे (घरभाडे भत्ता, शहर भत्ता, वाहन भत्ता, पेन्शन इ.) नाकारणे, त्यामुळे रात्र शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महोदय, रात्र शाळेमध्ये काम करणारे जे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांच्या समस्यांकडे वर्षानुवर्षे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या नेमक्या काय समस्या आहेत ते या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून सभागृहासमोर मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

आज शहरी भागामध्ये नगरपालिका किंवा महानगरपालिका क्षेत्रामध्ये बरेचसे विद्यार्थी गरीब कुटुंबातील आहेत. मोलमजुरी करुन ते शिक्षण घेतात. त्यांना शिकण्याची इच्छा असते, ते दिवसाच्या शाळेत जाऊ शकत नसल्यामुळे रात्र शाळेच्या माध्यमातून ते आपले शिक्षण पूर्ण करीत

..4..



SJB/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 10:05

श्री.रामनाथ मोते....

असतात. त्यामुळे रात्र शाळा आजच्या युगामध्ये अत्यंत आवश्यक अशी बाब झाली आहे. म्हणून या रात्र शाळेमध्ये काम करणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्यांकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. रात्र शाळेला एक विशिष्ट परंपरा असल्यामुळे रात्र शाळेला सुध्दा दिवसाच्या शाळे इतकेच महत्व आहे. या राज्याचे माजी मुख्यमंत्री व आंध्र प्रदेशचे विद्यमान राज्यपाल माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे हे सुध्दा रात्र शाळेमध्येच शिक्षण घेऊन निरनिराळया उच्च पदांपर्यंत पोहोचलेले आहेत. त्यामुळे रात्र शाळा ही आज काळाची गरज आहे. या रात्र शाळेमध्ये काम करणारे जे शिक्षक आहेत त्यांना अर्धवेळ शिक्षक समजून वेतन दिले जात आहे. परंतु मला वाटते त्यांच्या कामाचे स्वरुप आणि त्यांना शासनाकडून दिले जाणारे वेतन यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत आहे. त्यांना अंशकालीन शिक्षक समजल्या जाते. परंतु वास्तविक पाहता त्यांच्या कामाचे स्वरुप मात्र पूर्णवेळ शाळेसारखेच आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ...

दिवसाच्या 'शाळेत जो अभ्यासक्रम पूर्ण केला जातो तोच अभ्यासक्रम रात्र शाळेमध्ये कमी कालावधीत पूर्ण केला जातो. रात्र शाळेतील शिक्षकांना 17-18 घडयाळी तास काम करावे लागते.रात्र शाळेतील शिक्षकांना मधली सुटी नसते.सलगपणे ते पिरियड घेत असतात.सरासरी तीन तास सलगपणे ते अध्यापनाचे काम करीत असतात.त्यामुळे त्यांचासुध्दा 17 ते 18 तास कार्यकाल होत असतो.त्यांना मात्र अर्धवेळ समजले जाते. त्यामुळे त्यांना अर्धवेळ शिक्षकांची वेतनश्रेणी मिळत असते.त्यामुळे नुकसान होत असते की. या शिक्षकांना अर्धवेळ समजले जात असल्यामुळे त्यांना वेतनश्रेणी अर्धवेळ मिळते त्यावर त्यांना डी.ए.मिळतो.परंतु त्यांना घरभाडे भत्ता,वाहतूक भत्ता वा अन्य भत्ते दिले जात नाहीत. तेव्हा हे भत्तेसुध्दा या शिक्षकांना देणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.रात्रशाळांच्या बाबतीत दुसरी एक महत्वाची बाब अशी आहे की, दिवसाच्या शाळांप्रमाणे रात्र शाळांमध्ये पूर्ण विद्यार्थी उपलब्ध होतीलच असे नाही. मी सुरुवातीलाच उल्लेख केला होता की, रात्र शाळा ही काळाची गरज आहे.गोर गरीब, मालमजुरी करणारे विद्यार्थी या शाळेत शिकत असतात.एखाद्या हॉटेलमध्ये वेटरचे काम करणारा किंवा कपबशा विसळणारा विद्यार्थी या शाळेत शिकत असतो.त्यामुळे दिवसाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सरासरी उपस्थिती बाबतची जी अट आहे ती अट या रात्र शाळांना लागू करणे बरोबर होणार नाही. त्यामुळे या अटी मध्ये शिथिलता आणणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.महानगरपालिका शाळेतील ज्या रात्र शाळा आहेत त्यामध्ये किमान 30 विद्यार्थी असावेत अशी अट घालण्यात आलेली आहे.30 विद्यार्थी नसेल आणि 20 किंवा 20 पेक्षा कमी विद्यार्थी असतील तर त्या ठिकाणी अनुदान कपात केली जाते.15 विद्यार्थी असतील किंवा 13 -14 विद्यार्थी असतील तर त्या शाळांना अनुदान द्यावयाचे नाही असा निर्णय शासनाने घेतला आहे.रात्र शाळांच्या बाबतीत जी सरासरी अट घालण्यात आलेली आहे त्यात शिथिलता आणण्याची गरज आहे.या रात्र शाळांमध्ये काम करणारे जे शिक्षक आहेत त्यातील काही शिक्षक दिवसा कोठे तरी काम करतात आणि रात्रीच्या वेळी या रात्र शाळांमध्ये काम करतात .कायद्याने तशा प्रकारे करण्याची त्यांना संधी उपलब्ध असल्यामुळे ते दोन्ही ठिकाणी काम करीत असतात. परंतु असे अनेक शिक्षक असेही आहेत की ते अन्य ठिकाणी कोठेही सेवेत नाहीत.अन्य कोणत्याही ठिकाणी काम करीत नाहीत ते फक्त रात्र शाळेतील पगारावरच अवंलबून आहेत.या शाळेतून मिळणा-या पगारावरच त्यांच्या कुटुंबियाचा उदरनिर्वाह

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ RJW/

श्री.रामनाथ मोते ...

चालत असतो म्हणून या शिक्षकांना पूर्ण वेळ शिक्षक समजून भविष्य निर्वाह निधीची सवलत देण्यात आली पाहिजे आज या शिक्षकांना भविष्य निर्वाह निधीची सवलत दिली जात नाही.अन्य शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीची सवलत लागू आहे. दिवसाच्या शाळेत काम करणा-या आणि रात्रीच्या शाळेत काम करणा-या शिक्षकांना ही सवलत लागू केली नही तरी माझी त्याला काही हरकत नाही. परंतु जे शिक्षक फक्त रात्रीच्या शाळेतच काम करतात अन्य कोणत्याही ठिकाणी काम करीत नाहीत अशा शिक्षकांना भविष्य निर्वाह निधीची सवलत लागू करण्यात आली पाहिजे वर्षानुवर्षे काम कारत असतांनासुध्दा त्यांना ही योजना लागू केली जात नाही. त्याचबरोबर पेन्शन योजनासुध्दा लागू केलेली नाही तेव्हा ही योजना सुध्दा लागू करणे आवश्यक आहे.जी रात्रीची  डिग्री महाविद्यालये आहेत त्या ठिकाणी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना पूर्ण वेळ समजले जाते त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या संख्येची कोणतीही अट घालण्यात आलेली नाही तेव्हा याच धर्तीवर महाराष्ट्रात ज्या माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर काम करीत आहेत त्या रात्र शाळेतील कर्मचा-यांना पूर्ण वेळ समजण्यात यावे त्यांना भविष्य निर्वाह निधीची योजना लागू करण्यात यावी.सरासरी उपस्थितीची जी अट आहे ती शिथिल करण्यात यावी त्याचबरोबर अनुदान मिळण्याच्या  बाबतीत जी निकालाची अट आहे त्याही बाबतीत विचार करण्यात यावा. दिवसाच्या शाळांच्या बाबतीत 20 टक्क्या पेक्षा कमी निकाल लागला तर ती शाळा बंद करण्याची नियमामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.रात्र शाळेमध्ये सुध्दा किमान 20 टक्याच्या निकालाची अट लावली तर महाराष्ट्रात एकही रात्र शाळा टिकण्ार नाही.या रात्रीच्या शाळेत येणारे विद्यार्थी हे कोणतया वातावरणातील आहेत, हे विद्यार्थी कोणत्या परिस्थितीतील आहेत आणि कोणत्या परिसरातील आहेत याचा विचार करुन शालांत परीक्षेच्या निकालाची जी अट घालण्यात आलेली आहे ती अट शिथिल करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे वेगवेगळया अडचणी रात्र शाळेत शिकविणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या ज्या विविध अडचणी आहेत त्या मी मांडल्या आहेत त्याबाबत मंत्रिमहोदयांना आापल्या मार्फत नम्र विनंती क रतो की, या समस्यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे तो त्यांनी करावा. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या या मागण्याच्या बाबतीत एक महिन्याच्या आत बैठक बोलावून या सर्व समस्या सोडविण्याचा सकारात्मक प्रयत्न शासन करणार आहे काय याबाबतीत मंत्रिमहोदयानी आश्वासन द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी दुर्लक्षित, उपेक्षित असलेल्या रात्रशाळांसंबंधातील महत्त्वाचा प्रश्न या ठिकाणी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. ज्यांना शिक्षण प्रवाहामध्ये येता आले नाही परंतु त्यांची शिक्षण घेण्याची तसेच शिक्षण देण्याची तीव्र इच्छा आहे आणि त्या द्वारा आपले जीवन उंचावण्याचा प्रयत्न करीत आहेत अशांसाठी रात्रशाळा आहेत. अर्थात या रात्रशाळांचे जाळे महाराष्ट्रात निश्चितच कमी आहे म्हणजे 184 रात्रशाळा आहेत आणि त्यामध्ये विद्यार्थी संख्या देखील खूप आहे म्हणजे एकंदर 27973 विद्यार्थी असले तरी त्या तुलनेने त्यामध्ये 1727 शिक्षक आहेत आणि या अशा रात्रशाळांतील शिक्षक तसेच विद्यार्थ्यांच्या बाबतीतील महत्त्वाचा प्रश्न येथे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे त्याबद्दल त्यांना प्रथमत: मी धन्यवाद देतो. सभापती महोदय, या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी काही महत्त्वाचे मुद्दे येथे मांडलेले आहेत. त्यामध्ये या शाळांची निकड सन्माननीय सदस्यांनी स्पष्ट केली आहे तसेच या रात्रशाळा दिवसशाळां इतक्याच महत्त्वाच्या आहेत हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. परंत या शिक्षकांना मिळणारे वेतन व सवलती आणि दिवसशाळांतील नियमित काम करणाऱ्या शिक्षकांना मिळणारे वेतन व सवलती यामध्ये प्रचंड तफावत आहे हेही मला मान्य आहे. हा भेद असू नये आणि अर्धवेळ शिक्षक आहेत त्यांना पूर्णवेळ करावे तसेच त्यांना पूर्णकालिक समजून त्यांना अन्य पूर्णकालिक शिक्षकांप्रमाणे वेतन व सवलती मिळाव्यात. त्याचप्रमाणे या रात्रशाळांसाठी विद्यार्थी संख्येची अट आहे तीही शिथिल करावी, निकालाची अट आहे ती देखील शिथिल करावी. असे अनेक प्रश्न या निमित्ताने येथे मांडले गेले आहेत. मी आपल्याला निश्चितपणे ग्वाही देईन. तसे पाहता नाईट कॉलेजसाठी निकालाचीही अट नाही आणि मुलांच्या संख्येचीही मर्यादा नाही. परंतु या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, कारण ज्यांना शिक्षणाची खरोखरी आवश्यकता आहे , ज्यांना शिक्षणाची अभिरूची आणि आवड निर्माण झालेली आहे आणि एक जिज्ञासा निर्माण झालेली आहे की, मी शिकून मोठा होऊ शकतो पण तो आपल्या अशा काही अटींमुळे शिकू शकत नाही. अशा परिस्थितीमध्ये पुरेसे हे वर्ग होत नसतील, पुरेशी शिक्षक संख्या नसेल किंवा शाळेच्या गुणात्मक दृष्ट्या विचार केला तर मुलभूत सुविधा नसतील तर त्याकडे शासनाने आणि आपणदेखील अतिशय गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे असे मला वाटते. या समस्या सुटण्यासंदर्भात, खरे म्हणजे निकालाची अट ही 20 टक्केच

..... डी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. पुरके ....

आहे, तसेच मुलांची संख्या देखील किमान 20 असावी. यासाठी मी हे म्हणतो आहे की, मुलेच जर येत नसतील आणि अशा प्रकारचे कोठलेही बंधन नसेल तर ही मुले फार कमी विलिंगली येतात. परंतु परिस्थितीच्या मजबुरीमुळे देखील काही मुले येतात आणि शिक्षण घेऊन मोठे होतात. याबाबतीत आपण तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांचे उदाहरण दिले. ही अपवादात्मक बाब असली तरी एक आदर्श म्हणून स्वीकारायला हरकत नाही. म्हणून मी आपल्याला नम्रपणे सांगेन की, या सगळ्याच मागण्या आपल्याला मान्य करता येतील असे नाही. पण तरीही मी आपल्या सोबत, संबंधित विभागाचे अधिकारी आणि आपण, एक महिन्याच्या आत किंवा 15 दिवसांमध्ये एक बैठक लावण्यास माझी काहीच हरकत नाही. कारण हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. या रात्रशाळांच्या बाबतीत मी तर असाही विचार करीत आहे की, तालुका स्तरावर देखील या रात्रशाळा असल्या पाहिजेत. रात्रशाळांबाबतचा माझा स्वत:चा प्रस्ताव देखील मी टाकला होता. परवापरवा जी युनिसेफची टीम आहे त्यामध्ये असे दिसून आले की, ज्या मुलींना शिक्षण मिळत नव्हते किंवा शिक्षणापासून त्यांना मजबुरीने बाहेर पडावी लागले आहे. मग ते लग्नाच्या कारणामुळे असेल, त्यासाठी आईवडलांनी त्यांचेवर जबरदस्ती केली अशा जवळपास 50 ते 60 मुलींना आम्ही यवतमाळ येथे हा प्रयोग राबविला तेव्हा तेथे त्या मुली निर्भिडपणे समोर येऊ लागल्या व सांगू लागल्या की, माझी आई माझ्यावर कसे दडपण आणीत होती आणि सांगत होती की, तुला आता शिक्षण सोडून लग्न करणे कसे गरजेचे आहे. अशा प्रकारे या जीवघेण्या स्पर्धेमध्ये या लोकांना शिक्षण द्यावयाचे असेल तर या रात्रशाळांचे महत्त्व मला निश्चितपणे मान्य आहे. मी एक महिन्याच्या आत या संदर्भात आपल्या सोबत एक बैठक घेऊन सकारात्मक भूमिका घेऊन निर्णय घेऊ. त्यानंतर एक विषय असा सांगावयाचा राहिला आहे की, बाहेर जे दिवसशाळांमध्ये देखील नोकरी करतात आणि या रात्रशाळांमध्येही नोकरी करतात .. तर आपले म्हणणे असे आहे की, जे बाहेरही नोकरी करीत नाहीत आणि येथे मात्र डिव्होशनने काम करतात, समर्पित भावनेने काम करतात. परंतु यामध्ये वर्कलोडचा जो प्रश्न आहे तो वर्कलोड तसा फार कमी आहे. दिवसाचे कामकाज आणि कामकाजाचे दिवस हे निश्चितच कमी आहेत. तरी देखील याचा आपण साकल्याने विचार करू इतकेच मी सांगतो.

...... डी 3 ..



KBS/ D/ RJW/ श्री.गायकवाड नंतर --- 10:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, रात्रशाळांमध्ये नोकरी करणाऱ्यांना एमआरए आणि सीएलए मिळत नाही, ते मिळावे म्हणून मी गेली 17 वर्षे भांडते आहे. पण अजूनही त्यांना हे भत्ते दिले जात नाहीत. जे दोन्ही ठिकाणी नोकरी करतात त्यांचा फार थोडा प्रश्न आहे. पण फक्त रात्रशाळेत नोकरी करणारे आहेत त्यामध्ये बऱ्याच महिला आहेत, त्यांना अजूनही हे भत्ते मिळत नाहीत. आणि सिनिअर कॉलेजमध्ये जे नाईट कॉलेजला शिकविण्यासाठी जातात त्यांना आपण पूर्ण वेतन देत आहात. पण या रात्रशाळांतील, माध्यमिक शाळांतील शिक्षकांना मात्र ते मिळत नाही. तेव्हा या दृष्टीनेही विचार आपण करावा अशी विनंती आहे. दुसरे म्हणजे मुंबई महापालिकेने भरमसाठ भाडेवाढ केलेली आहे. आपल्याला या रात्रशाळांसाठी महापालिकेच्या शाळा भाड्याने मिळतात. आता त्याला कोर्टाचा स्टे वगैरे आला आहे. पण तरीही आपण या संदर्भात महापालिकेला विनंती करावी की, तुम्ही एवढे भरमसाठ भाडे या रात्रशाळांसाठी लावू नये म्हणून. तरी याबाबत आपण विचार करावा.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, महाविद्यालयीन नाईट कॉलेजेसमध्ये ज्या अटी आहेत त्या संदर्भात आपल्याला विचार करता येणार नाही. परंतु 12वी पर्यंत ज्या शाळा आहेत त्यांचा आपण जरूर विचार करू. आता मुंबई महापालिकेसंबंधातील जो प्रश्न आहे त्या संदर्भात मी आपल्यासोबत जेव्हा चर्चा करीन त्यावेळेस महापालिका आयुक्त यांना देखील आपण तेथे बोलावू. त्यांनी जे भरमसाठ भाडे रात्रशाळांसाठी केले आहे त्यासंबंधात आपल्याला त्यांचेशीच चर्चा करणे गरजेचे आहे. आणि एचआरए व सीएलए चा जो प्रश्न आहे तोही आपण चर्चेतून मार्ग काढून सोडविण्याचा प्रयत्न करू.

( यानंतर श्री. सरफरे .... इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : आपण चर्चेतून हा प्रश्न निकाली काढू.

प्रा. जोगेंद्र कवाडे : रात्रशाळेतील शिक्षक दिवसा पूर्णवेळ काम शिक्षक म्हणून काम केल्यानंतर त्याला अर्धा पगार मिळतो. त्याचबरोबर घरभाडे भत्ता, शहर भत्ता. वाहन भत्ता व पेन्शनचा लाभ त्यांना मिळतो. याठिकाणी मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, आपल्याला यामध्ये क्लासिफिकेशन, बायफरकेशन करता येणार नाही काय? जर रात्र शाळेत शिकविणारा शिक्षक दिवसा दुसरीकडे नोकरी करीत असेल आणि मग तो रात्र शाळेत येत असेल तर त्याला आपण अर्धा पगार द्यावा. परंतु पूर्ण वेळ रात्र शाळेत काम तो शिक्षक काम करीत असेल तर त्या शिक्षकाला सर्व सोयी-सवलती देण्यामध्ये अडचण काय? माझी आपणाला विनंती आहे की, याबाबत आपण गंभीरपणे विचार करावा.

प्रा. वसंत पुरके : त्या शिक्षकाचा प्रत्यक्ष वर्कलोढ, गुणवत्ता किंवा अर्हता यांचा विचार करु. याकरीता तिनही माननीय सदस्यांबरोबर बसून चर्चा करण्याची माझी तयारी आहे.

**उपसभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

**(सभागृहाची बैठक 10 वाजून 21 मिनिटांनी, 11.00 पर्यंत स्थगित झाली.)**

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/RJW/D पूर्वी श्री.सरफरे . . . . 11.00

**सभापतीस्थानी - मा.उपसभापती**

नियम 93 अन्वयेच्या निवेदनांसंबंधी

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसीजर आहे. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नियम 93 च्या सूचनेसंबंधात निवेदने असतील, तर त्यावर चर्चा सुरु होते. परंतु गेल्या दोन दिवसापासून प्रश्नोत्तराचा तास संपता-संपताच आम्हाला 93 च्या सूचनां-वरील निवेदने दिली जातात. एवढया उशीरा निवेदने मिळाली तर सन्माननीय सदस्यांनी ती कधी वाचावयाची आणि त्यावर प्रश्न कसे विचारावयाचे ?

**उपसभापती** : ठीक आहे. याबाबतीत ताबडतोब दखल घेण्यात यावी.

----

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे .

**आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील विद्यार्थ्यांना शेक्षणिक फी माफीची सवलत.**

(1) * 9266 **श्री. श्रीकांत जोशी , डॉ. अशोक मोडक , श्रीमती संजीवनी रायकर** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) आर्थिक दृष्टया कमकुवत वर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी माफीची सवलत देण्यासाठीची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये 15000/- इतकी आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील मर्यादा आजच्या काळात योग्य आहे काय,
(3) तसेच, तहसील कार्यालयातून इतक्या कमी वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळविणे अडचण वा त्रासाचे असून अशा प्रमाणपत्राअभावी सवर्णांमधील आर्थिक दृष्टया कमकुवत गटातील विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत घेता येत नाही परिणामी त्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते याकडे शासनाचे लक्ष वेधले वा वेधण्यात आले आहे काय,
(4) असल्यास अशा विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत देणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(5) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता** : (1) होय, हे खरे आहे.
(2) शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलतींच्या इतर योजनांसोबत ई.बी.सी. योजनेचाही आढावा घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(3) दिनांक 19 जून, 1964 च्या शासन निर्णयान्वये ई.बी.सी. सवलतीसाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून घेणे बंधनकारक नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे हा आपला उद्देश आहे आणि असे असताना 15 हजार इतकी वार्षिक उत्पन्नाची अट असून प्रमाणपत्रा अभावी सवर्णांमधील आर्थिकदृष्टया कमकुवत वर्गातील मुलांना आपण सवलत देत नाही. एस.सी.,एस.टी. मधील लोकांचे उत्पन्न कदाचित जास्त असेल, पण त्यांच्या मुलांना सवलती देता, त्याबद्दल दु:ख नाही. त्यांच्या मुलांना जशा सवलती देता, तशा त्या खुल्या प्रवर्गातील कमी उत्पन्न गटातील मुलांनाही देण्यात याव्यात. यादृष्टीने शासन विचार करणार आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण पहिली ते दहावी पर्यंतच्या सर्व मुला-मुलींना मोफत शिक्षण देत आहोत. पहिली ते बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण देत आहोत. आता

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फक्त अकरावी आणि बारावी या इयत्तेतील मुलांचा प्रश्न राहीलेला आहे. यामध्ये फक्त दोन टक्के विद्यार्थी फी देत आहेत. फी माफीची सवलत देण्यासाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 15 हजार रुपये आहे. यासाठी सरपंच,महापौर,नगराध्यक्ष याचेही प्रमाणपत्र चालेल. त्यामुळे आता यामध्ये बदल करण्याची काहीही गरज नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न क्र.3 ला उत्तर देताना असे म्हटलेले आहे की,"दिनांक 19 जून 1964 च्या शासन निर्णयान्वये ई.बी.सी.सवलतीसाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून घेणे बंधनकारक नाही". हा निर्णय 1964 मध्ये झालेला आहे. पूर्वीपेक्षा आता उत्पन्नाची मर्यादा वाढत जात आहे अशा परिस्थितीत उत्पन्नाची मर्यादा 25 हजारा-पर्यंत नेण्यासंबंधी शासन विचार करणार आहे का ? नसेल तर, आपण आज 21 व्या शतकामध्ये जात आहोत. हा 1964 सालातील जी.आर.आहे. ज्यानंतर अनेक जी.आर.निघाले, अनेक पुरवणी जी.आर.निघाले. पण शिक्षणाच्या बाबतीत 1964 मध्ये काढलेला जी.आर.अजूनपर्यंत बदललेला नाही. तेव्हा हा जी.आर. बदलण्यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भात तहसीलदाराचे सर्टीफीकेट घेण्याची गरज नाही यासाठी हा जी.आर.आहे.काँग्रेस पक्ष लोकप्रिय झाला, त्याला कारण म्हणजे ई. बी. सी. बाबत देण्यात आलेली सवलत. यामुळे गरीब समाजातील, बहुजन समाजातील लोकांची मुले शिकू शकली. माननीय कै.यशवंतराव चव्हाण, माननीय कै.बाळासाहेब देसाई यांची नावे अजूनही घेतली जातात. 2 टक्के विद्यार्थी . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे सर्व कोणाच्या काळात झाले ? तर युती शासनाच्या काळामध्ये झालेले आहे. यामध्ये काँग्रेस पक्षाने काही केलेले नाही. मी मघाशी स्पेसीफीक प्रश्न विचारला आहे की, 15 हजार रुपयापर्यंत असलेली उत्पन्नाची मर्यादा वाढवून देण्यासंबंधी शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासन या शिफारशीचा विचार करील.

**उपसभापती** : आपण ई.बी.सी.म्हणजे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांबाबत बोलत आहोत. मघाशी जे सांगितले, ती गोष्ट खरी आहे की, ही योजना तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.बाळासाहेब देसाई यांनी इन्ट्रोडयूस केली होती.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9266(पुढेसुरु..... **उपसभापती** (पुढे सुरु...

परंतु आता इकॉनॉमिकली बॅकवर्डची त्या काळातील आणि या काळातील व्याख्या संपूर्णपणे वेगळी आहे. त्यामुळे इकॉनॉमिकली बॅकवर्ड म्हणून 15000 रुपयाची रक्कम धरत असाल तर ती वाढविणे गरजेचे आहे, ही गोष्ट तितकीच निश्चित आहे. त्याबाबतीत शासन निर्णय करेल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : 1964 साली 1200 रुपयाची अट होती, त्यानंतर 1992-93 साली 1500 रुपयाची अट केली. निश्चितपणे उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याच्यादृष्टीने शासन विचार करेल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मर्यादा तर कमी आहे पण इ.बी.सीचा दर हा 1964 पासून 1 रुपया 20 पैसे आहे. पाचवी ते सातवीच्या वर्गासाठी 60 पैसे आणि आठवी ते दहावीच्या वर्गासाठी 1 रुपया 20 पैसे असा दर दिला जातो. हा दरसुध्दा वाढवावयास पाहिजे. यामधून शालेय कामकाजासाठी खर्च दिला जातो. 20-25 वर्षे झाली महागाई वाढली, परंतु दर वाढला नाही. हा दरसुध्दा वाढविण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : दर वाढविला तरी सरकारच रिअेम्बर्समेंट करते.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,दर वाढविण्याचे आणि मर्यादा वाढविण्याचे मंत्रीमहोदयांनी मान्य केले. माझा महत्वाचा प्रश्न असा आहे की, ई.बी.सी. सवलतधारकांना तहसिलदारांकडून उत्पन्नाचा दाखला घेण्याची आवश्यकता नाही, असे म्हटले असले तरी जे इ.बी.सी.सवलतधारक विद्यार्थी आहेत, प्रवेशासाठी जाताना उत्पन्नाचा दाखला तहसिलदारांचा असल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. त्यामुळे तातडीने आता नव्याने आदेश काढणार आहात काय ? की इ.बी.सी.सवलतधारक आहेत, त्यांच्याकडे तहसिलदारांचे प्रमाणपत्र नसेल तरी त्यांना प्रवेश द्यावा. दुसरे जे इ.बी.सी.सवलत धारक विद्यार्थी आहेत यांच्याकडून देखील प्रवेशाच्यावेळेस जरी त्यांची फी शासन रिअेबर्समेंट करणार असले तरी देखील प्रवेशाच्यावेळेस त्यांच्याकडून पूर्ण फी घेतली जाते ती बंद करणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघापासून सांगतो आहे की, दोन टक्केच लोक फी भरतात. प्रवेशासाठी तहसिलदारांच्या प्रमाणपत्राची अट ठेवलेली आहे, ती अट काढून टाकण्याचा विचार करु. या प्रश्नाच्या संबंधात सन्माननीय सदस्यांनी विचार करण्याची गरज आहे की,ऐपत असतानासुध्दा फी भरत नाहीत. फक्त दोनच टक्के विद्यार्थी फी भरतात. म्हणून मी म्हणेन की, उत्पन्नाची अट ही निश्चितपणे आपण वाढवू.

16-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9266(पुढेसुरु.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय मंत्री महोदयांनी ज्यांची ऐपत आहे, ते फी भरत नाहीत. आपण उत्पन्नाची मर्यादा घातलेली आहे. त्यामुळे त्यांच्या ऐपतीचा प्रश्न येत नाही. उत्पन्नाच्या मर्यादेमध्ये राहून जर उत्पन्नाचा दाखला आणून तो विद्यार्थी शिकत असतील तर त्यांची ऐपत कशाला काढता ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे दाखले आपण कोणाचे घेतो ? तहसिलदांची अट घालायची आहे काय ? माझे मत एवढेच आहे की...(अडथळा)...

-

**उपसभापती** : मी आता पुढचा प्रश्न पुकारतो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक 11865</u>**

(प्रश्न विचारण्यात आला नाही.

(अडथळा)

**उपसभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 9273.

4.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ D/ RJW/ KGS/

**प्राथमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू होणेबाबत**

**(3) * 9273 श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. नानासाहेब बोरस्ते** : **तारांकित प्रश्न क्रमांक 5637 ला दिनांक 19 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाने त्यांचे कडील प्राथमिक शिक्षकांसाठी मंजूर केलेली रु. 4500-7000, 5500-9000 व 6500-10,500 ही सुधारित वेतनश्रेणी राज्यातील प्राथमिक शिक्षकांना देण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ ,प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता**: (1) नाही.

(2) व (3) प्रस्तुत प्रकरणी मा. सभापती, विधानपरिषद यांचेकडे झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव वेतन असमानता समिती ऐवजी मंत्रीमंडळापुढे सादर करण्याचे ठरले आहे. त्यानुसार याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

...अडथळा....

अनेक सन्माननीय सदस्य : श्रीमती मंदा म्हात्रे उपस्थित आहेत. त्यांना प्रश्न उपस्थित करायला परवानगी द्यावी.

**उपसभापती** : मी प्रश्न दोनदा पुकारला. कोणी उभे राहिले नाही. मी पहिल्याच सन्माननीय सदस्यांचे नाव वाचणार की सगळी नामावली वाचणार ?

श्री.वसंतराव खोटरे सभापती महोदय, प्राथमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत हा प्रश्न या सभागृहामध्ये सात वेळा विचारलेला आहे. त्याच्या तारखासुध्दा माझ्याकडे आहेत. 12-3-2003, 16-7-2003, 10-12-2003, 26-5-2004, 20-4-2005, 20-7-2005 आणि आज 16-12-2005 आणि लक्षवेधीसुध्दा विचारलेली आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, आपण यादीतील दुसरा प्रश्न पुकारला. तेव्हा एकाच सन्माननीय सदस्यांचे नाव घेतले, प्रश्नामधील बाकीच्या सदस्यांची नावे घेतली नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांना प्रश्न उपस्थित करता आला नाही. माझी विनंती आहे की सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे या उपस्थित आहेत,त्यांना प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ D/ RJW/ KGS/

ता.प्र.क्र.9273......

**उपसभापती** : प्रश्नावरील सगळयाच सदस्यांची नावे पुकारावीत असे काही बंधन नाही. मी जेव्हा पहिल्या सन्माननीय सदस्यांचे नाव दोन वेळा पुकारले आणि त्यानंतर तिसऱ्या क्रमांकाचा प्रश्न पुकारला. सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नावर माझेही नाव आहे असे म्हटले असते तर त्यांना मी संधी दिली असती. पण तरी देखील हा प्रश्न संपल्यानंतर मागील प्रश्न विचारण्याची सन्माननीय सदस्यांना संधी दिली जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या विषयावर सातवेळा प्रश्न उपस्थित केला, त्यानंतर दोनवेळा लक्षवेधी सूचना चर्चेला आली. या विषयावर सभागृहामध्ये भरपूर चर्चा झाली. त्यानंतर दिनांक 2-9-2005 मध्ये माननीय सभापती महोदयांनी त्यांच्या दालनामध्ये बैठक देखील आयोजित केलेली होती..

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MHM/ 11:10

ता.प्र.क्र.9273...

श्री. वसंतराव खोटरे..

तरीही आजपर्यंत याबाबतीत निर्णय झालेला नाही. मंत्रिमहोदयांनी यासंदर्भात दोन-तीन वेळा आश्वासन दिलले आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत ताबडतोब आठ दिवसात किंवा एका महिन्याच्या आत निर्णिय घेण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, केंद्र सरकारच्या प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणी प्रमाणे राज्यातील शिक्षकांना वेतनश्रेणी मिळावी याबाबत सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात अनेक वेळा प्रश्न विचारलला आहे. याबाबतीत माननीय सभापतींनी स्वत: निर्देश दिले की, यासंदर्भात माझ्या दालनात बैठक घेऊ. त्याप्रमाणे दि. 28 सप्टेंबर 2005 रोजी ती बैठक झाली. त्या बैठकीत असे ठरले की, महाराष्ट्र शासनाने प्रत्येक खात्यामध्ये जी वेतनश्रेणीमध्ये असमानता आहे त्यासाठी एक असमानता समिती नेमलेली होती, तो प्रस्ताव त्या समितीसमोर ठेवण्यात आला होता. सभापतींनी सांगितले की, त्या समितीसमोर जाण्याची गरज नाही. मंत्रिमंडळापुढे जावे. हा प्रस्ताव वित्त विभागाकडे गेलेला होता. आणि असमानता वेतनश्रेणी नेमली होती त्या समितीने दि. 28 सप्टेंबर, 2005 ला आपला अहवाल शासनाला सादर केलेला आहे. वित्त विभाग हे असमानता समितीचे सगळे अहवाल लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणणार आहे आणि ही वेतनश्रेणी शासन दुरुस्त करुन देणार आहे.

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, दि. 26 मे ला हा प्रश्न उपस्थित करण्यात आला हाता. त्यावेळेस हा प्रश्न राखून ठेवण्यात आला होता. त्यानंतर दि. 2 जून, 2004 ला याबाबतीत स्पष्टपणे असे उत्तर दिले आहे की, दोन महिन्यात पॉझिटिव्ह निर्णय घेऊ. आता या गोष्टीला दोन वर्षे झाली आहेत. केंद्राच्या मिडलस्कूल आणि प्राथमिकच्या शिक्षकांना ही वेतनश्रेणी दिलेली आहे. 1977 मध्ये ज्यावेळी 54 दिवसांचा संप झाला होता त्यावेळी असे आश्वासन देण्यात आले होते की, केंद्रात जी वेतनश्रेणी दिली जाईल ती जशीच्यातशी महाराष्ट्रात दिली जाईल. त्याप्रमाणे ती वेतनश्रेणी सगळयांना दिली. ती फक्त प्राथमिक शिक्षकांना आणि मिडलस्कूल

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9273...

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे...

शिक्षकांना दिलेली नाही. माननीय सभापतींच्या दालनात चर्चा झाली त्यावेळी सुध्दा शासनाची यासंबंधीची टिप्पणी निगेटिव्ह होती. आता आपण पुन्हा मागे आलो. आता हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. तेव्हा यासंबंधात सकारात्मक निर्णय घेऊन तो मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे काय? या संदर्भाती निर्णय एका महिन्यात नाही तर दोन महिन्यात द्यावा. पैसे थोडे उशिरा द्यावे.पण बजेटमध्ये प्रोव्हिजन करुन दोन महिन्यात शासन हा निर्णय पॉझिटिव्हली घेणार काय ? याचे स्पष्ट उत्तर दिले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय,वित्त विभाग मंत्रिमंडळापुढे हा प्रस्ताव आणणार आहे. गुरुजनांबद्दलचा आदर मी वेळोवेळी या सभागृहात व्यक्त केलेला आहे. म्हणून हा प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणून या वेतनश्रेणीतील त्रुटी दुरुस्त करणार आहोत.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लवकरात लवकरची व्याख्या सांगावी. केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीप्रमाणे वेतनश्रेणी देण्याचे कमिटमेंट आहे. त्याप्रमाणे ती वेतनश्रेणी सगळया विभागातील सगळया घटकांना दिल्यानंतर केवळ प्राथमिक शिक्षक आणि मिडल स्कूलच्या शिक्षकांना वंचित ठेवणे योग्य नाही. म्हणून या संदर्भात दोन महिन्यात पॉझिटिव्ह उत्तर देणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासन म्हणून काम करीत असतांना सर्व खात्यांच्या वेतनश्रेणीबाबत असमानता वेतन श्रेणी समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल आलेला आहे. तो अहवाल मंत्रिमंडळापुढे ठेवणे बाकी आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हा सर्व खात्यांचा प्रश्न नाही. या सर्व खात्यांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी शासनाने दिलेली आहे. त्यामुळे इतर खात्याशी यांची तुलना करणे चुकीचे आहे. मुद्दा असा आहे की, प्राथमिक शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याबाबत केंद्र शासनाने जी करेक्शन सुचविली आहे ती लागू केलेली नाही. केंद्राने सर्व शिक्षकांसाठी जी वेतनश्रेणी दिली ती दिलेली आहे. त्यामुळे इतर खात्याशी यांची तुलना करणे बरोबर नाही. शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, केंद्रामध्ये जी वेतनश्रेणी येईल ती महाराष्ट्रात लागू करु, हे खरे आहे

..3..



SMT/ KGS/ MHM/ 11:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9273...

प्रा. बी. टी. देशमुख...

की नाही ? त्याला मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे तो प्रश्न आता पुन्हा विचारणार नाही. हे जर खरे आहे तर धोरणात्मक निर्णय घेतल्यानतर या प्राथमिक शाळेच्या शिक्षकांना एका लहानशा करेक्शनसाठी टोलवाटोलवी करण्याचे कारण काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, वित्त विभागाला आम्ही सातत्याने सांगितले की, हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर न्यावा. त्यावेळी त्यांनी असे संगितले की, अहवालात उक्त संवर्गा व्यतिरिक्त जवळ जवळ इतर 250 संवर्गाचे प्रस्ताव आहेत. त्यामुळे ही एकच बाब मंत्रिमंडळासमोर आणता येणार नाही, असे त्यांनी सांगितले. आम्ही त्यांना सांगितले की, माननीय सभापतीने निर्देश दिलेले असल्यामुळे हा प्रस्ताव ताबडतोब मंत्रिमंडळापुढे आणावा. आम्ही त्यांना सांगून सुध्दा ते ऐकत नाहीत. पण

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 9273 .........) (श्री. हसन मुश्रीफ .......

पुढील अधिवेशनात सन्माननीय सदस्यांना पुन्हा या प्रश्नाबाबत संधी देणार नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वित्त विभागाने 265 केडरबाबत सांगितले असे मंत्री महोदय सांगतात परंतु त्यांना आपण हे का सांगत नाही की या 265 केडरच्या बाबतीत केंद्रामध्ये डिस्पॅरिटी आहे. प्राथमिक शिक्षकांच्या संदर्भातील हे एकच प्रकरण दुर्देवाने या डिस्पॅरिटीमध्ये आहे, हे पुन्हा पुन्हा सांगावे लागत आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, वित्त विभागाने 265 केडरबाबत जे सांगितले त्याबाबतही केंद्राची शिफारस आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, वित्त विभागाने जे दिले ते मी वाचून दाखविले. परंतु या निमित्ताने मी पुन्हा सांगतो की, पुढील अधिवेशनामध्ये हा विषयच येणार नाही.

श्री. व्ही.यू डायगव्हाणे : माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत ठराविक अशाच प्रकारचे उत्तर देत असल्यामुळे आम्ही निषेध करतो.

( सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे व प्रा. बी.टी.देशमुख बहिर्गमन करतात.)

---------------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पाचव्या वेतन आयोगातील शिफारशीनुसार मातृत्व व पितृत्व रजा देण्याच्या कार्यवाहीबाबत**

**(2) * 11865 श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती मंदा म्हात्रे** : **दिनांक 22 जुलै, 2005 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सातव्या यादीतील प्रश्न क्रमांक 1691 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पाचव्या वेतन आयोगानुसार शिक्षक/शिक्षकेतरांसाठी मातृत्व रजा 90 ऐवजी 135 व पुरुष कर्मचाऱ्यांना 15 दिवसांची पितृत्व रजा देण्यासंदर्भात करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झ ाली आहे काय,

(2) असल्यास कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(3) अद्याप कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रश्नी लवकरात लवकर निर्णय व्हावा यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता** : (1) व (2) अंशत: पूर्ण. मातृत्व रजा 90 दिवसाऐवजी 135 दिवस करण्यात आली आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, प्रश्न क्र. 1 मध्ये मातृत्व रजा 90 दिवसांऐवजी 135 दिवस करण्यात आलेली आहे काय ? तसेच पालकांना 15 दिवस पितृत्वाची रजा दिली आहे काय? त्याला उत्तर नाही असे दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, 135 दिवस रजा दिल्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये यासाठी त्यांच्या जागी कंत्राटी पध्दतीने शिक्षकांची नियुक्ती करणार काय ? कारण बऱ्याच शाळांमध्ये 135 दिवस शिक्षिका उपस्थित नसतील तर इतर वर्गाच्या शिक्षकांना ते वर्ग चालविण्यासाठी चार चार तास शिकवावे लागते. याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, पाचव्या वेतन आयोगानुसार मातृत्वाची 90 दिवसांची अगोदर जी रजा देत होतो त्याऐवजी ती रजा 135 दिवस करावी आणि त्या काळात त्या महिलेच्या पतीला देखील 15 दिवस पितृत्वाची रजा देण्यात यावी अशी शिफारस केलेली आहे. पण अजून हा निर्णय आपण स्वीकारलेला नाही. हा निर्णय स्वीकारल्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सूचना केली त्याप्रमाणे आपण रजेच्या काळात विद्यार्थ्यांना पर्यायी शिकविण्याची सोय करुन तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांची नियुक्ती करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 11865.........) पुढे सुरु.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, प्रश्न विचारण्याचा हेतू आणि त्याला दिलेले उत्तर पाहिले तर गाडी रुळावरुन घसरली असल्याचे दिसून येईल. मूळात 90 दिवसांऐवजी 135 दिवस मातृत्वाची रजा महिलांना दिलेली आहे, या प्रस्तावामध्ये शासनाची आता कोणती अडचण आहे ? म्हणून हा निर्णय शासन कधी घेणार आहे ? दुसरे म्हणजे पालकांना 15 दिवसांची पितृत्वाची रजा देण्याबाबतची जी शिफारस केलेली आहे ती शासनाने स्वीकारलेली आहे की नाही, नसल्यास ती कधी स्वीकारण्यात येईल व या दोन्ही शिफारशींच्या संदर्भात वस्तुस्थिती काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींची छाननी होत असून शासनाच्या सर्वच खात्यांमध्ये हा निर्णय लागू करावा लागेल.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, 90 दिवसांऐवजी 135 दिवसांची रजा महिलांसाठी आणि तिच्या पतीसाठी 15 दिवसांची रजा अशा प्रकारची शिफारस पाचव्या वेतन आयोगाने केलेली आहे ती शासनाच्या सर्वच कर्मचाऱ्यांसाठी केलेली आहे की, फक्त शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : राज्यशासनाच्या सर्वच विभागांसाठी, ज्या ज्या ठिकाणी महिला कर्मचारी आहेत, त्या त्या ठिकाणी ही शिफारस लागू राहील.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, शिक्षक वर्षातून एकूण किती दिवस काम करतात ? वर्षातून त्यांना मिळणारी एकूण रजा किती आहे ? माझ्या माहितीप्रमाणे 130 दिवसांपेक्षा कमी काळ शिक्षक काम करतात ही गोष्ट खरी आहे काय ?

हसन मुश्रीफ : महोदय, दिवसेंदिवस अध्यापनाचे दिवस कमी कमी होत असल्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जावर परिणाम होत आहे, हा प्रश्न वारंवार या सभागृहात चर्चेला येतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 18865....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात वारंवार चर्चा झ ाालेली आहे. परंतु यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, रजेमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो तसेच त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या दर्जावर सुध्दा होतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, केंद्रशासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या अहवालात या महिला शिक्षकांच्या रजेच्या संदर्भात शिफारस केलेली आहे त्यामुळे केंद्रशासनाने मातृत्वाची रजा 90 दिवसापासून 135 दिवसापर्यंत केलेली आहे. तसेच पुरुषांसाठी 15 दिवसांची विशेष पितृत्वाची रजा देण्याचा निर्णय घेतला व तो केद्रात लागू देखील केलेला आहे.यासंदर्भातील विषय आपल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत देखील आला होता त्यामुळे पितृत्वाच्या रजेच्या संदर्भात आपल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत कोणता निर्णय झालेला आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय झालेला नाही परंतु यासंदर्भात किती दिवसांच्या रजेची गरज आहे याची चर्चा झालेली आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मातृत्वाचा हक्क फक्त स्त्री शिक्षकांनाच बजावता येतो पुरुष शिक्षकांना बजावता येत नाही हे खरे आहे का? असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी विचारला होता परंतु त्याला उत्तर मिळाले नाही.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, पाचव्या वेतन आयोगात स्पष्ट केले आहे की, महिलांना बाळंतपणासाठी.........

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भात मला मंत्रीमहोदयांना विचारावयाचे आहे की, शिक्षकेतर कर्मचां-यांना मातृत्व रजा दिली जाते परंतु ही सवलत दोन अपत्याच्यावरील कर्मचा-यांना मिळणार नाही असा निर्णय घेतला जाणार आहे काय? जास्त अपत्य असेल तर लोकप्रतिनिधींची आमदारकी जाते, सरपंच पद जाते त्यामुळे यासंदर्भात ज्यांना दोन अपत्य असतील त्यांना सवलत मिळणार नाही असा नियम करा.

श्री. हसन मुश्रीफ : दोन अपत्यांनंतर मातृत्वाची रजा न देण्याच्या संदर्भात शासन विचार करीत आहे परंतु आपण जी सूचना केली त्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात येईल. सजेशन फॉर ॲक्शन.

----------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नांदागोमुख (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील पशुवैद्यक दवाखान्यात डॉक्टर नसल्याबाबत**

**(४) * ११३४२ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर, श्री.सागर मेघे, श्री. जगदिश गुप्ता :**
सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदागोमुख (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील पशुवैद्यक दवाखान्यात गेल्या अनेक महिन्यांपासून डॉक्टर नसल्यामुळे या भागातील अनेक गरीब शेतकऱ्यांच्या बकऱ्या व इतर पाळीव जनावरांचा माहे सप्टेंबर, २००५ मध्ये औषधोपचाराअभावी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्यामुळे त्यांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २००५ रोजी वा त्यासुमारास मा.पशुसंवर्धन मंत्री यांच्याकडे व अन्य संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच पशुवैद्यक दवाखान्यात संबंधित डॉक्टर वारंवार गैरहजर राहत असल्यामुळे त्यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री. अनिस अहमद यांच्या करिता**: (१) नाही.

(२) होय.

(३) डॉक्टर वारंवार गैरहजर राहतात हे खरे नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, नांदोगोमुख या गावातील केशव पुजाराम मिलमिले या शेतक-याच्या 14 बक-या आजारी पडल्या होत्या. त्यामुळे हा शेतकरी आपल्या बक-या नांदोगोमुख पशुवैद्यकीय दवाखान्यात घेऊन गेला. परंतु या दवाखान्या डॉ. कधीही हजर रहात नाही त्यामुळे जनावरावंर त्या दवाखान्याचा कंपाऊडर उपचार करीत असतो. अशा प्रकारे या शेतक-याला त्या कंपाऊंडरने औषधे लिहून दिली लिहून दिलेली औषधे खरेदी करण्यासाठी या शेतक-याला 3000 रुपये लागले. या शेतक-याने ही औषधे आपल्या बक-यांना दिल्यानंतर शेतक-यांच्या 14 बक-या मरण पावल्या त्यामुळे या गरीब शेतक-याचे साधारणत: 15 ते 20 हजार रुपयांचे नुकसान झ ाालेले आहे. सभापती महोदय, डॉक्टर नसल्यामुळेच या गरीब शेतक-याचे नुकसान झालेले आहे. या पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉक्टर कधीही रहात नाही. यासंदर्भात तेथील शेतक-यांनी अनेक वेळेला जिल्हाधिका-यांकडे तक्रारी केलेल्या आहेत. परंतु असे असतांनाही हा डॉक्टर दवाखान्यात कधीही उपस्थित राहत नाही. या डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळेच गरीब शेतक-याचे नुकसान झालेले असल्यामुळे व हा डॉक्टर पशुवैद्यकीय दवाखान्यात राहत नसल्यामुळे त्याच्यावर कारवाई केली जाईल काय?

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGJ/ MHM/ KGS/ (पूर्वी श्री. खर्चे ) 11:20

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उत्तरामध्ये सांगितले आहे की, हे खरे नाही. डॉक्टर नसल्यामुळे बक-या मेल्या असतील तर निश्चितपणे यासंदर्भात चौकशी केली जाईल. सन्माननीय विरोधीपक्ष नेते जे काही सांगत आहेत ते सत्य समजून यासंदर्भात चौकशी केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉक्टर उपस्थित न राहिल्यामुळे सप्टेंबर महिन्यात गरीब शेतक-याच्या 14 बक-या मेलेल्या आहेत. या गरीब शेतक-याच्या बक-या मेल्या तरी या शेतक-याला कुठल्याही प्रकारची मदत मिळालेली नाही. या ठिकाणी डॉक्टर उपस्थित राहत नाही म्हणून अनेक वेळेला तक्रारी झालेल्या आहेत असे असतांना शासन या डॉक्टराला पाठीशी का घालीत आहे हे काही समजत नाही. त्यामुळे या डॉक्टरावर कारवाई केली जाणार आहे काय?

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ MHM/ जुन्नरे... 11:25

ता.प्र.क्र.11342....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तिथे डॉ.पुरी होते. त्यांची 30.7.2005 रोजी बदली झ ााली होती. आता तिथे दिनांक 10.10.2005 पासून डॉ.झांबरे यांची बदली केली आहे. या दोधा डॉक्टरांना आपण दवाखान्याच्या चार्ज दिला होता. मला जी माहिती मिळाली आहे त्यात असे म्हटले आहे की, अशी वस्तुस्थिती नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते सत्य सांगत आहेत असे गृहीत धरून त्याची चौकशी करण्यात येईल असे मी म्हणालो. परंतु, मरण पावलेल्या बकऱ्यांना मदत करण्याची व्यवस्था शासनाच्या स्थायी आदेशामध्ये नाही. तरी सुध्दा या प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई निश्चितपणाने केली जाईल.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, ही तक्रार फक्त विदर्भापुरती मर्यादित नाही. मराठवाडा, पुणे, सांगली, सातारा या भागातसुध्दा अतिवृष्टी झाली आहे. या भागात देखील हजारो मेंढया मृत्युमुखी पडलेल्या आहेत. हे सरकारने कालच्या निवेदनात मान्य केले आहे. ज्यावेळी मेंढया मरत होत्या त्यावेळी वैद्यकीय अधिकारी तिथे हजर नव्हते. त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारची औषधे नव्हती. सर्वांत कडी म्हणजे यासंबंधी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कुठल्याही प्रकारचे आदेश नव्हते की, मरणाऱ्या मेंढयांना लसीकरण करा. तेव्हा मंत्रिमहोदय वैद्यकीय अधिकाऱ्यांना स्डँडिंग ऑर्डर देणार का की, एखादा मेंढपाळ मेंढया आजारी आहेत अशी तक्रार घेऊन आल्यानंतर ताबडतोब लसीकरण करावे. अशा ऑर्डर्स् आपण संपूर्ण महाराष्ट्रासाठी काढणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कालच्या 93 च्या चर्चेला मी उत्तर दिलेले आहे. त्यावेळी सांगितले होते की, 100 वर्षात कधी पडला नव्हता इतका पाऊस जुलै महिन्यात झालेला आहे. या अतिवृष्टीत पाणी तुंबल्यामुळे मेंढयाना पीपीआर नावाचा रोग झाला. हा रोग पाण्यामुळे होतो. त्याच वेळी सांगितले होते की, लसीकरणाचा आदेश देऊ. पुणे जिल्हयामध्ये 4000 च्या वर मेंढया दगावल्या आहेत. या संबंधीची चौकशी करू असे उत्तर मी कालच दिलेले आहे. शेळया-मेंढयांचे लसीकरण करण्यात यावे यासंबंधी शासनाच्या स्टँडिग ऑर्डर्स् आहेत. लसीकरण करण्यात येत नसेल तर मला निश्चितपणाने सांगावे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे औषधे नाहीत.

श्री.हसन मुश्रीफ : वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे औषध नाहीत अशी तक्रार पुन्हा येणार नाही.

.....

..2..

**अनुदानास निकषपात्र ठरणाऱ्या माध्यमिक शाळांची यादी जाहीर करणे व अनुदान मंजूर करणे**

**(५) * ९३३० श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. वसंतराव खोटरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००४-२००५ पासून अनुदानास निकषपात्र ठरणाऱ्या माध्यमिक शाळांची यादी जाहीर करुन अनुदान मंजूर करावे याबाबतचे एक निवेदन सरकार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २५ ऑगस्ट, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान पाठविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केलेली आहे,

(३) अद्यापही कार्यवाही केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ ,प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता**: (१) होय.

(२) व (३) दिनांक १७ फेब्रुवारी २००४ च्या शासन निर्णयात विहित करण्यात आलेल्या सुधारित तरतुदीनुसार, मे २००४ मध्ये केलेल्या मूल्यांकनात ज्या माध्यमिक शाळा अनुदानासाठी अपात्र ठरल्या होत्या अशा मान्यताप्राप्त विनाअनुदानित माध्यमिक शाळांचे आणि सन २०००-२००१ मध्ये विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांचे अनुदान पात्रतेसाठी मूल्यांकनाचे आदेश जिल्हा समिती व राज्य समितीस देण्यात आले होते. सदर मूल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरणाऱ्या माध्यमिक शाळांची यादी दिनांक २७ ऑक्टोबर, २००५ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आली आहे.

----------

श्री.व्हि.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझे निवेदन याठिकाणी कोट केले आहे. मी निवेदनामध्ये दोन गोष्टींचा उल्लेख केला आहे. पहिली गोष्ट अशी होती की, 2004-2005 मध्ये निकष पात्र ठरणाऱ्या शाळांची यादी जाहीर करा आणि त्याचप्रमाणे अनुदान देण्यात येईल काय ? यापैकी एकाला उत्तर आले आहे तर एकाला नाही. सभागृहामध्ये गुरूपौर्णिमेच्या दिवशी सभापती महोदय, आपण निदेश दिले होते की, काही तरी गुरूदक्षिणा द्यावी. त्यावेळी गुरूदक्षिणा देण्यासाठी 15 ऑक्टोबर पर्यंत यादी जाहीर करतो असे मंत्रिमहोदयांनी सांगितले होते. ती यादी आपण 27 ऑक्टोबरला जाहीर केली. त्याबद्दल आम्ही आभारी आहोत. 915 निकष पात्र शाळांची यादी आपण जाहीर केली. पण नुसती यादी जाहीर करून भागणार नाही. ही सलगी प्रक्रिया आहे. आपला जी.आर. आहे. जी.आर.मध्ये टाईमबाऊंड प्रोग्रॅम आहे. चार वर्ष काही नाही. पाचव्या वर्षापासून 20 टक्के आणि नवव्या वर्षी 10 टक्के. आपण जी यादी जाहीर केली आहे, ती बरोबर आहे. पण



अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.व्हि.यू.डायगव्हाणे....

त्यासोबत अनुदान देखील महत्त्वाचे आहे. आपण जी.आर.ची अवहेलना करीत आहात. जी.आर.प्रमाणे वागत नाही. शाळांची आणि तुकडयांची मुदत संपूनही 2-2 वर्ष अनुदान देत नाहीत. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या 915 शाळा आहेत, या शाळांचे अनुदान आपण जाहीर केले आहे म्हणून येत्या मार्च पर्यंत या शाळांना अनुदानावर आणण्याचे काम केले जाईल का ? आणि तुकडयांच्या संदर्भात देखील निर्णय घेतला जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. यासंबंधीचे व्यवस्थित उत्तर मी दिले की राज्यामध्येच माध्यमिक शाळांच्या अनुदानाचा प्रश्न उपस्थित होणार नाही. सन 2004-2005 पर्यंत एकूण 1249 शाळांचे मूल्यांकन व्हावयाचे होते. ते मूल्यांकन झाले. त्यानुसार 915 पात्र शाळांची यादी जाहीर केली आहे. 303 शाळा अपात्र ठरलेल्या आहेत. त्यांचे मूल्यांकन यावर्षी देखील चालू आहे. 915 शाळांपैकी 840 शाळा हया बिगर आदिवासी आहेत. 75 शाळा आदिवासी आहेत. या 75 शाळांचे आपण 40 टक्के, 20 टक्के अनुदान पुरवणी मागण्यामध्ये मंजूर केले आहे. आता 840 शाळा राहिल्या आहेत. त्या 40 टक्क्यावर आलेल्या आहेत, काही जास्त टक्क्यावर आहेत. याच पुरवणी मागणीमध्ये 28 कोटी रुपये लागतात ते द्यावे अशी मागणी केली होती.

यानंतरश्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9330....

श्री.हसन मुश्रीफ.........

पूर परिस्थितीमुळे बजेटच्या वेळी आऊट ले वाढवून देऊ असे वित्त विभागाने सांगितल्यामुळे येत्या मार्च महिन्यात मी आणि मंत्रिमहोदय प्रा.पुरके अर्थमंत्री आणि संबंधित विभागाशी चर्चा करणार आहोत. आम्ही वचन दिल्याप्रमाणे यादी केलेली आहे. मार्च महिन्यात अनुदान देण्याचे काम निश्तिचपणे करु.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी यादी जाहीर करा अशी जी मागणी केली त्याप्रमाणे आपण यादी जाहीर केलेली आहे. जे निकषपात्र नाहीत त्यांच्या विषयी बोलत नाही. त्यांची दुसरी मागणी म्हणजे त्यांना अनुदान केव्हा देणार ? माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आपण 31 मार्च पर्यंत त्यांना अनुदान दिले जाईल असे येथे ठामपणे सांगाल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आम्हाला मार्च महिन्यात द्यावे लागणार आहे. फक्त 304 शाळांचे मूल्यांकन शिल्लक राहिलेले आहे. 304 अधिक 150 असे एकूण साधारत: 500 शाळांचे मूल्यांकन बाकी आहे. शिल्लक राहिलेल्या शाळा या कायम विनाअनुदानीत असल्यामुळे त्याबाबत धोरण ठरविणार आहोत. परंतु या वर्षी हे सर्व बंद होईल असे मला वाटते.

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर भ्रमित करणारे आहे. यासंबंधी पुरवणी मागण्यांमध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. सरकार हा निधी कोणत्या पध्दतीने उपलब्ध करणार आहे ? कारण मागच्या वर्षी 20 टक्केला पात्र असूनसुध्दा अतिशय नियोजनबध्द पध्दतीने कोणतेही नियोजन न करता हे टाळलेले आहे. आता सुध्दा निधी न देण्यासाठी ही यादी उशिरा जाहीर केली. यासंबंधी बजेटमध्ये तरतूद केलेली नाही असा माझा आरोप आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, बजेटमध्ये तरतूद केलेली नसताना आपण हा निधी कसा उपलब्ध करणार आहात ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9330.......

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे भ्रमित करणारे उत्तर आहे असा जो हेत्वारोप केलेला आहे तो चुकीचा आहे असे मला वाटते. आम्ही यादी जाहीर करुन असे वचन दिले होते. आम्ही ही यादी पारदर्शीपणे इंटरनेटवर दिलेली आहे. पूर परिस्थितीमुळे पूरक मागणीमध्ये आऊट ले उपलब्ध नव्हता. म्हणून प्लॅनिंग सबकमिटी बरोबर चर्चा करुन आम्ही आऊट ले वाढवून घेत आहोत आणि ते मार्चच्या बजेटमध्ये आणणार आहोत.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पर्यावरणाला हानी पोचविल्याने महाबळेश्वर व पाचगणी येथील 38 हॉटेलांना त्यांचा व्यवसाय बंद करण्याच्या देण्यात आलेल्या नोटीसा**

**(6) * 10700 डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब , श्री. अरविंद सावंत , श्री. अनंत तरे** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाबळेश्वर व पांचगणी या थंड हवेच्या ठिकाणच्या सुमारे 38 मोठया हॉटेल मालकानी पर्यावरणाला हानी पोचविल्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांची हॉटेल बंद करण्याच्या नोटीसा माहे सप्टेंबर, 2005 मध्ये बजावल्या हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर हॉटेल मालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक** : (1) होय.

(2) होय.

(3) चौकशीअंती असे आढळून आले की, मे-2005 मध्ये मंडळाने दिलेल्या आदेशानुसार सुमारे 38 हॉटेल मालकांनी सांडपाणी नियंत्रण प्रक्रिया बसविलेली नाही. म.प्र.नि. मंडळाकडे संमतीपत्रासाठी अर्ज केलेला नाही. वरील बाबींची पूर्तता करण्यासाठी रु.5000/- ची बँक हमी पत्र दिलेले नाही. त्यामुळे त्यांना हॉटेल बंद करण्याच्या नोटिसा सप्टेंबर-2005 मध्ये बजाविण्यात आल्या होत्या. याबाबत सदर हॉटेल संस्थांना सुनावणी देण्यात आली होती. सुनावणीनंतर सदर हॉटेलना प्रदूषण नियंत्रण उपाययोजना करण्यासाठी डिसेंबर, 2005 पर्यंत मुदत देण्याचे प्रस्तावित केले होते. त्यास मा. मुंबई उच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कोणत्याही व्यावसायिकांना तो व्यावसायिक आहे म्हणून त्रास द्यावयाचा ही भूमिका असता कामा नये. तसेच सर्वसामान्य पर्यटक याठिकाणी जातात त्यांच्या आरोग्याविषयीचे प्रश्न अतिशय महत्वाचे आहेत. हा प्रश्न उपस्थित करण्यामागील हेतू असा की, या हॉटेलमधील सांडपाणी ज्या तलावात सोडले जात होते तो वेण्णा तलाव एक प्रेक्षणीय स्थळ आहे. त्याच तलावातील पाणी महाबळेश्वरातील पर्यटक आणि नागरिकांसाठी वापरले जाते. त्या तलावात हॉटेलमधील सांडपाणी सोडले जात आहे अशा प्रकारची जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. त्या अगोदर प्रदूषण मंडळाने कोणती कार्यवाही केली होती का ? प्रदूषण मंडळाने यात लक्ष घातले होते काय ? आपण उत्तरामध्ये म्हटलेले की, त्यांना वेळ देण्यात आलेला आहे. या वेळेमध्ये तेथे अनेक हॉटेल्स उभी राहिली आहेत, त्या हॉटेलच्या सांडपाण्याया व्यवस्थेबाबत प्रदूषण मंडळाने कोणती पावले उचलली आहेत ? हे सांडपाणी कोठे सोडले जात आहे ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10700....

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, महाबळेश्वर आणि पांचगणी ही पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे या परिसराला सेंसेटीव्ह परिसर म्हणून जाहीर केलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वेण्णा तलावामध्ये त्या ठिकाणच्या सर्व हॉटेल्सचे सांडपाणी सोडले जात आहे अशी माहिती दिली ती खरी आहे. त्या अनुषंगाने या परिसरातील हॉटेल्सना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे नोटीस इश्यू करण्यात आली. त्यामध्ये नमूद करण्यात आले की, हॉटेल्सनी सांडपाणी बाहेर सोडण्यासाठी एकतर स्वत:ची यंत्रणा निर्माण करावी किंवा ते सांडपाणी नगरपालिकेच्या गटारातून बाहेर काढावे. त्यानुसार ज्यांनी स्वत:ची यंत्रणा निर्माण केली आहे त्यांच्यावर कारवाई केलेली नाही. परंतु ज्यांनी अजूनही स्वत:ची यंत्रणा निर्माण केली नाही त्या हॉटेल्सच्या वीज आणि पाण्याची व्यवस्था खंडीत करण्यात आली आहे. त्यामुळे हॉटेल व्यावसायिक कोर्टामध्ये गेले. कोर्टाने त्यांना स्वतंत्र सांडपाणी व्यवस्था निर्माण करण्यासाठी कालखंड दिलेला आहे. त्या कालखंडात त्यांना आपली सांडपाणी व्यवस्था निर्माण करावी लागणार आहे. भविष्यकाळात जे कोणी हॉटेल व्यावसायिक त्या परिसरात येतील त्या सर्वांना हे बंधन लागू पडणार आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, उत्तरामध्ये तीन बाबी दर्शविण्यात आलेल्या आहेत. त्यातील पहिली बाब म्हणजे प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या आदेशानुसार 38 हॉटेल मालकांनी अजूनही सांडपाणी नियंत्रण प्रक्रिया बसविलेली नाही. दुसरी बाब महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे संमतीपत्रासाठी अर्ज केलेला नाही आणि तिसरी बाब म्हणजे याची पूर्तता करण्यासाठी रु.5 हजार बँक हमी पत्र दिलेले नाही. या अनुषंगाने माझे एक-दोन प्रश्न आहेत. वास्तविक पाहता शहराला सर्व सुविधा देणे स्थानिक स्वराज्य संस्थेचे बंधनकारक कर्तव्य आहे. महाबळेश्वर महानगरपालिकेने सांडपाण्यासाठी गटारे बांधलेली नाहीत. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांबरोबरच त्या महानगरपालिकेवर सुध्दा कारवाई होणे आवश्यक होते. त्यानुसार त्या महापालिकेवर कारवाई करणार आहात काय ? तसेच ज्येष्ठ नागरिकांनी कोर्टामध्ये जनहित याचिका दाखल केलेली आहे. त्यात शासन आणि नगरपालिकेला त्यांनी पार्टी केलेले आहे. या याचिकेच्या दृष्टीने महानगरपालिकेने काय म्हणणे मांडले आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांना सांगू इच्छितो की, महानगरपालिकेने जे ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे त्यामध्ये दिनांक 31/1/2006 पर्यंत महानगरपालिकेमार्फत सांडपाण्याची स्वतंत्र यंत्रणा निर्माण करुन, भविष्यात अशाप्रकारे दूषित पाणी बाहेर टाकले जाणार नाही असे नमूद केलेले आहे.

श्री.विलास अवचट : येत्या 31 जानेवारी 2006 पर्यंत महापालिका स्वतंत्र सांडपाणी व्यवस्था करणार हे योग्य आहे. परंतु व्यक्तीगत स्वरुपाचे सांडपाणी बाहेर टाकले गेले तर आरोग्याला मोठया प्रमाणावर धोका निर्माण होईल असे मला वाटते.

श्री.गणेश नाईक : दिनांक 31 जानेवारी, 2006 पर्यंत सांडपाण्याची स्वतंत्र व्यवस्था करणे महानगरपालिकेला भाग आहे. हा कालखंड पूर्ण होईपर्यंत त्यांनी दिलेला शब्द पाळला नाही असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. हा कालखंड उलटल्यानंतरही जर त्यांनी स्वत:ची सांडपाणी नियंत्रण व्यवस्था केली नाही तर त्यांच्यावर कारवाई करु.

डॉ.अशोक मोडक : महोदय, त्या परिसरात प्रवेश केल्यानंतर नागरिकांकडून टोल वसूल केला जातो. आपण हॉटेल मालकांवर बंधन आणल्याबद्दल आपले स्वागत करतो. परंतु या महानगरपालिकेवर काही बंधन आहे की नाही ? त्यामुळे तेथील महापालिका जर आपल्या कर्तव्यापासून बाजूला जात असेल तर नगर विकास विभागाकाडून काही ॲक्शन घेतली जाणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : महोदय, नगरपालिकेला नोटीस देण्यात आली आहे आणि त्यानुसार त्यांनी न्यायालयात ॲफिडेव्हिट सुध्दा सादर केलेले आहे. न्यायालयाने ॲप्रूव्हल दिलेले आहे आणि त्यानुसार कोर्टाने महानगरपालिकेला स्वत:ची सांडपाणी व्यवस्था करण्यासाठी 31/1/2006 पर्यंत कार्यमर्यादा दिलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कोर्टाने दिलेला कालखंड पूर्ण होण्याची वाट पाहत आहे. 31 जानेवारी, 2006 पर्यंत जर महापालिकेने व्यवस्था केली नाही तर त्या महापालिकेवर सुध्दा कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, वेंगळा तलावात हॉटेलमधील सांडपाणी जात आहे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. अजूनही त्या तलावात ते सांडपाणी जात आहे काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : महोदय, बऱ्याचशा हॉटेल्सनी स्वत:ची सांडपाण्याची स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली आहे. पूर्वीच्या कालखंडात त्या तलावामध्ये जेवढे सांडपाणी जात होते त्यापेक्षा निश्चितच कमी प्रमाणत आता पाणी जात आहे. येत्या एक-दीड महिन्याच्या कालखंडानंतर सांडपाणी त्या तलावात जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10700..

डॉ.दीपक सावंत : माझ्या माहिती प्रमाणे केन्द्र सरकारने एको सेन्सेटीव्ह झोन म्हणून जाहीर केलेला आहे.त्या झोनमध्ये महाबळेश्वर आणि पाचगणीसुध्दा येते. त्या नियमानुसार नगरपालिका आणि हॉटेलला केन्द्र सरकारच्या नोटीसेस पाठविण्यात आलेल्या आहेत. जो पर्यन्त नगरपालिका तशी व्यवस्था करीत नाही तोपर्यन्त या आदेशाला स्थगिती देण्यात येणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : कोणत्याही घटकाला उद्योग सुरु करीत असतांना "consent to establlish, consent to operate " अशा प्रकारच्या दोन परवानग्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्फत दिल्या जातात.या लोकांनी शिस्त पाळली नव्हती परंतु आता ते शिस्त पाळणार आहेत. पर्यटकांची अडचण होऊ नये हे लक्षात घेऊन हॉटेल्स चालू ठेवूनच त्यांना मुदत दिलेली आहे. त्या मुदतीत जर कार्यवाही केली नाही तर निश्चित पणे ही हॉटेल्स बंद केली जातील.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर शिमगा सत्याग्रह करण्याचे दिलेले निवेदन**

**(७) * ९३८६ श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील ५ वी ते १० वीच्या विना अनुदानित वर्ग तुकड्यांना शासनाचे निकषाप्रमाणे अनुदान मंजूर करावे या मागणीसाठी उस्मानाबाद माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २५ ऑक्टोंबर, २००५ रोजी "शिमगा सत्याग्रह" आयोजित करण्याबाबतचे एक निवेदन सरचिटणीस, मराठवाडा शिक्षक संघ यांनी दिनांक ७ ऑक्टोंबर, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान मा. शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केलेली आहे,

(३) अद्यापही कार्यवाही केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वसंत पुरके** : (१) होय.

(२) व (३) खाजगी माध्यमिक शाळांना विनाअनुदान तत्वावर जोडलेल्या इयत्ता ५ वी ते ७ वीचे अनुदानास पात्र वर्गासाठी व इयत्ता ५ वी ते १० वीच्या विनाअनुदानित तत्वावरील अनुदानास पात्र तुकडयांसाठी सन २००५-०६ या वार्षिक योजनेत अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, अनुदानाच्या संदर्भातील प्रश्न पुन्हा उपस्थित करावा लागत आहे. तुकडयांच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. शासनाने वेळोवेळी जी.आर. काढले असून त्या जी.आर.मध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की सुरुवातीची चार वर्षे अनुदान मिळणार नाही आणि पाचव्या वर्षापासून 20 टक्के, नवव्या वर्षी 100 टक्के अशा प्रकारे अनुदान देण्यात येईल. पंरतु जी.आर.ची अंमलबजावणी होत नसल्यामुळे सभागृहात प्रश्न उपस्थित करावा लागतो व त्यामुळे सभागृहाचा वेळ वाया जातो.मराठवाडयामध्ये शिक्षकांना "शिमगा सत्याग्रह "करावा लागला आहे.यापुढे कोणताही सत्याग्रह या शिक्षकांवर करण्याची वेळ येणार नाही याची काळजी घेऊन पाचवी ते दहावी पर्यन्तच्या तुकडया व अकरावी आणि बारावीच्या तुकडयापैकी ज्या तुकडया निकषपात्र आहेत त्या तुकडयांना मार्च पूर्वी शासन अनुदान देणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : 25 ऑक्टोबरला या शिक्षकांनी "शिमगा आंदोलन" केले आहे ते दिवाळीला केलेले आहे...

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :पाच दहा वर्षे हे शिक्षक वेतनापासून वंचित राहिलेले आहेत त्यांनी काय करावयाचे.? लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.शासन निवेदनाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उत्तर देत नाही. त्याबाबतीत चर्चा घेत नाही, आमचे म्हणणे ऐकत नाही.त्यामुळे या शिक्षकांना शिमगा आंदोलन करावे लागत आहे.

श्री.हसन मुश्रीफ : प्रा.वसंत पुरके यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण खात्यात अनेक अमुलाग्र बदल करण्यात आले आहेत. ज्या जिल्हास्तरीय योजना होत्या त्या राज्यस्तरीय केल्या , पगार एक तारखेला दिला, शासनाची आर्थिक अडचण असतांनासुध्दा ब-याच गोष्टी दिल्या त्याबाबतीत धन्यवाद दिले जात नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : शासनाने जी.आर. काढला आहे ना ? त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे.

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय या एकूण 3839 तुकडया आहेत. अशासकीय माध्यमिक शाळांचा विकास आणि विस्तार अशी आमची योजना आहे. 1 ते 70 मुले असेल तर एक तुकडी तुकडी द्यावयाची आणि 71 ते 120 मुले असतील तर दोन तुकडया द्यावयाच्या आहेत त्यातील काही तुकडया आता 20 टक्के अनुदानावर आल्या आहेत आणि काही 40 टक्यावर आल्या आहेत. काही 60 टक्यावर आल्या आहेत. यावेळी आम्हाला नियतव्यय उपलब्ध झाला नाही म्हणून आम्ही आता नियतव्यव उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.मार्च महिन्यामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये या तुकडयांना नियतव्यय उपलब्ध करुन अनुदान देऊ.

--

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12179

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे आज अनुपस्थित असून त्यांनी आपल्याला त्याबद्दल पत्र पाठवून कळविलेले आहे का ?.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्या प्रापंचिक अडचणीमुळे ते तातडीने मुंबईला गेले असून आज सभागृहात अनुपस्थित राहत असल्याबद्दल त्यांनी माझी पूर्व परवानगी घेतलेली आहे आणि मी ती मान्य केलेली आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरापासून मराठी व इंग्रजीचे ज्ञान देण्याचा प्रस्ताव**

**(९) * ९४२२ डॉ. दिपक सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब , श्री. अरविंद सावंत , श्री. अनंत तरे , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंग्रजी शाळेतील मराठी व मराठी शाळेतील इंग्रजी विषयाचा दर्जा वाढविण्याचा प्रस्ताव राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्य शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, सध्या इंग्रजी व मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांना शिकविण्यात येणाऱ्या मराठी व इंग्रजी विषयांमुळे अनेक विद्यार्थी मागे पडत असल्याचे बोर्डाच्या निदर्शनास आल्याने प्राथमिक स्तरापासून विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजीचे दर्जेदार ज्ञान देण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाला शासनाची अंतिम मंजूरी मिळाल्यास २००६-०७ पासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय ?

**प्रा. वसंत पुरके** : (१) होय. हे खरे आहे. इयत्ता ९ वी व १० वी मध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठी (प्रथम) भाषा विषय अभ्यासण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी, आणि इयत्ता ९ वी व १० वी मध्ये मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना इंग्रजी (प्रथम) भाषा विषय अभ्यासण्याचा पर्यायउपलब्ध करुन देण्यासाठी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला असून शासनाने या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

(२) नाही. वरील प्रश्न (१) च्या उत्तरात नमूद केल्याप्रमाणे अतिरिक्त पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे, हा हेतू आहे.

(३) होय. शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. इयत्ता ९ वी मध्ये २००६-०७ पासून अंमलबजावणी होणार आहे.

डॉ.दीपक सावंत : हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.इंग्रजी माध्यमामध्ये शिकणा-या विद्यार्थ्याचे मराठी कच्चे असते आणि मराठी माध्यमातून शिकणा-या विद्यार्थ्याचे इंग्रजी कच्चे असते त्यांना कॉलेजमध्ये गेल्यानंतर त्रास होत असतो म्हणून मी हा प्रश्न उपस्थित करीत आहे माझा प्रश्न असा आहे की, नववी आणि दहावी च्या विद्यार्थ्यांना पर्याय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे परतु तत्पूर्वी प्राथमिक स्तरावर मराठी शाळेमध्ये इंग्रजी आणि इंग्रजी शाळेमध्ये मराठी अशा प्रकारे एच्छिक विषय( प्रथम ) भाषा घेण्याच्या बाबतीत या प्रस्तावात सुधारणा करण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9422 ...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तेच करण्याचा आमचा प्रयत्न आहे. इयत्ता 9वी व 10वी साठी जून 2006 पासून आपण हे करणार आहोत. आतापर्यंत आपण इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून इंग्रजी हा विषय उच्च आणि मराठी लोअर, व हिंदी आणि अन्य भाषा या लोअर म्हणूनच घेतल्या जायच्या. तसेच मराठी माध्यमातून मराठी विषय हा उच्च आणि इंग्रजी लोअर म्हणून घेतला जायचा परंतु आता इंग्रजी माध्यमातून देखील इंग्रजी हा विषय उच्च राहीलच पण त्याबरोबर मराठी देखील उच्च करण्याचा आपला प्रयत्न राहील.

डॉ. दीपक सावंत : त्यापूर्वी आपण करण्याचा प्रस्ताव घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या इंग्रजी माध्यमांच्या शाळांतून मराठी बोलणारी मुले असूनही त्यांचे मराठी लोअर होते म्हणूनच हा प्रयत्न आहे. तेथे इंग्रजी हा विषय उच्च आहे त्याबरोबरच मराठी विषय देखील उच्च करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. तसेच मराठी माध्यमातील शाळांमध्ये इंग्रजी हा विषय 3 नंबरवर होता त्यालाही 2 नंबरवर आपण घेत आहोत.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, यहां प्रश्न भाषा के दर्जे के बारे में है. भाषा का दर्जा 9 वीं या 10 वीं कक्षा में तय नहीं होता है, बल्कि यह प्राथमिक स्तर पर तय होता है. मैं मंत्री महोदय से यह पूछना चाहती हूँ कि प्राथमिक स्तर पर मराठी और अंग्रेजी भाषा का दर्जा बढ़ाने के लिए शासन की तरफ से क्या उपाय-योजना की जा रही है ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या वर्षी आम्ही प्रयोग करून पहिली पासूनच ते करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मूळ मुद्दा या ठिकाणी असा आहे की, आपण मराठीची किती अवहेलना रोज करतो आहोत हे आपण रोजच पाहतो आहे. अगदी आजचेच उदाहरण सांगावयाचे तर यापूर्वीच्याच प्रश्नामध्ये आपण असे लिहिलेले आहे की, ' महाबळेश्वर व पाचगणी या थंड हवेच्या ठिकाणच्या सुमारे 38 मोठ्या हॉटेल मालकांनी पर्यावरणाला हाणी पोचविल्याने ....' म्हणजे या 'हानी' शब्दामध्ये न हा नळातील आहे की बाणातील आहे हेही आपण लक्षात घेतलेले नाही. ही मराठीची अवहेलना नाही तर आणखी काय आहे ? म्हणूनच या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारले की, इयत्ता 9वी व 10वी पर्यंतचा हा मर्यादित प्रश्न नाही तर मराठी मुलांना इंग्रजीचे ज्ञान चांगले नसल्याने ती मागे पडतात. आणि

..... ओ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (पुढे चालू..) ता.प्र.क्र. 9422 ...

इंग्रजीतून शिकणाऱ्यांना मराठीचे चांगले ज्ञान नसते तेव्हा या दोन्ही बाबतीत आपण सर्वंकष विचार करून त्यांना मूलतः इंग्रजी भाषादेखील आली पाहिजे. कारण शेवटी इंग्रजी ही जगातील ज्ञान मिळवून देणारी खिडकी आहे पण मराठी ही आई आहे असे कुसुमाग्रजांनीच म्हटलेले आहे तेव्हा मराठीकडे आपण पूर्णतः दुर्लक्ष करणेही बरोबर नाही. इंग्रजी विषय हा मराठी शाळांमध्ये पहिली पासून शिकविला जावा आणि इंग्रजी शाळांमध्ये देखील पहिली पासून मराठी विषय शिकविला जावा असा प्रयत्न सरकार करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पुढील वर्षी पासून आपण तेच करीत आहोत मात्र या वर्षी आपण ते प्रयोग म्हणून करीत आहोत. शेवटी आपला प्रयत्न आपण म्हणता तोच आहे.

*****

..... ओ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील वसई-नालासोपारा पूर्व टाकी रोड येथे रॉकेलचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्तीस झालेली अटक**

**(10) * 10752** **श्री. अनंत तरे** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) ठाणे जिल्हयातील वसई-नालासोपारा पूर्व टाकी रोड येथे रॉकेलचा काळाबाजार करणाऱ्या भाईलाल सरोज याला दिनांक 31 जुलै 2005 रोजी वा त्यासुमारास अटक करुन 1 हजार 540 लिटर रॉकेल जप्त केले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रॉकेलचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल तटकरे** : (1) पुरवठा निरीक्षक, वसई यांनी वसई-नालासोपारा पूर्व टाकी रोड येथे दिनांक 26.07.2005 रोजी धाड टाकून 1540 लिटर केरोसीनचा अनधिकृत साठा जप्त केला हे खरे आहे.
(2) होय.
(3) श्री. भाईलाल सरोज ही व्यक्ती केरोसीनची अनधिकृतपणे काळ्या बाजारात विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तु कायदा, 1955 अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या ठिकाणी रेशन कार्डवर केरोसीन मिळत नाही परंतु बाहेर मात्र पाहिजे तेवढे केरोसीन उपलब्ध होते. या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेली श्री.भाईलाल सरोज ही व्यक्ती परवानाधारक आहे काय ? असल्यास, त्याचा परवाना रद्द आपण केला आहे काय ? तसेच आपण धाड टाकल्यानंतर तेथे जो 1540 लीटर केरोसीनचा अनधिकृत साठा सापडला त्यावर आपण काय कारवाई केली तसेच हा इतका मोठा केरोसीनचा साठी या आरोपींकडे कोठून व कसा आणला गेला याचा तपास आपण केला आहे काय, असल्यास त्यात काय आढळले ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या श्री. भाईलाल सरोज यांच्याकडे कोठल्याही प्रकारचे रॉकेलची विक्री करण्याचा वा साठविण्याचा परवाना नव्हता आणि त्यामुळे त्यांचा परवाना रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ज्या दिवशी हा अनधिकृत साठा सापडला त्याच दिवशी संबंधितांवर पोलीस कारवाई करण्यात आली असून त्यांना अटकेमध्ये ठेवण्यात आले होते व 30.7.2005 ला त्यांना जामीन देण्यात आलेला आहे.

..... ओ 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.ञ 10752 ...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माझ्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. मी विचारले होते की, हे 1540 लीटर रॉकेल त्यांनी कोठून आणले, कसे आणले याचा तपास आपण केला आहे काय ? असल्यास, त्यात काय आढळून आले आणि हा इतका अनधिकृत साठा जेथे सापडला त्या घरावर किंवा जागेवर आपण कारवाई केली आहे काय ?

( यानंतर श्री. सरफरे .... पी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 10752...

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा रॉकेलचा साठा तो ज्या ठिकाणी रहात होता त्याठिकाणी सापडला आहे. हे रॉकेल त्याने कोठून आणले याबाबत पोलीस तपास चालू आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नागपूरमध्ये पेट्रोलमध्ये केरोसिनची भेसळ करुन ते विकण्यात येते. 1540 लीटर इतके केरोसिन त्याला कोठे मिळाले? त्याच्याकडे परवाना नाही, तो अधिकृत शिधावाटप धारक नाही, केरोसिनचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेला परवाना त्याच्याकडे नाही. अशावेळी या व्यक्तीने एवढया मोठया प्रमाणावर केरोसिन कोठून आणले? आणि जेथून हे केरोसिन आणले आहे त्या व्यक्तीकडे आपण याबाबत चौकशी कां केली नाही? केवळ पोलीस तपास चालू आहे अशाप्रकारचे साधे उत्तर आपण देऊ नका. त्या व्यापाऱ्याकडून जर माहिती मिळाली असती तर त्या दिशेने पोलीसांना तपास करता आला असता. इतके होऊन सुध्दा पोलीस आपल्याला माहिती देत नाहीत ही भयानक गोष्ट आहे. याचा परिणाम आज नागपूर शहरातील पेट्रोल पंपावर होत आहे. त्या ठिकाणी केरोसिनमिश्रित पेट्रोल मिळत आहे. तेव्हा याबाबत आपण काय उपाय योजना करणार आहात?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी व्यक्त केलेल्या भावना खऱ्या आहेत. अनेक वेळा अवैध पध्दतीने साठा ठेऊन रॉकेलचा गैर व्यवहार, गैर बाजार अनेक ठिकाणी सुरु आहे हे सत्य आहे. आणि त्या संदर्भात कठोर कारवाई करण्यासंबंधी आम्ही निश्चितपणे उपाय योजना करीत आहोत. या संदर्भात पोलीस यंत्रणेला एक महिन्याच्या आत हे रॉकेल कोठून आणले याचा तपास करण्यासाठी सूचना दिल्या जातील. आणि पोलीसांच्या तपासामध्ये ते रॉकेल परवानाधारकाकडून आणल्याचे सिध्द झाले तर त्या परवानाधारकाचे लायसन्स तातडीने रद्द केले जाईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी पेट्रोलमध्ये रॉकेल मिश्रण केले जात असल्याचा दुसरा प्रश्न उपस्थित केला. त्या अनुषंगाने....

श्री. अनंत तरे : या घटनेला 5 महिने झाले. एक महिन्यात शोध घेण्याच्या सूचना आपण पोलीसांना देणार, पोलीसांनी 5 महिन्यामध्ये काय केले याची आपण चौकशी करणार काय? आणि त्यांच्यावर कारवाई करणार काय? कारण 1540 लीटर इतके रॉकेल कोठून आणले याचा पाच महिन्यात पत्ता लागलेला नाही. तर मग एक महिन्याच्या आत त्याचा शोध कसा लागणार? यामध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश देणार काय?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 10752...

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हा मुद्दा गंभीर आहे. त्याचे गांभीर्य सरकारला निश्चितपणे आहे. त्यामुळे एका विशिष्ट कालावधीमध्ये याबाबत कारवाई केली जाईल. या संदर्भात राज्यामध्ये कशा पध्दतीने उपाय योजना केली जात आहे यासंबंधीची माहिती संकलित करुन ती परिपत्रकाव्दारे सर्व सन्माननीय सदस्यांना देण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री. अनंत तरे : दक्षता समित्यांचे काय झाले?

श्री. सुनील तटकरे : दक्षता समित्यांमध्ये विधान परिषद सदस्यांना नेमण्यात यावे असे आदेश राज्य सरकारने निर्गमित केले आहेत.

(गोंधळ)

सभापती महोदय, हे शासकीय सदस्य असल्यामुळे अशासकीय सदस्यांची नावे पालक मंत्र्यांकडून येईपर्यंत शासकीय सदस्यांची समिती गठीत करावी असे आदेश दिले जातील. विधान सभा, विधान परिषद सदस्य व अन्य शासकीय अधिकारी यांची समिती गठीत झाली आहे. आणि सर्व विधान परिषद सदस्यांचा या समितीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाकडील माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

डॉ. नीलम गोऱ्हे : समिती गठीत झाली आहे तर मग तिच्या बैठका किती झाल्या आहेत?

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधान परिषदेची तीन अधिवेशने झाली आहेत. तेव्हा या समित्या केव्हा गठीत झाल्या आहेत ते मंत्रिमहोदयांनी सांगावे?

(गोंधळ)

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी कृपया शांत रहावे, मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे...

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी हा जो प्रश्न उपस्थित केला आहे तो या तारांकित प्रश्नाशी निगडीत नाही. तरीसुध्दा मी या विधान परिषद सभागृहामध्ये वारंवार आश्वासन दिले आहे व त्याची पूर्तता कशी झाली ते सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या संबंधात माननीय पालक मंत्र्यांना सुध्दा पत्रे लिहिली आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/KGS पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:55

ता.प्र.क्र.10752 . . . . .

श्री.सुनील तटकरे . . . .

पण त्याचबरोबर अशासकीय सदस्य घेऊन समिती गठीत करण्यास विलंब लागत असल्यामुळे जे शासकीय सदस्य त्याठिकाणी डेसीग्नेट केलेले आहे, त्यामध्ये विधानपरिषद सदस्यांचा अंतर्भाव आहे आणि तशा प्रकारच्या समित्या ताबडतोब कार्यान्वित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. अनेक समित्यांचे सन्माननीय विधानसभा सदस्य अध्यक्ष आहेत. त्याप्रमाणे या समित्या निश्चितपणे नेमल्या गेल्या असतील. पण काही ठिकाणी राहीले असेल तर त्याची माहिती घेऊन सर्व संबंधितांना माझ्या सहीने आठ दिवसात उत्तर दिले जाईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण आदेश द्यावेत.

**उपसभापती** : मी आदेश देणार नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अशा प्रकारची माहिती दिली असेल, दिली नसेल अशी या सदनामध्ये भाषा वापरणे योग्य नाही. सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्य उभे राहून सांगत आहेत की, त्यांची कोणत्याही दक्षता समितीवर नेमणूक झालेली नाही. ही माहिती फर्स्ट हॅन्ड इंफरमेशन म्हणून तुमच्यासमोर तीन वेळा दिली आणि तीन वेळा आश्वासने दिले की, मी यामध्ये स्वत: लक्ष घालतो. पण आजही याबाबतीत उत्तर मिळत नाही. माननीय मंत्री महोदय ऑथेन्टीकली असे सांगत नाहीत की, तुमच्या नेमणुका झालेल्या आहेत. पण आमचे म्हणणे आहे की, नेमणूक झालेली नाही. मग यातील सत्य काय आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये विधानपरिषद सदस्यांना दक्षता समितीवर नेमावे असा विषय येथे उपस्थित होईपर्यंत, या विधानपरिषद सदस्यांचा या समित्यांमध्ये समावेश नव्हता. पण याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी तशी भावना मांडल्यानंतर माझ्या लक्षात आले की, विधान परिषद सदस्यांनाही या दक्षता समित्यांवर घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शासनाने सुधारीत आदेश दिले. समिती गठीत करण्याचे अधिकार पालकमंत्र्यांना असल्यामुळे यामध्ये वेळ लागत आहे असे लक्षात आल्यानंतर शासकीय सदस्यांना घेऊन समिती गठीत करावी यासंबंधीचे पुन्हा आदेश माझ्या विभागाने सर्व अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले.....

. . . .क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10752 . . . . .

श्री.सुनील तटकरे . . . .

आहेत. सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहेत, त्याची मी सखोलपणे पूर्ण चौकशी करीन आणि या समित्या गठीत करण्यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांकडून विलंब झाला असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती** : आपण अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना समित्या गठीत करण्याचे आदेश दिलेले आहेत. तर आपल्या आदेशाची अंमलबजावणी आजपासून 15 दिवसाच्या आत करावी असे मी सक्त निर्देश देत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, होय.

-----

. . . .क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## तालुका रोहे (जि.रायगड) येथील जिंदाल कंपनीत कामगारांचा झालेला मृत्यू

**(11) * 9625** **श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रोहे तालुक्यातील (जि.रायगड) नागोठणे जवळ असलेल्या जिंदाल कंपनीत क्रेनच्या दुरुस्तीचे काम करीत असतांना गिअर बॉक्समध्ये अडकून पडलेल्या एका कामगाराचा दिनांक 29 मे, 2005 रोजी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आळून आले व तद्नुसार मृत कामगारांच्या नातेवाईकांना शासनाने कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच मदत दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक** : (1) रोहे तालुक्यातील सुकेली, पाईपनगर येथे असलेल्या मे.महाराष्ट्र सिमलेस लि. कारखान्याच्या परिसरास लागून असलेल्या निवासी वसाहतीपलीकडील मोबाईल क्रेन क्र.एमआरजे 8962 ठेवलेली होती. दिनांक 28.5.2005 रोजी सकाळी 10.30 च्या दरम्यान मोबाईल क्रेनच्या दुरुस्तीचे काम चालू असतांना गिअरमध्ये अडकून एका कामगाराचा मृत्यू झाला हे खरे आहे.

(2) होय.

(3) सदर अपघाताची चौकश्ी पोलीस खात्यामार्फत करण्यात आली असून चौकशीत असे आढळुन आले आहे की, कारखान्याच्या परिसरात लागून असलेल्या निवासी वसाहती पलिकडील मैदानात मोबाईल क्रेन ठेवलेली होती. सदर क्रेन नादुरुस्त होती. तिच्या दुरुस्तीचे कंत्राट मे.श्रीनार्थ मुव्हर्स या कंत्राटदाराने घेतले होते. सदर क्रेनच्या दुरुस्तीचे काम श्री. बाबासाहेब रोडे हा कंत्राटी कामगार करीत होता. दिनांक 28.5.2005 रोजी दुरुस्तीचे काम करीत असतांना सकाळी 10.30 वाजता कंत्राटी कामगार श्री. बाबासाहेब रोडे यांचा मोबाईल क्रेनच्या गिअरमध्ये अडकून मृत्यू झाला. या प्रकरणी श्रीनाथ मुव्हर्सचे मालक श्री. कृष्णकुमार गोपाल दालमिया, श्री. दिग्वीजय सिंग,श्री. राम लालन सिंग, री. सुनिलकुमार शर्मा व श्री. अश्विनीकुमार श्रीवास्तव यांनी निष्काळजीपणा दाखविल्याचे आढळुन आल्याने, पोलीसांनी त्या सर्वांवर भा.दं.वि.304 व 34 अंतर्गत गुन्हा दाखल करुन सर्वांना अटक केली. सर्व आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

व्यवस्थापनाने नुकसान भरपाई म्हणून नुकसान भरपाई आयुक्त यांचेकडे 3,62,918/- एवढी रक्कम जमा केली आहे. तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान म्हणून 40,500/- एवढी आर्थिक मदत रोखीने दिली आहे व उरलेले रु.59,500/- सुध्दा नुकसान भरपाई आयुक्तांच्या कार्यालयात जमा केले आहेत.

तसेच या प्रकरणी उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड यांनी चौकशी केली त्यांना असे आढळून आले की, सदर अपघात कारखान्याच्या परिसराबाहेरील मैदानात झाला असल्याने कारखाने अधिनियमाचा कोणताही भंग झाला नाही.त्यामुळे कारखाने अधिनियमातील तरतूदी प्रमाणे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(4) मृत कामगारांच्या नातेवाईकांना मदत देण्यात आली आहे. विलंब झालेला नाही.

. . . .क्यु-4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आयुक्तांकडे जी नुकसान भरपाई जमा आहे, ती संबंधित मृत व्यक्तीच्य पत्नीला मिळालेली आहे का ? या कंपनीने संबंधित सर्व कामगारांचा विमा उतरविला होता का ? जर विमा उतरविला असेल तर विम्याची रक्कम मिळालेली आहे का ? जर विमा उतरविला नसेल तर संबंधित कंपनीवर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मे.महाराष्ट्र सीमलेस लिमिटेड या कंपनीच्या परिसरात हा अपघात झाला नसून कंपनीच्या बाहेर जे पटांगण आहे, तेथे मोबाईल क्रेनची दुरुस्ती सुरु असताना हा अपघात झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी असा प्रश्न विचारला आहे की, नुकसान भरपाईची रक्कम मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला मिळाली आहे का ? याबाबतीत सांगावयाचे तर ही रक्कम कोर्टामध्ये जमा केलेली आहे. कोर्ट त्याचे वारसदार कोण आहेत याची शहानिशा करुन मग त्यांना रक्कम अदा करील. कंपनीमध्ये काम करणाऱ्या कामगारांचा विमा उतरविला आहे. या क्रेनचे काम ठेकेदारामार्फत केले जात होते, ठेकेदाराने त्या अनुषंगाने सर्व बाबी पूर्ण केल्यानंतर कंपनीने नुकसान भरपाई, सानुग्रह अनुदान दिलेले आहे. त्यांच्या नातेवाईकांना नोकरीचीही संधी दिली होती, पण लांब रहात असल्यामुळे त्यांनी ती संधी घेतली नाही. शासकीय नियमानुसार खटले दाखल केले आहेत आणि शासन त्यांच्या कुटुंबियांची काळजी घेण्यासाठी सक्षमतेने काम करीत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ही क्रेन त्या कंपनीच्या कामासाठी आणली होती हे खरे आहे का ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, होय. कंपनीच्या कामासाठी क्रेन आणली होती, ही कंपनीची क्रेन होती. पण ती दुरुस्त करण्याचे काम बाहेरच्या घटकाला दिले होते. अपघात झाल्यानंतर मृत झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना नियमाप्रमाणे जी सवलत आहे, जी नुकसान भरपाई आहे, ती दिलेली आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, कंपनीने ज्या ठेकेदाराला काम दिले होते, तो रजिस्टर्ड आहे का ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, ठेकेदार रजिस्टर्ड आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित करणे.**

**उपसभापती** : या अधिवेशनाच्या दिनांक 19 डिसेंबर, 2005 ते 23 डिसेंबर,2005 या कालावधीसाठी मी जे तारांकित प्रश्न स्वीकृत केले होते ते प्रश्न विधानपरिषद नियम 20 प्रमाणे व्यपगत न करता सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित करण्याचा निर्णय मी घेतलेला आहे. त्यानुसार सदर याद्या सभागृहाच्या पटलावर अतारांकित म्हणून ठेवण्यात आल्याचे मी घोषित करत आहे.

सोमवार, दिनांक 19 डिसेंबर,2005 रोजीची यादी मुद्रीत स्वरुपात प्राप्त असल्याने सदस्यांना आजच टपाल खाणाद्वारे वितरीत करण्यात येत आहे. उर्वरित, दिनांक 20 डिसेंबर,2005 ते दिनांक 23 डिसेंबर 2005 रोजीच्या याद्यांत समाविष्ट असलेल्या प्रश्नांची उत्तरे शासनाकडून त्वरित मागवून मुद्रीत याद्या यथावकाश मा.सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात येतील.

(प्रेस: येथे याद्या छापणे)

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ D/ RJW/ MHM/

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी,बारावी,तेरावी व चौदावी यादी सभागहापुढे ठेवणे.

उपसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतच्या याद्या छापाव्यात)

---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : अतारांकित प्रश्नाबाबतचे निवेदन सभागृहासमोर ठेवणे.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने शासनाच्या मोफत पुस्तक योजनेबाबत या विषयावरील श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, अशोक मोडक, विनोद तावडे, विलास अवचट, अरविंद सावंत, दिवाकर रावते, अनिल परब, अनंत तरे, श्रीमती नीलम गोऱ्हे, प्रतापसिंह मोहिते-पाटील, नानासाहेब बोरस्ते, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जी.एल.ऐनापूरे, वसंतराव खोटरे, जयंत पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे,वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 1676 ला दिनांक 17 मार्च,2005 रोजी दिलेल्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्यावेळी आश्वासनानुसार निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : तारांकित प्रश्नाबाबतचे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

(प्रेस : सोबतचे तारांकित प्रश्नाचे निवेदन छापावे.)

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ D/ RJW/ MHM/ पूर्वी सौ.रणदिवे.... 12:00

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने श्री.साईबाबा संस्थान विकास व्यवस्था, शिर्डी यांचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : श्री.साईबाबा संस्थान विकास व्यवस्था, शिर्डी यांचा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभाती महोदया, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 200-2001 चा 35 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

**पॉइन्ट ऑफ इन्फमेशनसंबंधी**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मुख्यमंत्र्यांच्या वतीने नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी अहवाल ठेवला, ते निघून जातील म्हणून माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. मिठी नदीच्या अनधिकृत बांधकामाच्या कारवाईसंबंधीचे निवेदन सभागृहात शेवटच्या दिवशी करण्यात येईल असे सांगण्यात आलेले आहे. ज्यांनी मुख्यमंत्र्यांना चुकीची माहिती दिली, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे वारंवार सांगण्यात आले होते. योगायोगाने मुख्यमंत्र्यांच्या वतीने नगरविकास राज्यमंत्री महोदय निवेदन करतात. ते अनधिकृत बांधकामांची यादी देणार होते. ती यादी पटलावर ठेवलेली नाही. मुख्यमंत्र्यांनी प्रश्नोत्तराच्या तासाच्यावेळी एकही बांधकाम तसे झालेले नाही, असे उत्तर दिल्यानंतर पुन्हा उपप्रश्न विचारला होता की, "तसे बांधकाम झाले असल्यास, त्यावर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू....

कारवाई करण्यात येईल काय", त्यावर "कठोर कारवाई करण्यात येईल", असे सांगण्यात आले होते. सर्व वर्तमानपत्रामध्ये त्या ठिकाणी हॉटेलचे बांधकाम चालू आहे, अशी बातमी छापून आलेली आहे. शेवटच्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या वतीने या संदर्भातील निवेदन करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. यादी पटलावर ठेवण्यात येईल, असे सांगण्यात आले होते, परंतु ती यादी सादर झालेली नाही. वेळ काढण्याचे काम चाललेले आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, मी देखील प्रश्नोत्तराच्या तासाच्यावेळी उपस्थित होतो. "आपण माहिती द्या, त्या माहितीच्या आधारावर कारवाई करण्यात येईल," अशापध्दतीने माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितलेले होते.

श्री.मधुकर चव्हाण : मी सगळी माहिती दिली होती.

श्री.राजेश टोपे : निवेदन करण्याबाबतचा विषय नव्हता...

श्री.मधुकर चव्हाण : निवेदन करण्याबाबतचा विषय होता. मा. उप सभापती श्री.डावखरे साहेब आणि त्यापूर्वी माननीय सभापती श्री.देशमुख साहेब यांचे आदेश आहेत. त्याबाबतचे माझ्याकडे मिनिटस् आहेत. अधिवेशन संपण्यापूर्वीच्या कालावधीमध्ये निवेदन करण्यात यावे असे आदेश आहेत. मी ज्यावेळेला माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या दालनात भेटलो, तेव्हा ते जे म्हणाले त्यांचे उद्गार मी सांगतो. ते म्हणाले की, "ते कठोर आहे, मी सिरियसली घेतलेले आहे आणि या संबंधी मी कारवाई करणार आहे". त्यावर मी म्हणालो, "तुमच्या वतीने निवेदन करण्यात येईल काय ? " त्यावर त्यांनी "होय" असे ते म्हणाले. हे जबाबदारीने सांगतो आहे. तुम्ही ॲक्शन घेण्याचे टाळता का ?

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ RJW/ 12:05

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हा प्रश्न उपस्थित करण्यात आला त्यावेळी मुख्यमंत्र्यांच्यावतीने सांगण्यात आले की, 527 अनधिककृत बांधकामांची यादी आहे आणि त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. ती यादी आम्ही त्यावेळेला मागितलेली होती. ती यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे वचन मुख्यमंत्र्यांनी त्या दिवशी दिले होते. सभापती महोदय, ज्या अनिधिकृत बांधकामांवर कारवाई झालेली आहे, ती यादी आम्ही मागत आहोत. सभापती महोदया, हा विषय आम्ही तीन वेळा सभापतींच्या निदर्शनास आणून दिलेला आहे. परंतु आज पर्यंत ती यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, मी या ठिकाणी परत एकदा एवढेच सांगू इच्छितो की, मी त्यावेळेस सभागृहात उपस्थित होतो.मला सुध्दा आठवते की, सन्माननीय सदस्यांकडून यादी येणार होती.(अडथळा) सभापती महोदया, माहिती जर आता उपलब्ध असेल तर निश्चितप्रकारे सभागृह संपण्यापूर्वी ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : माननीय मंत्रिमहोदय, आपल्याला माहिती उपलब्ध झालेली नाही काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, माझ्या माहिती प्रमाणे सन्माननीय सदस्यांनी यादी द्यावी आणि त्यावर कारवाई करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते. परंतु याबाबत निवेदन करावे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर ती माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनात जे स्टेटमेंट केलेले आहे त्याचा प्रोसिडिंगमध्ये उल्लेख आहे. सन्माननीय राज्य मंत्री त्यावेळी या सदनात उपस्थित होते. या सगळया प्रश्नावर चर्चा झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, जी अनधिकृत बांधकामे पाडली आहेत. त्यांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवू. सभापती महोदया, गेल्या आठवडयात घडलेली ही घटना आहे. त्या गोष्टीला पाच-सहा दिवस होऊन गेले. अद्यपही ती माहिती आम्हाला उपलब्ध झालेली नाही., हा माझा हरकतीचा मुद्दा आहे. तेव्हा ती आजच्या आज देण्याचे आपण निर्देश द्यावेत.

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदय, अनधिकृत बाधकामांची यादी आपण केव्हा देणार आहात?

श्री. राजेश टोपे :सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सांगत आहेत ती माहिती खरी समजून आज संध्याकाळी हे सभागृह संपण्याच्या अगोदर माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, अनधिकृत बांधकामांची यादी नाही. ज्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई झालेली आहे, या कारवाई झालेल्या बांधकामांची यादी सभागृहात देण्यात येणार होती ती यादी आज पर्यंत दिलेली नाही. ती निष्कासित केलेली बांधकामे आहेत.

**तालिका सभापती** :अनधिकृत बांधकामांच्या यादी बरोबरच कारवाई सुध्दा येणार आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, पुन्हा यामध्ये गल्लत होत आहे. अनधिकृत बांधकामांवर कारवाई झालेल्या बांधकामांची यादी आम्हाला पाहिजे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मिनिट्स तपासून बघावेत. तसा त्यात उल्लेख असेल तर जरुर सभागृह संपण्याच्या आगोदर ती माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. माहिती उपलब्ध करुन द्यायला शासनाला कुठलिही अडचण नाही.

**तालिका सभापती** :प्रोसिडिंग तपासून ( गोंधळ ) ज्या प्रकारचे आश्वासन दिले असेल त्या आश्वासनाची पूर्तता आज सभागृह संपण्याच्या आत माननीय मंत्रिमहोदयांनी करावी, असा आदेश देण्यात येत आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. आपण प्रोसिडिंग तपासून बघावे. प्रोसिडिंगमध्ये तशा प्रकारचा उल्लेख असेल तर त्याप्रमाणे आपण माननीय मंत्रिमहोदयांना सूचना देऊ शकता.एवढे सांगितल्या नंतर पुन्हःपुन्हा तेच सांगून सभागृहाचा वेळ घेणे बरोबर नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.......

यानंतर श्री. खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : मी आताच सांगितले की, यासंबंधीचे प्रोसिडींग तपासून पाहून सदस्य म्हणतात तशी माहिती दिली असेल तर त्यानुसार सभागृह संपण्यापूर्वी ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली आहे त्यानुसार माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे की, सन्माननीय सदस्य श्री. पवार यांनी जी हरकत घेतली तीच माझ ी हरकत असून मी त्याबाबत बोलत आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्याकडे त्या चर्चेचे मिनिट्स आहेत, त्यांनी ते कृपया वाचून दाखवावे. ते वाचल्यानंतर खरे काय आणि खोटे काय हे स्पष्ट होईल. आपणही अशा प्रकारचे आदेश दिले परंतु अशा प्रकारे मंत्री महोदयांवर दबाव टाकणे बरोबर नाही.

ॲड. अनिल परब : महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.........

**तालिका सभापती** : मी पुन्हा पुन्हा तेच सांगत आहे की, या प्रोसिडींगमध्ये काय आहे हे पाहून ज्याप्रकारचे त्यामध्ये नमूद केले असेल त्या प्रकारची माहिती मंत्री महोदयांनी आजच सभागृह संपण्यापूर्वी पटलावर ठेवावी असे मी निदेश देत आहे. आता मी आणखी कुणालाही बोलण्याची परवानगी देणार नाही.

श्री. उल्हास पवार : महोदया, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, त्या दिवशी मी सुध्दा सभागृहात उपस्थित होतो. सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित केला त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, अशी कोणती अनधिकृत बांधकामाची माहिती सन्माननीय सदस्यांकडे असेल तर ती त्यांनी द्यावी, त्यांच्यावर मी कारवाई करतो.

**तालिका सभापती** : मी यासंदर्भात रुलींग दिलेले आहे. सध्या सभागृहात कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे हे कामकाज चालू आहे. सभागृह चालवित असतांना काही नियम आपल्याला पाळावे लागतात त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कोणताही मुद्दा मांडण्याचा आग्रह धरु नये.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

( पुढे चालू.......

श्री. रविशेठ पाटील (वन राज्यमंत्री ) : महोदया, मी आपल्या अनुमतीने फॉरेस्ट डेव्हलपपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचा सन 2003-2004चा 35 वा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभापती : फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचा सन 2003-2004चा 35 वा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----------

राणा जगजितसिंह पाटील ( रोजगार हमी योजाना राज्यमंत्री) : महोदया, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना पुनर्विलोकान समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : रोजगार हमी योजना पुनर्विलोकान समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावयाच्या निवेदनाच्या संबंधी**

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदया, मी औचित्याच्या मुद्याच्या द्वारे या दोन आठवडयात तीनवेळा असा मुद्दा मांडला आहे की, पंचायत राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला भेट दिली होती. समितीने भेट दिल्यानंतर काही दिवसांनी त्या ठिकाणच्या जाधव नावाच्या बीडीओला ॲन्टीकरप्शनने अटक केलेली होती व आता एक्झीकेटीव्ह इंजिनिअरला सुध्दा ॲन्टीकरप्शनने पकडले आहे. मी ज्यावेळी औचित्याचा मुद्दा मांडला होता त्यावेळी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे सांगण्यात आले होते परंतु आज अधिवेशनचा शेवटचा दिवस असतांना सुध्दा पंचायत राज समितीच्या संदर्भातील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले नाही. पंचायत राज समितीच्या सदस्यांना पैसे देण्यासाठी आम्ही पैसे वसूल करीत आहोत असे सांगून आज त्या ठिकाणी पैस गोळा केले जात आहेत. त्यामुळे सदस्यांची प्रतिमा मलिन होत आहे त्यामुळे यासंदर्भात आज तरी निवेदन करण्यात यावे अशी आमची मागणी आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात आश्वासन दिले असेल तर त्याची पूर्तता करण्यात यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया,यासंदर्भात आज निवेदन करण्यात येईल.

------------

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मागच्या डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय पशुसंवर्धन राज्यमंत्री यांनी शेळी-मेंढीच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भातील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवू असे आश्वासन दिले होते. आता हा अहवाल शासनाला प्राप्त झालेला असून अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. तसेच औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात सुध्दा मी या विषयाच्या संदर्भात विनंती केली होती त्यामुळे आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे शेळी-मेंढीच्या भ्रष्टाचाराबद्दलचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे आपण निर्देश द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

-------------

.....3

**<u>औचित्याच्या मुद्यासंबंधी</u>**

डॉ. निलम गो-हे ( विधनसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. सोलापूर जिल्हयातील रोजगार हमी योजनेच्या कामात झालेल्या करोडो रुपयाच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात आम्ही लक्षवेधी सूचना दिलेल्या होत्या परंतु त्या लागल्या नाहीत. परंतु या विषयाच्या संदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना स्विकृत करण्यात आली होती व त्यावर विस्तृत चर्चाही झालेली आहे. सोलापूरच्या रोजगार हमी योजनेमध्ये झालेल्या करोडो रुपयाच्या भ्रष्टाचारासंबंधी शासनाने काय कारवाई केलेली आहे याच्यासंदर्भात लक्षवेधी सूचना दिली होती तसेच नियम 93 खाली सुध्दा सूचना दिली होती परंतु आमची सूचना आणि लक्षेवधी सूचना स्विकृत झाली नाही. रोजगार हमी योजना मंत्री सुध्दा सुदैवाने सभागृहात आता उपस्थित आहेत. विधानसभेत तर ही लक्षवेधी सूचना सदस्यांनी लावू नये यासाठी पैसे ऑफर केले होते असे एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे तसेच यासंदर्भातील टेप सुध्दा त्यांनी ऐकवलेली आहे. अशी परिस्थिती असल्यामुळे आम्हा सदस्यांना सोलापूर आणि पश्चिम महाराष्ट्रात तोंड सुध्दा दाखवायला जागा उरलेली नाही त्यामुळे यासंदर्भात आपण निवेदन करण्याच्या संदर्भात आदेश द्यावेत ही विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्या प्रमाणे यासंदर्भात निश्चितपणे निवेदन पटलावर ठेवले जाईल. दुसरा प्रश्न असा आहे की, चूकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून सांगू इच्छितो की, खालच्या सभागृहात काही लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात आक्षेप घेतला होता परंतु तो ....

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील..

लक्षवेधीच्या संदर्भात नाही. हे प्रकरण दडपण्यासाठी आम्ही तुम्हाला रक्कम देऊ अशा प्रकारची कॅसेट सन्माननीय सदस्यांनी उपलब्ध केली. ती मला प्राप्त झाली. ती कॅसेट मी गृह विभागाला दिली असून गृहविभागाकडून पुढची कारवाई करण्यात येईल.

(सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांना सांगू इच्छिते की, मंत्रिमहोदयांनी जे आश्वासन दिलेले आहे,त्याची पूर्तता होईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा जीवनदायी योजनेसंबंधीचा औचित्याचा मुद्दा आहे. आपल्या अनुमतीने मी सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे त्याकडे लक्ष वेधू इच्छितो. जीवनदायी योजनेसंबंधी मी गेल्या 7 वर्षापासून प्रश्न उपस्थित आहे. महिन्यातून एकदा उपसंचालकांची जीवनदायी योजनेसंबंधीची मिटींग होते. एक रुग्ण हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी माझ्याकडे आला होता. त्याची तब्येत गंभीर होती. म्हणून मी डॉ.देशपांडे यांना विनंती केली की, रुग्णाचा व्हॉल्व्ह खराब झालेला आहे आपण एक महिना वाट न बघता त्यावर शस्त्रक्रिया करावी. तो रुग्ण गरीब आहे, आपण शस्त्रक्रिया करावी असे मी सांगितले. डॉ.देशपांडे यांनी त्या रुग्णावर दोन शस्त्रक्रिया केल्या. आपण जर एक महिना वाट पहात बसलो असतो तर त्याचे प्राण वाचवू शकलो नसतो. परंतु, या संदर्भात आपल्या उपसंचालकांनी पत्र लिहिले की, शस्त्रक्रिया झाल्यामुळे जीवनदायी योजनेमधून चेक देता येत नाही. अशाने गरीब माणसाला कोण वाली राहील ? त्या रुग्णावर शस्त्रक्रिया केली नसती तर तो मेला असता. महिनाभर आपले उपसंचालक मिटींग घेत नाहीत. म्हणून माझी मंत्र्यांना विनंती आहे की, मानवतेच्या दृष्टीकोनातून बीपीएल खालील गंभीर आजार त्रस्त असलेल्या गरीब रुग्णांच्या शस्त्रक्रियेवरील खर्चाला कार्योत्तर परवानगी दिली पाहिजे. ही योजना गरीबांकरिता आहे. तेव्हा अशाप्रकारच्या सूचना द्याव्यात अशी माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे. तसे केले नाही तर अनेक गरीब रुग्ण प्राणाला मुकतील.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, दोन ऑपरेशनची आर्थिक मदतीला मंजुरी देण्यात येईल. पूर्वी बीपीएल कार्डाची अट होती. ती आता शिथिल करण्यात आली आहे. आता आपण असे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा...

केले आहे की,ज्याचे वार्षिक उत्पन्न 20000 रुपयाच्या आत आहे व त्याने तहसिलदाराचे प्रमाणपत्र दिल्यानंतर ऑपरेशन करतो. यामध्ये वेटींग लिस्ट भरपूर आहे. प्राण वाचविण्याच्या दृष्टीने अशी अडचण येते हे मला मान्य आहे. अशी अडचण येऊ नये म्हणून काळजी घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाचे सगळे नियम बरोबर आहेत. मी जी केस सांगितली आहे, त्या केसला उपसंचालकांनी मान्यता देऊन शिफारस करायला पाहिजे. मूळात अडचणी अशी झाली की रुग्णाची तब्येत गंभीर झाली आणि उपसंचालकांची मिटींग एक महिना होणार नव्हती. खरे म्हणजे मिटीग एक महिन्यात व्हाववयास पाहिजे होती. ती न होत असल्यामुळे मी डॉक्टरांना विनंती केली की या रुग्णाचे प्राण वाचवा, त्याचे ऑपरेशन करा. त्याप्रमाणे ऑपरेशन्स केलेत. आता शासनाचे उपसंचालक म्हणतात की, ऑपरेशन झाले असल्यामुळे बीपीएल खालील योजनेचा लाभ देता येणार नाही. उपसंचालकांनी एक महिना मिटींग न घेणे हे मला योग्य वाटत नाही. तेव्हा माझी विनंती आहे की, या प्रकरणी आपण पैसे मंजूर करावे. त्याच बरोबर पुढे जर कोण्या गरीब माणसाचे प्रकरण आले तर त्यास देखील मदत करावी.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, विनाविलंब लाभार्थींना लाभ कसा देता येईल याचा शासन जरूर विचार करेल व भविष्यकाळामध्ये जीवनदायी योजनेचा लाभा लाभार्थीना देण्यासंबंधीची दक्षता घेण्यात येईल. अशा ज्या केसेस झालेल्या आहेत त्या पुढच्या काळात होणार नाहीत.

....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पूरक मागण्यांवरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासना नुसार अधिकची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.हसन मुश्रीफ (विधि व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने दिनांक 13 डिसेंबर 2005 रोजी विधि व न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी विधि अधिकाऱ्यांच्या नेमणुकीसंदर्भातील कार्यपध्दतीबाबत दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी)

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावयाच्या निवेदनासंबंधी**

व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदया, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न या सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. या संदर्भातील निवेदन राखून ठेवण्यात आले आहे. बाकीची सर्व निवेदने देण्यात आलेली आहेत. तेव्हा मंत्रिमहोदय हे निवेदन केव्हा करणार आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदया, सभागृह संपण्यापूर्वी निवेदन वितरीत करण्यात येईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व इतर वि.प.स यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , जिल्हापरिषद, चंद्रपूर यांनी ग्रामविकास विद्यालय, पाटाळा, तालुका भद्रावती, जि.चंद्रपूर येथील अपात्र सहाय्यक शिक्षकाला मान्यता देऊन पात्र शिक्षकांना मान्यता नाकारल्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे व इतर वि.प.स. यांनी अकोला महानगरपालिकेमधील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम कोणतीही पूर्वसूचना न देता गहाण टाकल्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकरीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "आदिवासी आश्रमशाळा, माणगाववाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील शासकीय अनुदानीत आश्रमशाळेस तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत सहभागी होण्यास गट शिक्षणाधिकारी कर्जत यांनी प्रतिबंध केल्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्मानीय सदस्य श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी "महाराष्ट्र शासनाच्या नागपूर येथील शिवराज फाईन आर्टस लिथो वर्क्समधील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांमुळे त्यांनी सामूहिक आत्मदहानाचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 विषय होत नसल्यानेमी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने भिवंडी महानगरपालिकेकडून मजूर सहकारी संस्थाना देण्यात आलेल्या कामामध्ये झ ाालेला गैरव्यवहार" या विषयावरील सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, डॉ.अशोक मोडक, सर्वश्री मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी उपस्थित कलेल्या निवेदनावरील लक्षवेधी सूचनेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**तालिका सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:नांदूरा तालुक्यातील निमगाव येथील चार शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या

**पृ.शी.**: नांदूरा तालुक्यातील निमगाव येथील चार शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली 93 अन्वये सूचना

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी "नांदूरा तालुक्यातील निमगाव येथील चार शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी जे निवेदन दिलेले आहे त्यामध्ये शासनाने स्पेशल पॅकेज देण्याचा निर्णय घेतला आहे असा उल्लेख केलेला आहे. मृतकाने 7914 रुपयांचे कर्ज घेतले होते, हे कर्ज कोणाकडून घेतले होते ? आपण स्पेशल पॅकेज जाहीर केल्यानंतरसुध्दा शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. तेव्हा आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आपण दोन लाख रुपयांची मदत करणार आहात काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदया, त्या मृतकाने जिल्हा बँकेकडून कर्ज घेतले होते. मृत पावलेल्या चार जणांपैकी मदतीसाठी तीन जण पात्र ठरले आहेत. श्री.दांडगे नावाचे जे गृहस्थ होते त्यांच्या नावावर कोणत्याही प्रकारचे कर्ज नव्हते म्हणून त्यांना मदत केलेली नाही. वरील तिघांना शासनातर्फे एक लाख रुपयांची मदत दिली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, जे तीन शेतकरी आहेत त्यांना शासन केव्हा मदत देणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदया, येत्या सात-आठ दिवसांत मदत करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 12:30

**पृ.शी.**: श्री.बी.डी.जाधव, गट विकास अधिकारी यांनी केलेल्या गैरप्रकारांबाबत.

**मु.शी.**: श्री.बी.डी.जाधव, गट विकास अधिकारी यांनी केलेल्या गैरप्रकारांबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "श्री.बी.डी.जाधव, गट विकास अधिकारी यांनी केलेल्या गैरप्रकारांबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, बाळापूर तालुक्यातील मौजे सांगवी-जोमदेव या गावात संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या बांधकामांतर्गत शेततळी बांधण्याचा जो कार्यक्रम झाला त्यामध्ये पैसे व धान्याच्या कूपन्समध्ये गट विकास अधिकारी श्री.बी.डी.जाधव यांनी मोठया प्रमाणावर गैरव्यवहार केलेला आहे. श्री.लांडे यांनी या गैरव्यवहाराबाबत तक्रार केली. त्यानुसार प्रथम चौकशी झाली. ती चौकशी चुकीची झाल्यामुळे दुसऱ्यांदा पुन्हा तक्रार प्राप्त आली. त्यामुळे नंतर या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी संयुक्त समिती नियुक्त करण्यात आली. या संयुक्त समितीने या गैरव्यवहाराबाबतचा चौकशी अहवाल जिल्हा परिषदेकडे दिलेला आहे. परंतु जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, ग्राम विकास विभाग, मंत्रालय यांचेकडे चौकशी अहवाल पाठविलेला आहे. या प्रकरणात असलेल्या ग्रामसेवकाला निलंबित केले आहे. परंतु गट विकास अधिकारी श्री.जाधव यांच्यावर कसल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. हा जाधव गेल्या 18 वर्षांपासून त्याच पंचायत समितीमध्ये कार्यरत आहे. वाटेल त्या पध्दतीचा गैरव्यवहार करुन, खालून वरपर्यंत सर्वांना मॅनेज करण्याचे धंदे तो करीत असून, ते धंदे दाबण्याचाही प्रयत्न करीत आहे. परंतु यावेळी तो गैरव्यवहारात सापडलेला आहे. त्यामुळे श्री.जाधव चौकशीमध्ये दोषी आढळल्यामुळे त्याच्यावर शासन किती दिवसात कारवाई करणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : महोदया, दोन आठवडयाच्या आत कारवाई केली जाईल.

----------

..3..



SJB/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 12:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खामगांव शहरात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणे.

**मु.शी.**: खामगांव शहरात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणे या विषयाबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "खामगांव शहरात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणे" या विषयाबाबत नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, हा प्रश्न माझ्या गावातील आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या विषयासंदर्भात एक बैठक घेतली होती. बुलढाणा जिल्हयामध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडलेला आहे. त्यामुळे या जिल्हयातील 5 नगरपालिकांना पाणी पुरवठा करणारा जो स्त्रोत आहे तो कमी पडत आहे. विशेषत: खामगांव नगर परिषदेच्या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. माननीय मंत्री महोदय श्री.अजित पवार यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, खामगांव शहराला पाणी पुरवठा ज्ञानगंगा प्रकल्पातून करण्यासाठी तातडीने पाणी पुरवठा योजना घेऊन, 10 टक्के लोकवर्गणीचा हिस्सा नगर परिषद आणि 90 टक्के हिस्सा शासनाने भरावा. त्यानंतर खामगांव नगरपालिकेला शासनाकडून एक पत्र आले आणि त्यामध्ये विचारण्यात आले की, नगरपालिका एम.एस.ई.बी. चा खर्च करणार आहे काय ? योजना ताब्यात घेणार आहे काय ? त्यानुसार महानगरपालिकेने या प्रश्नांची उत्तरे "होय" म्हणून दिलेली असताना, दुसऱ्याच दिवशी शासनाने कळविले की, खामगांव शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी तात्पुरती पाणी पुरवठा योजना घेता येणार नाही. या योजनेचे रुपांतर रेग्युलर पाणी पुरवठा योजनेमध्ये करावे लागेल. यासंदर्भात असे सांगितले गेले की, या योजनेसाठी येणारा खर्च 10 टक्के लोकवर्गणीतून, 50 टक्के कर्जातून आणि 40 टक्के शासनामार्फत तरतूद करुन ही योजना अंमलात आणण्याचा शासनाचा विचार आहे आणि याला नुकतीच तात्विक मान्यता देण्यात आली आहे. सध्या डिसेंबर महिना असताना सुध्दा खामगार नगर परिषदेला 50 टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे.

नंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

हा बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त आहे त्यामुळे त्या ठिकाणी रेग्युलर पाणीपुरवठयाची योजना देण्याचे ठरविले तर ती योजना या वर्षात होणार नाही. त्या शहराला टॅकरव्दारे पाणीपुरवठा करु शकत नाही.तेव्हा तातडीने पाणीपुरवठा करण्यासाठी 10:90 या रेषोला मान्यता देण्यात येणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे :सभापती महोदया, 26 ऑक्टोबरला जी बैठक घेण्यात आली होती त्या बैठकीला मी स्वत: हजर होतो.त्या बैठकीचे प्रोसिडींग्ज माझ्याकडे असून त्यावेळी माननीय मंत्रीमहोदयांनी स्पष्ट असे सांगितले होते की, दहा टक्के लोकवर्गणी 40 टक्के शासनाचे अनुदान..

श्री.पांडुरंग फुंडकर : 10 टक्के लोकवर्गणी आणि 90 टक्के शासनाचे अनुदान याप्रमाणे रेषो ठरवून ही तातडीची पाणीपुरवठा योजना घेण्यात आल्यास ते आपल्याला मान्य आहे काय असा प्रश्न आपण त्यावेळी नगराध्यक्षांना विचारला होता.

श्री.रणजित कांबळे :माननीय विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मला प्रथम पूर्ण बोलू द्यावे त्या बैठकीचे प्रोसिडींग्ज माझ्याकडे आहे.26 तारखेला बैठक घेण्यात आली होती त्या बैठकीमध्ये
माननीय मंत्री श्री. अजित पवार होते आणि मी सुध्दा होतो.त्यावेळी 10:40:50 असा रेषो ठरला होता.त्यानंतर 2 डिसेंबर 2005 ला सचिवांबरोबर आपली एक बैठक झाली होती. त्या बैठकीत सचिवांनी असे सांगितले होते की हा रेषो 10:40:50 असा आहे.10 टक्के लोकवर्गणी भरण्याची तुमची मानसिकता आहे काय ? असेही त्यावेळी विचारण्यात आले होते. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली ती बैठक झाली होती . त्यानंतर पुन्हा जिल्हाधिका-यांनी असे विचारले की, हा रेषो 90:10 आहे की 10:40:50 असा रेषो आहे?. त्यावेळी आम्ही फॅक्स पाठवून असे सागितले की, 10:40:50 या प्रमाणे या योजनेचा रेषो ठरविण्यात आला आहे.आता सन्माननीय विरोधी पक्ष नेते वारंवार असे सांगत आहेत की आमची आर्थिक परिस्थिती चांगली नाही खामगाव मध्ये टंचाईची परिस्थिती आहे.... अडथळा.. माननीय सदस्यांना मी सांगतो की, त्यांनी माझे उत्तर पूर्ण
झाल्या नंतर मला प्रश्न विचारावा. माननीय विरोधी पक्ष नेते या योजनेबद्दल सांगत आहेत ती तात्पुरती योजना आहे आणि त्या योजनेची अंमलबजावणी आपल्याला खामगावमध्ये

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ...

करावयाची आहे.त्या ठिकाणी 8 किलोमिटर्सचा भाग फॉरेस्टमध्ये येत असल्यामुळे या योजनेची अंमबजावणी करणे हे शक्य नाही..

श्री.पाडुरंग फुंडकर :सभापती महोदय, दिनांक 26 ऑक्टोबर 2005 च्या बैठकीत फॉरेस्टचा विषय निघाला होता तेव्हा माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी माननीय वन मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांना फोन लावला होता तसेच त्यांच्या ऑफिसमध्ये मनुष्य पाठवला होता व त्यांनी सांगितले की,एक दोन किलोमिटरच्या बाबतीत जी अट आहे त्या अटीच्या अधीन राहून` पाईप फॉरेस्टच्या भागातून टाकण्यास मी परवानगी देत आहे .असे असतांना ही अडचण सांगून योजना करण्याचे माननीय मंत्रीमहोदयांनी टाळू नये.खामगाव शहरातील टंचाईची परिस्थिती लक्षात घेता तसेच त्या जिल्हयाची पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन तातडीच्या पाणी पुरवठा योजना घेण्याबाबत फेरविचार करणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : शासनाचे धोरण स्पष्ट आहे.10:40:50 या रेषोप्रमाणेच महाराष्ट्रात योजना हाती घेण्यात आल्या होत्या.

श्री.नितीन गडकरी : हा प्रश्न महत्वाचा आहे. बुलढाणा जिल्हा हा दुष्काळग्रस्त आहे.माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या बरोबर एक बैठक घेतली होती.फॉरेस्टच्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित झाला होता.तेव्हा त्यांनी श्री.बबनराव पाचपुते यांना विनंती केली होती.त्यांच्याकडे माणूस पाठवला होता आणि त्यांनी हे कबूल केले होते की मी लाईन टाकण्यास परवानगी देतो. जे काही घडलेले आहे असे सर्व विरोधी पक्ष नेते सांगत असतांनासुध्दा माननीय मंत्रीमहोदय ते ॲक्सेप्ट करीत नाहीत.मंत्रीमहोदय सांगत आहे की फॉरेस्टमुळे ते शक्य होणार नाही.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : आपल्याला परवानगी मिळालेली आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : फॉरेस्टची परवानगी मिळालेली नाही.

श्री.नितीन गडकरी : मला आपल्या हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी बैठकीमध्ये जी चर्चा झाली होती त्याची माहिती सांगितली आहे.माननीय मंत्री श्री. अजित पवार यांनी श्री.बबनराव पाचपुते यांना फोन केला होता त्याचीसुध्दा माहिती त्यांनी सांगितली आहे.असे असतांना माननीय मंत्रीमहोदयांकडे ती माहिती नाही असे दिसते. तेव्हा

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात दुरुस्ती करण्याची गरज आहे.सन्माननीय विरोधी पक्षाचे नेते जबाबदारीने सांगत आहेत.त्यांनी कॅबिनेट मंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. ते मंत्री आपल्या खात्याचे कॅबिनेट मत्री आहेत तेव्हा राज्यमंत्र्यांनी ही बाब मान्य केली पाहिजे. विरोधी पक्ष नेते सुध्दा कॅबिनेट दर्जाचे आहेत. त्यांनी सर्व माहिती सांगितलेली आहे तरीही राज्यमंत्री ती माहिती ऐकावयास तयार नाही.

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : राज्यमंत्र्यांकडे त्याची माहिती नाही असे दिसते.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, मी अगोदरच सांगितले आहे की, त्या बैठकीमध्ये मी देखील उपस्थित होतो आणि ती बैठक 26 ऑक्टोबरला झाली होती. त्या दिवशी देखील 10-40-50 याप्रमाणेच ठरले होते. सभापती महोदया, ही नगरपालिका सक्षम आहे, तिचे उत्पन्न साडेसतरा कोटीचे आहे आणि प्रशासकीय किंमत 11 कोटी आहे. त्या ठिकाणी पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज आहे याबद्दल दुमत नाही. पण नगरपालिका सक्षम आहे ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, ही नगरपालिका सक्षम नाही. ...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, या खामगावचे आमदार आमच्या पक्षाचे आहेत. अर्थात यामध्ये राजकारण आणण्याचा प्रश्न नाही. पण मी आपल्याला हे सांगू इच्छितो ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, तेथील नगरपालिका बीजेपीकडे आहे आणि आमदार मात्र तुमच्या पक्षाचा आहे. सभापती महोदय, मी त्या दिवशी देखील माननीय मंत्री महोदय माननीय श्री.अजितदादा पवार यांना विनंती केली होती की, साऱ्या महाराष्ट्रात तुमचे निकष काहीही असले तरी येथील दुष्काळसदृश्य परिस्थिती लक्षात घेऊन, येथील पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेऊन तुम्ही 10:90 मध्ये योजना करण्यासाठी फेरविचार करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदया, मी शासनाचे या संबंधातील धोरण स्पष्टपणे आपल्यापुढे सांगितले आहे. आपल्याला कोठेही नगरपालिकेला योजना पाहिजे असेल तर तेथे 10-40-50 याप्रमाणेच आम्ही योजना राबविणार. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, येथील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता 10:90 मध्ये ही योजना बसविण्याचा आपण प्रयत्न करणार काय ? असे विचारले असतानाही त्याला नकारात्मक उत्तर देण्यात आलेले आहे त्यावरून या शासनाला दुष्काळग्रस्त माणसाला पाणी पुरवठा करावयाचा नाही असे दिसते. तरी त्याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करतो.

( काही विरोधी पक्ष सदस्य सभात्याग करतात. )

**तालिका सभापती** : यानंतर नियम 93 खालील पुढील निवेदन क्र.4 घेण्यात येईल.

****

...... झेड 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z 2

**पृ.शी.** : अकोला शहरातील शासकीय निवासस्थान भाड्याने देऊन तेथे देहविक्रीचा अनैतिक व्यवसाय सुरू असणे.

**मु.शी.** : अकोला शहरातील शासकीय निवासस्थान भाड्याने देऊन तेथे देहविक्रीचा अनैतिक व्यवसाय सुरू असणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, गुरूमुख जगवाणी वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री. रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : अध्यज महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, गुरूमुख जगवाणी यांनी "अकोला शहरातील शासकीय निवासस्थान भाड्याने देऊन तेथे देहविक्रीचा अनैतिक व्यवसाय सुरू असणे " या विषयावर नियम 93 अ-वये जी सूच-ना दिली होती, तिला अ-नुलजू-न, आपज निदेश दिल्याप्रमाजे मला निवेद-न जरावयाचे आहे. निवेद-नाच्या प्रती सदस्यांना अजोदरच वितरित जेलेल्या असल्या-ने मी हे निवेद-न सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेद-न सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेद-न छापावे )

...... झेड 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 च्या सुचनेवरील मा.सा.बां.राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर..)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, या ठिकाणी आमच्या सहकारी सदस्यांनी सभात्याग केलेला आहे त्यांना माझा पूर्ण पाठींबा आहे. परंतु देहविक्रीतील अनैतिक धंद्यातील दलालावर कारवाई व्हावी या उद्देशानेच मी सभात्यागामध्ये भाग न घेता येथे थांबलेली आहे.

सभापती महोदया, गृह विभागाकडून आलेल्या या निवेदनामध्ये म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग या शासकीय विभागातील कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी असलेल्या इमारतीमध्ये हा अनैतिक व्यवसाय सापडला आहे. परंतु याबाबत तेथील रहिवाशांनी कोठलीही तक्रार केलेली नाही. तेव्हा या गंभीर प्रश्नाच्या संदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे आपण स्वतःहून, सुमोटो, ज्यांच्या अखत्यारीमध्ये ही कॉमनपूल क्वार्टर होती त्या अधिकाऱ्यांनी हा वेश्या व्यवसाय चालविण्यासाठी ती इमारत वापरली म्हणून कोणती कारवाई करणार आहात ? तसेच या लोकांना जामीन मिळू नये यासाठी शासन कोणती पावले उचलीत आहे ? तिसरे म्हणजे या आरोपींकडून मोबाईल संच जप्त केलेले आहेत परंतु कित्येकदा असे आढळून येते की, पोलीसच त्यातील मेमरी कार्ड काढून टाकतात. कारण त्या मोबाईलवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे नाव व नंबर आलेले असतात. तेव्हा या आरोपींच्या मोबाईलवर जी नावे व नंबर्स सापडले आहेत ते कोण अधिकारी आहेत आणि अशा प्रकारचा इम्मॉरल ट्राफिक ॲक्ट मध्ये हे जे आरोपी सापडलेले आहेत त्यांना जामीन मिळू नये म्हणून, ज्याप्रमाणे आता आपण दारूबंदीचा कायदा केला आणि त्यामध्ये तरतूद केली आहे त्याप्रमाणे, कायदा कराल काय ?

( यानंतर श्री. सरफरे ... एए 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदया, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, श्री. वहिद अहमद हिफाजत उल्ला खान हा कॉमन पूल क्वॉर्टरमध्ये रहात होता. तो बांधकाम खात्याच्या कोणत्याही इमारतीमध्ये रहात नव्हता. त्याच्यावर गुन्हा दाखल करुन त्याला निलंबित केले आहे व या प्रकरणाची चौकशी चालू आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, या व्यक्तीला राजाश्रय देणारा मूळ सूत्रधार जो आहे त्याची चौकशी झाली पाहिजे. कारण एका आरोपीला पकडल्यानंतर त्यामधून दुसरा गुन्हेगार तयार होईल. म्हणून यामध्ये जो मुख्य बॉस आहे त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदया, याबाबत चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वसई तालुक्यात एस.टी.बस सेवेच्या खाजगीकरणाविरुध्द सुरु असलेले बेमुदत उपोषण.

मु.शी. : वसई तालुक्यात एस.टी.बस सेवेच्या खाजगीकरणाविरुध्द सुरु असलेले बेमुदत उपोषण याबाबत डॉ. अशोक मोडक यां-ी दिलेली -ियम 93 अ-वये सूच-ाा.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. अशोक मोडक यां-ी "वसई तालुक्यात एस.टी.बस सेवेच्या खाजगीकरणाविरुध्दसुरु असलेले बेमुदत उपोषण" या विषयावर -ियम 93 अ-वये जी सूच-ाा दिली होती, तिला अ-ुलजू-ा, आपज -िदेश दिल्याप्रमाजे मला -िवेद-ा जरावयाचे आहे. -िवेद-ाच्या प्रती सदस्यां-ाा अजोदरच वितरीत जेलेल्या असल्या-े मी हे -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी निवेदनाचे मागील पृष्ठ कृपया पहावे. त्यातील दुसऱ्या परिच्छेदामध्ये "वसई तालुक्यातील वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपालिका हद्दीमध्ये खाजगी प्रवासी वाहतूक सुरु करण्याबाबतचा ठराव चारही नगरपालिकांनी पारीत केलेला आहे". मंत्रिमहोदयांनी कृपया तेथील असंतोष समजून घ्यावा. माझ्याकडे नालासोपारा प्रवासी संघटनेचे पत्र आहे. इथे शहर बस वहातुकीचा अर्थ लावला जात आहे त्या बसेस खेडयापाडयातून पाठवावयाच्या आहेत. याठिकाणी ज्या शहराचा उल्लेख केला,त्या वसई, विरारला जोडण्यासाठी तेथील खेडयापाडयातून, गावातून बसेस सुरु होतील. यामुळे विद्यार्थी, मुले-मुली, वयोवृध्द नागरीक यांच्यामध्ये असंतोष निर्माण होईल. याचे कारण त्यांना मिळणारी सवलत बंद होणार आहे. तेव्हा आपण ही बस सेवा गावातून जाणार नाही, खेडयातून जाणार नाही याची नक्की खात्री करुन घेणार काय? व त्याचा अर्थ तसा लावणार काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, एस.टी. बस सेवेचे खाजगीकरण करण्याच्या विरोधात सुरु असलेल्या उपोषणासंबंधी याठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यादृष्टीने तेथील शहर वहातूक बंद केली जाणार नाही अशाप्रकारच्या सूचना दिल्या आहेत. आणि परवाच्या दिवशी उपोषण करण्यासाठी बसलेल्या उपोषणकर्त्यांना सुध्दा सांगितले आहे, व त्यांना उपोषण सोडण्यासाठी विनंतीही केली आहे. सभापती महोदया, एस.टी. महामंडळाची बस सेवा ही लोकांच्या सोयीसाठी आहे. त्या दृष्टीकोनातून एस.टी. महामंडळाची कोणतीही सेवा बंद केली जाणार नाही. ती सेवा सुरु राहील.

डॉ. अशोक मोडक : मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये म्हटले आहे की, "वसई तालुक्यातील वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपालिका हद्दीमध्ये खाजगी प्रवासी वाहतूक सुरु करण्याबाबतचा ठराव चारही नगरपालिकांनी पारित केलेला आहे" याबाबत मी याठिकाणी शंका व्यक्त केली आहे. वर्षानुवर्षे शहर बससेवेच्या नावाखाली ही सेवा सुरु असून प्रत्यक्षात मात्र त्या बसेस खेडयापाडयातून जात होत्या. त्यामुळे या ठिकाणी आंदोलन करण्यात आले आहे. या चारही नगरपालिकांनी पारीत केलेल्या ठरावाचा चुकीचा अर्थ लावून यामध्ये खाजगी बस वहातूकदारांची मलई होणार आहे तर सामान्य माणसाची धुलाई होणार आहे. हा यामागील अर्थ आहे तो तुम्हाला मान्य आहे काय? मान्य असेल तर या चारही नगरपालिकांकडून आपण खुलासा मागविणार काय?

16-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )AA 4
DGS/ D/ RJW/ श्री. सुंबरेनंतर.. 12:45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदया, चारही नगरपालिकांकडून खुलासा मागविण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, ही बस सेवा सुरु करण्यासाठी या नगरपालिकांनी ठराव पारीत केला. त्याप्रमाणे ही बस सेवा फक्त त्या नगरपालिकांच्या सीमेमध्ये राहिली पाहिजे. ती बस सेवा नगरपालिकांची हद्द सोडून बाहेर खेडापाडयातून केली जाईल. आणि त्यामुळे विद्यार्थी, वृद्ध यांना जी सवलत मिळणार आहे तिच्यापासून ते वंचित होणार आहेत. याचा त्यांना त्रास होणार आहे. म्हणून प्रश्न अगदी स्पेसिफिक आहे. नगरपालिकांनी केलेल्या ठरावाप्रमाणे उद्या हे लोक आपली बस सेवा सुरु करतील. ती बस सेवा सुरु झाल्यानंतर त्या नगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर जाता कामा नये याची आपण दक्षता घेणार काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : ती बस सेवा नगरपालिका हद्दीच्या बाहेर जाणार नाही अशाप्रकारची व्यवस्था करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई,ठाणे शिधावाटप क्षेत्रात पकडण्यात आलेले रॉकेलचे 5 टँकर पोलीसांनी सोडून देणे.

**मु.शी.**: मुंबई,ठाणे शिधावाटप क्षेत्रात पकडण्यात आलेले रॉकेलचे 5 टँकर पोलीसांनी सोडून देणे यासंबंधी श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

मा. सदस्य अनुपस्थित.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्तेसंदर्भात जाहीर केलेल्या पॅकेजमधील मदत तातडीने न मिळणे.

मु.शी. : राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्तेसंदर्भात जाहीर केलेल्या पॅकेजमधील मदत तातडीने न मिळणे याबाबत सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, अरविंद सावंत, विनोद तावडे, डॉ. नीलम गोऱ्हे यां-ी दिलेली -ियम 93 अ-वये सूच-ा.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, अरविंद सावंत, विनोद तावडे, डॉ. नीलम गोऱ्हे यां-ी "राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्तेसंदर्भात जाहीर केलेल्या पॅकेजमधील मदत तातडीने न मिळणे" या विषयावर -ियम 93 अ-वये जी सूच-ा दिली होती, तिला अ-ुलजू-, आपज -िदेश दिल्याप्रमाजे मला -िवेद-ा ज्रावयाचे आहे. -िवेद-ाच्या प्रती सदस्यां-ा अजोदरच वितरीत जेलेल्या असल्या-े मी हे -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे.)

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/RJW पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:50

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 अन्वये सूचना देण्यामागचे विशेष कारण असे आहे की,महाराष्ट्रात ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींनी याठिकाणी विधान भवनासमोर 12 डिसेंबरला धरणे धरण्याचा कार्यक्रम केला. दोन दिवसापूर्वीच महाराष्ट्र शासनाने विदर्भातील सहा जिल्हयांसाठी पॅकेज जाहीर केले. या पॅकेजमध्ये आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांसंबंधी कोणतीही ठोस उपाययोजना नव्हती. पॅकेजमध्ये असे सांगितले आहे की, कलेक्टर यांच्या अध्यक्षतेखाली त्या-त्या जिल्हयात कमिटी स्थापन करुन तेथील लोकप्रतिनिधी, सामाजिक समाजसेवक यांची कमिटी स्थापन करुन आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांची प्रकरणे तपासली जातील आणि मग योग्य असेल तर त्यांना मदत दिली जाईल. 14 आत्महत्या झाल्यानंतर मागच्या अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, "यासंबंधी कमिशनर यांना चौकशी करण्यास सांगतो आणि त्यांनी चौकशी केल्यावर आत्महत्या झ ालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देता येईल."आजच्या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की,"उपरोक्त आत्महत्यांबाबत विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी सुरु असून चौकशीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर मदतीसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्याबाबत कार्यवाही तातडीने करण्यात येईल."मार्चमधील अधिवेशनाच्यावेळी, जुलै मधील अधिवेशनाच्यावेळी आणि आजही तशाच प्रकारचे उत्तर येत आहे. विदर्भातील 6 जिल्हयांसाठी स्पेशल पॅकेज जाहीर केलेले असताना, माझा स्पेसीफीक प्रश्न असा आहे की, टाटा इन्स्टीटयूट आणि इंदिरा गांधी संस्था यांच्या अहवालानुसार 6 जिल्हयातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आठ दिवसाच्या आत शासन मदत देणार आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधात येथे प्रश्न उपस्थित केलेला आहे. मागच्या आठवडयातच राज्य शासनाच्यावतीने विदर्भातील, अमरावती जिल्हयातील 5 जिल्हे आणि वर्धा जिल्हा अशा सहा जिल्हयांसाठी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय चांगले आणि महत्वाचे असे 1 हजार 75 कोटीचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे, पॅकेजमध्ये उल्लेख केल्यानुसार येथून पुढच्या काळामध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर त्यांना मदत करण्याचे ठरविले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांबरोबर लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांनी एकत्र बसून याबाबतीत निर्णय घ्यावयाचा आहे. कारण आत्महत्या केल्यावर शेतकऱ्यांच्या

. . . .2 बी-2

डॉ.राजेंद्र शिंगणे . . . .

कुटुंबियांना मदत करीत असताना, आतापर्यंतचे धोरण असे होते की, आयुक्तांमार्फत, जिल्हाधिकाऱ्यां-मार्फत चौकशी केली जात असे. पण याबाबतीत तक्रारी येत होत्या की, अशा प्रकारे चौकशी करीत असताना भेदभाव होतो. चौकशी करताना त्यावेळी लोकप्रतिनिधींना विचारात घेतले जात नव्हते. म्हणनू या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आपण धोरण घेतलेले आहे. पण निवेदनामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे जवळपास आठ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. त्यामध्ये गोपाळ मानकर, उत्तम शेंडे, गोविंद वाघ, प्रकाश राठोड या शेतकऱ्यांच्या बाबतीत चौकशी पूर्ण करुन त्यांना आठ दिवसात एक लाख रुपयांची मदत करण्यात येईल. उर्वरित देवराव पारधेकर, सहिदखाँ शब्बीरखाँ यांच्या नावाने कर्ज नव्हते. तसेच कैलास सेंबेकर या शेतकऱ्याबाबतचा अहवाल आलेला नव्हता. हा अहवाल मागवून घेऊन, ते पात्र ठरले तर त्यांना देखील मदत केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कलेक्टर यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी आणि शेतकरी प्रतिनिधी यांची कमिटी नेमण्याचे ठरविले आहे. हे प्रकरण गेले सहा महिने सुरु आहे. तेव्हा याबाबतीत कलेक्टरनां टाईम बाऊंड स्वरुपाच्या सूचना देणार आहात का ?
की, त्यांनी दोन महिन्याच्या आत जिल्हयामध्ये झालेली शेतकऱ्यांच्या आत्महत्येची प्रकरणे निकालात काढली पाहिजेत. असे कलेक्टरनां आदेश देणार आहात का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दोन महिन्याची मुदत द्यावी असे म्हटले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर(खाली बसून) : मागच्या प्रकरणाबाबत.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागच्या प्रकरणाबाबत सांगितले आहे. तर मागच्या ज्या प्रकरणाबाबत कलेक्टरनां चौकशी करण्याबाबत सांगितले होते, त्याबाबतीत त्या-त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी येत्या दोन महिन्याच्या आत ती प्रकरणे मागवून घेऊन, शेतकरी, लोकप्रतिनिधी यांच्याबरोबर बैठक घेऊन येत्या दोन महिन्याच्या आत बाकीची प्रकरणे निकालात काढली जातील.

**(सभापतीस्थानी - माननीय उपसभापती)**

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मलकापूर स्टेट बँकेतील लेखापाल यांच्या घरात घुसून 3 महिलांवर करण्यात आलेला खुनी हल्ला.

**मु.शी.** : मलकापूर स्टेट बँकेतील लेखापाल यांच्या घरात घुसून 3 महिलांवर करण्यात आलेला खुनी हल्ला, याबाबत श्रीमती कांता नलावडे, श्री.नितीन गडकरी, श्रीमती संजीवनी रायकर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्रीमती कांता नलावडे, श्री.नितीन गडकरी, श्रीमती संजीवनी रायकर वि.प.स. यांनी "मलकापूर स्टेट बँकेतील लेखापाल यांच्या घरात घुसून महिलांवर करण्यात आलेला खुनी हल्ला" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

SKK/ RJW/ KGS/ MHM/ D/

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, श्रीमती शोभा वराडे यांच्या मोठया मुलाचा मित्र श्री.गजेंद्र उर्फ पिंटू पाथटकर हा त्यांच्या घरामध्ये वारंवार येत होता. तेव्हा त्या बाईंनी त्याला विचारले की, तू सारखा सारखा आमच्या घरी का येतोस ? यावरुन त्या मुलाच्या संदर्भात आक्षेपार्ह काहीतरी असणार. तुम्ही श्री.पिंटूला पकडले, पण श्रीमती वराडे बाईंचा मुलगा त्याचा मित्र आहे. याच्याकडे आपण चौकशी केलेली आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,हा श्री.गजेंद्र उर्फ पिंटू पाथटकर हा त्या मयत महिलेच्या मुलाचा मित्र होता, हे बरोबर आहे. तो त्यांच्या घरी सारखा येत होता. त्यावर त्या मयत महिलेने त्याला तू सारखा सारखा कशाला येतो ? कामधंदा न करता, असा का फिरतो, काही तरी कामधंदा कर, असे त्याने टोकल्यामुळे त्याने तसे केले.

श्रीमती संजीवनी रायकर : इतके साधे प्रकरण नाही. त्यांचा जो मुलगा आहे, त्या मुलाला तो सारखा तुझ्याकडे कोणत्या कारणाने येत होता, हे विचारलेले आहे काय ? त्या ठिकाणी मुलगी आलेली होती, त्यासाठी सुध्दा तो कदाचित येत असेल, अशाप्रकारे चौकशी केलेली आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्यांची जी भाची मुलगी होती तिच्यासाठी तो येत होता काय, याचीही चौकशी पोलीसांनी केली. परंतु तसे काही निष्पन्न झालेले नाही. फक्त तो त्या मयत महिलेकडे तीनचार दिवसापासून पैसे मागत होता. त्यांनी पैसे दिले नाहीत. उलट त्या महिलेने...

श्रीमती संजीवनी रायकर : हा आणखीन वेगळा प्रकार आहे.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ KGS/ MHM/ D/

**पृ.शी.** : भंडाऱ्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानाला रास्त भाव मिळण्याची केलेली मागणी.

**मु.शी.** : भंडाऱ्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानाला रास्त भाव मिळण्याची केलेली मागणी याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी "भंडाऱ्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानाला रास्त भाव मिळण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा,गोंदिया आणि नागपूर या ठिकाणच्या धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर या विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये ठोस अशी काहीही घोषणा झालेली नाही आणि त्यांना कोणत्याही प्रकारचा दिलासा मिळालेला नाही. गेल्या अधिवेशनामध्ये धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी 20 कोटी रुपयाचे पॅकेज देण्यात आलेले होते. त्यावेळेला अल्प रक्कमेसाठी 60 रुपये, 70 रुपयासाठीसुध्दा चेक देण्यात आले होते. यासाठी त्यांना बँकेमध्ये खाती उघडण्यास सांगण्यात आली होती. यावरुन या ठिकाणी गदारोळ झालेला होता. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीकोनातून आपण शेवटी जरी आम्ही पाठपुरावा करतो आहे असे म्हटले असले तरी याबाबतचा कधी पर्यन्त पाठपुरावा होणार आहे आणि किमान आधारभूत किंमत आणि प्रत्यक्षात मिळणारी किंमत यामधील जो फरक आहे तो दूर करुन यांना काही पॅकेज देणार आहात काय ? यासंबंधीची शासन घोषणा केव्हा करणार आहे ? आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे तर आजच यासंबंधीची घोषणा व्हावी असा माझा आग्रह आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये एक तासापूर्वी याच विषयावर चर्चा झालेली आहे. असा निर्णय घेण्यात आला होता की, मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कन्सर्न आमदारांची बैठक घेण्यात यावी. मग काहीतरी निर्णय घेण्यात येईल. हा निर्णय येत्या 15-20 दिवसामध्ये घेण्याचा प्रयत्न राहील. शासनाची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. आपण जी शिफारस केलेली आहे ती 927 रुपये 61 पैशाची केलेली आहे. केंद्र सरकारचा जो आयोग आहे. आयोगाने 570 रुपये प्रति क्वींटल एवढी आधारभूत किंमत मान्य केलेली आहे. पण शासनाची याबाबतीत भूमिका अतिशय स्पष्ट आहे. मदत करण्याची आपली भावना आहे. यासंबंधीचे जे पॅकेज आहे ते माननीय मुख्यमंत्री महोदयांची बैठक झाल्यानंतर जाहीर करण्यात येईल.

--

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ RJW/ KGS/ MHM/ D/

**पृ.शी.** : कुर्ला, मुंबई येथील जैन मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर मिळकत मालकाने संरक्षक भिंत बांधणे.

**मु.शी.** : कुर्ला, मुंबई येथील जैन मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर मिळकत मालकाने संरक्षक भिंत बांधणे याबाबत प्रा.शरद पाटील, श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटील, श्री. जयंत प्र. पाटील,वि.प.स. यांनी "कुर्ला, मुंबई येथील जैन मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर मिळकत मालकाने संरक्षक भिंत बांधणे", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ KGS/ MHM/ D/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सिव्हील कोर्टाने हा रस्ता सुरु करण्याच्या संबंधातील आदेश संबंधित महापालिकेला दिले होते. या ठिकाणी निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे हायकोर्टाने याला स्टे दिलेला आहे काय ? हायकोर्टाने स्टे दिला नसेल तर त्या ठिकाणी मंदिरापर्यन्त रस्ता जाण्यासाठी महापालिका सोय करेल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी हायकोर्टामध्ये जैन मंदिर ट्रस्टने दाद मागितल्यानंतर कोर्टाने अंतरिम आदेश दिले की, 6 फूट रस्ता जैन मंदिराकडे जाण्यासाठी विकासकाने सोडावा अशाप्रकारचा अंतरिम आदेश दिलेला आहे. महानगरपालिका हा आदेश पाळण्याच्या दृष्टीकोनातून आणि 6 फूट रस्ता करुन देण्याच्या दृष्टीकोनातून कारवाई करेल. त्याचबरोबर महानगरपालिकेने विकासकाला किंवा संबंधित जैन मंदिर स्ट्रस्टला अशीही मागणी केलेली आहे की, तुमच्याजवळ राईट टू वे असेल तर त्या पध्दतीची कागदपत्रे दाखल केली तर निश्चितप्रकारे तसा रस्ता देखील महानगरपालिकेच्या वतीने करुन देण्यात येईल.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:श्रीमती उषा चव्हाण यांच्या उषा सभागृहाच्या बांधकामास दिलेली स्थगिती.

**मु.शी.**: श्रीमती उषा चव्हाण यांच्या उषा सभागृहाच्या बांधकामास दिलेल्या स्थगितीबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर वि.प.स.यांची नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्य मंत्री) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर **यां**नी "श्रीमती उषा चव्हाण यांच्या उषा सभागृहाच्या बांधकामास दिलेली स्थगिती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>नि वे द न</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे :सभापती महोदय, हल्ली जो टी.डी.आर. घोटाळा सुरु आहे. त्या घोटाळयातील हा एक प्रकार आहे. जवळ जवळ 200 कोटीचा घोटाळा टी.डी.आर.च्या माध्यमातून पुणे शहरात झाल्याचे मी वर्तमानपत्रात वाचले आहे. पण प्रत्यक्षात झालेला एक घोटाळा मी सभागृहासमोर सादर करीत आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिध्द अभिनेत्री श्रीमती उषा चव्हाण यांचा पुण्यामध्ये बिब्बेवाडी येथे त्यांच्या मालकीचा एक भूखंड होता. तेथे त्यांनी उषा सभागृहाचे बांधकाम सुरु केले. नगरपालिकने ते बांधकाम अचानकपणे स्थगित केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, त्या जागेचा टीडीआर महानगरपालिकेच्या अधिका-यांनी बिल्डर्सशी संगनमत करुन जवळ जवळ 1 कोटी 70 लाख रुपयाला परस्पर बिल्डरला विकला आहे. त्यानंतर त्याबाबत रीतसर तक्रार करण्यासाठी त्या पोलीस स्टेशनमध्ये गेल्या. डेक्कन पोलीस स्टेशनमध्ये त्यांची तक्रार घेण्यास पोलिसांनी नकार दिला. त्यामुळे त्या सुप्रसिध्दी अभिनेत्रीने तेथेच उपोषण सुरु केले. सबंध दिवसभर उपोषण केल्या नंतर पुण्यातील आमदार श्री. गिरीष बापट, नगरसेवक आणि मी स्वत: तेथील डी.सी.पी.सी. यांचेशी बोलल्यानंतर त्यांची तक्रार नोंदवण्यात आली. माझा गृहराज्यमंत्र्यांना प्रश्न असा आहे की, हया बाबतीत पोलीस स्टेशनवर चौकशी केली काय? जर चौकशी केली असेल तर संबंधित बिल्डरवर अथवा संबंधित व्यक्तीवर किंवा अधिका-यावर कारवाई केली आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, या ठिकाणी श्रीमती उषा चव्हाणांची दोन प्रकरणे आहेत. एक तर खोटया पध्दतीने पॉवर ऑफ ॲटर्नी घेऊन टीडीआर घेण्याचे श्री. थोपटे यांच्या माध्यमातून जे काम झाले आहे त्यांच्या विरुध्द फिर्याद नोंदवलेली आहे आणि हे प्रकरण न्यायालयात आहे. त्याचबरोबर दुसरे प्रकरण असे आहे की, ज्या ठिकाणी टीडीआर अद्याप दिलेला नाही. परंतु उषा सभागृहाचे काम थांबविलेले आहे, त्याचे कारण वेगळे आहे. ती जमीन इकॉनॉमिकली विकर सेक्शनसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहे. जर त्यांना त्या ठिकाणी अशा पध्दतीचे सभागृह बांधावयाचे असेल तर नियम 37 अन्वये महानगरपालिका पुणे यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविला तर जरुर त्या पध्दतीने बदल करुन शासन त्या सभागृहाला परवानगी देईल.

---------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:नागपूर महानगरपालिकेमध्ये गेल्या सात महिन्यापासून सर्वसाधारण सभा न होणे.

**मु.शी.**: नागपूर महानकरपालिकेमध्ये गेल्या सात महिन्यापासून सर्वसाधारण सभा न होणे या बाबत सर्वश्री नितीन गडकरी, सागर मेघे, पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्य मंत्री) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, सागर मेघे, पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी "नागपूर महानगरपालिकेमध्ये गेल्या सात महिन्यापासून सर्वसाधारण सभा न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, मागील चार महिन्यापासून नागपूर महानरगपालिकेमध्ये बैठक झालेली नाही, हे आपणही मान्य केलेले आहे. ती बैठक कां झाली नाही?

श्री. राजेश टोपे :सभापती महोदय, बैठक झालेली नाही हे मी निवेदनामध्ये देखील मान्य केलेले आहे. त्यामुळे निश्चितप्रकारे ही बाब कायद्याला धरुन नाही. म्हणून या बाबतची चौकशी प्रधान सचिव, नगरविकास (2) च्या माध्यमातून निश्चितप्रकारे केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, हे गंभीर प्रकरण आहे.चार महिन्यापासून बैठकच झालेली नाही. आणि त्यासंबंधीचे काही कारणही सांगितलेले नाही. बैठक झाली नाही हे जर सिध्द झालेले आहे तर त्या महापालिकेवर शासन काही कारवाई करणार आहे काय? नागपूर महापालिकेचा कारभार ठप्प झालेला आहे. बैठक झालेली नसल्यामुळे कामे मंजूर झालेली नाहीत. अंदाजपत्रक मंजूर झालेले नाही. आणि अंदाज पत्रक मंजूर न होता त्या महापालिकेचा कारभार चाललेला आहे. म्हणून ज्या महापालिकेने नियमात असतांना चार महिन्यापासून एकही बैठक घेतली नाही, त्या महापालिकेवर प्रधान सचिव काय कारवाई करणार आहेत? शासन त्या महापालिकेच्या बरखास्तीची कारवाई करणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी मी स्पष्ट सांगितले की, निश्चितप्रकारे महापालिकेची बैठक झालेली नाही. परंतु महानगरपालिकेच्या अधिनियमामध्ये दर महिन्याला जनरल बॉडीची बैठक व्हावी अशी तरतूद आहे. परंतु एखादी बैठक झाली नाही तर.....

श्री. पांडुरंग फुंडकर : बैठक कां झाली नाही?

श्री. राजेश टोपे : बैठक झाली नाही, हे चूकीचे काम आहे. आणि म्हणूनच मी म्हटले की, प्रधान सचिवांच्या माध्यमातून चौकशी केली जाईल आणि निश्चितप्रकारे तशा प्रकारची समज महापौरांना आणि इतरांना दिली जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या महानगरपालिकेची चार महिन्यापासून मिटिंग झालेली नाही. एक महिना मिटिंग घेतली नाही म्हणून भाजपची महानगरपालिका नंदलाल समितीने बरखास्त केलेली आहे.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 ची निवेदने ...... क्र. 12 सुरु....

श्री. नितीन गडकरी .....

मग याच मुद्दयाच्या आधारावर ही महापालिका का बरखास्त करीत नाहीत ? महापौरांनी, बंदी असतांना देखील आपल्या घराच्या मागील जागा भाडयाने देतांना त्याचे 5000 रुपये घेतले होते व त्या ठिकाणी मंडप टाकण्याची परवानगी दिली होती, दोन लाख रुपयाचे ॲफिडेव्हीट करुन घेतले होते. नंतर हे सर्व महापालिकेचे अधिकारी तेथे गेले, त्यांनी पंचनामा केला आणि मंडप काढायला लावला, स्थायी समितीचे चेअरमन विना परवानगी गाडी घेऊन पुण्याला गेले व बिल वसूल केले, म्हणून माझा प्रश्न असा आहे की, ज्या महापौरांनी ही कृती केली त्यांची चौकशी करुन कारवाई करणार काय ? तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर देखील कारवाई होणे आवश्यक आहे आणि चार महिने महापालिकेची बैठकच घेतली नाही त्याबाबत महापालिकेच्या संदर्भात कोणती कारवाई शासन करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : महापालिकेची बैठक घेतली नाही हे चुकीचे काम झालेले आहे. खरे म्हटले तर महापालिकेच्या कायदयामध्येच दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. कारण नगरपालिकेच्या कायदयानुसार जर अशा प्रकारे बैठक नगरपालिकेमध्ये झाली नाही तर मुख्याधिकारी जिल्हाधिकाऱ्यांना तसे कळवितात आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून विशेष बैठक घेण्यात येते. पण जनरल बॉडीची बैठक झाली नाही तर महापालिकेच्या कायदयात तशी तरतूद नाही की, आयुक्तांना सांगून अशा प्रकारे बैठक घेण्यात यावी. या महापालिकेमध्ये चार महिन्यापासून बैठक झालेली नाही त्यादृष्टीने महापालिकेची अनेक कामे खोळंबलेली आहेत. जनरल बॉडीशी संबंधित जेवढी कामे आहेत तेवढी थांबलेली असल्यामुळे ही बाब शासन स्तरावर खपवून घेतली जाणार नाही. म्हणूनच प्रधान सचिवांना या सर्व गोष्टीची चौकशी करण्यास सांगितले आहे. तसेच बंदी असतांना देखील महापौरांनी जमीन भाडयाने देण्याचे काम केलेले आहे, स्टँडिंग कमिटीचे चेअरमन विनापरवानगी वाहन घेऊन बाहेर निघून गेले आणि बिलाची वसूली करण्यात आली या सर्व बाबींची देखील चौकशी करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : महोदय, ऑलरेडी नंदलाल समितीने नागपूर महापालिकेची चौकशी केल्यानंतर त्या अहवालात नियमाप्रमाणे तीन महिन्याच्या आत किमान एक तरी बैठक घेतली

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.........

पाहिजे असे म्हटले आहे. या ठिकाणी आपण असे म्हणता की कमिशनरांनी बैठक बोलवावी. अशा प्रकारे राज्यमंत्र्यांचा एक गट आणि कॅबिनेट मंत्र्यांचा एक गट आहे. या ठिकाणी प्रधान सचिव हे महापौर तसेच स्थायी समितीचे अध्यक्ष यांच्याबाबत चौकशी करुन 8 दिवसात त्याबाबतचा निर्णय जाहीर करतील काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, 8 दिवसात चौकशी होऊन निर्णय देणे शक्य होईल असे वाटत नाही. म्हणून एक महिन्यात ही चौकशी पूर्ण करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मी सांगितले की, चार महिन्यामध्ये या महापालिकेची बैठक झाली नाही, महापालिकेच्या कायदयात दुरुस्ती केली पाहिजे, अशा प्रकारचे बोधामृत त्यांनी आम्हाला पाजले म्हणून पुन्हा हे एक महिन्याचे बोधामृत ते का पाजत आहेत ? म्हणून 15 दिवसांत ही चौकशी पूर्ण करुन तसा निर्णय शासन जाहीर करणार काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, मला आताच मिळालेल्या माहितीनुसार 20.12.2005 ला या महापालिकेची बैठक घेण्याबाबतची नोटीस काढलेली आहे. त्यानंतर देखील यापूर्वी जी अनियमितता या महापालिकेमध्ये झालेली आहे त्यासंदर्भात चौकशी करुन 15 दिवसात तसे जाहीर करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अकोला महानगर पालिकेतील 127 कर्मचा-यांना कमी केल्याबाबत.

**मु.शी.**: अकोला महानगर पालिकेतील 127 कर्मचा-यांना कमी केल्याबाबत श्री. गोपिकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, श्री. गोपीकिशन बाजोरिया यांनी "अकोला महानगर पालिकेतील 127 कर्मचा-यांना कमी केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

**( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )**

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, अकोला महानगर पालिकेत विहित पध्दतीचा अवलंब न करता नियुक्त्या केल्याबद्दल माननीय उच्च न्यायालयात याचिका प्रविष्ठ आहे. परंतु 127 नियुक्त्यांच्या संदर्भात उच्च न्यायालयात एकही याचिका न्यायप्रविष्ठ नाही. उच्च न्यायालयात जी याचिका आहे ती वेगळी आहे. हे कर्मचारी 2000-ते 2001 मध्ये कामावर रुजू होते. त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता 14.10.2005 पासून सेवा मुक्त करण्यात आलेले आहे. यापैकी 13 कर्मचा-यांनाी 5.12.2005 पासून उपोषण सुरु केले व त्यांना वेगवेगळया जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये भरती करण्यात आले होते. निवेदनात म्हटले आहे की, या कर्मचा-यांना रुग्णालयातून सोडण्यात आलेले आहे. परंतु अजूनसुध्दा 4 कर्मचारी रुग्णालयामध्ये भरती आहेत. यासंदर्भात माझे तीन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, महानगर पालिकेत 127 कर्मचा-यांची आवश्यकता आहे काय? प्रश्न क्रमांक दोन असा आहे की, या कर्मचा-यांना परत सेवेत घेण्यासाठी मनपाने काही ठराव केला आहे काय? व त्यावर शासनाची काय प्रतिक्रिया आहे? तसेच माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या 127 कर्मचा-यांना अचानक कामावर न घेतल्यामुळे त्यांचे राहिलेले वेतन कोणत्या तारखेपासून कोणत्या तारखेपर्यंत देण्यात येणार आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी माहिती सांगितली आहे त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, खरे म्हणजे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. केवळ ठरावाच्या माध्यमातून या ठिकाणी भरती करण्यात आलेली आहे एवढेच नाही तर या ठिकाणी इंजिनिअरची भरती सुध्दा नियमाला धरुन करण्यात आलेली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने विभागीय आयुक्तांना सर्व चौकशी करण्याची सूचना दिलेली आहे. विभागीय आयुक्तांची चौकशी चालू आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर 127 कर्मचा-यांच्या बाबतीत कार्यवाही केली जाईल. या ठिकाणच्या वेतनाच्या संदर्भात शासनाने असे कळविलेले आहे की, जे काही वेतन देय असेल ते निश्चितपणे दिले जाईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : या ठिकाणच्या कर्मचा-यांनी काम करुन सुध्दा त्यांना गेल्या 6-7 महिन्यापासून पगार मिळालेला नाही. महापालिकेने ठराव करुन या ठिकाणी कर्मचा-यांची भरती केलेली आहे. या ठिकाणी प्रश्न आहे तो फक्त ज्यूनिअर इंजिनिअरच्या संदर्भातच आहे. ज्यूनिअर इंजिनिअरच्या पोस्टच्या संदर्भात स्टँडींग कमिटी आणि कमिशनर यांचा वाद झाल्यामुळे ज्युनिअर इंजिनिअरचा प्रश्न अडकलेला आहे. उर्वरित जे कर्मचारी आहेत ते ठरावानुसार घेतलेले आहेत. या कर्मचा-यांची मुलाखत सुध्दा घेण्यात आलेली होती. परंतु यासंदर्भात तक्रार होऊन हे प्रकरण कोर्टात गेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे गेल्या सहा महिन्यापासून या ठिकाणच्या कर्मचा-यांना पगार मिळालेला नाही त्यामुळे या कर्मचा-यांना पगार देण्याबाबत आपण त्वरीत निर्देश देणार आहात काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या सर्व पोस्ट ठेकेदारीवर घेण्यात आल्या होत्या. या कर्मचा-यांचा कालावधी संपल्यानंतर त्यांचा कालावधी वाढवून देण्यात आलेला नव्हता. कालावधी वाढवून न देताही हे कर्मचारी काम करीत राहिले खरे म्हणजे लिगल अधिकार कर्मचा-यांकडे नाहीत. परंतु तरी सुध्दा या कर्मचा-यांनी काम केलेले आहे त्यामुळे याबाबत सहानुभूतीने विचार करुन यासंदर्भात अशी सूचना देतो की, या कर्मचा-यांनी जेवेढे दिवस काम केलेले असेल तेवढया दिवसाच्या कामाचे पैसे त्यांना देण्यात येतील. परंतु या कर्मचा-यांच्या नेमणूका नियम धाब्यावर बसवून झालेल्या आहेत. त्यामुळे उच्च न्यायालयाचा जो काही निकाल येईल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर शहरातील ऊंच इमारतींमध्ये आगप्रतिबंधक उपाययोजना नसणे.

**मु.शी.**: नागपूर शहरातील ऊंच इमारतींमध्ये आगप्रतिबंधक उपाययोजना नसणे या बाबत श्री. सागर मेघे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वयेची सूचना.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सागर मेघे यांनी "नागपूर शहरातील ऊंच इमारतींमध्ये आगप्रतिबंधक उपाययोजना नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, नागपूर शहरातील हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. नागपूर शहरामध्ये जेवढया मोठमोठया इमारती आहेत त्यांच्यामध्ये आग लागली तर आगीपासून बचाव करणारी कोणतीही यंत्रणा नाही. उत्तरामध्ये देखील म्हटले आहे की, 624 इमारतींना तात्पुरते ना हरकत प्रमाणपत्र दिले होते. यांसदर्भात नंतर चौकशी केल्यानंतर 365 इमारतीमध्ये आगप्रतिबंधक यंत्रणा नसल्याचे आढळून आले. फायर चिफ ऑफिसर सुनील मेश्राम यांचा मनमानी कारभार नागपूरमध्ये सुरु आहे. आपल्याला माहिती असेल की, राजू लोखंडे यांच्या घरी आग लागली होती त्या आगीमध्ये एक अग्नीशमन दलाचा अधिकारी आणि 10 लोक मृत्यूमुखी पडले होते. उत्तरात म्हटले आहे की, त्यांनी लायसन्स रिन्यूअल केले नव्हते.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे...

ज्युनिअर ऑफिसरने 2001 मध्ये पाहणी केली. त्याचा अहवाल स्पष्ट आहे. त्यात त्याने म्हटले होते की, बिल्डिंगच्या कन्स्ट्रक्शनच्या कामासाठी जे काही प्रीकॉशन घ्यावयास पाहिजे ते घेतलेले नाही. यासंबंधीचे डॉक्युमेंटसुध्दा माझ्याकडे उपलब्ध आहे. तरी सुध्दा याकडे लक्ष देण्यात आलेले नाही. या घटनेमध्ये 11 लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. एवढया मोठया गंभीर प्रश्नाकडे चीफ ऑफिसर लक्ष देत नाही. तेव्हा त्यास शासनाने ताबडतोब निलंबित करणार आहे का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: डागा रुग्णालय,नागपूर येथील वैद्यकीय अधीक्षिका यांनी शस्त्रक्रिया करण्याकरिता मागितलेली लाच.

**मु.शी.**: डागा रुग्णालय,नागपूर येथील वैद्यकीय अधीक्षिका यांनी शस्त्रक्रिया करण्याकरिता मागितलेली लाच बाबत सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री नितीन गडकर इतर वि.प.स.यांनी "डागा रुग्णालय,नागपूर येथील वैद्यकीय अधीक्षिका यांनी शस्त्रक्रिया करण्याकरिता मागितलेली लाच" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरनच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, डागा रुग्णालय,नागपूर येथील वैद्यकीय अधीक्षिकेने शस्त्रक्रिया करण्याकरिता मागितलेली लाच या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यानुसार शासनाने निवेदनाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली आहे. माझ्या सूचनेनुसार शासनाने डागा स्मृती शासकीय रुग्णालय, नागपूर येथील वैद्यकीय अधीक्षिकेवर निलंबनाची कारवाई केल्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो.

....

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

ॲड्.अनिल परब : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय नगरविकास राज्यमंत्रीमहोदयांनी मिठी नदीवरील अनधिकृत बाधकामाच्या विषयासंबंधी असे सांगितले होते की, जर प्रोसिडींगवर असेल तर त्यासंबंधीची माहिती पटलावर ठेवण्यात येईल. दिनांक 7.12.2005 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते त्याचे प्रोसिडींग मी आपल्याकडे पाठवित आहे. त्यानंतर पुन्हा दिनांक 12.12.2005 रोजी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला असता माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी देखील यादी पटलावर ठेवण्यासंबंधीचे आश्वासन दिले होते. मी जो प्रश्न विचारला होता तो वाचून दाखवितो :-

"कोणत्याही बांधकामावर कारवाई झालेली नाही आणि त्यांच्यावर जरी कारवाई झाली असली तरी ती बांधकामे पुन्हा नव्याने उभी राहिली आहेत. केवळ थूक लावण्याचा कार्यक्रम शासनाकडून राबविला जात आहे. अजूनही त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे सरकार अशी चुकीची माहिती देणाऱ्या कामचुकार अधिकाऱ्यांवर किती दिवसात कारवाई करणार आहे ?" त्यास मुख्यमंत्रीमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, "...सदनाला जी माहिती दिली जाते ती अतिशय जबाबदारीने दिली जाते. सदनाचा सदस्य जेव्हा एखादा मुद्दा उपस्थित करतो, त्यावेळी त्यांच्याकडे असलेली माहिती ग्राहय धरली जाते. त्यातल्यात्यात सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब हे त्याच भागतील आहेत. त्यामुळे 512 अनधिकृत बांधकामाबाबतची यादी आम्ही त्यांना देऊ. आज जर त्याठिकाणी पुन्हा बांधकाम झाले असेल किंवा त्यांच्यावर कारवाई झाली नसेल आणि अधिकाऱ्यांनी जर चुकीची माहिती पुरविली असेल तर तो अधिकारी त्याक्षणी निलंबित होईल. तसेच, दिनांक 12.12.2005 रोजीचे श्री.हर्षवर्धन पाटील यांनी सभागृहाला दिलेल्या आश्वसनासंबंधीचे प्रोसिडींग आपल्याकडे पाठवून देत आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

.....

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:माईक बंद असणे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, काल उल्हासनगर संबंधीची लक्षवेधी सूचना आली असताना श्री.पप्पू कलानीसंबंधी बराच आवाज उठविला होता. तेव्हा पासून माझा माईकच बंद झाला. माझा माईक बंद केल्यामुळे मला दुसऱ्याच्या माईकवर जावे लागते. हे कसे काय झाले हे मला कळत नाही.

**उपसभापती** : पीठासीन अधिकारी म्हणून श्री.वसंत डावखरे जो पर्यंत बसलेले आहेत, तो पर्यंत तुमचा आवाज कोणीही बंद करू शकणार नाही, याची मी आपल्याला पूर्ण खात्री देतो.

श्री.नितीन गडकरी : धन्यवाद.

.....

**पृ.शी./मु.शी.**: विजयीदिनाचे स्मरण.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, देशाच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वाचा विषय सभागृहासमोर मांडू इच्छितो. आज 16 डिसेंबर आहे. या दिवशी फिल्ड मार्शल माणेक शॉ यांच्या नेतृत्त्वाखाली आपल्या देशाने बांगला देशवर मोठा विजय मिळविला. त्याचा फक्त उल्लेख व्हावा व मृत जवानांना श्रध्दांजली अर्पण करावी म्हणून मी हा विषय येथे उपस्थित केला आहे.

....

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळाचा मोर्चा.
**मु.शी.** : महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळाचा मोचा यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापूरे, रामनाथ मोते,वि.प.स. यां-ी दिलेली लजवेधी सूच-ा

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : अध्यज महोदय, मी -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि़ज महत्वाच्या बाबीज्डे आपल्या अ-ुमती-ो स-मा-ा-ीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा ज्रावे. अशी वि-ंती ज्रतो.

"महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळाने दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी विधानमंडळावर मोर्चा नेण्याचा व फेब्रुवारी-मार्च 2006 पासून महाराष्ट्रातील सर्व शाळा महाविद्यालयाच्या इमारती बंद ठेवण्याचे आंदोलन जाहीर करणे, महामंडळाच्या अध्यक्षांनी दिनांक 25 ऑक्टोंबर, 2005 रोजी किंवा त्या दरम्यान मुख्यमंत्र्यांना, जिल्हाधिकारी, अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन सादर करुन याबाबतची सूचना देणे, दिनांक 17 फेब्रुवारी, 2004 रोजी शाळा महाविद्यालयाच्या थकित वेतनेत्तर अनुदानाबाबत मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेतील काही आश्वासनांची कार्यवृत्तामध्ये नोंद होणे पण त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी न होणे, काही आश्वासनांची कार्यवृत्तामध्ये नोंद न होणे, दिनांक 5 ऑगस्ट, 2002 च्या बैठकीमध्ये श्री. गोवींदभाई श्रॉफ यांच्याशी झालेल्या चर्चेतील निर्णयाशी शासन बांधील असल्याचे मुख्यमंत्र्यांनी दिनांक 17 फेब्रुवारी, 2004 रोजी झालेल्या बैठकीत मान्य करणे पण त्याप्रमाणे प्रत्यक्षात कोणतीही कृती न होणे, इतर मागण्याबाबत सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे एकूणच शिक्षण क्षेत्रात निर्माण झ ाालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

-िवेद-ा

( प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे )

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी जे निवेदन दिलेले आहे त्यातील शेवटच्या परिच्छेदामध्ये जो उल्लेख केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. निवेदनात म्हटल्यानुसार शिक्षण हे मानवी विकासाचे मूलभूत क्षेत्र आहे हे आपण मान्य केलेले आहे. निवेदनाच्या शेवटी असे म्हटलेले आहे की, माननीय सभापती, विधानपरिषद यांनी या संदर्भात दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली असून पूरपरिस्थिती तथा राज्यासमोरील अन्य आर्थिक अडचणींमुळे माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानासाठी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तरतूद उपलब्ध करुन देता आली नाही. विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानाकरिता तरतूद उपलब्ध करुन घेण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील. ही शाळा आणि महाविद्यालय अशी दोहोंची लक्षवेधी आहे. संयुक्त जबाबदारी म्हणून आपल्याकडे आलेली आहे. शाळा आणि महाविद्यालयाच्या वेतनेतर अनुदानासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यानी कमिटमेंट दिलेली आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला जात नाही म्हणून परीक्षेच्या वेळेला महाराष्ट्रातील साऱ्या व्यवस्थापकांनी इमारती बंद करु अशी नोटीस दिलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यानी जे कमिटमेंट केलेले आहे ते मी वाचून दाखवितो. "At the outset the Hon'ble Chief Minister unequivocally stated that Non-salary-grant being a committed expenditure shall have to be paid in full." आजचे मुख्यमंत्री त्यावेळी अध्यक्ष होते. श्री.सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असताना दिनांक 17 फेबुवारी 2004 रोजी लिहून दिले की, "श्री.गोविंदभाई श्रॉफ यांना दिलेल्या आश्वासनासंबंधात थकीत वेतनेतर अनुदान देण्याची बांधिलकी शासनाने मान्य केली." माझे असे म्हणणे आहे की, इमारती बंद झाल्या तर परीक्षा होणार नाहीत. तुम्ही त्यांच्यावर ब्लेम टाकणार आणि ते तुमच्यावर ब्लेम टाकणार. आपण मागच्या अधिवेशनात म्हटले होते की, त्यांनी असे करणे बरोबर नाही. आता तुम्ही तुमची चूक कबूल केलेली आहे. खरे म्हणजे आपण त्यांना चर्चेसाठी बोलाविले पाहिजे. शाळा महाविद्यालयांचे जे वेतनेतर अनुदान आहे ते राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी वारंवार कबूल केल्यामुळे त्याची तरतूद या तारखेपर्यंत केली जाईल आणि या तारखेपर्यंत दिले जाईल. यासंबंधीच्या तारखा तुम्ही टाकाव्यात. आपण असे करणार आहात काय ? महाराष्ट्रासमोर आलेले हे मोठे संकट आहे. त्यामध्ये आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..........

फार रॉंग साईडला आहात. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिलेला लेखी शब्द दोन-तीन वर्षे पाळला जात नाही ही अशोभनीय गोष्ट आहे. आपण त्यांना लेखी कळविण्यापेक्षा त्यांना चर्चेसाठी बोलवावे. शाळा-महाविद्यालयाच्या वेतनेतर अनुदानाबाबत जे कमिटमेंट आहे त्याबाबत अमूक अमूक तारखेपर्यंत तरतूद करु आणि या या तारखेपर्यंत उपलब्ध करुन देऊ असे आपण करणार आहात काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेची व्याप्ती फार व्यापक आहे. कारण शाळा आणि महाविद्यालयांच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. पण मी शाळेच्या संदर्भात सांगू इच्छितो की, दिनांक 5 ऑगस्ट 2002 आणि 17 फेब्रुवारी 2004 मध्ये या दोन्ही बैठकांमध्ये जे मान्य केले होते. त्यानुसार काहीच तरतूद केली नाही अशातला भाग नाही. 233 कोटी 19 लाख रुपयांचा प्रश्न आहे. जी 42 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे त्यापैकी 21 कोटी रुपये वितरीत व्हावयाचे आहेत. ती रक्कम आम्ही समन्याय पध्दतीने वितरीत करु. दिनांक 8 डिसेंबर रोजी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर रोजी चर्चा केली. तेव्हा त्यांनी मान्य केले की, येत्या अधिवेशनात यासंबंधी तरतूद करणे क्रमप्राप्त आहे. मात्र तत्पूर्वी पैसे उपलब्ध होणे अवघड आहे असे त्यांनी सांगितले. तेव्हा सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सूचना केल्याप्रमाणे अध्यक्षांबरोबर चर्चा करुन हा प्रश्न निकालात काढू.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सभापतींनी दिलेले निर्देश शासनाला बंधनकारक आहेत. माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख यांनी श्री.गोंविदभाई श्रॉफ यांना आश्वासन दिले होते ते शासनाने मान्य केले होते. कोणत्याही परिस्थितीत ही रक्कम अदा करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तेव्हा विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात माध्यमिक शाळांच्या वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील असे उत्तर देणे बरोबर नाही. माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशाप्रमाणे आगामी अधिवेशनात माध्यमिक शाळांच्या वेतनेत्तर अनुदानासाठी तरतूद करुन देण्यात येईल असे लिहिले पाहिजे होते. आपण माननीय सभापतींचा अवमान करीत आहात हे बरोबर नाही. तेव्हा आपण उत्तरामध्ये दुरुस्ती करावी एवढीच माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : महोदय, माननीय सभापती महोदयांनी दिलेल्या निदेशाचा अवमान करण्याचा माझा तीळमात्र हेतू नाही. परंतु येत्या मार्चच्या अंदाजपत्रकीय अधिवेशनात यासाठी निश्चितपणाने तरतूद केली जाईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, 2005-2006 या वर्षासाठी 42 कोटी 91 लाख रुपये तरतूद उपलब्ध करुन देण्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. त्यापैकी 21 कोटी 45 लाख रुपये दिलेले असून, बाकीची रक्कम दिलेली नाही उर्वरित रक्कम तरतूद केलेली असताना सुध्दा उर्वरित रक्कम अजून वितरित झालेली नाही. उर्वरित 21 कोटी रुपये माननीय मंत्री महोदय 15-20 दिवसांत उपलब्ध करुन वितरित करतील काय ?

प्रा.वसंत पुरके : महोदय, पूर्वीच्या 41 कोटी रुपयांपैकी जी रक्कम देण्याचे बाकी आहे ती 31 मार्च पूर्वी वितरीत केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांनी सांगितले की, त्यांच्या जिल्हयाला समन्यायी न्याय दिला नाही. मा.गोविंदभाई श्रॉफ यांच्यासमवेत झालेल्या बैठकीमध्ये ठरले होते की, सर्वांना प्रमाणशीर वाटप झाले पाहिजे. मी त्यांना सांगू इच्छितो की, तेच तत्व वाटप करताना पाळले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी उर्वरित रकमेची मार्चपूर्वी तरतूद करण्यात येईल असे सांगितले आहे. माननीय मंत्री महोदयांनी संबंधितांना बोलावून तरतूद करणार आहोत असे सांगावे. तसेच ती तरतूद कधी उपलब्ध करुन देऊ असेही सांगावे, जेणेकरुन हे संकट टळेल. सभापती महोदयांनी निदेश दिल्यामुळे त्यांनी प्रवास थोडा समोर नेला आहे. तरतूद करु असे ते या ठिकाणी म्हणाले आहेत. त्यामुळे हा निधी नेमका केव्हा उपलब्ध करुन देणार आहात हे त्यांना कळविण्यात माननीय मंत्रिमहोदयांना काय अडचण आहे ?

प्रा.वसंत पुरके : मार्चच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याचे मी सांगितलेले आहे. त्यामुळे मी अध्यक्ष महोदय आणि संबंधितांशी याबाबत बोलेन आणि निश्चित केव्हा वितरीत केले जाईल हेही सांगेन.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळाने एक दिवस शाळा बंद केल्या होत्या. कुलूप लावल्यामुळे कोणीही आत पोहोचू शकले नाही. ते कर्मचारी मस्टरवर सही सुध्दा करु शकले नाही. त्यामुळे शासनाकडून त्यांचा एक दिवसाचा पगार कापण्यात आला आहे. त्यांचा कापण्यात आलेला एक दिवसाचा पगार त्यांना परत देणार आहात काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकणातील अनेक जिल्हयात विशेषत: सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये दोन वर्षे वेतनेतर अनुदान दिले गेले नाही. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये प्रश्न क्र.12 याच लक्षवेधी सूचनेशी निगडीत आहे. शेवटच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 2005-2006 या आर्थिक वर्षात अशासकीय माध्यमिक शाळांच्या वेतनेत्तर अनुदानाची रक्कम केल्यानंतर 2145.50 लाख रुपये शिल्लक आहे. वास्तविक पाहता याची तरतूद केलेली आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन्ही ठिकाणी वेतनेत्तर अनुदान न मिळाल्यामुळे शाळांना सोयी-सुविधा दिल्या जात नाही. त्यामुळे त्या ठिकाणी ती रक्कम उपलब्ध करुन द्यावी किंवा त्यातील किमान 50 टक्के रक्कम देण्याबाबत आपण 15 दिवसांत आदेश देऊन ती रक्कम देणार आहात ?

प्रा.वसंत पुरके : काही जिल्हयांना तांत्रिक कारणांमुळे किंवा अंकेक्षनामुळे अनुदान वितरित करणे राहिले असेल तर त्यांना प्राधान्य दिले जाईल.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.अजित.... 13:25

**पृ.शी.**: भिवंडी तालुक्यातील गोंदवली व माणकोली परिसरामध्ये किना-यालगत होत असलेले अनधिकृत बांधकाम.

**मु.शी.**: भिवंडी तालुक्यातील गोंदवली व माणकोली परिसरामध्ये किना-यालगत होत असलेले अनधिकृत बांधकाम यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय दत्त, अनंत तरे, रामनाथ मोते, प्रकाश शेंडगे, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.नितीन गडकरी वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील गोंदवली व माणकोली या गावच्या परिसरामध्ये खाडी किना-यालगत  मोठया प्रमाणावर होत असलेले अनधिकृत बांधकाम, यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या असंख्य तक्रारी, वास्तविक गोंदिवली व माणकोली गावचा परिसर हरित पट्टयामध्ये मोडत असून येथील खाजगी मालकीच्या जमिनीचे .20 इतके क्षेत्रफळ ॲग्रो-प्रोसेसिंग झोन करीता राखून ठेवणे, असे असतानादेखील या परिसरात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकाम सुरु असून जवळपास दोन ते तीन लक्ष चौ.फु. अनधिकृत गोडावूनचे झालेले बांधकाम, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे या परिसरातील नागरिकांना जीवित तसेच वित्तहानीचा बसलेला फटका, यापुढील काळात निसर्गनिर्मित तसेच मानवनिर्मित कारणांसाठीदेखील तेथील जनतेला बळी पडण्याचा निर्माण झालेला धोका, अशा अनधिकृत बांधकामाची गंभीरपणे दखल घेऊन सदरचे बांधकाम निष्कासित करण्याबरोबरच, बांधकाम करणा-या व्यक्तीविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, आपण परवानगी दिली तर मी हरकतीचा मुद्दा मांडू इच्छितो. मी आपले लक्ष महाराष्ट्र विधानपरिषद नियम 101 कडे वेधू इच्छितो. ही लक्षवेधी नियमात बसत नाही असे माझे म्हणणे आहे. आपण लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे त्यामुळे त्यावर उत्तर देण्याची माझी तयारी आहे. नियम 101 हा निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधण्याबाबत आहे. त्यात म्हटले आहे की, "सदस्यास सभापतींची आगाऊ परवानगी घेऊन, निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबींकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधता येईल." त्यामुळे हा सार्वजनिक हिताचा विषय आहे परंतु निकडीचा नाही असे मला वाटते.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ..

लक्षवेधी सूचनेचा विषय हा सार्वजनिक महत्वाचा आणि निकडीचा असला पाहिजे. या ठिकाणी जी लक्षवेधी सूचना मांडण्यात आलेली आहे त्यातील विषय हा निकडीचा नाही एवढेच मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

**उपसभापती** :हा विषय सार्वजनिक हिताचा आहे. परतु हा प्रश्न नुसताच निकडीचा नसून अत्यंत तीव्र निकडीचा असल्यामुळे या लक्षवेधी सूचनेला परवानगी देण्यात आली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय,ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील गोंदवली आणि माणकोली ही दोन गावे मुंबई नाशिक हाय वे लगतची आहेत.या गावाच्या परिसरात लाखो स्क्वेअर फुटाचे गोदामांचे बांधकाम झालेले आहे. चटई क्षेत्रफळ 0.20 इतके अनुज्ञेय असतांना त्यापेक्षा जास्त बांधकाम त्या भागात करण्यात आलेले आहे.तेव्हा ही बांधकामे करणारे कोण आहेत याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावी. त्याचबरोबर अनुज्ञेय चटई क्षेत्र नियमांचा भंग करुन 100 टक्के एफ.एस.आय.चा वापर करुन ग्रीन झोनमध्ये ही अनधिकृत बांधकामे केलेली आहेत. अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे किती आहेत ? आणि ती बांधकामे तोडण्याच्या बाबतीत शासन कोणती कारवाई करीत आहे वा करण्यात येणार आहे ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय,भिवंडी तालुक्यातील गोंदवली आणि माणकोली या दोन गावाच्या परिसरात ही बांधकामे झालेली आहेत ही वस्तुस्थिती खरी आहे. खाडीच्या किना-यावर असलेली ही दोन गावे आहेत.त्या गावाच्या आजूबाजूच्या परिसरात मोठया प्रमाणावर बाधकामे झालेली आहेत. एम.एम.आर.डी.ए.ने कृषी पूरक उद्योगासाठी ही जागा राखून ठेवली आहे .2011 साला पर्यन्त कृषी पूरक उद्योग तेथे डेव्हलप करावयाचे असल्यामुळे मुंबईच्या जवळ ही जागा राखून ठेवलेली आहे.ग्रीन झोनमध्ये 0.25 एवढे बांधकाम करण्यास परवानगी आहे. आतापर्यन्त त्या ठिकाणी बिगर शेती परवानगी न घेता 2 लाख 70 हजार चौरस मिटरचे बांधकाम केलेले आहे. बिगर शेती परवानगी घेऊन 10 लाख 80 हजार स्क्वेअर मिटरचे वाढीव बांधकाम केलेले आहे.बिगर शेती परवानगी घेऊन 4 लाख 83 हजार स्क्वेअर मिटरचे बांधकाम झालेले आहे अशा प्रकारे त्या भागामध्ये मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकाम झालेले आहे हे शासनाच्या लक्षात आले असून शासनाने यासंबंधी जिल्हाधिका-यांकडून आणि आयुक्तांकडून अहवाल मागवला आहे मुंबईच्या जवळपास असलेल्या भिवंडी तालुक्यातील ही दोन गावे आहेत व तेथे ही बांधकाम

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ....

झालेले आहे. उद्योग व्यवसायाला पूरक असे वातावरण या भागात असल्यामुळे एवढया मोठया प्रमाणात बांधकाम तेथे झालेले आहे. ती बांधकामे काढून टाकण्याच्या बाबतीत कारवाई करीत असतांना अनेक उद्योजकांनी शासनाकडे निवेदन दिलेले आहे की, त्या ठिकाणी करोडो स्क्वेअर चौरस मिटरचे बांधकाम झालेले आहे तेव्हा शासनाने याचा विचार करावा. एन.ए.ची परवानगी देऊन बांधकामाचे जे वाढीव क्षेत्र आहे. त्यासाठी दंड आकारणी करुन ही परवानगी देण्यात आल्यास त्यामुळे त्या भागातील उद्योजधंद्यांना मोठया प्रमाणावर चालना मिळेल. रोजगाराची निर्मिती होईल. अशा प्रकारचा प्रस्ताव त्यांनी शासनाकडे दिलेला आहे आणि तो शासनाच्या विचाराधीन आहे. काही कालावधी नंतर त्या प्रस्तावावर विचार होऊन शासनाची भूमिका ठरल्या नंतर शासन त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करील.

श्री.मधुकर चव्हाण :माननीय मंत्रिमहोदयांच्या एक गोष्ट लक्षात आली असेल की शहर आणि शहराच्या लगतच्या परिसरात नियम धाब्यावर बसून अनधिकृत बांधकामे करण्याची लोकांची प्रवृत्ती वाढीस लागली आहे.मुबईमध्ये जी पूर परिस्थिती निर्माण झाली होती ती पाहिल्यानंतर आपल्या असे लक्षात येईल की, बांधकामावर नियंत्रण ठेवले गेले पाहिजे.या बाबतीत माझा प्रश्न असा आहे की, ही दोन्ही गावे ग्रीन झोनमध्ये आहेत काय ? आणि त्या बांधकामाला स्टे दिला आहे काय ? तेथे अनधिकृत बांधकाम झालेले आहे हे माननीय मत्रिमहोदयांनी मान्य केलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. ही अनधिकृत बांधकामे होत असतांना ज्या अधिका-याने त्याकडे डोळेझाक केली त्या अधिका-याच्या विरुध्द कोणती कठोर कारवाई करण्यात येणार
आहे ?

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, येथे बांधकाम किती झाले आहे त्याचे स्वरूप मी मुद्दाम आकडेवारी देऊन सांगितले आहे. मला असे सांगावयाचे आहे की, हे जे बांधकाम झालेले आहे व होत आहे त्याबद्दल शासनाकडे अनेक दिवस तक्रारी येत आहेत. त्यामुळे तेथील काही बांधकामांना शासनाने स्थगिती देखील दिलेली आहे, ती अगदी सुनावणी पर्यंत दिलेली आहे. या मघाशी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात जो नवीन प्रस्ताव आलेला आहे तो शासनाच्या विचाराधीन आहे आणि त्यावर निर्णय झाल्यानंतर, प्रस्ताव अमान्य झाल्यास, तेथील बेकायदा बांधकामाला कोठल्याही प्रकारे पाठीशी न घालता कारवाई करण्यात येईल. करोडो चौरस फूटाचे बांधकाम तेथे झालेले आहे आणि ते खरोखरी तेथे ठेवणे योग्य आहे की नाही ? तेथील बेकायदा बांधकामाबाबत कारवाई करावयाची की नाही ? याबाबत शासन निश्चित निर्णय घेईल.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी आता जे उत्तर येथे दिलेले आहे ते समाधानकारक असेच आहे. कालच या सभागृहामध्ये चर्चा झाली की, उल्हासनगर येथे देखील अशाच प्रकारे अनधिकृत बांधकाम झालेले आहे आणि ते प्रकरण शेवटी हायकोर्टामध्ये गेले असता हायकोर्टाने आदेश दिला की, तेथील जवळपास 900 इमारती पाडण्यात याव्यात. आता तेथे मग कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. म्हणून मग आपणही शासनाला काही निदेश दिले आहेत. असो. सभापती महोदय, तेथे त्या लोकांना कोठल्याही प्रकारे गोडावून बांधण्याचा हक्क नाही तरीही कायदा हातामध्ये घेऊन ग्रीन झोनमध्ये देखील तेथे बांधकाम झालेले आहे आणि तेही लाखो चौरस फूटांचे बांधकाम करण्यात आले आहे. माझी तर माहिती अशी आहे की, या सभागृहाचे उपसभापती हे या सदनाचे देखील सदस्य आहेत. त्यांनी देखील या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे आणि या सर्व अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी असे सांगितलेले आहे. तेव्हा येथे जे काही अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले आहे ते आणि ते करणारे, याच्या विरूद्ध आपण कारवाई करणार आहात का ? प्रसंगी एमआरटीपी ॲक्ट नुसार कारवाई करणार का ? तसेच हे सारे बांधकाम संगनमताने केलेले असल्याने सर्व संबंधित असलेले बांधकाम व्यावसायिक तसेच शासकीय अधिकारी यांचेवर देखील आपण कारवाई करणार का ? करणार असल्यास, केव्हा करणार आहात ?

..... केके 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, हे बांधकाम काही काल परवाचे नाही तर गेल्या अनेक वर्षांपासूनचे आहे आणि यातील कोणत्याही माणसाला पाठीशी घालण्याचे काम शासन करीत नाही व करणार नाही. परंतु तिकडे जे प्रकार झालेले आहे त्याची सर्व माहिती ...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना म्हटले की, बऱ्याच वर्षांपासूनचा हा प्रश्न आहे. पण आम्ही या लक्षवेधी सुचनेमध्ये उल्लेख केलेले जे बांधकाम आहे ते काल परवा सुरू झालेले आहे आणि रस्त्यावरून जाणाऱ्या कोणालाही हे हजारो चौरस फूटाचे बांधकाम दिसते आहे ...

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी केवळ भिवंडी शहर व परिसरासंबंधात बोलत नाही तर भिवंडी तालुक्यातील अनधिकृत बांधकामासंबंधात बोलतो आहे. मी नेमक्या गोंदिवली व माणकोली या गावातील बांधकामासंबंधी सांगितलेले नाही. हा संपूर्ण भिवंडीतील अनधिकृत बांधकामाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरूनाथ कुलकर्णी यांनी उल्हास नगरातील अनधिकृत बांधकामाचा उल्लेख करून सांगितले की, सदरचे बांधकाम 30-40 वर्षांपासूनचे आहे आणि सदरहू प्रकरण कोर्टामध्येही गेले होते व कोर्टाने आता ते पाडून टाकण्यास सांगितले आहे. आता भिवंडीतील या अनधिकृत बांधकामासंबंधात शासनाकडे जो प्रस्ताव आहे त्यावर निर्णय घेतल्यानंतर, तो प्रस्ताव अमान्य केल्यास, त्या सर्व संबंधितांवर कारवाई होईल एवढेच नव्हे तर ज्या अधिकाऱ्यांच्या कारकीर्दीमध्ये हे अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्यांच्यावर देखील कारवाई आपण करू. यामध्ये कोणीही राजकारणी असोत वा शासकीय अधिकारी असोत, त्यापैकी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. इतकेच नव्हे तर त्यांचेवर प्रसंगी एमआरटीपी ॲक्टनुसारही कारवाई करण्यात येईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, हे जे उत्तर दिलेले आहे ते संपूर्ण भिवंडी तालुक्यातील अनधिकृत बांधकामासंबंधात आहे. परंतु आम्ही मात्र ही लक्षवेधी सूचना गोंदिवली व माणकोली या गावातील अनधिकृत बांधकामासंबंधात दिलेली आहे. आज तेथील हायवे वरून जाणाऱ्या कोणाही माणसाला हे बांधकाम दिसते तसेच सभापती महोदय, आपल्या मतदारसंघातील हा भाग असल्याने आपल्याला देखील याबाबत पूर्ण माहिती आहे. आता मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, शासनाने या संदर्भात अपील आले आहे आणि त्यावर शासन विचार करणार आहे. परंतु त्या ठिकाणी

..... केके 3 ..



KBS/ MHM/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 13:35

सीआरझेड आहे, व आपण सांगितले की, .20 इतके चटईक्षेत्र तेथे मिळते. परंतु हे चटईक्षेत्र देखील व्यापारी कामासाठी नाही तर निवासी बांधकामासाठीच आहे. सभापती महोदय, आज देखील तेथे अनधिकृत बांधकाम सुरू आहे. तेथील महसूल खात्याचे अधिकारी, मग ते प्रांत अधिकारी असो वा आरडीसी, कलेक्टर वा तलाटी असेल, ते या बांधकामांबाबत कोणतीही कारवाई करीत नाहीत.

( यानंतर श्री. सरफरे ....एलएल 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. सुंबरे... 13:40

श्री. अनंत तरे...

प्रश्न असा आहे की, हे जी बांघकाम सुरु आहेत ती तोडायला पाहिजेत. जी बांधकामे पूर्ण झाली आहेत त्याबाबत ज्या विकासकांनी आपल्याकडे अर्ज केले आहेत त्याचा आपण विचार करणार आहात. परंतु आज जी बांधकामे सुरु आहेत त्यामध्ये कोणत्याही ॲक्टिव्हिटीज सुरु नाहीत, त्याबाबत आपण कारवाई करणार काय? आणि अशाप्रकारे बांधकाम करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकाऱ्यावर एमआरटीपी ॲक्टअन्वये आपण कारवाई करणार काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सद्या बांधकामे चालू असतील तर त्याविरुध्द त्वरीत कारवाई केली जाईल. आणि त्याच्याशी जे संबंधित अधिकारी असतील त्यांच्यावरही कारवाई होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री ज्यावेळी सदनामध्ये आले त्यावेळी त्यांची मानसिकता दिसली. त्याचे कारण असे की, आपण ही जी लक्षवेधी सूचना दिली ती पूर्ण विचारांती दिलेली असून या विधानमंडळ सचिवालयाने तिला मान्यता पण दिली. तीच इन्व्हॅलिड आहे, ती नियमात बसत नाही अशाप्रकारचे निवेदन माननीय महसूल मंत्र्यांनी सुरुवातीला केले. त्यामुळे त्यांची मानसिकता लक्षात आली. याबाबतीत माननीय महसूल मंत्री या सर्व लोकांना संरक्षण देऊ इच्छित आहेत हे त्यावेळी लक्षात आले. ही लक्षवेधी सूचना नियमबाहय आहे की नियमात बसणारी आहे हे पहाण्याचे काम पिठासीन अधिकारी म्हणून आपले आहे, माननीय सभापतींचे आहे. त्यांनी ते पूर्ण केलेले आहे. त्यानंतर पुढील माहिती देतांना माननीय महसूल मंत्र्यांनी जी माहिती दिली आहे त्या प्रत्येकामध्ये एकच गोष्ट ध्वनित होत होती की, या सर्व अनधिकृत बांधकाम करणाऱ्या माणसांना पाठिशी घालणे. ज्या वेळी हरकतीच्या मुद्यातून हा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळी पहिले उत्तर द्यायला पाहिजे होते ते उत्तर त्यांनी आता दिले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, कोणत्याही प्रकारच्या इतर गोष्टींचा विचार न करता ज्याप्रमाणे हायकोर्टाने उल्हासनगरच्या बाबतीत निर्णय घेतला तशाप्रकारचे तुमच्या शासनाचे धोरण ठरवायचे असेल ते ठरवा, त्याबाबत जो निर्णय घ्यायचा असेल तो ध्यावा. परंतु ज्यांनी ग्रीन झोन आहे हे माहीत आहे, हे संपूर्ण बेकायदेशीर बांधकाम आहे. त्याला कुणाचीही संमती नाही, आणि तेथील महसूल अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने हे सर्व चालू आहे हे माहीत आहे. एवढेच नव्हेतर आपले पत्र सुध्दा आम्हाला मिळाले आहे व तशाप्रकारच्या सूचना आपणही दिल्या आहेत. या सर्व गोष्टी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

असतांना सुध्दा असा विचार केला जातो की, या गोष्टी नियमित करावयाच्या की नाही हे शासनाच्या विचाराधीन आहे. अनियमित बांधकामे नियमित करुन देशाची व महाराष्ट्राची ही परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून यासंबंधी आपण त्वरीत जिल्हाधिकाऱ्यांना किंवा संबंधित अधिकाऱ्यांना शो-कॉज नोटीस देऊन ही बांधकाम कशी झाली? यांसबंधी पूर्ण माहिती घेऊन त्वरीत कारवाई करणार काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, विधान परिषदेचे काम हे नियम, प्रथा व परंपरेनुसार चालावे असे माझे स्वत:चे मत आहे. आणि म्हणून एखादी शंका आली तर ती विचारावी या माध्यमातून मी विचारले की, ही लक्षवेधी सूचना नियम 101 मध्ये बसते काय? मी सुध्दा अनेक वर्षे विधानसभेमध्ये काम केले आहे आणि मंत्री या नात्याने विधान परिषदेमध्ये उपस्थित राहिलो आहे व विधान परिषदेचे कामकाज जवळून पाहिले आहे. तेव्हा एखादा विषय हा नियमात बसणारा असला पाहिजे. सभागृहाचे कामकाज हे नियमाप्रमाणे चालले पाहिजे म्हणून शंका विचारली. यामध्ये कुणाला प्रोटेक्ट करण्याचा माझा हेतू आहे? एखादा विषय जर नियमात बसत नसेल तर तो दुसऱ्या आयुधाच्या माध्यमातून आपल्याला उपस्थित करता येऊ शकतो. परंतु या नियमामध्ये ही लक्षवेधी सूचना बसत नाही असे माझे म्हणणे होते. त्यामुळे माझा हेतू काय होता हे माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगण्याची गरज नाही. सभापती महोदय, मी खालच्या सभागृहामध्ये होतो परंतु माननीय राज्यमंत्र्यांनी मला चिठ्ठी पाठविली की, मला काही काम असल्यामुळे मी बाहेर जात आहे. म्हणून मी याठिकाणी आलो. कुणाला पाठिशी घालण्यासाठी आलेलो नाही. या राज्याचा महसूल मंत्री म्हणून मी चार महिन्यापासून याच्याशी निगडीत आहे. त्यामुळे कुणालाही पाठीशी घालावे किंवा बेकायदेशीरपणे काम करणाऱ्या बाकीच्या एजन्सीजना मी प्रोटेक्ट करीत नाही. महसूलमंत्री म्हणून आणि मुख्यमंत्री म्हणून माझा पूर्वेतिहास सर्वांना माहीत आहे. मी जिल्हाधिकारी आणि आयुक्तांची कधीही गय केलेली नाही. हे काम करीत असतांना मला कुणाकडूनही पारदर्शकतेचे धडे घेण्याची गरज नाही. माझ्या राजकीय जीवनातील माझे व्यक्तिमत्व मी तसे तयार केले आहे. त्यामुळे हेतू आणि आरोप कुणी करण्याची गरज नाही. आपण कृपया या प्रश्नावर बोलावे असे मला वाटते. संपूर्ण भिवंडीच्या परिसरामध्ये एम.एम.आर.डी.ए.ने जी जागा घेतली आहे ती ग्रीन झोनसाठी राखीव ठेवली आहे. शेती पूरक व्यवसायासाठी या ग्रीन झोनचा



DGS/ KGS/ MHM/ 13:40

श्री. मधुकर सरपोतदार...

211 मध्ये उपयोग करायचा आहे. आणि म्हणून या सर्वांची काळजी एम.एम.आर.डी.ने घेतली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे . . . .

पण 211 मध्ये कृषी पूरक व्यवसाय उभारले जावेत म्हणून ही जागा राखीव ठेवली आहे. म्हणून मी संपूर्ण जमिनीसंबंधात बेकायदेशीर बांधकामांचा आढावा तपशीलवार येथे ठेवला. या सगळयाचा शासन म्हणून विचार करीत असताना, कालपरवा जे काही बांधकाम झाले, त्याला कोणी संरक्षण देत नाही. पण आता त्याची बाजू ऐकून घेणे हे महसूल कायद्याप्रमाणे जी प्रोसेस आहे, त्याप्रमाणे केलेले आहे. आपलीही तक्रार आहे, आपणही त्यासंबंधी कळविलेले आहे.मी जिल्हाधिकारी यांच्याकडून सर्व माहिती घेतलेली आहे. यासंबंधात कोणालाही प्रोटेक्ट करण्याची गरज नाही. यासंबंधी उद्या जर प्रस्ताव फेटाळला गेला किंवा आता सध्या काम सुरु आहे असे सांगण्यात आले. तेव्हा जर काम सुरु असेल तर ते ताबडतोब बंद होईल. पण एखाद्याने माहिती घ्या किंवा त्यासंबंधी आपले म्हणणे ऐकून घ्या आणि मग कारवाई करावी असे म्हटल्यानंतर ती करावी लागते. .2 प्रमाणे बांधकाम झाले आहे. काहींनी बिनशेती केलेले आहे. संपूर्ण भिवंडीमध्ये मोठया प्रमाणात गोडाऊन आहेत. नुसते या दोन गावांमध्ये नाही. त्यामुळे उल्हासनगरला जसा प्रश्न निर्माण झाला, तसा येथे होऊ नये या हेतूने, यासंबंधीची भूमिका आज आली नाही तर दोन महिन्यापूर्वी प्रस्ताव आला की, असे-असे आमचे म्हणणे आहे. एवढे बांधकाम आहे आणि हे जर रेग्युलराईज केले तर सरकारच्या उत्पन्नात भर पडेल आणि मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण होईल. यासंबंधीचा विचार करावा.यासंबंधात माननीय मुख्यमंत्र्यांच्या लेव्हलवर कॅबिनेटमध्ये चर्चा झालेली आहे. याबाबतीत काय करावयाचे याचा आम्ही येत्या 8-10 दिवसामध्ये निर्णय घेऊ. नाहीतर सगळी जी बेकायदेशीर बांधकामे आहेत, ती काढली जातील. त्यासाठी कोणाची गय केली जाणार नाही. पण कोणत्या बेकायदेशीर बांधकामांना कोण कधी पाठिंबा देतो याचीही माहिती आमच्याकडे आहे. त्यामुळे कोणी असे समजू नये की, अमुक तक्रारीच्या बाबतीत हा माणूस प्रोटेक्ट करीत आहे. आम्हाला सरकार म्हणून प्रोटेक्ट करण्याची गरज नाही. महाराष्ट्रात जेथे-जेथे शासकीय जमीन आहे, जेथे-जेथे बेकायदेशीर बांधकाम आहे, ते तोडणे, पाडून टाकणे हे सरकारचे काम आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता उत्तर दिलेच आहे आणि ते यावर कारवाई करणारच आहेत याबद्दल समाधान व्यक्त करतो. पण तरीसुध्दा दोन मुलभूत प्रश्नांची उत्तरे आली नाहीत. एक प्रश्न असा होता की, सभापती महोदय, आपण स्वत: पत्र

. . . .2 एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लिहीले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, माननीय उपसभापतींनी पत्र लिहीले आहे. तर आपल्याला त्याचे उत्तर तरी आले आहे का ? तेही आम्हाला कळले पाहिजे. दुसरा एक महत्वाचा मुद्दा असा की, मूळ लक्षवेधी ही "ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील गोंदिवली व माणकोली या गावच्या परिसरामध्ये खाडी किनाऱ्यालगत मोठया प्रमाणावर होत असलेले अनधिकृत बांधकाम " याबाबत आहे आणि माननीय मंत्री महोदय सातत्याने भिवंडी तालुक्याबाबत सांगत आहेत. भिवंडी तालुक्यातही अनधिकृत बांधकाम आहे याबद्दल वाद नाही. आपण व्यापक दृष्टीकोनातून सर्व अनधिकृत बांधकामांचा विचार करीत आहात ही स्वागतार्ह गोष्ट आहे. मूळ मुद्दा असा आहे की, भिवंडी तालुक्यातील गोंदवली व माणकोली या गावच्या परिसरामध्ये खाली किनाऱ्यालगत मोठया प्रमाणावर होत असलेले अनधिकृत बांधकाम. मग तेथे सी.आर.झेड. झ ोनचा विषय आला. त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे अतिवृष्टीमध्ये तेथे प्रचंड पाणी साचले आणि धोका निर्माण झाला होता. म्हणून खऱ्या अर्थाने ही लक्षवेधी सूचना येथे आलेली आहे. त्या अतिवृष्टीनंतर पुन्हा जोरात बांधकामे सुरु झाली. म्हणून वारंवार सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरेसाहेब विचारीत आहेत की, अतिवृष्टीनंतर जी बांधकामे सुरु झाली, याला सी.आर.झेड.चा कायदा लागू होतो की नाही ? हा एक मुद्दा आणि दुसरा मुद्दा म्हणजे 0.20 बाबत आहे. हे जे क्षेत्रफळ आरक्षित आहे, ते कमर्शिअलसाठी वापरता येते का ? आपण या दोन मुद्यांचे विश्लेषण करावे आणि यासंदर्भात आपण तातडीने कार्यवाही कराल अशी मी अपेक्षा करतो.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, 0.20 कमर्शिअलसाठी वापरता येईल की नाही या प्रश्नाचे मी पहिल्यांदा उत्तर देतो. ग्रीन झोनमधील 0.20 रिझर्वेशन हे ॲग्रो प्रोसेसिंग झ ोनसाठीच राखून ठेवलेले आहे. पण काही लोकांनी 0.20 पेक्षा अधिक केले आहे. मी ही माहिती देखील सांगितली. सन्माननीय सदस्यांनी येथे प्रश्न विचारला की, या गावातील अनधिकृत बांधकाम सी.आर.झेड.मधील आहे, पूर परिस्थितीला बाधा येणारे आहे. हे दोन्ही प्रश्न तपासले जातील आणि या दोघांमध्ये बसत असेल तर कोणतीही स्थगिती न देता कारवाई केली जाईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, सदर परिसर क्षेत्र कृषी पूरक उद्योग या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. पुढे असेही म्हटलेले आहे की, "सन 2004-2005 या वर्षात भिवंडी तालुक्यात अनधिकृत ----

. . . .2एम-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बांधकामाबाबत शोध मोहीम राबविण्यात येऊन सुमारे 7200 गोडाऊन्संना नोटीसा देऊन रुपये 2.25 कोटी इतका बिनशेती दंड संबंधितांकडून वसूल करण्यात आलेला आहे. तसेच भिवंडी तालुक्यात अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणे व कारवाई करण्यासाठी लागणारे मजूर,जेसीबी इत्यादि यंत्रणा तसेच अधिकारी व कर्मचारीवृंद सद्य:परिस्थितीत अनधिकृत बांधकामांचा विचार करता पर्याप्त असल्याचे दिसून येत नाही." म्हणजे एकीकडे माननीय मंत्री महोदयांची इच्छा शक्ती आहे की,अनधिकृत बांधकामे पाडावीत आणि दुसरीकडे ते असे म्हणतात की, अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी जी साधनसामुग्री लागते, ती आमच्याकडे उपलब्ध नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (पुढे सुरु...

ही साधनसामुग्री कधी उपलब्ध होणार आहे ? जेणे करुन पुढील अनधिकृत बांधकामे ही पाडली जातील.

श्री.नारायण राणे : ही सगळी बांधकामे पाडण्याचा जेव्हा निर्णय होईल, तेव्हा साधनसामुग्री उपलब्ध करुन युध्द पातळीवर ती पाडली जातील.

श्री.प्रकाश शेंडगे : मंत्री महोदयांनी तीन गोष्टी कबूल केलेल्या आहेत. एक तर या जागेमध्ये ग्रीन झोन आहे. 0.20 जे बांधकाम झालेले आहे,तेसुध्दा बांधकाम बेकायदेशीर झालेले आहे. ॲग्रो प्रोसेसिंग झोनला परवानगी आहे. त्यापेक्षाही मुंबईमध्ये बेकायदेशीर झोपडपट्या तोडण्यात आल्या, तेथील 80 हजार कुटुंबे उध्वस्त झाली, उल्हासनगरमध्ये अनधिकृत बांधकामे तोडली, त्यामध्ये जवळ जवळ 1 लाख कुटुंबें उध्वस्त झाली. अनधिकृत बांधकामे पाडण्याच्या संबंधात महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतलेला आहे. मग हीच बांधकामे रेग्युलराईज करण्याचे विचाराधीन आहे, असे कसे काय म्हटलेले आहे? याबाबतीत त्या ठिकाणी जे गोडाऊन मालक आहेत, त्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने विकत घेतलेल्या आहेत. हे परप्रांतीय गोडाऊन मालक आहेत. त्यांनी लाखो रुपये कमाई करण्याचा धंदा चालू केलेला आहे. अशा या धनदाडग्यांना तोच न्याय द्याल काय ?

श्री.नारायण राणे : तेथील लोकांच्या हिताच्यादृष्टीने जो निर्णय असेल तोच निर्णय घेण्यात येईल.

**उपसभापती** : या लक्षवेधीवर सभागृहात बरीचशी चर्चा झाली. सन्माननीय सदस्यांनी देखील बरेचसे प्रश्न या ठिकाणी निर्माण केले. सन्माननीय महसूल मंत्र्यांनी देखील या ठिकाणी शासनाची बाजू मांडली. मी ठाणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेलो आहे. त्यामुळे या ठिकाणच्या असलेल्या सर्व प्रश्नांशी मी देखील अत्यंत जवळून संबंधित आहे. काल देखील या ठिकाणी उल्हासनगर येथील प्रश्नावर जनहित लक्षात घेऊन आणि सभागृहाला विश्वासात घेऊन चर्चा घडवून आणली. त्यासंबंधात काही निर्देशही देण्यात आले. मला महसूल मंत्र्यांना एक गोष्ट सांगाविशी वाटते की, यावरील निवेदन मी वाचले होते. वास्तविकपणे निवेदन संपूर्णपणे डोळयात धुळ फेकणारे आणि दिशाभूल करणारे होते. याचे कारण मी स्वत: या संदर्भात दिनाक 15-9-2005 रोजी सन्माननीय मुख्यमंत्री, महसूल मंत्री, जिल्हयाचे पालक मंत्री, पोलीस आयुक्त, ठाणे जिल्हाधिकारी आणि ठाणे ग्रामीण पोलीस या सर्वांना माझ्या हस्ताक्षरामध्ये पत्रे लिहिलेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

**उपसभापती** (पुढे चालू....

आहेत. तक्रारीचे पुढे काय करायचे ? त्याची विल्हेवाट कशी लावायची हे अधिकार शासनाचे आहेत. पण ज्या ठिकाणी अनियमित, बेकायदेशीर बांधकामे होतात. आपण शेतकऱ्यांच्या हिताच्या गोष्टी करतो. परंतु शेतकऱ्यांचे हित न पहाता, ज्याला आपण मृताच्या टाळूवरील लोणी खाणे म्हणतो असा प्रकार त्या ठिकाणी चालू असताना, माझ्यासारखा जबाबदार लोकप्रतिनिधीनी इतके पत्रव्यवहार केले होते, पण मला सांगायला शरम वाटते की,माझ्या पत्राला एकाकडूनही आजतागायत उत्तर आलेले नाही. या संदर्भात प्रशासनाकडे देखील मी वेळोवेळी विचारणा केली. मला उत्तर देण्यात आले की... आपण सुनावणी घेणार असाल तर त्यामध्ये ही बेकायदेशीर बांधकामे होऊनयेत, ती तोडावीत म्हणून अर्ज आहे, मला देखील सुनावणीला बोलवा अशी माझी सूचना आहे. बोलवायचे की नाही हा भाग वेगळा, नियमात बसते की नाही, तेही पहा. पण जनतेच्या हिताकरिता तुमच्या न्यायालयात देखील मी उभा राहायला तयार आहे. या संदर्भात मी जेव्हा प्रशासनाकडे विचारणा केली, त्यावेळेस त्यांनी जी उत्तरे दिली, ती उत्तरे ऐकली तर कदाचित आपल्याला देखील धक्का बसेल. म्हणून आपण सुनावणी जर करणारच असाल तर त्यावेळी मला देखील लोकांची बाजू मांडण्याची संधी द्यावी, असेही मी या ठिकाणी सुचवू इच्छितो. याबाबतीत मला काही गोष्ट स्पष्ट करायच्या आहेत.

विरोधी पक्ष नेते, सभागृहाचे इतर सन्माननीय सदस्य व माननीय मंत्री महोदय यांचे या लक्षवेधी सूचनेवरील अभिप्राय विचारात घेतले. या लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाचा मी बारकाईने अभ्यास केला. माझ्या मते निवेदन हे संपूर्णपणे दिशाभूल करणारे आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात असलेल्या गोंदिवली व माणकुली या गावांच्या परिसरात जुलै 2005 मध्ये महापूर आल्यानंतर.....

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

या परिसरातील नागरिकांना जीवित व वित्तहानीचा अपरिमित असा फटका बसूनही त्यानंतरसुध्दा या विभागात दोन ते तीन लक्ष चौरस फूट अनधिकृत गोडाऊनची बांधकामे होणे ही बाब प्रशासकीय दुर्लक्षाचे उत्तम उदाहरण आहे. हे मी दि. 15-9-2005 ला ज्यावेळी पत्र लिहिले होते त्यावेळी हे बांधकाम झाले होते आणि आपण आता जी उत्तरे दिली आहेत त्याच्यामध्ये दि.15-9-2005 ते आजतागायत जवळपास सात लाख स्क्वेअर फुटाची भर पडलेली आहे. म्हणजे गेल्या दोन ते तीन महिन्याच्या काळामध्ये या तीन लाखा व्यतिरिक्त आणखी सात लाख स्क्वेअर फुटाची भर पडलेली आहे. म्हणजे या ठिकाणचे जे बांधकाम व्यावसायिक आहेत ते किती निर्ढावलेले आहेत हे यावरुन दिसून येते. मी गेल्या पंधरा दिवसापूर्वीच याच गावात गावक-यांनी बोलावलेल्या एका समारंभाला उपस्थित राहिलो असतांना त्या ठिकाणी शेतक-यांकडून अशी मागणी करण्यात आलेली होती की, ही बांधकामे रेग्युलर करण्याच्या संदर्भात आपण या ठिकाणी घोषणा करावी. त्या ठिकाणी मी ठणकाऊन सांगितले की, शेतक-यांच्या हिताकरिता वेळ आली तर आम्ही वाट्टेल ते करु. परंतु या ठिकाणी शेतक-यांच्या नावाखाली जर कुणी स्वत:च्या पोळीवर तूप सोडणार असेल तर तो प्रकार मी सहन करणार नाही, हे मी त्या ठिकाणी जाहीररीत्या बोललो. आणि जे मी जाहीररीत्या बोललो, त्याला मी शेवटपर्यंत वचनबध्द राहणार आहे. मी याच्यामध्ये यापुढे एक गोष्ट सूचवू इच्छितो की, ही बांधकामे प्रशासकीय अधिका-यांनी भ्रष्टाचार व गैरमार्गाचा अवलंब करुन व अनधिकृत बांधकामांकडे डोळेझाक करुन राजरोसपणे ती पूर्ण करण्यास मदत केली. ब-याच व्यावसायिकांनी शेतक-यांच्या नावावर अकृषिक परवानगी घेऊन कोटयावधी रुपयांची अनधिकृत बांधकमे केली.

शासनाने निवेदनात प्रस्तावित केलेली कार्यवाही ही निव्वळ धूळफेक करणारी दिसून येते. मी स्वत: या प्रकरणात माननीय मुख्यमंत्री, माननीय मंत्री, राज्य उत्पादन शुल्क तथा पालक मंत्री, ठाणे जिल्हा, माननीय मंत्री, महसूल, पोलीस अधीक्षक, ग्रामीण ठाणे, पोलीस आयुक्त, ठाणे, जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक 15-9-2005 रोजी पत्र लिहून भिवंडी तालुक्यातील गोदिंवली व माणकुली या गावच्या परिसरामध्ये खाडी किना-यालगत मोठया प्रमाणावर होत असलेल्या अनधिकृत बांधकामे, या संदर्भात स्थानिक रहिवाशी व प्रतिष्ठित नागरिकांनी माझ्याकडे केलेल्या असंख्य तक्रारी कलेल्या असून सदरचे अनधिकृत बांधकामास पायबंद घालणे अतिशय गरजेचे झाले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

मी पुढे असे निदर्शनास आणले होते की, वास्तविक गोंदिवली व माणकुली गावाचा परिसर हरीत पट्टयामध्ये मोडत असून तेथील खाजगी मालकीच्या जमिनीचे 0.20 इतके क्षेत्रफळ ॲग्रो प्रोसेसिंग झ ोनकरिता राखून ठेवले असल्याचे समजते. असे असतांना देखील या परिसरात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे सुरु असून जवळपास दोन ते तीन लक्ष चौरस फूट अनधिकृत गोडाऊनचे बांधकाम झालेले आहे. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे या परिसरातील नागरिकांना जिवीत व वित्तहानीचा फटका बसला आहे. भविष्यात असे प्रसंग टाळण्यासाठी उपरोल्लेखित अनधिकृत बांधकामांची गंभीरपणे दखल घेऊन सदरची बांधकामे निष्कासित करण्याबरोबरच अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे करणा-या व्यक्तींविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. तथापि, एवढे सविस्तिर पत्र लिहूनही त्याची सरकार दरबारी दखल घेण्यात आलेली नाही. अत: या प्रकरणात मी शासनास असे निर्देश देतो की,

1. या अनधिकृत बांधकामांचा तातडीने सविस्तर आढावा घेऊन अशी बांधकामे नियमाप्रमाणे तातडीने तोडण्याबाबत कार्यवाही उद्यापासून सुरु करावी व संबंधित बांधकाम व्यवसायिकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत.
2. ज्या ज्या अधिका-यांनी या प्रकरणात हलगर्जी व निष्काळजीपणा दाखवून भ्रष्टाचार व गैरव्यवहारास उत्तेजन दिले त्यांची तातडीने चौकशी करुन पुढच्या आठवडयात त्यांना त्वरित विनाविलंब निलंबित करण्यात यावे.
3. या विभागातील सर्वसामान्य जनतेच्या हिताच्यादृष्टीने व जनतेच्या सार्वजनिक हिताची जपवणूक होण्यासाठी अशी अनधिकृत बांधकामे एक महिन्याच्या आत तोडण्यात यावीत व ही कारवाई उद्यापासून सुरु करावी. त्याचप्रमाणे या सर्व प्रकरणाचा अहवाल विनाविलंब देण्यात यावा. हीकारवाई तातडीने पार पाडण्यासाठी आवश्यक ते पोलीस संरक्षण प्राधान्यांने पुरविण्यात यावे.

त्याचप्रमाणे मी या ठिकाणी निदर्शनास आणून देतो की, या ठिकाणी एम.एम.आ.डी.ए.चे उदाहरण दिले. या एम.एम.आर.डी.ए. चा मी गेले 14 वर्षे सदस्य आहे. त्यामुळे एम.एम.आर.डी.ए. प्रधिकरणाच्या देखील या संदर्भात ज्या अनियमितता झालेल्या असतील त्या पंधरा दिवसाच्या आत शोधून काढून त्याचा अहवाल संबंधित मंत्रालयास देण्यात यावा अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना एम.एम.आर.डी.ए.ला देखील देण्यात येत आहेत.

यानंतर श्री. खर्चे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आपल्या निदेशानुसार गोंदिवली आणि माणकुली तसेच भिवंडीतील जेवढी बेकायदेशीर बांधकामे असतील त्यांच्यासंबंधीची कारवाई करण्यात येईल आणि संबंधित अधिकाऱ्यांवर देखील कारवाई केली जाईल असे आश्वासन मी या निमित्ताने देत आहे.

-----------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नंदुरबार जिल्हयात सांस्कृतिक मंडळाच्या नांवाने सुरु असलेले क्लब.

**मु.शी.**: नंदुरबार जिल्हयात सांस्कृतिक मंडळाच्या नांवाने सुरु असलेले क्लब, यासंबंधी श्री. चंद्रकांत रघुवंशी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे-नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नंदुरबार जिल्हयात सांस्कृतिक मंडळाच्या नांवाने सुरु असलेले क्लब, क्लबमध्ये (दररोज 10 टक्के दराने) प्रचंड व्याजाने देण्यात येणारे कर्ज, या कर्जाला भुरळ पडून नंदुरबार शहरातील महाविद्यालयात क्रिडा प्राध्यापक पदी नोकरी करणारे प्रा. योगेश गोपालसिंग परदेशी हे लाभार्थी असल्याने त्यांचे दिनांक 22 ऑगस्ट, 2005 रोजी अचानक घरुन बेपत्ता होणे, दिनांक 30 ऑगस्ट, 2005 रोजी 8 दिवसांनी त्यांचे शव शहराबाहेरील झाडा-झुडपात कुजलेल्या अवस्थेत आढळून येणे, परिणामी स्थानिक जनतेत या मृत्यूविषयी निर्माण झालेली संशयाची भावना, तीव्र संताव व तर्क वितर्कांचे वातावरण, याप्रकरणी उपमुख्यमंत्री यांना दिनांक 28 सप्टेंबर, 2005 रोजी निवेदन देऊनही अद्यापर्यंत कोणतीच कारवाई झालेली नसणे, याबाबत राज्यशासनाने त्वरित लक्ष घालून या मृत्यूबाबत करावयाच्या चौकशीची आवश्यकता व कारवाई, तसेच सांस्कृतिक मंडळाच्या नावाने सुरु असलेले क्लब, सक्तीने बंद करण्याबबत करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**- नि वे द न -**

( प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------------

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये जी वस्तुस्थिती दिलेली आहे ती संपूर्ण दिशाभूल करणारी आहे. खरे म्हणजे एका प्राध्यापकाचे अचानक घरातून गायब होणे, आठ दिवसात त्याचे प्रेत सापडणे, शहराच्या जवळच मंदिराजवळील झाडा-झुडुपात हे प्रेत सापडले होते. घरच्या लोकांनी फिर्याद दिल्यानंतर सुध्दा पोलिसांनी तपास न करणे, त्यानंतर कोणीतरी खबर दिली की, मंदिराच्या जवळच प्रेत पडले आहे त्यावरुन प्रेताचा तपास लागला. दुर्दैवाने 22 ऑगस्टला घरातून निघालेला माणून 30 ऑगस्टला त्याचे प्रेत सापडते. सदर प्रेत कुजल्यामुळे त्या प्रेताचे पोस्ट मार्टेम जागेवरच करण्यात येते. या पोस्ट मार्टेमचा रिपोर्ट आल्यानंतर त्यामध्ये असे म्हटले आहे की, 3-4 दिवसांपूर्वी हा दुर्दैवी अंत झालेला आहे. तीन दिवसांमध्ये प्रेत कुजत नाही असे पोस्ट मार्टेमच्या रिपोर्टनुसार स्पष्ट झाल्यानंतर व्हिसेरा काढून तपासणीसाठी पाठविला आणि त्या तपासणी अहवालामध्ये सुध्दा विष आढळून आले नाही. तत्पूर्वी पोलिसांनी एक शंका व्यक्त केली होती की, संबंधित प्राध्यापकाने आत्महत्या केली काय ? पण व्हिसेरा तपासणी अहवालामध्ये आत्महत्या केल्याचीही नोंद नाही पण माणूस तर मेलाच आहे म्हणजे निश्चितच त्याची हत्या झालेली आहे. अद्यापही याबाबतचा तपास 4 महिने झाले तरी पोलीस खात्याला लागलेला नाही. दुर्दैवाने या इसमाच्या पत्नीने आपल्या जबानीत म्हटले नाही तेच उत्तर या ठिकाणी देण्यात आलेले आहे. मयत माणसाच्या पत्नीच्या जबानीत स्पष्टपणे म्हटले आहे की, तिच्या घरी वसुलीला लोक येत होते, आणि त्यांची नांवे सुध्दा दिली होती. मघाशीच माननीय उप सभापतींनी सांगितल्याप्रमाणे प्रेताच्या टाळूवरील लोणी खाणे असाच प्रकार पोलीस येथे करीत आहेत. प्रत्येकाला बोलावून त्यांची जबानी पोलीस घेत होते, अशा प्रकारे पोलिसांचा धंदा मोठया प्रमाणावर सुरु होता. निवेदनात सांगण्यात आले की, जुगाराचे व्यसन होते म्हणून तो कर्जबाजारी इ ाला होता, पण तसे तपासात निष्पन्न झाले नाही. उलटअशी परिस्थिती आहे की, तो जुगारात जवळजवळ 20 लाख रुपये जिंकला होता, जास्त पैसे जिंकला म्हणून त्याचा खून करण्यात आला आहे. यापूर्वी सुध्दा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन दिले आहे. अशा प्रकारे आपण एका बाजूला मान्य करतो आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निवेदनानुसार कारवाई करतो. परंतु कोणालाही निलंबित अथवा चौकशी करुन हा प्रश्न सुटणार

......4

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

नाही तर मयताच्या कुटुंबियांना न्याय मिळाला पाहिजे अशी स्पष्ट भूमिका यामध्ये आहे. माझा असा प्रश्न आहे की, या गुन्हयाचा तपास आठ दिवसात शासन पोलीस अधीक्षक दर्जाच्या सीआयडी अधिकाऱ्याकडे सोपविणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : होय, आठ दिवसात या गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक दर्जाच्या सीआयडी अधिकाऱ्याकडे सोपविण्यात येईल.

श्री. अनंत तरे : महोदय, निवेदनात नंदुरबार जिल्हयातील सांस्कृतिक मंडळे 10 टक्के एवढया व्याज दराने कर्जाचे वाटप करीत होते. अशा प्रकारे कर्ज देण्याचे लायसेन्स त्या क्लबकडे आहे काय ? नसेल तर सावकारांवर ज्याप्रकारची कारवाई शासनाने सुरु केली आहे तीच कारवाई या क्लबच्या माध्यमातून कर्ज वाटप करणाऱ्यांवर शासन करणार काय ? तसेच हे पैसे वसूल करण्यासाठी वारंवार त्याच्या पत्नीला भेटायला श्री. सुनील चौधरी आणि नाना मराठे हे येत होते त्यांची देखील चौकशी शासनाने केली काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : वारंवार त्यांच्या घरी जाणाऱ्या या दोघांचीही चौकशी करण्यात आली आहे, त्यांनी सांगितले की, आम्ही कुठलेही कर्ज मयत इसमाला दिलेले नाही. तसेच 10 टक्क्याच्या बाबतीत कर्जवाटपाची परवानगी नाही तसेच क्लबला देखील परवानगी नसून सध्याच्या परिस्थितीत हा क्लब बंद आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नंदूरबार शहरात जेव्हापासून सांस्कृतिक मंडळाच्या नावाने हे जे दोन क्लब सुरु झालेले होते तेव्हापासून या ठिकाणी चक्का खेळला जात होता. या क्लबमध्ये रोज 25 ते 50 लाखाची उलाढाल होत होती. एका जैन समाजाच्या मुलावर 4 लाख रुपये कर्ज झाले होते म्हणून तो गाव सोडून पळून गेला नंतर ते चार लाख रुपये कर्ज त्याच्या वडिलांनी फेडले. म्हणजे एक माणूस मेला तर गाव सुधारले, पोलीस खाते सुधारले. माणूस मेल्यानंतर गावातील लोकांनी ज्यावेळेस संताप व्यक्त केला त्याच वेळेला हे सांस्कृतिक क्लब बंद इ ाले. या क्लबवर दर तासाचा पालिसांना हप्ता दिला जात होता. ही सर्व वस्तुस्थिती नंदूरबार शहरातील जनतेने बधितलेली आहे. एकीकडे उपमुख्यमंत्री एवढया मोठया घोषणा करीत असतात परंतु त्याचा काही सुध्दा उपयोग होतांना दिसत नाही. त्यामुळे यापुढे अशा प्रकारचे सांस्कृतिक क्लब नंदुरबार शहरात सुरु होणार नाहीत याची काळजी शासन घेणार आहे का?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सजेशन फॉर ॲक्शन.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: क्रांती ज्योती महात्मा फुले हायस्कूलमधील शिक्षकाने शाळकरी मुलीचा केलेला विनयभंग .

**मु.शी.**: क्रांती ज्योती महात्मा फुले हायस्कूलमधील शिक्षकाने शाळकरी मुलीचा केलेला विनयभंग यासंबंधी श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, डॉ. अशोक मोडक वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्यावर त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"क्रांती ज्योती महात्मा फुले हायस्कूलमधील शिक्षक श्री. संतोष पांडुरंग पोतदार यांच्या विरुध्द शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याची तक्रार राजारामपुरी पोलीस ठाण्यात केल्यावरुन त्यांना सतत त्रास देण्याचा संस्थेने केलेला प्रयत्न, विनयभंगाच्या तक्रारीमुळे धक्का बसल्यामुळे विमनस्क अवस्थेत वावरणारे श्री. पोतदार शाळेतच कोसळून मृत्यू पावणे, या प्रकरणामुळे संस्था अध्यक्षांची भावजय असलेल्या मुख्याध्यापकांच्या विरोधात विद्यार्थ्यांनी जोरदार हल्ला करणे, पालक, विद्याथी, शिक्षक व परिसरातील लोकांच्यात शिक्षकाला विनाकारण बदनाम केल्याबद्दल पसरलेला तीव्र असंतोष, जबाबदार असलेल्या दोषी व्यक्तीविरुध्द अद्यापही कोणतीही कारवाई न होणे याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया"

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

--------

......3

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मी अशाच विषयाच्या संदर्भात 93 ची सूचना दिली होती परंतु ती स्वीकृत झाली नाही. संस्था चालक हे शिक्षकांना त्रास देतात, शिक्षकांना मारहाण करतात तसेच जीवे सुध्दा मारतात. या ठिकाणी विभागाकडून जे उत्तर आलेले आहे ते समाधानकारक नाही. या ठिकाणी जे पोतदार शिक्षक होते त्यांना पगार मिळतच नव्हता. कपडे आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे विकून आपली गुजराण करीत होते. अशा वेळेला काहीही केलेले नसतांना या शिक्षकांवर विनयभंगाचा खोटा आरोप करण्यात आला. संस्थाचालकांची भावजय या शाळेवर मुख्याध्यापिका आहे. सतत त्रास दिल्यामुळे व मानसिक तणावामुळे पोतदार मृत्युमुखी पडलेले आहेत परंतु येथे असे उत्तर दिलेले आहे की, "तसे काही झाले नाही". त्यामुळे यासंदर्भात सखोल चौकशी केली जाणार आहे का? वेळप्रसंगी संस्था चालकांविरुद्ध कारवाई केली जाणार आहे का? तसेच या शिक्षकाच्या कुटुंबियांना संस्थांचालकांच्या वतीने काही मदत मिळवून दिली जाणार आहे का? आणि या संस्थेवर प्रशासक नेमला जाईल का?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कु. शुभांगी अनिल गायकवाड या मुलींने विनयभंग केल्याची पोलिसात तक्रार केली होती.

श्रीमती संजीवनी रायकर : संस्था चालकांनी सांगितले तर काहीही तक्रार होऊ शकते. त्यामुळे केलेली तक्रार खरी असतेच असे काही नाही.

**उपसभापती** : कृपया मुलीचे नाव रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे तसेच ते नाव प्रसिध्दही होणार नाही याचीही नोंद घेण्यात यावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : शाळेतल्या एका मुलीने विनयभंगाची तक्रार केल्यामुळे संबंधित शिक्षकाला अटक करण्यात आली होती. हा शिक्षक जेव्हा सुट्टीवरुन परत आला तेव्हा त्याला सांगण्यात आले की,तुला कामावरुन निलंबित करण्यात आले आहे त्याच दिवशी कॅन्टिनमध्ये चहा पीत असतांना त्यांचा मृत्यू झालेला आहे. पोलिसांनी अटक केली असल्यामुळे शिक्षणाधिका-यांनी त्यांच्या विरुध्द निलंबनाचा आदेश काढला होता.

श्री. रामनाथ मोते : या शाळेवरील शिक्षक श्री. पोतदार यांच्या विरुध्द पोलिसांमध्ये विनयभंगाची जी तक्रार केली ती तक्रार त्या मुलीने केली की, तिच्या पालकांनी केली होती?

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

ही तक्रार किती तारखेला केली व पोलीस तपासामध्ये काय निष्पन्न झाले ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ही तक्रार संबंधित मुलीच्या आईने दिनांक 18.10.2005 रोजी केलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तक्रार आल्यानंतर पोलिसांच्या चौकशीत संबंधित शिक्षक दोषी असल्याचे आढळून आले आहे का ? असल्यास, त्यांच्या नावाने चार्जशीट तयार केली आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलिसांकडे तक्रार आल्यानंतर पोलिसांनी मुलीचा जबाब घेतलेला आहे. तो शिक्षक तुझे अंग मऊ किती मऊ आहे, तुझे हात जाड आहेत असे विचित्र बोलत होता म्हणून त्याच्या विरूध्द गुन्हा नोंदविला आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, माझी खात्री आहे की, यासंबंधी संस्थाचालकांनी दबाव आणला असावा. अशा तक्रारींचा अनुभवन अनेक वेळा आम्ही घेतलेला आहे. तेव्हा शासन याबाबत खरोखर चौकशी करणार आहे का ? तेथील शिक्षक हे संस्थाचालकांच्या दबावामुळे माहिती देणार नाहीत. हा जो शिक्षक आहे त्याला पगारसुध्दा मिळत नव्हता. त्यासंबंधीची चौकशी शासन करणार आहे का ? सदर शिक्षक हा अन्य व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत होता.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित संस्थाचालकांचा दबाव असेल तर निश्चितपणे त्याची चौकशी केली जाईल. चौकशीत संस्थाचालकाने दबाव टाकला असे निष्पन्न झाले तर संस्थाचालकाविरूध्द कारवाई करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, संस्थाचालकाने दबाव टाकला असा उल्लेख करण्यात आला आहे. या निमित्ताने मला एक साधी मागदर्शक सूचना करावयाची आहे व ती पोलिसांच्या कार्यपध्दतीत गृहीत धरली पाहिजे की ज्यावेळी मुलगी जबाब देत असेल त्यावेळी तिच्या आजूबाजूला दुसरी व्यक्ति उपस्थित असता कामा नये. असे जर केले तर सत्य समोर येईल.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जी सूचना केली आहे तिचा निश्चितपणे विचार केला जाईल.

.... ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नागपूर सुधार प्रन्यासने नागपूर शहरातील हजारो भूखंड लिलावाद्वारे विक्री करणे.

मु.शी. : नागपूर सुधार प्रन्यासने नागपूर शहरातील हजारो भूखंड लिलावाद्वारे विक्री करणे यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,सागर मेघे, जगदिश गुप्ता,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"नागपूर सुधार प्रन्यासने नागपूर शहरातील हजारो भुखंड लिलावाद्वारे विक्री करणे, हे भूखंड ३० वर्षाच्या भाडेतत्वावर देण्यात येवून त्यावर शासनाकडून कराची आकारणी होणे, हे भूखंड विकत घेतलेल्या व्यक्तींना त्याची मालकी नागपूर सुधार प्रन्यासकडून अद्यापपर्यन्त प्राप्त न होणे, दिनांक ७ मे, २००५ रोजी महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. १५/७१८ अन्वये मुंबई मुद्रांक अधिनियमात दुरुस्ती सुचविणे, उक्त दुरुस्तीनुसार मालमत्तेच्या बाजार मुल्याच्या १० टक्के रकमेवर अनुच्छेद २५ च्या खंड अ-ब-क-ड नुसार अभिहस्तांतरण पत्राच्या आकरणीस्तव असते तितके शुल्क धरुन त्यावर मुद्रांक शुल्क आजच्या बाजार भावानुसार ५ टक्के द्यावा लागण्याची केलेली सक्ती, या सक्तीमुळे हे भूखंड खरेदी केलेल्या प्रत्येक परीवाराला २ ते ३ लाख रुपये भरावे लागण्याची केलेली सक्ती, दिनांक ७ मे २००५ रोजीच्या अध्यादेशात केलेली दुरुस्ती रद्द करण्यात न आल्यास मोठे जन आंदोलन करण्याचा तेथील जनतेने शासनाला दिलेला इशारा, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



BGO/ D/ RJW/ 14:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर शहरामध्ये नागपूर महानगरपालिका आहे आणि नागपूर सुधार प्रन्यास आहे. नागपूर शहरामध्ये नागपूर सुधार प्रन्यासने हजारो भूखंड 30 वर्षाच्या लिजवर दिलेले आहेत  व ते लिलाव करून विकलेले आहेत.  शहरातील 75 टक्के जमीन ही नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची आहे. या भूखंडाची मालकी अद्यापपावेतो भूखंडधारकांना देण्यात आलेली नाही.  ती नागपूर सुधार प्रन्यासकडे आहे. या भूखंडावर नागपूर सुधार प्रन्यास ग्राऊंडरेट हा कर वसूल करते. त्याचप्रमाणे याच भूखंडावर एन.ए.टॅक्स वसूल केला जातो आणि महानगरपालिका मालमत्ता टॅक्स वसूल करते. असा प्रकार महाराष्ट्रात अन्य कुठे असेल असे मला वाटत नाही.  याचा अर्थ एकाच भूखंडावर तीन प्रकारचे टॅक्स घेतले जातात. सध्या प्रत्येक भूखंडधारकांकडून एन.ए.टॅक्स एकदम 15 वर्षाचा वसूल केला जात आहे. म्हणजे भूखंड बाजारभावाने लिलावाद्वारे घ्यायचा. एनआयटी च्या नियमाप्रमाणे 30 वर्षाच्या लिजवर घ्यायचा. आता जुना एन.ए.वसूल करण्यास सुरूवात केली आहे. 15 वर्षापासूनचा टॅक्स वसूल केला जात आहे. तो माफ करावा अशी मी सरकारला विनंती करीत आहे. To Value of property rule 4(6) या प्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यात यावी ती बाजारभावाप्रमाणे करण्यात येऊ नये असा माझा दुसरा प्रश्न आहे. तिसरा प्रश्न असा आहे की, जमीन महसूल संहिता कलम 113 अन्वये जी सुधारणा झालेली आहे त्यामध्ये गैरकृषी कर हा 2 पटीवरून 6 पट झालेला आहे.  त्यामुळे एनआयटीच्या मालकीच्या असलेल्या भूखंडधारकांवर 15 वर्षाचा थकित गैरकृषीकराचा बोजा अतिरिक्त पडलेला आहे तो माफ करण्याचा निर्णय शासन घईल काय आणि लोकांना न्याय देईल काय ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना विचारावयाचे आहे की, हा स्टॅम्प ड्युटीचा विषय आहे. आपण जे अन्य दोन विषय मांडले त्याचा उल्लेख या लक्षवेधीच्या सूचनेत नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. एन.ए. ग्राऊंड रेट, आणि प्रॉपर्टी टॅक्स इतका कर येथील मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांना भरणे शक्य नाही. मी आपणास आश्वासन देतो की, या संदर्भात 15 दिवसांत बैठक बोलाविली जाईल आणि गेल्या 15 वर्षाचा एन.ए.कलेक्शन करण्याचा आदेश दिलेला आहे त्यासंबंधी फेरविचार करुन निर्णय घेण्यात येईल. आपण या ठिकाणी उल्लेख केला की, बाजार भावाप्रमाणे स्टॅम्पडयुटी लावली जाते. याबाबत एक गैरसमज एका जी.आर.मुळे झालेला आहे. दिनांक 11 जुलै 2005 रोजीचा जी.आर. आहे त्याच्या पान क्रमांक 2 वरील मजकूर मी वाचून दाखवितो. "...... "ब" मध्ये नमूद केलेले दस्तास दिनांक 7.5.2002 पासून भाडेतत्वावर देण्यात येत असलेले मिळकतीच्या बाजारमूल्यावंर वर नमूद केलेली टक्केवारी वर मुद्रांक शुल्क देय करण्यात आलेले असल्याने अशा सर्व दस्त्यांमध्ये आपण सदर मिळकतीचे बाजारमूल्य नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपण नमूद केलेल्या किंमतीवर नोंदणी अधिकारी मुद्रांक शुल्काची आकारणी करेल. मात्र आपण किंमत नमूद न केल्यास नोंदणी अधिकारी यांचेकडील बाजारमूल्य दर तक्त्यानुसार मिळकतीचे बाजारमूल्य आकारणी करुन टक्केवारी नुसार देय मुद्रांक शुल्काची आकारणी करेल. आता त्या जी.आर.मध्ये सुधारणा केलेली आहे. ती मी वाचून दाखवितो."नागपूर सुधार प्रन्यासने मालमत्तेच्या दस्तऐवजामध्ये नमूद केलेले म्हणजे एन.आय.टी.ने जे मूल्य सांगितले आहे ते भाडे व कर यावर मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यात येईल. त्यामुळे तुमचा प्रश्न सुटलेला आहे. रेडीरेकनरचा प्रश्न येथे राहत नाही. बाजारभावाचा प्रश्न राहत नाही. एन.आय.टी.जी.किंमत काढेल त्यावर स्टॅम्पडयुटी लावली जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, अनेकवेळा मी हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. दुर्दैवाने या अगोदरच्या महसूल मंत्र्यांना निर्णय घेता आला नाही किंवा त्यांनी तशी भूमिका घेतली नाही. पण आपण यासंबंधी सकारात्मक भूमिका घेऊन आम्हाला दिलासा दिला याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. आपण जी मिटींग बोलाविणार आहात त्या मिटींगमध्ये आम्हालाही बोलवावे. आपण हा विषय सुध्दा सोडविला तर आम्ही आपले आभारी राहू.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास वेगवेगळे टॅक्स घेतात. ज्यांना 30 वर्षे, 25 वर्षे, किंवा 15 वर्षाच्या लीजवर जागा देण्यात आली. त्यावर आपण जो मुद्रांक लावणार तो साधारणत: 30 ते 35 हजार रुपयांवर जाणार आहे. एन.आय.टी.वेगळे पैसे घेते.त्याचप्रमाणे महानगरपालिका देखील वेगवेगळया टॅक्स रुपाने पैसे घेते. त्यामुळे भूखंड धारकावर फार मोठ्या प्रमाणावर भार पडत आहे. माझा दुसरा मद्दा असा की, दोन वर्षापूर्वी येथे एक खिडकी योजना लागू करण्यात आली. भूखंड रेग्युलराईज करण्यासाठी 1900 ले आऊट आणि 572 ले आऊट याच्या सुधारणेसाठी नागपूर सुधार प्रन्यासने एक खिडकी योजने अंतर्गत लाखो रुपये जमा केले पण त्या प्रमाणात विकास झाला नाही. तो विकास आपण करणार आहात काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना ज्याप्रकारचा विकास अभिप्रेत आहे त्याप्रकारचा विकास करण्यासाठी एन.आय.टी.ला शासन योग्य ते सहकार्य करील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा असा प्रश्न आहे की, 1900 अनधिकृत आणि 572 लेआऊट आहेत. आपण मुख्यमंत्री असताना ते रेग्युलराईज करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावर डेव्हलमेंट चार्जेस म्हणून 19 रुपये चौ.फू. घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे एन.आय.टी.मध्ये पैसे भरले. एन.आय.टी.ने काही कामे केली तर काही कामे केली नाहीत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

हा विषय पूर्णपणे महसूल आणि नगर विकास विभागाशी संबंधित आहे. आपण ज्यावेळी महसूल मंत्री होता त्याचवेळी आपण ते लागू केले होते. परंतु आताचे सरकार लोकांकडून पैसे घेत आहे परंतु काम करीत नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, त्या कामांचा विचार केला जाईल. परंतु मी आताच स्टॅम्प डयुटीबद्दल जे सांगितले आहे त्यानुसार यामध्ये दिलासा मिळेल.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वाढोना, ता.परतूर, जि.जालना येथील 16 वर्षीय अविवाहित मुलीवर सामुहिक बलात्कार करुन तिची केलेली हत्या.

**मु.शी.**: वाढोना, ता.परतूर, जि.जालना येथील 16 वर्षीय अविवाहित मुलीवर सामुहिक बलात्कार करुन तिची केलेली हत्या या संबंधी प्रा.फौजीया खान वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.फौजीया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक 11 ऑक्टोबर, 2005 रोजी वाढोना ता.परतूर जि जालना येथील शेख मदिना पि.शेख लालमिया यांच्या 16 वर्षीय अविवाहित मुलीवर करण्यात आलेला सामुहिक बलात्कार, बलात्कारानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने विहिरीत ढकलून तिची करण्यात आलेली हत्या, घटनेची माहिती पोलिस पाटलांनी पोलिस स्टेशन परतूरला दिलेली असणे, परंतु शवविच्छेदन दुसऱ्या दिवशी वाटूर येथे करण्यात येणे, वाढोना हे गाव परतूर पोलिस ठाण्याच्या अंतर्गत येत असल्याने मयताचे शवविच्छेदन परतूर येथे करण्यात यावे अशी पित्याने केलेली वारंवार मागणी, परंतु पोलिसांकडून त्याला प्रतिसाद न मिळणे, आरोपी, डॉक्टर आणि पोलिसांचे संगनमत असल्याचा मयताच्या पित्याने केलेला आरोप, परंतु या आरोपाची गांभीर्याने दखल न घेणे, या प्रकरणात अनेक बडे हस्ती आणि वरिष्ठ पोलिस अधिकारी गुंतले असल्याची शक्यता, एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची हत्या केली असताना पोलिस हे प्रकरण गांभीर्याने घेत नसल्याने लोकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष, शासनाने याबाबत तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : माननीय सभापति महोदया, यहां पर जो उत्तर दिया गया है कि मृतक के रिश्तेदारों से जवाब लेने गए तो उनकी तरफ से कोई संशय व्यक्त नहीं किया गया और उसके मां-बाप ने जवाब देने के लिए टालाटाल की. मैं कहना चाहती हूं कि यह उत्तर सरासर

झूठ है क्योंकि उस लड़की के पिता ने लगातार 10 दिन तक पुलिस स्टेशन के चक्कर काटे लेकिन उनकी कंप्लेंट लेने के लिए वहां पर कोई् तैयार नहीं था. उनसे कहा जा रहा था कि आप वापस जाइए आपके पास कंप्लेंट लेने के लिए हम  खुद आयेंगे. वह बेचारा अनपढ़ व्यक्ति 10 दिन के बाद  किसी नेता  को साथ लेकर गया तो उसकी कंप्लेंट ली गयी. लेकिन कंप्लेंट इस तरह की ली गयी कि वह लड़की  विनयभग की वजह से सू-साइड करने के लिए प्रवृत्त हुई. सभापति महोदया, मैं खुद वहां पर गयी   और वहां के फेक्ट्स ये बताते हैं कि वहां पर मर्डर हुआ है. सभापति महोदया, एक सात साल का बच्चा भी वहां पर आय विटनेस है. वहां पर जो पोस्टमार्टम होता है वह ऐसी जगह पर होता जो वहां से दूर है.  परतूर पुलिस स्टेशन वहां से नजदीक है वहां पर पोस्ट मार्टम होना चाहिए. लेकिन यह पोस्ट मार्टम वाटूर में किया गया जो कि एक पुलिस चौकी है. वहां पर जो डाक्टर बुलाया गया वह डाक्टर भी वढ़ाला का था इसलिए यह सब काम एक संगनमत से हुआ है. इस बारे में मैंने जब एस.पी. से बात की तो उन्होंने कहा कि मैं खुद तपास करुगा. उन्होंने बाद में वह तपास की और मुझे फोन करके बताया कि मॅडम आपने जो कुछ संशय व्यक्त किया था वह सच है इसलिए हमने पुलिस आफिसर के खिलाफ एक्शन लिया है. लेकिन वह एक्शन यह लिया गया कि उस आफिसर को सिर्फ एक पुलिस स्टेशन से दूसरे पुलिस स्टेशन में ट्रांस्फर कर दिया गया. जो लोग रक्षण के लिए है वही भक्षण करेंगे, वे खुद क्रामइ में शामिल हो जायेंगें तो फिर क्या होगा ? मेरा कहना है कि ऐसे पुलिस आफिसर को बडतर्फ करना चाहिए.  इस आफिसर पर कलम 302 लगायी जानी चाहिए, ऐसी मैं मांग करती हूं.



असुधारित प्रत / प्रकाशनार्थ नहीं

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान यांनी या घटनेबाबतची माहिती देताना सांगितले की, 10 दिवस त्या ठिकाणी जबाब घेण्यात आला नाही. मी सांगू इच्छितो की, त्या पोलीस स्टेशनचे पी.एस.आय.श्री.मदान घटना घडल्यानंतर 12 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 7.15 वाजता त्यांच्या घरी गेले परंतु त्यांनी जबाब दिला नाही. त्यानंतर 15 ऑक्टोबरला सायंकाळी 5.30 वाजता गेल्यानंतरही त्यांनी जबाब दिला नाही. त्यानंतर पुन्हा 16 तारखेला व नंतर 17 तारखेला त्या ठिकाणी जाऊनही......

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

( यानंतर श्री गायकवाड )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापति महोदया, मेरा पाइंट ऑफ आर्डर है. मंत्री महोदय यहां पर कह रहे है कि बार बार उनके घर गए यह बिल्कुल गलत बात है. अगर वे गए होते तो पुलिस पाटील के पास उसकी नोंद होनी चाहिए. वह नोंद उसके पास नहीं है. यह बात एस.पी. ने भी मानी है और मैं खुद इसकी साक्षीदार हूं. वे लोग वहां पर कंपलेंट लेने के लिए नहीं गए हैं.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदया, पोलीस अधिकारी ज्यावेळी त्यांच्या घरी गेले होते त्यावेळी त्यांनी स्टेटमेन्ट दिले नाही. अशा प्रकारे अनेकदा येऊन गेल्यानंतर सुध्दा त्यांनी जबाब दिलेला नाही म्हणून इतर साक्षीदारांचा सुध्दा त्यांनी जबाब घेतला होता. त्यामुळे तेथे जाऊन जबाब घेतला नाही हे म्हणणे बरोबर नाही असे मला सांगावयाचे आहे.सन्माननीय सदस्यांनी सांगितले की एस.पी.कडे तक्रार केल्यानंतर त्यांनी या अधिका-याकडून तपास काढून घेतला आहे.डी.वाय.एस.पी. दर्जाच्या अधिका-याकडे दिला आहे.

प्रा. फौजिया खान : मैं बताना चाहूंगी कि पुलिस पाटील ने कहा कि मॅडम वहां पर गांव में वातावरण बहुत खराब है, और मुझे मारा भी है. इसलिए सच बताने के लिए मैं डर रहा हूं.. पुलिस पाटील ने यह बात .मुझे कही है.

( उत्तर दिले नाही )

**तालिका सभापती (श्रीमती.सुधा जोशी)** :मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान स्वत: त्या ठिकाणी गेल्या होत्या. त्यांना हे सर्व प्रकरण माहीत आहे. हा विषय अत्यंत संवेदनशील असल्यामुळे या विषयाच्या बाबतीत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे.केवळ वर वरची चौकशी करुन आपण उत्तर दिलेले आहे असे वाटते.

( उत्तर दिले नाही )

श्री.पांडुरंग फुंडकर : या मुलीवर बलात्कार करण्यात आला असून तिची वैद्यकीय तपासणी उशिरा करण्यात आली होती.त्याचा अहवाल काय आला आहे ? या मुलीवर जर बलात्कार झाला आहे अशी तक्रार असेल तर 376 कलमाखाली गुन्हा का दाखल करण्यात आला नाही ? बलात्कार केल्यानतर जर ही मुलगी मेली असेल तर खून झाल्यामुळे 302 चे कलम सुध्दा लावावयास पाहिजे होते तेव्हा सबंधिताविरुध्द 376 आणि 302 ही कलमे का लावण्यात आली नाही ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सदर मुलीवर बलात्कार झाला नाही आणि तिचा बुडून मृत्यू झाला आहे असे पोस्ट मार्टेमच्या रिपोर्टमध्ये म्हटलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : ही घटना 11 तारखेला घडली आहे असे असतांना पोस्ट मार्टेम किती तारखेला करण्यात आले होते ? सन्माननीय सदस्या श्रीमती फोजिया खान यांनी सागितले की, परतूरच्या हॉस्पिटलमध्ये पोस्ट मार्टेम न करता वाटूर येथे पोस्ट मार्टेम केले होते तेव्हा पोस्टमार्टेमसाठी दवाखाना का बदलण्यात आला? जवळचे हॉस्पिटल सोडून दूरच्या हॉस्पिटलला नेऊन पोस्टमार्टेम करण्याचे कारण काय आहे.? 11 तारखेला या मुलीवर बलात्कार करण्यात आला होता आणि तीन चार दिवसानंतर पोस्टमार्टेम केल्यानंतर त्याचा योग्य रिपोर्ट येऊ शकत नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : वाढोना हे गाव वाटूर पी.एच.सी. च्या अंतर्गत येते. त्यामुळे ज्या पी.एच.सी.च्या अंतर्गत ते गाव येते तेथेच पोस्ट मार्टेम केले जाते.

श्री.पांडुरंग फुंडकर : यासाठी पी.एच.सी.ची मर्यादा नसते. जवळच्या दवाखान्यात पोस्ट मार्टेम करावयास पाहिजे होते. जर लवकर पोस्ट मार्टेम केले नाही तर त्याचे रिझल्टस चांगले येत नाहीत. मी काही डॉक्टर नाही. परंतु माहितीवरुन आणि अनुभवावरुन जवळच्या हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय तपासणी व पोस्ट मार्टेम करावयास पाहिजे . तेव्हा त्या ठिकाणी ते का करण्यात आले नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : 12.10.2005 ला पोस्ट मार्टेम करण्यात आले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :वैद्यकिय तपासणी कोठे केली आणि केव्हा केली ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे: विहिरीत उडी मारल्यामुळे तिचा मृत्यू झाला होता.

श्रीमती मंदा म्हात्रे :एका मुलीवर सामुदायिक बलात्कार केला जाणे ही खरोखरच लाजिरवाणी गोष्ट आहे. बलात्कार केल्यानंतर त्या मुलीला विहिरीत ढकलून दिले जाते. ही घटना पाहिली असल्याचे तिच्या सहा वर्षाच्या भावाने सागितले आहे. त्याच बरोबर तिच्या वडिलांचे पत्र वाचल्यानंतर असे वाटते की दहा दिवस घरी बसल्यामुळे व त्यांना माहितीच्या अधिकारासंबंधी माहिती नसल्यामुळे त्याच्या तक्रारीची नोंद घेण्यात आली नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की पोलीस अधिकारी वारंवार त्याच्या घरी गेले परंतु त्यांनी जबाब दिला नाही. कोणताही पोलीस अधिकारी कोणाच्याही घरी गेल्यानंतर जबाब न नोंदविता परत जात नाही.

नंतर श्री.सुंबरे

अग्रिम प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती म्हात्रे .....

जे काही राज्यमंत्री महोदय येथे सांगत आहेत त्यामध्ये काही तथ्य नाही. या मुलीच्या बॉडीचे दफन झालेले असल्याने तिची बॉडी तेथून बाहेर काढून पुन्हा पोस्ट मार्टेम व चेकअप करणार काय ? तिच्या वडिलांनी देखील तशी मागणी केलेली आहे.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदया, त्या मुलीच्या पालकांची तशी इच्छा असेल तर तिची बॉडी काढून परत पोस्ट मार्टेमसाठी पाठविली जाईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, एका तरूणीवर बलात्कार करून तिने आत्महत्या केली आहे असे दाखवून पुरावा नष्ट करण्याचा हा गंभीर असा प्रकार आहे. आपण या प्रकरणी चार आरोपींना अटकपूर्व जामीन मिळवून दिलेला आहे. खरे तर या आरोपींवर कलम 302 आणि कलम 120बी लावण्यात आलेले नाही. तसेच कलम 376 देखील लावावयास पाहिजे होते तेही लावण्यात आलेले नाही. यतेव्हा या प्रकरणात या घटनेसंबंधीचा पुरावा नष्ट करण्यामध्ये आपले अधिकारी देखील सामील झाले आहेत असे वाटते. तेव्हा असे जे कोणी यामध्ये सामील आहेत त्यांचेवर देखील आपण कारवाई करणार काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदया, या सर्व घटनेची उच्च अधिकाऱ्यांकडून पुन्हा चौकशी करण्यात येईल आणि त्यामध्ये जे कोणी दोषी आढळतील त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येईल.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, हे अत्यंत गंभीर असे प्रकरण आहे. एका 16 वर्षे वयाच्या युवतीवर सामुहिक बलात्कार केला जातो आणि त्या संबंधात येथे गृह राज्य मंत्री जे काही उत्तर देत आहे त्यातून ते सभागृहाची फसवणूक करीत आहेत किंवा काय असे वाटते. या प्रकरणी जी काही कलमे लावण्यात आलेली आहेत त्याबद्दल आपण आपल्या पोलीस अधिकाऱ्यांना विचारायला पाहिजे. हे प्रकरण कलम 306 चे नाही तर कलम 376, 302 आणि 120बी चे आहे. हे तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे आणि त्याने तेथून श्री.मदान म्हणून जो कोणी पोलीस अधिकारी होता त्याला हाकलून लावले आहे. म्हणजे तुमच्या विभागाचे ॲडमिशन आहे. तेव्हा या प्रकरणी आपण केवळ उच्च अधिकाऱ्याकडून चौकशी करण्याऐवजी सीआयडी कडून चौकशी करावयास लावणार आहात काय ? तसेच त्या श्री.मदान नावाच्या अधिकाऱ्याला बडतर्फ करणार का ?

...... 2व्ही 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदया, मी मघाशीच सांगितले आहे की, या संपूर्ण घटनेची उच्च अधिकाऱ्याकडून चौकशी केली जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एसपीचा तसा रिपोर्ट आहे, पण आमच्याकडे काही तो रिपोर्ट आलेला नाही. तेव्हा याबाबत एसपी यांना देखील विचारण्यात येईल की, त्यांनी याचा रिपोर्ट का दिला नाही आणि आवश्यक तर त्याबद्दल त्यांचेवर देखील कारवाई करण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे ....2डब्ल्यू 1

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश देशमुख : सभापती महोदय, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आरोपीविरुध्द गुन्हा दाखल झाला, तो दाखल करतांना अधिकाऱ्यांनी कुचराई केली ही गोष्ट खरी आहे काय, असल्यास त्यावर काय कारवाई करणार? व ही कारवाई किती दिवसात करणार?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या सर्व घटनेमध्ये जे जे जबाबदार आहेत. त्यामध्ये एस.पी. नी रिपोर्ट कां दिला नाही ? या सर्वांची चौकशी करण्यात येईल. आणि म्हणून त्यामध्ये जे दोषी आढळतील त्या सर्वांवर कारवाई केली जाईल.

**तालिका सभापती** : या लक्षवेधी सूचनेवर अनेक प्रश्न विचारले गेले. मी या आसनावरुन मंत्रिमहोदयांना निर्देश देते की, अतिशय संवेदनशील, अतिशय विदारक अशी ही घटना आहे. असे असल्यामुळे आपण या प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करावी व चौकशी अहवाल सादर करावा.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, होय.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ग्रामीण व शहरी विभागात अंगणवाडयातील बालकांना जुन्या दरामध्ये सकस आहार पुरवावा लागणे.

मु.शी.: ग्रामीण व शहरी विभागात अंगणवाडयातील बालकांना जुन्या दरामध्ये सकस आहार पुरवावा लागणे.यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य श्री. रमेश निकोसे यां-ी दिलेली लजवेधी सूच-ा.

श्री. रमेश निकोसे ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, मी आपल्या अ-ुमती-े ि-यम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि-ज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय महिला व बाल विकास मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी ि-वेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

"राज्यात ग्रामीण व शहरी विभागात अंगणवाडयातील बालकांना सकस आहार पुरविण्याची योजना असून सन 1997 पासून शहरी विभागात 100 ग्रॅम करीता रुपये 1.00 प्रमाणे दर लागू करणे, या दराची निविदा फक्त एका वर्षासाठीच करण्यात आलेला असणे, हा करार संपला असला तरी सुध्दा जुन्या दरातच आहार पुरवठा करण्यात येत असणे, दर वाढवून मिळण्याबाबत संस्थांनी मा.आयुक्त एकात्मीक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, बदलापूर नवी मुंबई यांना वारंवार पत्र करण्यात येणे, तसेच उपआयुक्त (स.आ.पो) यांना प्रत्यक्ष भेटून दर वाढीबाबतची मागणी करण्यात येणे, उप आयुक्त यांनी दर वाढीचे आश्वासन देण्यात येणे परंतु अद्याप दर वाढ करण्यात न येणे, दिवसेंदिवस भाववाढ होत असून संस्थांना जुन्या दरात सकस आहाराचा पुरवठा करावा लागत असणे, या संस्थांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, डिसेंबर, 2005 पर्यंत दर वाढ लागू करण्यात आली नाही तर आहार पुरवठा बंद करण्याचा संस्थांनी घेतलेला निर्णय, यामुळे दरवाढीबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हर्षवर्धन पाटील (महिला व बाल कल्याण मंत्री ) : सभापती महोदया, लजवेधी सूच-ेसंबंधीच्या ि-वेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत ज्ल्या असल्यामुळे मी ते ि-वेद-ा आपल्या अ-ुमती-े सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : ि-वेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

ि-वेद-ा
( प्रेस : येथे सोबतचे ि-वेद-ा छापावे. )

.... ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, ही सकस आहार योजना मुंबई-कल्याणपासून खामगाव-भंडाऱ्यापर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे. यामध्ये 1 ते 6 वर्षाच्या लहान मुलांना अंगणवाडयांमधून सकस आहार दिला जातो. त्यामध्ये ग्रामीण व शहरी विभागामध्ये अशा दोन योजना आहेत. ग्रामीण भागामध्ये 1997 साली 100 ग्रॅमला 148 चा भाव लावला. तो शहरी विभागात लावण्यात आला नाही. मागील वर्षी अंगणवाडया सुरु झाल्या त्यांना वर्षभर आहार देण्यात आला नाही. संपूर्ण महाराष्ट्रात सप्टेंबर-ऑक्टोंबरपासून वेगवेगळया अंगणवाडया सुरु आहेत. त्याठिकाणी त्यांना 1 रुपयामध्ये आहार पुरवावा लागतो. त्यामध्ये त्यांना परवडत नाही. मैद्याचे भाव वाढले आहेत, लाकडाचे भाव वाढले आहेत. अशा परिस्थितीत आपण शहरी विभागामध्ये भाव वाढवून देणार काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, शालेय पोषण आहाराच्या संदर्भात आणि नागरी प्रकल्पाच्या परिसरात माननीय सदस्य श्री निकोसे यांची मागणी आहे की, त्या ठिकाणी भाव वाढविणार काय? मी आपल्यामार्फत सदनाला सांगू इच्छितो की, सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत त्या आदेशानुसार यापुढे ग्रामीण प्रकल्प किंवा शहरी प्रकल्पामध्ये सकस आहार, लोकल फूडच्या संदर्भात पुरवठा करण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्यात येणार नाही. त्या परिसरात महिला बचत गट असेल, महिला मंडळे असतील त्यांना हे काम संपूर्ण राज्यामध्ये देण्याच्या संदर्भात 28 ऑक्टोबर 2005 ला नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्याप्रमाणे नागरी प्रकल्प व ग्रामीण प्रकल्पामध्ये त्यांच्या रेसिपिज कोणत्या असाव्यात, साधारणपणे 300 कॅलरीज त्या बालकाला पोषण आहाराच्या कार्यक्रमातून द्याव्यात. यासंबंधीचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी आणि नागरी प्रकल्पामध्ये महानगरपालिका आयुक्तांकडे सुपूर्द केले आहेत. त्या जी.आर. मध्ये रेसिपिज दिल्या आहेत. त्यामध्ये 20 ते 25 आयटेमचा उल्लेख आहे. त्याबाबतचे रेट ठरविण्याचे अधिकार हे जिल्हाधिकारी व आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे माननीय सदस्यांची जी मागणी आहे त्याबाबत त्यांनी नवीन जी.आर. चा आधार घेऊन तशाप्रकारचा अर्ज करावा.त्याबाबत नागरी प्रकल्पामध्ये आयुक्त स्तरावर निर्णय होईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील . . . .

आणि ग्रामीण प्रकल्पामध्ये जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्तरावर निर्णय होईल आणि आम्ही 28 ऑक्टोबर रोजी तशा प्रकारचा जी.आर.निगर्मित केलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत एकात्मिक प्रकल्प राबविला जाणार आहे. पण माननीय मंत्री महोदयांना माझा प्रश्न असा आहे की, यावर कोणतीही मॉनेटरींग किंवा रेग्युलेटरींग ॲथॉरिटी नाही. हे काम व्यवस्थित होत आहे की नाही ? हा सकस आहार आहे की नाही ? त्या आहाराची क्वॉलीटी कशी आहे ? त्याच्या रेसीपीज् काय आहेत ? यामध्ये असलेली प्रथिने, याचा जो उष्मांक आहे, तो मॉनेटर करण्यासाठी आपल्याकडे कोणतीही यंत्रणा नाही. यासाठी आपण कोणती यंत्रणा राबविणार आहात ? कारण हा सर्व जिल्हयांशी संबंधित प्रश्न आहे आणि विशेषत: कुपोषित भागात हा प्रश्न महत्वाचा आहे. यासाठी आपण मॉनेटरींग आणि रेग्युलेटरींग ॲथॉरिटी नेमणार आहात का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न महिला बालविकासच्या माध्यमातून अतिशय टॉप प्रॉयॉरिटीवर घेतला आहे. त्यामध्ये सी.डी.पी.ओ. आणि जिल्हा स्तरावर जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांच्या नेमणूका करण्याच्या बाबतीत, विशेषत: यामध्ये कंट्रोल करण्याच्या बाबतीत, मॉनेटरींग करण्याच्या बाबतीत आणि क्वॉलीटी मेन्टेन करण्याकरता जो जी.आर.काढला आहे, तो मी आपल्याकडे माहितीसाठी पाठवितो. प्रथमच 16 पानी जी.आर.काढला आहे आणि यासंबंधात शासनाच्यावतीने उच्च न्यायालयात ॲफेडेव्हीट दिलेले आहे. महिला बचत गट आणि महिला मंडळाला काम देताना ग्राम स्तरावर काही समित्या गठीत करण्याचा निर्णय या जी.आर.मध्ये घेतलेला आहे. लॅबोरेटरींग चेकींग हा नवीन क्लॉज घातलेला आहे आणि याची बिले देण्यापूर्वी क्वॉलीटीबद्दल तक्रार असेल, शेवटी महिला बचत गट आणि महिला मंडळ यामध्ये कॉन्ट्रॅक्टर हा विषय आता राहीलेला नाही. त्यामुळे आज महाराष्ट्रात जवळपास 1 लाख 71 हजार 129 महिला बचत गट स्थापन केले आहेत. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याकरता, आर्थिकदृष्टया महिलांना सबल करण्याच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे. मी या सदनाला माहिती देऊ इच्छितो की, सुप्रीम कोर्टाने आदेश दिल्यानंतर अजून इतर राज्यांमध्ये अजून हे काम सुरु झालेले नाही. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे की, ज्याठिकाणी हे सर्व काम महिला बचत गट आणि महिला मंडळाकडे देण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे आणि

. . . .2एक्स-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील . . . .

निश्चित स्वरुपामध्ये 300 कॅलरीज प्रमाणे त्या बालकाला आहार मिळाला पाहिजे अशा प्रकारची व्यवस्था करण्याकरता काही कठोर निर्णय सुध्दा घेतलेले आहेत आणि काही कठोर नियम सुध्दा घालण्यात आलेले आहेत. त्याचा उपयोग महाराष्ट्रातील विशेषत: जी 0 ते 6 वयोगटातील बालके आहेत, त्यांना निश्चितपणे होईल.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यामध्ये सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे तुम्ही महाराष्ट्रात केवळ महिला बचत गट संस्थानांच काम दिलेले आहे. जो रेट 1997 ला लागू केला होता, तोच रेट आताही तसाच आहे. नवीन प्रोजेक्ट सुरु झाले, जुने प्रोजेक्टही आहेत. महिला संस्थांकडे काम आहे, खाजगी ठेकेदारी बंद करण्यात आली आहे. महिला बचत गटाला देण्याच्या आदेश काढणार आहात, तसा तो द्यावा त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे सप्टेंबर 2005 पासून ज्यांनी सुरुवात केलेली आहे, त्यांचा रेट 1 रुपया 48 पैसे आपण देणार आहात का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने जो रेट ठरवून दिलेला आहे, या सकस आहार योजनेमध्ये रेट ठरलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांची मागणी अशी आहे की, पूर्वी शहरी भागासाठी 1 रुपया रेट होता. म्हणून यासंदर्भात 1.50 रुपयाचा रेट करण्याचा . .

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : मॅच फिक्सींग आहे . . . .

श्री.हर्षवर्धन पाटील : ते मागणी करीत आहेत आणि मी नाही असे सांगत आहे. आता आपले काही म्हणणे असेल तर सांगा.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : मी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देत नाही. मंत्री महोदयांनी आपले उत्तर पूर्ण करावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळामध्ये एक नवीन निर्णय घेण्याच्या विचारात आहोत. आपण सकस आहाराचे काम देत आहोत. आपण बालकांना जो सकस आहार देत आहोत, त्या योजनेमध्ये सुध्दा त्यामध्ये 1.50 रुपयाचा रेट निश्चित केलेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरु...

सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे समितीमार्फत निश्चितपणे विचार केला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, शासनाच्या या निर्णयाचे मी स्वागत करते. परंतु उच्च न्यायालयाकडून आदेश येईपर्यन्त मधे खूप वर्षे लोटलेली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, महिला बचत गटाकडे हे काम सोपविलेले आहे हे उत्तम आहे, बऱ्याच वर्षापासून बचत गटांची मागणी होती की, हे काम करण्याची तयारी आहे. माझा प्रश्न असा आहे की, बचत गटांची काम करण्याची तयारी असली तरी बचत गट वेगवेगळया प्रकारचे आहेत. अनेक बचत गटांचा जीव अगदी छोटा आहे. एका वस्तीपुरते किंवा दोन गावांपुरतेच ते काम करु शकतात. आपण जो निकष लावाल त्या निकषामध्ये हे बचत गट बसले नाहीत तर जसे महिला मंडळांची नावे पुढे करुन अनेक कंत्राटदारच पुढे येत असल्याचे आपण बघत असतो तसा धोका यामध्ये आहे. मला असे विचारायचे आहे की, बचत गटांना कोणत्या भागापर्यन्त काम करण्याची क्षमता आहे हे पाहून त्याप्रमाणे विकेंद्रित स्वरुपात त्यांना काम दिले तरच त्या ते काम करु शकतील. पूर्वी जसे एका जिल्ह्यासाठी एक संस्था देत होतो तसे जर झाले तर त्यामधून अनेकवेळेला असे होते की, त्या बचत गटांकडे सगळया निकषांमध्ये बसण्याएवढा निधीच नसतो. म्हणून बचत गटाला विकेंद्रित स्वरुपात काम द्याल काय ? दुसरे मला असे विचारायचे आहे की, या बचत गटाबरोबर या कामकाजाची देखरेख करणारी यंत्रणा आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सूचना केल्याप्रमाणे त्यासाठी ॲथॉरिटी असली पाहिजे. जेव्हा बचत गट कोणतेही काम मागण्यासाठी जातात तेव्हा आपण नेहमीच म्हणतो त्याप्रमाणे विकासाच्या कामामध्ये राजकारण आणता कामा नये. मला बालकल्याण मंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे की, स्व. मॉंसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या नावाने अनेक महिलांनी बचत गट केलेले आहेत. आपले स्वत:चे आदेश नसतील पण अनेक ठिकाणी स्व.मासाहेब मीनाताई ठाकरे अशा नावाने बचत गट असला तर तुम्ही हे नाव बदला असे अनेक अधिकाऱ्यांनी महिला बचत गटांना सांगितलेले आहे...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : माझा प्रश्न आहे की, यात कोणतेही पक्षीय राजकारण येऊ न देता या महिला बचत गटांना कामकाजामध्ये सहभागी करुन घेतले जाईल काय ?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांचा प्रश्न असा आहे की, काम देताना जी.आर.मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, एक अंगणवाडी एक महिला बचत गट अशा प्रकारचा निर्णय केलेला आहे. एका अंगणवाडीसाठी एकापेक्षा जास्त महिला बचत गटांनी मागणी केली तर त्याबाबतचा प्रस्ताव सी.डी.पी.ओ.मार्फत सादर केला जाईल. जिल्हा स्तरावरील जी सिलेक्शन कमिटी आहे त्यामध्ये कोणीही लोकप्रतिनिधी नाही. सगळया अधिकाऱ्यांची कमिटी गठित केलेली आहे. जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे सी.ई.ओ. हे त्या समितीचे पदाधिकारी आहेत. त्यामध्ये त्याबाबतचा निर्णय होईल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. दुसरे असे की, या महिलांना ट्रेनिंग देण्याचे काम आम्ही सुरु केलेले आहे. आता माझ्याकडे सात जिल्ह्यांचे प्रस्ताव आलेले आहेत. त्या ठिकाणचे संपूर्ण जिल्हयाचे काम महिला बचत गट करायला तयार आहे. जोपर्यन्त महिला बचत गट या संदर्भात पुढे येत नाहीत तोपर्यन्त जुनी जी व्यवस्था आहे तिला मुदतवाढ दिलेली आहे. परंतु ज्या जिल्ह्यामधून अशा प्रकारची मागणी येईल, त्याप्रमाणे ते काम देण्याच्या संदर्भामध्ये आपण निर्णय केलेला आहे. दुसरा प्रश्न उपस्थित केला की, महिला बचत गटाला काम देतांना कोणतेही राजकारण यामध्ये आणले जाणार नाही. जर कोणत्या अधिकाऱ्यांनी असे सांगितले असेल तर जरुर त्या अधिकाऱ्याचे नाव सांगा, मी कारवाई करीन. जे सक्षम महिला बचत गट आहेत त्यांना हे काम निश्चित दिले जाईल.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदया, महिला बाल कल्याण विभागाचे तेथील उप आयुक्त श्री. बोरखडे आहेत त्यांच्याशी मी सतत संपर्कात असून, मी त्यांच्याबरोबर या स्कीमबाबत तीनवेळा चर्चा केली. मी स्वत: झोपडपट्टीमध्ये राहात असल्यामुळे माझ्या इंदोऱ्यासारख्या विभागामध्ये...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सदस्यांचा प्रश्न काय आहे ?

श्री.रमेश निकोसे : माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे 100 ग्रॅम आहारासाठी जो मोबदला आहे तो आता आपण लागू करावा. कारण वेगवेगळया उसळ असो, ब्रेड असो अशा सर्व वस्तूंचे भाव वाढलेले आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सप्टेंबर-ऑक्टोबरपासून जे प्रोजेक्ट चालू करण्यात आलेले आहेत, त्यांना आम्ही 1 रुपया देतो. त्याचवेळेला आपण ग्रामीण विभागामध्ये 1 रुपया 48 पैसे देतो. हा फरक न ठेवता सर्वांना हा 1 रुपया 48 पैसे रेट लागू करावा एवढीच माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

यानंतर कु. थोरात ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ RJW/ D/ 14:50

श्री. हर्षवर्धन पाटील :ज्या महिला बचत गटाकडून नवीन पाककृति प्रमाणे आहार पुरवठा होईल त्यांना 1 रुपया 50 पैशा प्रमाणे हा प्रॉस्पेक्टिव्ह दर देण्यात येईल.

श्री. रमेश निकोसे :महिला संस्था, मंहिलामंडळे, महिला बचत गट अशा प्रकारचा यामध्ये स्पेसिफिक शब्दप्रयोग करण्यात यावा. नाही तर अधिकारी यामध्ये गोंधळ करतात. मी यासंदर्भात त्यांना सांगून दमलो आहे. तर शासन स्पेसिफिक शब्द प्रयोग करील का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, मी पुन्हा याचे स्पष्टीकरण करु इच्छितो. ज्या महिला बचत गट किंवा महिला संस्था असतील किंवा त्या ठिकाणची महिला मंडळे असतील ज्यांना यापूर्वी हे काम दिलेले आहे आणि जे नवीन पाककृतिप्रमाणे आहार पुनवठा करतील त्यांना 1 रुपया 50 पैशा प्रमाणे हा प्रॉस्पेक्टिव्ह डिफरंट देण्याच्या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदया, महिला बचत गटांना काम देण्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो स्वागतार्ह आहे. त्या बद्दल मी मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करते. महिल बचत गट सक्षम करण्यासाठी हा निर्णय घेतलेला आहे.परंतु मला मंत्रिमहोदयांच्या एक गोष्ट लक्षात आणून द्यायची आहे की, महिला बचत गटांना काम देण्याच्या संदर्भात वृत्त पत्रात एक बातमी आलेली आहे. महिला बचत गट तयार करायला 200 रुपये महाराष्ट्र शासन देते. त्यानंतर या महिला गटांना काम करण्यासाठी कामे दिली जातात. आजच्या तरुण भारत मध्ये यासंदर्भात एक बातमी आलेली आहे. बोगस महिला बचतगट निर्माण करुन 200 रुपये मानधन घेण्यात येते. आणि या बोगस बचत गटांना उद्योग देऊन तोही पैसा घेण्यात येतो. अशा प्रकारचे बोगस बचत गट निर्माण करण्यात आलेले आहेत. म्हणून मी मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितें की, असे बोगस महिला गट निर्माण होऊन ते काम घेतील आणि ग्रामीण भागात जे खरे महिला बचत गट आहेत त्यांच्यावर उद्या काम मिळण्याच्या बाबतीत अन्याय होणार नाही, ही काळजी शासन घेईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदया, तरुण भारत सारख्या पेपरमध्ये आलेली जी माहिती सन्माननीय सदस्यांनी संगितली आह तिची निश्चितपणाने चौकशी केली जाईल. त्याच्यामध्ये काही बोगस आढळून आले तर संबंधितावर कारवाई केली जाईल. परंतु या महिला बचत गटाच्या माध्यमातून जर त्यांच्या पाठिमागे राहून कोणी गैर फायदा घेणार असेल तर निश्चितपणाने........

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील.....

त्याबाबतीत सुध्दा कठोर कारवाई करु. महिला बचत गटांना काम देण्याचा निर्णय केलेला आहे. मी या निमित्ताने सदनाला ग्वाही देऊ इच्छितो की, त्याच्यामध्ये फक्त महिला सदस्य असल्या पाहिजे. ब-याच वेळेला असे होणार आहे की, महिला बचत गटाला काम मिळणार आहे म्हटल्यानंतर पहिली अकरा नावे महिलांची असतील आणि त्याच्या खाली पुन्हा पुरुषांची नावे असतील तर ते चालणार नाही. म्हणून तशा पध्दतीने जी.आर.मध्ये सगळे स्पष्ट नमूद केलले आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मेसर्स किनवटकर कृषि उद्योग प्रा.लि. व इतर कंपन्यांकडून शेतक-यांना मिश्र खतांचा पुरवठा केला जाणे.

**मु. शी** : मेसर्स किनवटकर कृषि उद्योग प्रा.लि. व इतर कंपन्यांकडून शेतक-यांना मिश्र खतांचा पुरवठा केला जाणे.यासंबंधी स□मा□□ीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी,जगदीश गुप्ता, सागर मेघे वि.प.स.यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ □ियम 101 अ□वये पुढील तातडीच्या व सार्वज□□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय कृषि मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी □िवेद□ □रावे, अशी वि□ंती □रतो.

" मेसर्स किनवटकर कृषि उद्योग प्रा.लि. मेसर्स धरतीधन फर्टीलायझर्स लि. मेसर्स डेक्कन सेल्स, कॉर्पोरेशन प्रा.लिमिटेड, या व इतर अनेक कंपन्याकडून महाराष्ट्रातील शेतक-यांना मिश्र खतांचा पुरवठा केला जाणे, या मिश्र खतात भेसळ असल्याने त्याचा शेतक-यांच्या पीकांवर झालेला विपरीत परिणाम, या मिश्र खतांच्या वापरामुळे शेतक-यांच्या हातात कमी पीक येऊन शेतक-यांचे झालेले नुकसान, शेतक-यांना पुरविण्यात आलेल्या खतांची कृषि विभागामार्फत तपासणी केली असता त्यामध्ये भेसळ असल्याचे सिध्द होणे, त्यामुळे शेतक-यांचा वाढलेला उत्पादन खर्च, भेसळयुक्त खते वापरल्याने उत्पादनात झालेली घट व त्यामुळे त्यांचे झालेले आर्थिक नुकसान, भरपाई मिळण्याबाबत शेतक-यांनी मागणी करुनही याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी शेतक-यांमध्ये निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, शेतक-यांच्या नुकसानीस जबाबदार असणा-या या कंपनीच्या अधिका-यांविरुध्द कारवाई करुन शेतक-यांना नुकसान भरपाईची रक्कत त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व याबाबतची शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राण जगजितसिंह पाटील (कृषि राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या □िवेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते □िवेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : □िवेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

□िवेद□

( प्रेस : येथे सोबतचे □िवेद□ छापावे. ) ..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, महाराष्ट्रामध्ये खत उत्पादक कारखान्यांना जवळपास 47 दाणेदार मिश्र खताचे उत्पादनासाठी परवाने देण्यात आले. यामध्ये 18:18:10, 20:10:10, 10:20:20 आणि 20:20:0 या चार ग्रेडची खते अधिसूचित करण्यात आली. मेसर्स किनवटकर कृषि उद्योग प्रा.लि.,मेसर्स धरतीधन फर्टीलायझर्स लि., मेसर्स, डेक्कन सेल्स, कॉर्पोरेशन प्रा. लिमिटेड व इतर 47 हे जे खत निर्माते आहेत त्यांचे नमुने वेळोवेळी तपासले जातात. ऑक्टोबरमध्ये या मिश्र खताचे 1486 नमुने घेध्यात आले. त्यापैकी 573 नमुने अप्रमाणित आढळून आले आणि 288 नमुने ज्याच्यावर कोर्टकेसेस केल्या पाहिजे अशा प्रकारचे आढळून आले.

माझ्याजवळ यासंबंधीची यादी आहे. पण मी ती यादी वाचून दाखविणार नाही. याठिकाणी 10 कारखान्यांचे परवाने रद्द केले. लिमिटपेक्षा जास्त अप्रामाणिक नमुने निघालेले असल्यामुळे या 288 कारखान्यांची प्रकरणे कोर्टात दाखल केलेली आहेत पण त्यांचे परवाने रद्द केलेले नाहीत. फक्त 10 कारखान्यांचे परवाने रद्द केलेले आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ज्या कारखान्यांची प्रकरणे कोर्टात दाखल केलेली आहेत त्या कारखान्याचे परवाने शासन रद्द करणार आहे काय?

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ RJW/ D/ पूर्वी कु. थोरात.... 14:55

राणा जगजितसिंह पाटील : महोदय, फर्टिलायझर कंट्रोल ऑर्डर, 1985 ची आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, नेमकी कोणती कारवाई करण्यात यावी. मिश्र खतांच्या बाबतीत लिमिटच्या बाहेर जर डिफरन्स आढळून आला तर त्यामध्ये अशी तरतूद आहे की, फक्त लाँचिंग ऑफ प्रॉसिक्युशन आणि ती इ.सी.ए. च्या सेक्शन 7 प्रमाणे केली होती, याच्या अगेन्स्ट 5 टक्क्याच्या लिमिटच्या बाहेर हे प्रमाण आढळून आले म्हणून सस्पेंशन, कॅन्सलेशन आणि इश्यु ऑफ वॉर्निंग हे कलम 31 प्रमाणे केले जाते, अशा प्रकारे ही प्रासिक्युशन ॲक्शन घेतलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, डेक्कन सेल्स कॉर्पोरेशन 75, वर्धमान फोर्ड 20 टक्के, रामा कृषी रसायन 35 टक्के, आर.बी.पाटील किसान सहकार 33 टक्के, चंदगड 50 टक्के, मारुती फर्टिलायझर्स 33 टक्के, पार्वती फर्टिलायझर्स 33 टक्के असे हे प्रमाण आहे. मंत्री महोदय 5 टक्के सांगत आहेत परंतु हे सर्व कारखाने 5 टक्क्याच्या वर अप्रामाणिक आढळून आले आहेत. तसेच 25 टक्क्याच्या वर प्रामाणिक सापडले असून त्याच्यावर कोर्ट केसेस झालेल्या आहेत. म्हणून शासन या कारखान्यांचे परवाने रद्द करणार आहे काय ? शासनाने मेसर्स किनवटकर आणि धरतीधन फर्टिलायझर्स तसेच डेक्कनसंबधीचा या ठिकाणी उल्लेख आहे, त्यांना शासनातर्फे ताकीद देण्यात आली आहे, त्यांचे परवानगी का रद्द केले नाहीत ? अशा 288 केसेस कोर्टात दाखल झालेल्या आहेत, त्यांचे परवाने शासनाने रद्द करायला पाहिजेत. म्हणून ज्या कारखान्यांचे अप्रमाणितततेचे प्रमाण 5 टक्क्याच्या वर आढळून आले आहे त्या सर्व कारखान्यांचे परवाने शासन रद्द करणार काय ?

राणा जगजितसिंह पाटील : महोदय, सन 2001-02 पासून ऑक्टोबर, 2005 पर्यंत आपण जे नमूने काढले होते त्यांची तपासणी केल्यानंतर हा डिसीजन घेतलेला आहे. ज्या काही 10-12 लोकांवर कारवाया केल्या आहेत त्यांचा पाच वर्षांचा फरफॉर्मन्स कंसीडर करुन ही कारवाई केली आहे. एक वर्षाचा विचार यामध्ये केलेला नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, बोगस खतांचा पुरवठा हे कारखाने करणार असतील, कृषी केंद्रांच्या माध्यमातून अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक करणार असतील तर लाखो रुपयाचे

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

शेतकऱ्यांचे त्यामुळे नुकसान होते तरी देखील त्यावर शासन काहीच नियंत्रण ठेवणार नाही काय ? तसेच त्यांचे परवाने रद्द केले नाही तर शेतकरी अशाच प्रकारे नाडले जातील, फसविले जातील आणि शेतकऱ्यांचे उत्पादन परिणामी घटत जाते आणि शेतकऱ्याला आत्महत्या कराव्या लागतात. म्हणून वारंवार मी याबबत प्रश्न विचारतो की, ज्यांनी शासनाच नियमांचा भंग केला आहे आणि ज्या ज्या कारखान्यांच्या विरोधात कोर्टात केसेस दाखल झाल्या आहेत, त्यांचे परवाने शासन रद्द करणार नाही काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, यामध्ये एकूण 1486 नमूने काढण्यात आले होते. पुर्वीची परिस्थिती पाहिली तर यामध्ये ऑक्टोबर महिन्यात स्पेशल ड्राइव्ह घेण्यात आला आणि संपूर्ण राज्याचा हा ड्राइव्ह घेऊन असे नमूने काढण्यात आले. अगोदरपासून अशा प्रकारचा ड्राईव्ह घेण्यामागचे कारण म्हणजे यशस्वीपणे त्यातून सत्य बाहेर यावे म्हणून असा प्रयत्न करण्यात आला. सन्माननीय सदस्यांनी म्हटले ते खरे आहे की, अप्रमाणित व दर्जा नसलेले खत जास्त प्रमाणात शेतकऱ्यांना देण्यात येते, शेतकऱ्यांची त्यामुळे फसवणूक होते. उत्पादकतेवर त्याचा निश्चितच परिणाम होतो. हे लक्षात आल्यानंतर हा प्रश्न सोडविण्यासाठी पहिल्यांदाच आपण एवढया मोठया प्रमाणात ड्राईव्ह घेतला आणि त्यानुसार 573 नमूने असे अप्रमाणित आढळून आले हे करतांना संपूर्णपणे काळजी घेण्यात आली. कारण मिश्र खतांमध्ये दोन तीन खते एकत्रित असतात आणि त्यातील नमूने काढत असतांना ते सर्व तिन्ही खते एकजीव झालेले असतातच असे नाही म्हणून जास्तीत जास्त काळजी घ्यावी लागते, तशी ती घेतलेली आहे. काही कंपन्या या मिश्रखतांचे उत्पादन करीत असतील तर नेमकया त्याच कंपन्या दोषी आहेत हे कसे समजावयाचे यासाठी सन 2001 पासून 2005 पर्यंत सातत्याने अप्रमाणित आढळून येणाऱ्या कंपन्यांची माहिती घेण्यात आली व त्यांच्यावर कारवाई केली आहे आणि याच्या पुढे जाऊन अचानकपणे पुन्हा हा ड्राईव्ह सिझनमध्ये घेऊन त्यामध्येही या कंपन्या दोषी आहेत असे आढळून आले तर आपण निलंबित करण्याच्या दृष्टीनेही कारवाई करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात.....

यामध्ये सातत्याने लक्ष ठेवून कारवाई केली जात आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : यामध्ये 573 नमुने अप्रमाणित आढळून आलेले आहेत. यापैकी 288 नमुने कोर्ट केसेस पात्र ठरलेले आहेत, आणि 285 नमुने ताकीद पात्र आहेत. परंतु हे जे 288 नमुने आहेत त्यांच्यावर कोर्ट केसेस दाखल करण्यासंबंधीचा अभिप्राय आहे. डेक्कनचे 75 टक्के नमुने अप्रमाणित आहेत, त्यावेळेस तुम्ही डेक्कनला ताकीद दिली. परंतु त्यांचे लायसन्स रद्द केलेले नाहीत. कोर्ट कसेसच्या लायक ज्या केसेस आहेत त्यांचे परवाने रद्द केले पाहिजेत.

श्री. बाळासाहेब थोरात : निरनिराळया ठिकाणी जे नमुने घेतले त्याची ही आकडेवारी आहे. यामध्ये एक सूत्र ठेवले की सातत्याने कोणाची अप्रमाणित संख्या कमी आढळते, सातत्य कोणामध्ये आहे, कोणाचे डेप्युटेशन खराब आहे यासाठी हे सूत्र ठेवले होते. या सूत्रानुसार हे 10 जण आहेत. 63 मॅनिफॅक्चर मधून 10 जणांचे निलंबन केलेले आहे. आता योग्य वेळी पुन्हा एक लायूव्ह घेतला जाईल यापेक्षा कडक कारवाई केली जाईल याची मी ग्वाही देतो. 288 आकडा जरी असला तरी यामध्ये सातत्याने लक्ष ठेवून कारवाई केली जात आहे.

----

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पूर्णवेळ शिक्षकांना शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

**मु.शी.**: पूर्णवेळ शिक्षकांना शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार सुधारित व्रेतनश्रेणी लागू करणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उच्च माध्यमिक विभागात पूर्णवेळ शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाच्या 3 जून 2000 च्या शासन निर्णयानुसार 7225-225-11050 ची वेतनश्रेणी मान्य करण्यात आली असून अंमलबजावणी झाली आहे मात्र आदिवासी आश्रमशाळांमध्ये उच्च माध्यमिक शिक्षकांना 650-10500 ची वेतनश्रेणी सुरु ठेवणे, वारंवार विनंती करुन निवेदने देऊनही त्याची दखल न घेणे, सभागृहात विषय मांडून देखील आदिवासी विभागाने दुर्लक्ष करणे व सुधारित वेतनश्रेणी लागू न करणे, शिक्षकांचे आर्थिक नुकसान करणे अनुज्ञेय आर्थिक लाभापासून वंचित ठेवणे, याबाबत राज्यातील आश्रमशाळामधील उच्च माध्यमिकांच्या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विजयकुमार गावीत (आदिवासी विकास मंत्री ) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------------

......2



SGJ/ KGS/ RJW/ D/ MHM/ 15:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, आदिवासी आश्रमशाळांतील कनिष्ठ महाविद्यालयात पूर्ण वेळ काम करणारे जे शिक्षक आहेत त्यांच्या वेतनश्रेणीचा हा प्रश्न आहे. या वेतनश्रेणीच्या संदर्भात शालेय शिक्षण विभाग, किंवा ग्रामविकास विभाग, किंवा आदिवासी विकास विभाग असेल या सगळयांना एकच वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. पंरतु प्रत्येक विभागासाठी वेगवेगळा शासन निर्णय काढला जातो. प्रत्येक विभागाचा शासन निर्णय उशीराने निघत असल्यामुळे शिक्षकांना वेळेवर वेतनश्रेणी मिळत नाही. खरे म्हणजे शालेय विभागाने 3 जून, 2000 यासंदर्भातील निर्णय निर्गमित केलेला आहे. आम्ही सभागृहात मागणी केलयानंतर ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय 11 नोव्हेंबरला निघालेला आहे. प्रश्न आहे तो आदिवासी विभागातील कनिष्ठ महावद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांचा गेली 5 वर्षे त्याचा लाभ अन्य शिक्षकांना मिळतो. या शिक्षकांना तो मिळत नाही. ही फक्त 380 शिक्षकांनाच द्यावयाचा आहे यामुळे काही फार जास्त बोजा पडणार नाही. कारण 6500 च्या वेतनश्रेणीमधून हे शिक्षक ते 7225 च्या वेतनश्रेणीमध्ये जाणार आहेत. परंतु ते ऑलरेडी आता 7225 पर्यंत पोहचलेले आहेत. यामध्ये जास्त काही फरक पडणार नाही. 200 च्या एवजी 225 एवढाच फरक पडणार आहे. शासनाला हे मान्य आहेकी, हे आम्हाला द्यावे लागेल. आश्रमशाळेमध्ये काम करणा-या कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना ही जी 7225 ची वेतनश्रेणी शिक्षण विभागाने मंजूर केलेली आहे त्यासंदर्भातील जी.आर. आपण एक महिन्यात काढणार काय? यासाठी आपण असे म्हणणार आहात की, आर्थिक तरतूद नाही. पण 3 महिन्याच्या आत हा जी.आर. निघाल्यानंतर आर्थिक तरतूद करुन शालेय शिक्षण विभागाप्रमाणे सगळे फायदे प्रत्यक्ष रुपाने मिळतील काय?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयांना शालेय शिक्षण विभागाने जी वेतनश्रेणी लागू केलेली आहे त्या संदर्भातील प्रस्ताव आमच्याकडे 2000 मध्ये आल्यानंतर ही वेतनश्रेणी लागू करण्याच्या संदर्भात वित्त विभागाकडे प्रपोजल दिले होते. परंतु वित्त विभागाने सांगितले की, शालेय शिक्षण विभागाकडून त्यांचे अभिप्राय घ्यावे व त्याप्रमाणे सादर करावे. आमच्या विभागाने सर्व माहिती सादर केलेली आहे. त्यांनी ही सर्व माहिती ग्रामविकास

.....4

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावीत..........

विभागाकडे पाठविलेली आहे. अजूनसुध्दा ही फाईल आमच्याकडे आलेली नाही. त्यामुळे आम्ही एक दुसरी नस्ती तयार करुन वित्त विभागाकडे पाठविलेली आहे. ही वेतनश्रेणी लागू करण्याच्या संदर्भात आदिवासी विभागाने भूमिका स्वीकारलेली आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

वित्त विभागाकडून मंजुरी आल्यानंतर त्वरित वेतनश्रेणी देण्यासंबंधीचे आदेश आदिवासी विकास विभाग काढेल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदया, गेल्या 5 वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. वित्त विभाग जर आडकाठी करीत असेल तर आपण वित्त विभागाकडे पाठपुरावा करावा. शिक्षकांच्या हिताचा प्रश्न 5 वर्षापासून प्रलंबित आहे. आपण पाठपुरावा करून कोणत्याही परिस्थितीत एक महिन्याच्या आत जी.आर.निर्गमित करण्यात येणार आहे का ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, हे शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी जी.आर.निघेल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मूळातच या गोष्टीला 5 वर्ष उशीर झालेला आहे. एक महिन्याच्या आत शासनाला जी.आर.काढण्यात काहीच अडचण नसावी. शैक्षणिक वर्षाची मुदत घेतली तर अजून सहा महिने लागतील.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, वित्त विभागाकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव ताबडतोब काढण्यात येईल. सदर प्रस्ताव आमच्याकडे वित्त विभागाकडून आठ दिवसात आला तरी तो आम्ही लगेच काढू.

**तालिका सभापती** : अतिविलंब झालेला असल्यामुळे लवकरात लवकर जी.आर. काढणे आवश्यक आहे. त्यासाठी खात्याने पाठपुरावा करणेही अपेक्षित आहे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, आम्ही पाठपुरावा करीत आहोत. ग्रामविकास विभागाकडून अभिप्राय आलेले नाहीत. तरी सुध्दा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ग्रामविकास विभागाकडून अभिप्राय आलेले नसतानासुध्दा आम्ही फाईल वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठविली आहे.

श्री.व्हि.यू.डायगव्हाणे : सभापती महोदया, हा डिस्पॅरिटीचा प्रश्न आहे. आदिवासी विभागाकडूनच माध्यमिक शिक्षकांना केंद्राप्रमाणे पाचवा वेतन आयोग मिळतो. पण त्याच शाळेतील कनिष्ठ महाविद्यालयांना मिळत नाही. पुन्हा ही शाळा शासकीय आहे. 42000 कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना हा लाभ दिलेला आहे. तेव्हा एक महिन्यामध्ये जी.आर.काढायला काहीच हरकत नाही. शेवटी निर्णय आपल्यालाच घ्यावयाचा आहे. म्हणून शासन जास्तीतजास्त दोन महिन्यामध्ये निर्णय घेणार आहे काय ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, मी सांगितले की, वित्त विभागाकडे आमचा पाठपुरावा चालू आहे. प्रस्ताव मंजूर होऊन आठ दिवसात आला तर आठ दिवसामध्ये निर्णय घेण्यात येईल. आम्ही जवळजवळ सर्व प्रश्न सोडवत आलेलो आहोत. हा फक्त शेवटचा प्रश्न राहिलेला आहे. तो देखील ताबडतोब सोडवला जाईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, 2000 रोजी शालेय शिक्षण विभागाचा जी.आर.निघाला. पण चार वर्षे प्रस्ताव आला नाही. आता प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आहे असे मंत्रिमहोदय म्हणत आहेत. वित्त विभागाने चार वर्षे प्रस्ताव पाठविला नाही तर पुन्हा विलंब होणार नाही का ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, मी मंत्री झाल्यापासून सन्माननीय सदस्यांचे जेवढे म्हणून प्रश्न होते ते मी सोडविले आहेत. आता फक्त शेवटचा प्रश्न शिल्लक राहिलेला आहे. तो देखील सोडवून देईन.

....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : स्पेलिंग मिस्टेक करून धनगर समाजास अनुसूचित जमातीच्या सवलतींपासून वंचित ठेवणे.

मु.शी. : स्पेलिंग मिस्टेक करून धनगर समाजास अनुसूचित जमातीच्या सवलतींपासून वंचित ठेवणे यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, डॉ.अशोक मोडक,वि.प.स. यां-ी दिलेली लज्ञवेधी सूच-ाा

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेद्वारा निर्वाचित ) : अध्यज्ञ महोदय, मी -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि्ज महत्वाच्या बाबीज्डे आपल्या अ-ुमती-े स-मा-ा-ीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लज्ञ वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा ज्रावे. अशी वि-ंती ज्रतो.

"महाराष्ट्रातील धनगर समाजाचा अनुसूचित जमाती मध्ये समावेश असूनही केवळ "ए" ऐवजी चुकीची "ड" अशी स्पेलिंग मिस्टेक करुन या समाजास अनुसूचित जमाती च्या सवलतीपासून वंचित करुन ठेवणे, बिहार, ओरिसा आणि झारखंड या राज्यातील धनगर जात औरॉन असल्याने त्यांना अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याबाबत भारत सरकारने जानेवारी २००२ मध्ये कायद्यात तशी तरतूदही करणे, तरी सुध्दा महाराष्ट्र शासन केंद्र सरकारकडे "ड" ऐवजी "र" ही स्पेलिंग दुरुस्ती करण्याचे टाळणे, धनगर जातीचा तिस-या सूचीत समावेश करण्यात यावा असा निर्णय मंत्रिमंडळाने दिनांक १८ ऑगस्ट २००४ रोजी दिलेला आहे. याबाबत शासन कार्यवाही न होणे, यामुळे धनगर समाजामध्ये पसरला असंतोष व शासनाने त्यावर करावयाची कार्यवाही."

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकासमंत्री) : अध्यज्ञ महाराज, लज्ञवेधी सूच-ेसबंधीच्या -िवेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ाा आधीच वितरीत ज्ेल्या असल्यामुळे मी ते -िवेद-ा आपल्या अ-ुमती-े सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**तालिका सभापती** : -िवेद-ा सभागृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

-िवेद-ा
( प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, महाराष्ट्रातील धनगर समाजाला अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करण्याची शिफारस करावी असा या लक्षवेधीचा विषय आहे. हा विषय प्रत्येक अधिवेशनामध्ये मी सभागृहामध्ये मांडलेला आहे. पण प्रत्येकवेळी सरकारने थातुरमातूर उत्तर देऊन हा विषय टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी आपल्याला याची थोडक्यात पार्श्वभूमी सांगतो. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने मागासवर्गीयांसाठी पहिल्यांदा कालेलकर कमिशन नेमले. या कमिशनने धनगर समाजाच्या चालीरितीसह सर्व संस्कृतीचा अभ्यास केला. धनगर समाज हा पोटापाण्यासाठी दऱ्याखोऱ्यात भटकणारा आहे. यावर अभ्यास करून त्यांनी असा अहवाल दिला की, धनगर समाज हा महाराष्ट्रातील मोस्ट बॅकवर्ड क्लास आहे. त्यानंतर मग महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींची यादी प्रसिध्द झाली. या यादीमध्ये 36 नंबरवर 'ओरॉन' असे नाव लिहिले गेले. त्याच्यापुढे स्वल्पविराम दिला आणि लिहिले की, 'धनगड'. आम्ही विचारले की, धनगड कसे काय लिहिले गेले. आम्हाला कालेकर कमिशनने बॅकवर्ड म्हणून जाहीर केले आणि तुम्ही 'औरान' कसे काय लिहिता ? पण त्यासंबंधी काहीच उत्तर दिले नाही. त्यामुळे या समाजाला एस.टी.सवलती मिळत नाही. गेल्या 50 वर्षात कालेलकर समितीने जाहीर करून देखील या समाजावर प्रचंड अन्याय झाला. म्हणून आम्ही हा ओरॉन शब्द कुठे आहे याचा शोध घेतला.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे.....

"ओरान" हा शब्द आम्हाला बिहार, झारखंड आणि ओरिसा या राज्यांत सापडला. तेथील "धनगर" समाजाला "ओरान" म्हणतात. तरी सुध्दा महाराष्ट्राच्या यादीमध्ये जाणून बुजून "ओरान" शब्द टाकला गेला. "धनगड" शब्द कसा आला याचा आम्ही शोध घेतला. "विधानपरिषदेसभेचा सुवर्ण महोत्सव" अशी एक बाहेर पाटी लावलेली आहे. त्याचे उद्घाटन लोकसभेचे सभापती बलराम जाखर यांच्या हस्ते झाले. मला जाणून घ्यावयाचे आहे की, हा "र" चा "ड" झाला कसा ? आपण त्या पाटीवर "बलराम जाखर" लिहिले आहे. पण हिंदीमध्ये जी पाटी लिहिली जाते त्यावेळी "बलराम जाखड" असे लिहिले जाते. ज्या शब्दामध्ये शेवटचा शब्द "र" असतो त्या ठिकाणी तो "ड" लिहिला जातो असे हिंदी भाषा शास्त्र आहे. त्यामुळे "धनगर" शब्द हिंदीमध्ये "धनगड" असा लिहिला गेला आणि तोच शब्द महाराष्ट्राच्या यादीमध्ये छापून आला आणि आमच्या समाजावर गेली 50 वर्षे अन्याय झालेला आहे. ही पार्श्वभूमी आहे. "ओरान" म्हणजे "धनगर" हे बिहार, झारखंड आणि ओरिसा या राज्यांनी मान्य केले आहे आणि "धनगड" म्हणेज "धनगर" अशाप्रकारेच जी.आर.इश्यु केले. केंद्र सरकारने सुध्दा हे मान्य केलेले आहे. तेव्हा या तीन राज्यांनी धनगर समाजाला न्याय दिला, जी चूक होती ती दुरुस्ती केली. आपण अशाप्रकारे महाराष्ट्रातील धनगर समाजाला "धनगड" ऐवजी "धनगर" आणि "ओरान" म्हणजे "धनगर" अशी शिफारस करुन अनुसूचित जमातीला मिळणाऱ्या सवलती धनगर समाजाल देण्यात याव्यात अशी शिफारस करुन या समाजाला न्याय देणार आहात काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, 1979 साली राज्य सरकारने धनगर जातीचा समावेश अनुसूचित जमातीत करावा अशापध्दतीची शिफारस केंद्र सरकारकडे केली होती. तेव्ह केंद्र सरकारने कोणती जात आणि कोणत्या जमातीमध्ये टाकावयाची याबाबत निकष ठरवून दिलेले आहेत. या ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे बसत असेल वा साम्य होत असेल तर त्याप्रमाणे बदल करावा अशाप्रकारचे निर्देश दिले. कोणत्या जातीचा समावेश कोणत्या जमातीमध्ये असावा याबाबत नियम ठरवून दिलेले आहेत. याबाबत ट्रायबल रिसर्च इन्स्टीटयुट अभ्यास करते. मंत्रिमंडळाची कमिटी आहे. तसेच जनजाती सल्लागार समिती आहे. अशा वेगवेगळ्या टप्प्यावर आपण मान्यता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित........

घेत असतो. याबाबत टी.आर.आय.ने सर्व्हे केला आणि "धनगड" किंवा "ओरान" या जमातीपासून "धनगर" वेगळा आहे त्यामुळे धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करता येणार नाही असा रिपोर्ट दिलेला आहे. दुसरा मुद्दा असा की, एका राज्यामध्ये धनगर समाजाची नोंद आदिवासी आहे म्हणून दुसऱ्या राज्यामध्ये सुध्दा तशी नोंद असली पाहिजे असे नाही. सर्वसाधारपणे त्या समाजाची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक या सर्व गोष्टींचा अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास करुन जर साम्य होत असेल तर त्याप्रमाणे आपण समावेश करु शकतो. परंतु यामध्ये साम्य दिसून येत नाही. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, एका राज्यामध्ये धनगर समाज एस.सी.मध्ये आहे, तर तो दुसऱ्या राज्यामध्ये तो एस.टी.मध्ये आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तशी शिफारस आपल्याला करता येणार नाही.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एका राज्यातील निकष दुसऱ्या राज्यात लागू होऊ शकत नाही असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. मला असे सांगावयाचे आहे की, कालेलकर बॅकवर्ड कमिनशनने जो सर्व्हे केला तो चुकीचा आहे असे मंत्रिमहोदयांना म्हणावयाचे आहे काय ? धनगर समाज हा इकॉनॉमिकली बॅकवर्ड आहे असा रिपोर्ट 1950 साला कालेलकर कमिशनने दिलेला आहे. आपण मघाशी 1979 सालचा उल्लेख केला, परंतु मधली 30 वर्षे कुठे गेली ? या 30 वर्षात आपण जो अन्याय केला त्याचा जाब कोण देणार ? 1950 साली जी यादी आली ती कालेलकर कमिनशच्या बेसिसवर आलेली आहे. त्याचवेळी आपण धनगर समाजाला सवलत द्यावयास पाहिजे होती. आपण 1979 मध्ये धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करावा अशी शिफारस करता आणि 1981 मध्ये धनगर जातीचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करता येणार नाही असे सांगता आपण दोन वर्षात एका जमातीचे निकष कसे बदलता ? याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

यानंतर श्री.बोडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, जाती किंवा जमातींचा कशामध्ये समावेश करावयाचा हे सर्व्हे केल्यानंतर ठरले जाते. अशाप्रकारची....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दिनांक 9 रोजी केंद्र सरकारच्या नियोजन विभागाचे सचिव श्री.गंगाधरन यांच्याकडून एक पत्र राज्य सरकारला आले आहे. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "Govt. of India, Ministry of Planning Dept. of National Survey Organisation." हे अधिकृत पत्र आहे. त्यांनी कोकणे नावाच्या उप सचिवांना लिहीले आहे की "In this connection it ;may be state that "Dhangad" including "Dhangar" and Oran already covered in this tribal survey..."परंतु महाराष्ट्रात मात्र तुम्ही ते मान्य करीत नाहीत. त्या ठिकाणच्या लोकांना धनगर समजता. महाराष्ट्राची जी यादी प्रसिध्द केली त्यामध्ये या धनगर जातीचा क्रमांक 36 वर दर्शविलेला आहे. म्हणजे "धनगर" ऐवजी "धनगड" असा उल्लेख झाला हे आपण मान्य करीत आहात.

डॉ.विजयकुमार गावित : धनगर आणि धनगड या दोन्हीही जातीचा उल्लेख यादीमध्ये आहे. परंतु आपण जे म्हणत आहात ते यादीमध्ये समाविष्ट केले नाही.

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदय, सन्माननीय सदस्यांनी जे पत्र वाचले त्यासंदर्भात आपण स्पष्टीकरण करावे.

डॉ.विजयकुमार गावित : केंद्र सरकारने 2002 साली बिहार आणि ओरिसा या राज्यांमध्ये दुरुस्ती केलेली आहे. इतर राज्यांसाठी ती दुरुस्ती केलेली नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, हे पत्र दिनांक 6 सप्टेंबर, 1989 रोजीचे आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा उल्लेख आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी "tribal survey of 44 NS in Maharashtra State" हे जे सांगितले ते योग्य आहे.

डॉ.विजयकुमार गावित : ट्रायबल संदर्भात जो सर्वे झाला तो महाराष्ट्राला बंधनकारक नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदया, सेंट्रल गव्हर्नमंट ऑफ इंडियाने याबाबत पत्र दिलेले आहे. परंतु त्यांनी कळविल्यावरही या राज्यातील धनगर समाजाला सवलती मिळू नयेत म्हणून शासनामार्फत निरनिराळया समित्या नेमल्या जातात आणि हा प्रश्न रखडत ठेवला जातो. गेली 50





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

वर्षे या समाजावर अन्याय झाला आहे. जर ट्रायबलच्या सवलती धनगर समाजाला मिळाल्या तर तुमची त्यामध्ये काय अडचण आहे ? त्यामुळे धनगर समाजाला न्याय देण्यासाठी, त्यांचा यादीमध्ये समावेश करण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारला शिफारस करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदया, सामाजिकदृष्टया, आर्थिकदृष्टया ते ट्रायबलमध्ये बसत नसल्यामुळे केंद्र शासनाला तशी शिफारस करता येणार नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, पेशवाईच्या काळामध्ये जसा "ध" चा "मा" झाला होता, तसाच प्रकार "र" आणि "ड" च्या बाबतीत झालेला आहे. आपण मला सांगा की, या राज्यात "धनगड" समाज आहे काय ? असेल तर त्याची संख्या किती आहे ? ज्या समाजाचा धनगड जाती/जमातीमध्ये समावेश करण्यात आला त्यांना किती सवलती देण्यात आल्या ? जर दिल्या नसतील तर "र" आणि "ड" चा फरक दाखवून, धनगर समाजासंदर्भात कालेलकर समितीने जो अहवाल दिला आहे त्यानुसार धनगरांचा समावेश जमातीमध्ये करुन त्यांना सवलती देणार काय ?

डॉ.विजयकुमार गावित : महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेश यांचे जेव्हा संयुक्त राज्य होते त्यावेळी बऱ्याच सब कास्ट होत्या. परंतु कालांतराने आपले स्वतंत्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर केंद्र सरकारच्या यादीतील सब कास्ट महाराष्ट्रात नाहीत. गडचिरोली जिल्हयाचा 1971 साली सर्वे झाला, त्यावेळी गडचिरोली तालुक्यात धनगड जातीचे एकच कुटुंब होते.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

या बाबतीत सर्व्हे करण्यात आला होता. त्यानंतर मंडल आयोग स्थापन करण्यात आले होते.मंडल आयोग स्थापन करण्यात आल्यानंतर केन्द्र सरकारने मंडल आयोगामध्ये या समाजाला ओ.बी.सी.मध्ये टाकलेले आहे. कालेलकर समितीने आणि मंडल आयोगाने त्या समाजाचा समावेश ओ.बी.सी.मध्ये केलेला आहे. आपल्या राज्यामध्ये त्यांना व्ही.जे.एन.टी. (क) मध्ये टाकलेले आहे.त्यामुळे त्यांना पुन्हा जर अनुसूचित जमातीमध्ये टाकावयाचे असेल तर त्याबाबतीत आम्ही सर्व्हे करीत असतो आणि अनुसूचित जमातीमध्ये एखाद्या समाजाला टाकण्याची जी काही कार्यपध्दती आहे त्यामध्ये ते बसत नसल्यामुळे त्यांना अनुसूचित जमातीमध्ये टाकता येत नाही.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)**: एखाद्या समाजाला अनुसूचित जमातीमध्ये टाकण्याच्या संदर्भात जी काही कार्यपध्दती आहे ती कार्यपध्दती अवलंबिविण्याच्या बाबतीत आपण सहानुभूतीपूर्वक विचार करणार आहात काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, जी काही कार्यपध्दती ठरविलेली आहे त्यानुसार या संबंधीचा सर्व्हे या पूर्वी झालेला आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : शासन पुन्हा सर्व्हे करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : त्या समाजाची जी संस्कृती आहे त्यामध्ये बदल होऊ शकणार नाही.त्यामुळे पुन्हा सर्व्हे करता येणार नाही.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

एक सन्माननीय सदस्य : ज्या उपजाती या राज्यामध्ये नाहीत त्यांना वगळण्यात येणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : अशा प्रकारे ज्या उपजाती या राज्यामध्ये नाहीत त्या जातींना वगळण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया ,शासनाची ही भूमिका बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी केन्द्र सरकारचे पत्र मघाशी वाचून दाखविले आहे.त्यामध्ये 44 प्रमाणे " धनगड आणि ओरान "या जातीचा समावेश होतो .शासन जी भूमिका घेत आहे त्यामुळे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

एका समाजाला सवलती पासून वंचित ठेवण्यात येत आहे व ही भूमिका बरोबर नाही.कालेलकर समितीचा येथे उल्लेख करण्यात आला आहे. कदाचित त्यानंतर 50 समित्या नेमल्या जातील. परंतु जी पहिली समिती नेमण्यात आली होती ती चुकीची होती काय ?मागे काय झाले या बाबत मला काही म्हणावयाचे नाही .परंतु येथून पुढच्या काळात इतर राज्यामधील रिपोर्टस काय आहेत ते बोलविण्यात यावेत आणि इतर राज्याच्या रिपोर्टस्‌चा अभ्यास करुन धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावा अशा प्रकारची शिफारस करण्याबाबत शासन सहानुभूतीने विचार करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित :इतर राज्याकडूनसुध्दा रिपोर्टस मागविण्यात आले होते. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तरांचल या राज्यामध्ये या समाजाचा समावेश एस.सी.मध्ये करण्यात आला आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)**: या संदर्भात शासन पुनर्विचार करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : याबाबतीत सर्व्हे झालेला आहे तेव्हा त्याचा पुनर्विचार करण्याची गरज नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदया, शासनाने पुनर्विचार करावा असा आमचा आग्रह आहे . एका समाजावर अन्याय होत आहे.त्या अन्यायाच्या संदर्भात या विधी मंडळाच्या माध्यमातून जर दाद मागितली जात असेल व सरकारची भूमिका जर न्याय देण्याची नसेल तर धनगर समाजाला सवलती पासून वंचित करणा-या शासनाचा आम्ही निषेध करतो आणि सभात्याग करतो.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात )

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदया, अशा प्रकारे कोणीही कशाही प्रकारचा दबाव आणून एक मागासलेल्या समाजाचा हिस्सा हिसकावून घेण्याचा जो प्रयत्न केला जात आहे तो बरोबर नाही. या बाबतीत अनेकदा सर्व्हे झाला आहे. केन्द्र सरकारने मंडल आयोगामध्ये या समाजाला ओ.बी.सी.मध्ये टाकलेले असतांना आणि वेगवेगळया राज्यामध्ये वेगवेगळया प्रकारे त्यांचा समावेश झालेला असतांना आणि या बाबतीत दोन तीन कमिटया नेमल्या असतांना अशा प्रकारे सवलती मागणे हे उचित नाही हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

------

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.:शासनाने विदर्भास दिलेला अत्यल्प मत्स्यविकास निधी

मु.शी :शासनाने विदर्भास दिलेला अत्यल्प मत्स्यविकास निधी या संबधी सर्वश्री सागर मेघे,नितीन गडकरी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सागर मेघे ( नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) :सभापती महोदया, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्य शासनाने मत्स्यविकास निधी वाटपात विदर्भाला अत्यल्प निधी दिल्याचे माहे ऑक्टोबर,2005 मध्ये उघडकीस येणे, अमरावती व गडचिरोली जिल्हयात मत्स्य बीज केन्द्र नसणे, शासनाने विदर्भातील मत्स्य व्यवसायाकडे दुर्लक्षामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध न होणे, शासकीय योजनांपाठोपाठ मत्स्य विभागातील सर्वाधिक निधी देखील पश्चिम महाराष्ट्राला देऊन शासनाने विदर्भाची उपेक्षा करणे, राज्य व केन्द्र पुरस्कृत योजनांसाठी एकूण 43 कोटी 10 लक्ष रुपयांच्या मत्स्यविकास निधी पैकी विदर्भातील बुलढाणा 6 लक्ष, वाशिम 6 लक्ष,अमरावती 6 लक्ष,यवतमाळ 5 लक्ष, नागपूर 4 लक्ष,वर्धा 3 लक्ष, भंडारा 1 लक्ष, गोदिंया 3 लक्ष,चन्द्रपूर 2 लक्ष,अकोला 11 लक्ष याप्रमाणे अगदीच अत्यल्प निधी देणे, विदर्भाबाबत शासन उदासीन असणे, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया "

श्री.हसन मुश्रीफ ( मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) :सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

4..



- निवेदना नंतर -

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे : सभापती महोदया,शासनाचे विदर्भातील मत्स्यव्यवसायाकडे लक्ष नसल्यामुळे येथील तरुणांना रोजगाराची संधी मिळत नाही.राज्यात 3 लाख 30 हजार हेक्टर क्षेत्रात गोडया पाण्यावर मासेमारी होते. तसेच 720 कि.मीच्या खा-या पाण्यावर मासेमारीचा व्यवसाय केला जातो व त्यातून 415 कोटी 2 लाख 40 हजार मत्स्य बीजाचे वार्षिक उत्पन्न होते.शासनाला अधिक उत्पन्न मिळावे, रोजगार मिळावा तसेच उणिवा दूर करण्यासाठी मत्स्य बीजांचा वार्षिक कार्यक्रम जाहीर केला जातो.मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की 2005-2006 या वर्षातील उर्वरित रक्कम  विदर्भासाठी देण्याचे ठरविण्यात आले होते ती रक्कम किती दिवसात देण्यात येणार आहे ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MHM/ श्री.गायकवाड नंतर --- 15:25

श्री. सागर मेघे ...

तसेच गडचिरोली जिल्ह्यातील वडसा, ता. देसाईगंज येथील मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम प्रस्तावित केल्या प्रमाणे जमिनीची हस्तांतरणाची प्रक्रिया किती कालावधीत पूर्ण होईल व हे मत्स्यबीज केंद्र केव्हा सुरू होणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, एकंदर 43 कोटी 10 लाख 82 हजार इतका नियत व्यय आपण यासाठी मंजूर केलेला आहे आणि त्यापैकी 40 कोटी 38 लाख, 10 हजार हे राज्यातील सागरी किनाऱ्यासाठी दिलेले आहेत आणि राहिलेले पैसे गोड्या पाण्यामधील मच्छिमारीसाठी म्हणून दिलेले आहेत त्यापैकी 1 कोटी 51 लाख रूपयांवर विदर्भासाठी दिलेले आहेत पैकी केवळ 59 लाख राहिलेल्या 19 जिल्ह्यांमध्ये दिलेले आहेत. म्हणजे विदर्भाचा अनुशेष दूर व्हावा म्हणून आम्ही किती मनापासून प्रयत्न करीत आहोत हे आपल्या लक्षात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, माननीय राज्यमंत्र्यांनी काहीही बोलायचे आणि आम्ही ऐकून घ्यायचे असे होऊ शकत नाही. मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आमच्याकडे मोठ्या संख्येने तलाव आहेत, नद्या आहेत. आपल्या पश्चिम महाराष्ट्रातील पुणे वगैरे भागामध्ये तसे काहीच नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, जे सागरी किनारा असलेले 6 जिल्हे आहेत त्यांना आपण 40 कोटी रूपये दिलेले आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आमच्या पुणे जिल्ह्यात जेवढी धरणे आहेत तितकी महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही जिल्ह्यात असणार नाहीत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांच्या एका प्रश्नाचे उत्तर मला अजून द्यावयाचे आहे. गडचिरोली जिल्ह्यातील वडसा, तालुका देसाईगंज येथील मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम प्रस्तावित असून त्यासाठी 6 एकर जमिनीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे आणि या जिल्ह्यामध्ये 30 लाख मत्स्यबीजांचे उद्दिष्ट आहे व ते लौकरात लौकर पूर्ण आपण करणार आहोत. मला येथे हेही सांगितले पाहिजे की, आता आपण राज्यामध्ये मत्स्यबीजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहोत. यापूर्वी आपण पश्चिम बंगालमधून मत्स्यबीजे आयात करीत होतो. पण आता आपल्याकडेच आपण 40 कोटी मत्स्यबीजे तयार करीत आहोत.

..... 3जी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, शासनाने आपल्या मालकीची किती मत्स्यबीज केंद्रे खाजगी कंपन्यांना चालविण्यासाठी दिली आहेत आणि राहिलेली केंद्रे बीओटी तत्त्वावर देणार आहे का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत मला माहिती नाही. पण मी ती माहिती पटलावर ठेवीन. केंद्रे खाजगीतून चालविण्यास देण्याबद्दल जे विचारले आहे त्याबाबत माझ्या दालनात त्यांना मी माहिती देईन.

श्री. सागर मेघे : सभापती महोदया, या बजेटमध्ये आपण 43 कोटी पैकी केवळ दीड कोटी विदर्भासाठी दिलेले आहेत. तेव्हा पुढील बजेटमध्ये विदर्भावर या संदर्भात अन्याय होणार नाही अशी मी अपेक्षा करतो.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, अनुशेष दूर करण्यासाठी जे जे म्हणून करावे लागेल ते आम्ही जरूर करू.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आता माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, कोकणच्या सहा जिल्ह्यांसाठी 40 कोटी रूपये दिलेले आहेत. पण आज या संदर्भात सरकारची ॲक्वा कल्चरची योजना आहे आणि त्यासाठी ज्या जमिनी आहेत त्या ठिकाणी ॲक्वा कल्चर विकसित करावयाचे आणि त्यासाठी जास्तीत जासत शासकीय उत्तेजन द्यायचे. पण हे ॲक्वा कल्चरचे बीजे आहेत ती सुद्धा या राज्यामध्ये उपलब्ध होत नाहीत. ती तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश मधून आणावी लागतात. इतकेच नाही तर त्यासाठीचे खाद्य देखील आपल्याकडे होत नाही व ते कोरियामधून आणावे लागते. तेव्हा या ॲक्वा कल्चरचे खाद्य आणि बीजे तयार करण्यासाठी काही कार्यक्रम आपण राबविणार आहात काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. आता ही जी खार जमीन आहे ती तेथील सुशिक्षित बेकारांना ॲक्वा कल्चरसाठी म्हणजे झिंगे उत्पादनासाठी म्हणून देतो आणि तो प्रयोग आपल्याकडे सफल झालेला आहे. मध्यंतरी केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार यांनी एका बैठकीमध्ये आम्हाला सांगितले आहे की, या झिंगा उत्पादनासाठी, ॲक्वा कल्चरसाठी केंद्र सरकार मदत करणार आहे आणि त्यासाठी जागा देखील दिलेली आहे. तेव्हा आता आपण त्यादृष्टीने बीजे तयार करीत आहोत. ..

( यानंतर श्री. सरफरे ...3एच 1

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, 720 कि.मी. च्या असलेल्या समुद्र किनाऱ्यासाठी 40 कोटी रुपये पूरे होतात काय? हा मत्स्य शेंतीचा व्यवसाय ज्यांचा मच्छिमारीचा व्यवसाय नाही अशा लोकांना देण्यात आला आहे. त्यामुळे यामध्ये गैरप्रकार होत आहेत. तेव्हा जे बिगर मच्छिमार आहेत त्यांना मत्स्य शेतीसाठी जमीन दिली आहे त्याची आपण चौकशी करणार काय? व संबंधितांवर कारवाई करणार काय? सभापती महोदया, हा प्रश्न वेगळा असला तरी महत्वाचा आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खास करुन किनारपट्टीवर मत्स्य शाळा आहेत त्याठिकाणी शिक्षक नाहीत. याठिकाणी ही जी पशु मत्स्य युनिव्हर्सिटी आहे त्या ठिकाणी व्हेटर्नरी युनिव्हर्सिटी म्हणून मान्यता मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी त्यांच्याकडे नसल्यामुळे त्यांची मान्यता रद्द होण्याची वेळ आली आहे. त्याबाबत आपण विचार करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, जे लोक हा परंपरागत व्यवसाय करीत आहेत त्यांना मत्स्य शेतीसाठी जमीन न देता ती इतरांना दिली जात आहे असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. या व्यवसायामध्ये परंपरागत व्यवसाय करणारे लोक पुढे आले तर इतरांना जमीन मिळणार नाही. तरीसुध्दा प्राधान्याने परंपरागत व्यवसाय करणाऱ्या लोकांना जमीन दिली जाईल. दुसरा प्रश्न माननीय सदस्यांनी वेगळया पध्दतीने विचारावा. किंवा पुढील अधिवेशनामध्ये या संपूर्ण व्यवसायासंबंधी अर्धा तास चर्चा उपस्थित करावी अशी माझी सूचना आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: डब्लू.एच.ओ.जी.एम.पी. प्रमाणपत्र बंधनकारक केल्यामुळे औषध निर्मिती करणारे लघु उद्योग बंद पडणे.

**मु.शी.**: डब्लू.एच.ओ.जी.एम.पी. प्रमाणपत्र बंधनकारक केल्यामुळे औषध निर्मिती करणारे लघु उद्योग बंद पडणे यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"देशातील मोठया मल्टीनॅशनल औषध कंपन्याच्या हित रक्षणासाठी शासनाने शासकीय रुग्णालयातील औषध खरेदीसाठी डब्लू. एच. ओ. जी. एम. पी. सर्टिफिकेट (प्रमाणपत्र) बंधनकारक केल्यामुळे राज्यातील औषध निर्मिती करणा-या लघु उद्योगावर झालेला विपरीत परिणाम, त्यामुळे इतर सदर कंपन्या बंद पडून बेराजगारीची समस्या उद्‌भवणारी समस्या, शक्यता, आज राज्यामध्ये औषध निर्मित करणा-या लघु उद्योगांच्या भरवशावर हजारो कामगार उदरनिर्वाह चालवित असणे, शासनाच्या मल्टीनॅशनल कंपन्याकडे बघण्याचा दृष्टीकोन संशयास्पद व मेहरनजर ठेवणा असल्यामुळे लहान उद्योगावर हेतुपुरस्सररित्या केला जाणारा अन्याय, अन्याय दूर करण्याची नितांत आवश्यकता, राज्यातील डब्ल्यू. एच. ओ. जी. एम.पी. प्रमाणपत्राची अट रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही शासनाची प्रतिक्रिया.

श्री. दिलीप वळसे पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना वितरीत केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, माझ्या लक्षात येत नाही की, मल्टि नॅशनल कंपनीला पाठींबा द्यायचा आणि राज्यातील लघु उद्योगामध्ये सुरु असलेल्या औषध कंपन्या बंद पाडायच्या. हे नवीन प्रेम सरकारमध्ये कसे निर्माण झाले? औषध खरेदी करीत असतांना महाराष्ट्र सरकारने डब्लू.एच.ओ.जी.एम.पी. अनिवार्य केले आहे. म्हणजे डब्लू.एच.ओ.जी.एम.पी. ची अट असणाऱ्या संस्था महाराष्ट्रात 9 ते 10 औषधांचा पुरवठा करु शकतात. ती औषधे स्टँडर्ड आहेत. आणि मग महाराष्ट्रातील गोरगरीब लोक महाराष्ट्र फूड अँड ड्रग्ज ॲक्टप्रमाणे ही औषधे बाहेरुन विकत घेतात. ती अप टु दी मार्क नाहीत कां? अप टु दी स्टँडर्डप्रमाणे नाहीत कां? ही औषधे महाराष्ट्रात चालू शकतात तर शासकाला हे खरेदी करतांना डब्लू.एच.ओ.जी.एम.पी. ची गरज कां वाटली? माझी अशी माहिती आहे की, मल्टि नॅशनल कंपन्या मोजक्या आहेत आणि त्यांचे रेट जास्त आहेत. यामुळे महाराष्ट्र सरकारवर आर्थिक भुर्दंड पडत आहे. म्हणून त्यांना फेव्हर करण्यासाठी टेंडरमध्ये अट टाकली आहे. या संबंधी सुप्रिम कोर्टाने उत्तराखंडचा निर्णय दिला ते जज्जमेंट माझ्याकडे आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो. "For the reasons stated above the writ petition is allowed and the condition No.2 mentioned in the government order dated 13-9-2001 and condition No.6 of the tender form are quashed. No order as to costs." उत्तराखंडचा निर्णय घेतल्याबरोबर सुप्रिम कोर्टाने त्यांची अट काढून टाकली. माझ्याकडे केंद्र सरकारचे ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया श्री. अश्विनीकुमार यांचे पत्र आहे. त्यांनी लिहिले आहे की,"not to entertain the request of issuing WHO-GMP certificate by the manufacturer of pharmaceutical product to supply in India. The High Court also issued directions on the same line and accordingly the purchase department should refrain from insisting WHO-GMP certificate."असे केंद्र सरकारने म्हटले आहे, सुप्रिम कोर्टाने म्हटले आहे. अशावेळी आपल्याला मल्टि नॅशनल कंपनीबद्दल प्रेम ऊफाळून आले . हे प्रेम ऊफाळून आले आहे तर मग महाराष्ट्राचे फूड ड्रग्ज डिपार्टमेंट आपण बंद करा, त्याला सील लावा आणि महाराष्ट्रामध्ये डब्लू.एच.ओ.जी.एम.पी. ची औषधे वापरायला सांगा. अशाप्रकारचे अन्यायकारक धोरण कां राबविता. ती अट आपण रद्द करणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आपण सर्वजण सर्वच क्षेत्रात एका वेळेला गुणवत्तेचा आग्रह धरीत असताना दिसतो. राज्य सरकारच्या हॉस्पीटल्स्साठी आपण जी औषधे खरेदी करतो, ती खरेदी करीत असताना जेव्हा 2003 मध्ये हे टेंडर काढले, तेव्हा राज्य शासनाने टेंडरमध्ये जाणीवपूर्वक डब्ल्यु,एच.ओ.जी.एम.पी. ही अट घालण्याचा निर्णय घेतला. मी सुरुवातीलाच सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांना आणि सभागृहाला एक गोष्ट सांगू इच्छितो की, आजच्या तारखेला मेडिकल एज्युकेशन डिपार्टमेंटकडे ज्या कंपन्यांनी औषध पुरवठयासाठी रजिस्ट्रेशन केलेले आहे, त्यामध्ये एस.एस.आय.युनिटस् 101 आहेत आणि मल्टीनॅशनल कंपन्या 8 आहेत आणि 101 एस.एस.आय.युनिटपैकी 47 युनिटस् डब्ल्यु.एच.ओ.जी.एम.पी.ची अट पूर्ण करणारी आहेत. त्यामुळे कोणत्या तरी दोन-चार कंपन्यांना फेवर करण्यासाठी डब्ल्युएचओजीएनपी ची अट यामध्ये समाविष्ट करण्यात आली या सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य नाही. या देशातील 47 युनिटस्, एस.एस.आय.युनिटस्, ही ज्यावेळेला डब्ल्यु.एच.ओ.जी.एम.पी.च्या अटी पूर्ण करतात. त्यावेळेला विशिष्ट कंपनीला फेवर करण्याचा यामध्ये प्रश्न उद्भवत नाही. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने ज्यावेळेला गुड मॅन्युफॅक्चरींग प्रॅक्टीसेसच्या बाबतीत काही निर्णय घेतले आणि त्याआधी भारत शासनाच्या औषध प्रशासनाने शेडयुल-एम जाहीर केले आहे. त्या शेडयुलच्या अंतर्गत एका बाजूला औषधांची खरेदी केली जाते किंवा बाजारामध्ये औषधे उपलब्ध होतात आणि वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या या जी.एम.पी. अंतर्गत जे स्टॅण्डर्ड नॉर्म्स् ठरविले आहेत, त्यानुसार विशिष्ट पध्दत वापरुन औषधांचा दर्जा कायम ठेवण्यासाठी हा आग्रह धरलेला आहे. एका बाजूला आपल्या सरकारी रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांना जी औषधे द्यावयाची आहेत, ती जास्त दर्जेदार असली पाहिजे अशा प्रकारचा आग्रह . . . . (सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी खाली बसून बोलतात)

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील जे नियंत्रण आहे. यासंदर्भात केंद्र शासनाचे काही कायदे आहेत, राज्य शासनाचा कायदे आहे.

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : केंद्र शासनाने कायदा रद्द केला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाने कायदा रद्द केलेला नाही. एका बाजूला आपण सर्वजण ग्लोबल वर्ल्डशी कॉम्पीटीशन करण्याची भाषा करीत आहोत. तसेच शिक्षणाच्या क्षेत्रात आणि अन्य क्षेत्रात स्टॅण्डडरायझेशन भाषा करतो, तेव्हा वर्ल्ड हेल्थ -----

. . . .3 आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

ऑर्गनायझेशनने स्टॅण्डर्ड प्रॅक्टीससाठी नियम केले असतील आणि ते उत्कृष्ट गुणवत्तेसाठी किंवा दर्जासाठी राज्य शासनाने स्विकारावयाचे ठरविले असेल तर त्यामध्ये काही चुकीचे आहे असे मला वाटत नाही. राज्य शासनाने घेतलेला निर्णय हा क्वॉन्शसली घेतलेला निर्णय आहे. त्यामुळे त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तुम्ही जर गुणवत्तेसाठी कॉन्शसली निर्णय घेत आहाति, तर मग तुम्ही महाराष्ट्रातील फुड ॲण्ड ड्रग डिपार्टमेंट बंद करावे आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्वच ठिकाणी या कंडीशन घालून टाका. माझ्याकडे सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट आहे. या जज्जमेंटमध्ये उत्तराखंड सरकारने याबाबतीत घेतलेला निर्णय रद्द केलेला आहे. मी तुम्हाला केंद्र शासनाच्या ड्रग कंट्रोलर ऑफ इंडियाचे पत्र दिले. त्यांनी लिहिलेले आहे की, या अटींची गरज नाही. म्हणजे केंद्र सरकारचे मत आहे की,याची गरज नाही. ऑनरेबल सुप्रीम कोर्टाचे म्हणणे आहे की, याची गरज नाही. माननीय मंत्री महोदयांना पाहिजे असेल तर मी पूर्ण जज्जमेंट वाचून दाखवतो. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. उद्या जर कोणी सुप्रीम कोर्टामध्ये गेले आणि त्यांनी सेम कंडीशन उत्तराखंडच्या ऐवजी महाराष्ट्र असे टाकले तर त्यालाही लगेच तो न्याय मिळणार आहे. सुप्रीम कोर्टाने ज्या डायरेक्शन्स् दिलेल्या आहेत, त्यानुसार त्यालाही तो न्याय लगेच मिळणार आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या डायरेक्शन्स् या महाराष्ट्र शासनावर देखील बंधनकारक आहेत. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, याबाबतीत सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय ॲडव्होकेट जनरल किंवा विधी विभागाकडून तपासून घ्यावा आणि जर सुप्रीम कोर्टाचा निर्णय आपल्यावर बंधनकारक असेल तर आपण ही अट रद्द करणार आहात का ? त्यासाठी हा निर्णय तपासण्यासाठी ॲडव्होकेट जनरल किंवा विधी विभागाकडे पाठविणार आहात का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी याठिकाणी सुप्रीम कोर्टाच्या ज्या निर्णयाचा उल्लेख करीत आहेत, तो निर्णय मी देखील पाहिलेला आहे. परंतु आपला आणि या सभागृहाचा आग्रह लक्षात घेऊन माझे यासंबंधातील वैयक्तिक मत असे आहे की, हा निर्णय, राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाला काही बाधा आणत नाही. तरी सुध्दा आपण याबाबतीत आग्रह धरीत आहात. तेव्हा जरुर ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून ही बाब तपासून घेऊ. परंतु सरकारने हा निर्णय कॉन्शसली घेतलेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : मी सुप्रीम कोर्टाचे रिट पिटीशन, त्यावरील जज्जमेंट..

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : जज्जमेंट त्यांनी वाचलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : ते किती स्पष्ट आहे, तेच मी आपल्याला सांगतो. खरे म्हणजे बी इंडियन बाय इंडियन. स्वदेशीचा पुरस्कार करणारी काँग्रेस पार्टी आणि विदेशाचा विरोध करणारी राष्ट्रवादी पार्टी....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया...

श्री.नितीन गडकरी : तुम्ही विदेशीची भूमिका बदललेली आहे, बोलू नका...

श्री.सुधाकर गणगणे (बसून) : आमचे ते वकील आहेत.

श्री.नितीन गडकरी : विदेशी क्लायंटला स्वदेशी वकील सापडला. ठीक आहे. अध्यक्ष महोदया...

By means of this writ petition the petitioners have prayed to quash the condition No.2 mentioned in the government order dated 13-9-2001 and condition No.6 of tender form, which requires the tenderer to attach along with the tender form a certificate of Director General Quality Assurance (Defence Ministry) certificate or WHO Goods Manufacturing Practice Certificate." हे डिफेन्स मिनिस्ट्री आणि उत्तराखंड आणि कन्सर्निंग विथ अदर पार्टीज असे लिहिलेले आहे.तेव्हा जज्जमेंटनी या कन्डीशन्स क्वॅश केलेल्या आहेत. या जज्जमेंटमध्ये मी पुन्हा विचारपूर्वक विचारतो की, सुप्रीम कोर्टाने डिफेन्सच्या संबंधात, सेंट्रल गव्हर्नमेंटच्या संदर्भात, उत्तराखंडाच्या संदर्भात दिलेला निर्णय हा महाराष्ट्राला लागू आहे की नाही, हे जज्जमेंटच्या संदर्भात आपण ॲडव्होकेट जनरलकडे पाठवावे आणि ॲडव्होकेट जनरलनी जर सांगितले की, आपल्याकरिता देखील हे बंधनकारक आहे.....हे सगळे रेकॉर्डवर येऊ द्यावे. मला अनुभवातून माहिती आहे. तसे जर ओपिनियन आले तर ही अट ताबडतोब रद्द केली जाईल, असे नि:संदिग्ध उत्तर रेकॉर्डवर आले तर ठीक आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, कोणत्या तरी मल्टी नॅशनल कंपनीला मदत करण्यासाठी ही अट घातलेली आहे असे म्हणणे हे मला मुळीच मान्य नाही...

श्री.नितीन गडकरी : मी पुरावे देऊ काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : आपण पुरावे देऊ शकता.

श्री.नितीन गडकरी : मग आता मला बोललेच पाहिजे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : आपण पुरावे देऊ शकता,पण माझ्याजवळ जी माहिती आहे...

श्री.नितीन गडकरी : मी पुरावा देऊ शकतो. त्यांचे मी नाव घेतो. पण सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे माझ्यावर रागवतील. तो मुलगा हा त्यांचा नातेवाईक आहे. त्यांचे त्यावेळेला शे.का.प. मिळून सरकार होते, त्यावेळेला मुख्यमंत्र्यांकडे फाईल होती, त्यांच्यावर प्रेशर आणले. पण डिपार्टमेंटचा विरोध होता. त्याला बेनिफिट मिळावा म्हणून अध्यक्ष महोदया, ही अट टाकली गेलेली आहे. हे खरे नसेल तर म्हणाल ते मी मान्य करीन आता मला त्या पलिकडे बोलायला लावाल तर मी नेते कोण आहेत ते मी सांगतो. मुलगा कोण आहे, ते सांगतो, ती पार्टी कोण आहे ते सांगतो, कोणाला भेटले ते सांगतो, किती देणेघेणे व्यवहार झाला ते सांगतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, मी हे सांगितले की, मेडिकल एज्युकेशन डिपार्टमेंटकडे सप्लायसाठी 101 पार्ट्यांनी रजिस्ट्रेशन केले आहे, त्यापैकी 47 पार्ट्यांनी डब्ल्युएचओ-जीएमपीचे स्टॅन्डर्ड मिळविलेले आहे. त्यामुळे कोणाला काय केले, कोणाला काय केले याच्या खोलामध्ये मला जायचे नाही. पण यासंबंधीची माहिती दिली तर ती माहिती मी जरुर तपासून घेईन. मी सभागृहामध्ये यापूर्वी सांगितलेले आहे की, या संदर्भामध्ये आपण जी नवीन माहिती देता त्या नवीन माहितीच्या आधारे ॲडव्होकेट जनरलकडून ही बाब तपासून घेऊ आणि याबाबतचा जो निर्णय आहे तो मेरिटवर घेऊ.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी जे सांगितले ते अतिशय खरे आहे. कारण हा प्रश्न गेली चार वर्षापासून प्रलंबित आहे. डब्ल्युएचओ-जीएमपी आणायचे की नाही, यावर चार वर्षापासून चर्चा चालू आहे. मी पूरक मागण्यांच्यावेळी रेकॉर्डवर सांगितलेले आहे की,डब्ल्युएचओ-जीएमपी आणू नका. याबाबत माझे विवेचन आहे. सभापती महोदया, मला मंत्री महोदयांना एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, डब्ल्युएचओ-जीएमपी आणल्यानंतर त्यामध्ये ज्या औषधांच्या किंमती आहेत त्यामध्ये किती टक्क्यांनी वाढ होईल ? आपण जर गरीब लोकांना दर्जेदार औषधे देऊ इच्छिता, पण यामुळे 50 रुपयाचे औषध 150 रुपयाला मिळेल, हे आपण मान्य करता काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, या जीवनावश्यक वस्तू आहेत, या सगळया जीएमपीमध्ये आणण्याची कोणती गरज आहे ? या मागचे कारण काय आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, यामध्ये किंमतीने किती वाढ होईल हे आज सांगता येणार नाही. मी आपल्याला सांगतो की, या संदर्भामध्ये आपण जी औषधे खरेदी करतो ती सिलबंद टेंडरमधून करत असतो.

यानंतर कु.थोरात.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

यासंदर्भामध्ये WHO-GMP हे स्टॅण्डर्ड महाराष्ट्रात लागू करायचे की नाही यासंदर्भात सभागृहात चर्चा झालेली आहे. श्री. नितीन गडकरी साहेबांनी सांगितलेले आहे त्याप्रमाणे ॲडव्होकेट जनरल यांचे मार्फत ही गोष्ट तपासून घेण्याचे ठरलेले आहे. त्यामुळे योग्य वेळेला याचा निर्णय होईल. म्हणून आज त्याच्या संदर्भात या ठिकाणी अधिक चर्चा करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, एखादा कायदा आपण लागू करतो, तो ज्या औषध कंपन्यांना आणि ज्या औषधांना लागू करण्यात येणार आहे, त्याचे शासनाने ॲनॅलिसीस केले नाही काय ? औषधाच्या किंमती किती वाढतील, याबाबतीत शासन कसे सांगू शकते की, 50 रुपयाचे औषध 150 रुपयाला मिळणार आहे की नाही,हे माहीत नाही. (अडथळा)हे तुम्हाला माहीत नाही कां? तुम्ही याचा अभ्यास केला नाही काय? सांगा किती रुपयाला मिळेल ते? तुम्हाला हे सगळे माहीत आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये बोलायची पध्दत आहे. बोलायची भाषा आहे. आपण अशा पध्दतीने दरडावून बोलल्या सारखे बोलू शकत नाही. सभागृहामध्ये वापरायची भाषा आहे. सभागृहामध्ये वागण्याची पध्दत आहे. शांतपणाने सुध्दा प्रश्न विचारता येतो. दर वेळेला आम्ही असे ऐकून घेणार नाही.

डॉ. दीपक सावंत : आम्ही बोलायचेच नाही काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील : आपण बोला. पण प्रश्न विचारण्याची सुध्दा पध्दत आहे. या सभागृहाची एक लॅग्वेज आहे. या सभागृहात वागण्याची पध्दत आहे. डेकोरम आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ते काय आक्षेपार्ह बोलले?. प्रश्न विचारण्याच्या ओघात ते बोलले. मंत्री महोदयांचा अपमान त्यांनी केलेला नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : मी ही सभागृहाचा मान ठेवून हेच सांगितले की, सरकारने या संदर्भातील भूमिका ठरविलेली आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो मुद्दा लक्षात घेऊन ॲडव्होकेट जनरल यांचे या संदर्भात मत घेऊन .........

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

मेरिटवर निर्णय घेऊ. अशा प्रकारचे अतिशय स्पष्ट मी उत्तर दिलेले आहे. औषधाच्या किंमती वाढणार की, नाही वाढणार? याच्या संदर्भात आपण ज्यावेळेला टेंडर काढू आणि त्या टेंडरमध्ये किंमती येतील त्यावेळेला टेंडरच्या अटी काय असतील कंडिशन्स काय असतील, निगोसिएशन्स काय असेल, या गोष्टी ठरतील. बीएमसी किंवा बाकीचे जी हॉस्पिटल आहेत या हॉस्पिटलमध्ये WHO-GMP ची जी औषधे खरेदी केली जातात त्यामध्ये किंमती फार वाढल्याचे आपल्याला दिसत नाही. किंमती वाढणार काय वगैरे आता सांगता येणार नाही. "अंडे आधी की कोंबडी आधी" अशा सारखे विशेष सर्कल त्याच्यामध्ये आहे. मी या केसमध्ये ओपन आहे. याबाबतीत मी आपल्या सगळयांच्या भावना समजून घ्यायला तयार आहे. आवश्यकता वाटली तर आपल्याशी चर्चा करायला तयार आहे. परंतु या संदर्भात आज सरकारने घेतलेला जो निर्णय आहे तो सरकारचा निर्णय आहे. आज मला त्याच्यामध्ये बदल करावासा वाटत नाही. ॲडव्होकेट जनरलचे मत आल्यानंतर जरुर मेरीटवर याबाबतचा निर्णय घेऊ.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांना जे मूलभूत विचारावयाचे होता त्याचा संदर्भ असा आहे की, शेवटी आपण हे कशासाठी करीत आहोत? व्यवस्थित इलाज व्हावा आणि तो योग्य भावात औषधे मिळावीत. औषधांची जर दीडपटीने आणि तीनपटीने किंमत वाढणार असेल तर निश्चितपणे ती काळजी करण्याची बाब आहे.(अडथळा) माननीय मंत्रिमहोदय, डॉ. दीपक सावंताचा तोच तर आक्षेप आहे.यासंदर्भात शासनाच्या अधिका-यांनी याचे ॲनॅलिसीस केले पाहिजे. जर तुम्ही WHO-GMP आणत असाल तर त्याचे भाव वाढतील की नाही याचे ॲनॅलिसीस करता येते आणि ते ॲनॅलिसीस करायला पाहिजे, हे त्यांनी आपल्या निदर्शनास आणले. ती दक्षता शासनाने घ्यावी अशी त्यामागची भावना आहे. दुसरे काही नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभपती महोदय, या संदर्भातील निर्णय राज्य सरकारने ऑलरेडी घेतलेला आहे. 2003 मध्ये हे टेंडर ऑलरेडी निघाले आहे. त्या टेंडरमध्ये ही अट घालण्यात आली होती. त्याबाबतीत काही स्थानिक मॅनिफॅक्चरर्स कोर्टात गेले. कोर्टात या संदर्भातील केस टाईम-टू-टाईम चालत राहिली. ती केस चालत राहिल्यामुळे आजच्या तारखेपर्यंत ते टेंडर ओपन झाले नाही, याचा उल्लेख आपणही केला आहे. त्यामुळे मग बीएमसीची हॉस्पिटल्स

..3..

श्री. दिलीप वळसे-पाटील....

असतील किंवा कामगार रुग्णालय असतील ते त्यांच्या दर पत्रिकेप्रमाणे खरेदी करत राहिले. सप्लायर मंडळी असोत किंवा मॅनिफॅक्चरर मंडळी असोत ती सगळया बाजूने सगळे प्रयत्न करीत असतात. आज एका वर्षात किंवा पुढच्या सहा महिन्यात पुढच्या पंचवीस वर्षाची खरेदी करणार असे नाही. टेंडर दर वर्षी निघत असते. सप्लाय दर वर्षी पाहिजे असतो. आज ज्या कंपन्यांकडे WHO-GMP नसेल त्यांना जर काही कालावधी द्यायचा असेल किंवा क्वालिटीसाठी जर एखाद्या सरकारी ऑर्गनायझेशनने आग्रह धरला तर त्याच्यामध्ये काही चुकीचे आहे असे मला वाटत नाही. मी या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहाने ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सगळया भावना लक्षात घेऊन शासन या संदर्भातील निर्णय करील.

---x---

( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )

यानतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्र. सहा (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 102 या लक्षवेधी सूचनासंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 102 ही निवेदने कृपया छापावी.)

---------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दिनांक 24 नोव्हेंबर, 2005 रोजी अकोला येथील मूक बधीर मुलींच्या शाळेतील विद्यार्थीनींना झालेली विषबाधेची घटना.

**मु.शी.**: दिनांक 24 नोव्हेंबर, 2005 रोजी अकोला येथील मूक बधीर मुलींच्या शाळेतील विद्यार्थीनींना झालेली विषबाधेची घटना या विषयासंबंधी गठीत करण्यात आलेली चौकशी समिती.

श्री. दिलीप वळसे-पाटील (उर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 189 प्रमाणे पुढील प्रस्ताव मांडतो :--

"दिनांक 24 नोव्हेंबर, 2005 रोजी अकोला येथील मूक बधीर मुलींच्या शाळेतील विद्यार्थीनींना झालेली विषबाधेची घटना या विषयावरील दिनांक 7 डिसेंबर, 2005 रोजी उत्तरित झ ालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी सामाजिक न्याय राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार याप्रकरणी सखोल चौकशी करुन शिफारशी करण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

1. श्री. चंद्रकांत हंडोरे, मा. सामाजिक न्याय मंत्री व पदसिध्द सदस्य.
2. श्रीमती सुधा जोशी.
3. प्रा. फौजिया खान.
4. डॉ. नीलम गोऱ्हे.
5. श्रीमती कांता नलावडे.
6. श्रीमती मंदा म्हात्रे.
7. श्रीमती संजीवनी रायकर.

सदर समितीने आपला यासंदर्भातील अहवाल विधानपरिषदेच्या आगामी अधिवेशनामध्ये सादर करावा.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : महोदय, यासंदर्भात तालिका सभापती माननीय श्रीमती सुधा जोशी यांनी असे निदेश दिले होते की, 3 दिवसात केलेल्या कारवाईसंबंधीची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

श्री. चंद्रकांत हंडोरे : यासंबंधात सभागृहाने जो निर्णय घेतला होता त्याबाबत तीन दिवसात माहिती देण्यात यावी त्यानुसार आमचे आयुक्त, अपंग यांना खास चौकशीसाठी पाठविले होते, त्यांनी त्या चौकशीचा अहवाल दिलेला आहे, तो अहवाल पटलावर ठेवण्यात आला आहे. तसेच या संस्थेची परवानगी रद्द करण्यात आली आहे.

--------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख मांडण्याबाबत.**

श्री. जोगेंद्र कवाडे : ज्य प्रश्नांना वेगवेगळया माध्यमातून आम्हाला न्याय मिळत नाही त्या प्रश्नांना विशेष उल्लेखाच्या माध्यमातून न्याय मिळविण्याचा प्रयत्न करतो पण नेमकी आज शेवटच्याच दिवशी आपण विशेष उल्लेखासाठी परवानगी नाकारलेली आहे. माझी अशी विनंती आहे की, फक्त 15 मिनिटांचाच वेळ लागेल, कृपया आम्हाला विशेष उल्लेखाच्या सूचना उपस्थित करण्यासाठी फक्त 2-3 मिनिटेच वेळ द्यावा.

**उपसभापती** : ठीक आहे, ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी विशेष उल्लेखाच्या सूचना दिलेल्या आहेत त्या त्यांनी थोडक्यात उपस्थित कराव्यात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: मौजे. भावड, (ता.पवनी, जि.भंडारा ) येथील भगवान शंकराच्या मूर्तीची करण्यात आलेली तोडफोड

**मु.शी.**: मौजे. भावड, (ता.पवनी, जि.भंडारा ) येथील भगवान शंकराच्या मूर्तीची करण्यात आलेली तोडफोड याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मैाजे भावड ( ता. पवनी, जि. भंडारा ) कोंढा ते बेलाठी मार्गावर दि.14-10-2005 रोजी गावाच्या बाहेर एका नाल्याजवळ असलेल्या भगवान शंकराच्या मूर्तीची तोडफोड करण्यात आली.

अडयाळ पोलीस स्टेशनचे निरीक्षक श्री.किनवे यांनी घटनेचा तपास न करता शिपाई ब्राम्हणकर यांचे हस्ते निरोप पाठवून गावातील निरपराध अनुसूचित जातीचे नागरिक श्री. भगवान तातू खोब्रागडे, ग्यानीवंत अमृत चिमनकर, सखाराम तातू खोब्रागडे, वय 83 वर्षे यांना बोलावून सरळ बंदीगृहात डांबले आणि त्यांना मूर्ती तोडण्याचा गुन्हा कबूल कर अन्यथा गंभीर परिणाम होतील अशी धमकी देण्यात आली. एवढेच नव्हेतर लिलाधर महादेव तिडके व मौजे भावडचे पोलीस पाटील चांगोजी माहूरे यानी गावातील लोकांना ट्रॅक्टरमध्ये बसवून पोलीस स्टेशन अडयाळ येथे मोठा जमाव घेऊन आले व पोलीस निरीक्षक श्री. किनवे यांचे समोर वरील निरपराध नागरिकांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली.

ग्रामपंचायत "भावड" चे सरपंचपद हे खुल्या प्रवर्गातील आहे. परंतु हया पदी अनुसूचित जातीच्या एक महिला निर्मला बनसोड हया सरपंचपदी विराजमान झाल्यामुळे गावापतील जातीयवादी समाज कंटकांकडून हेतुपुरस्सर भगवान शंकराच्या मूर्तीचे तोडफोड प्रकरण घडविण्यात येऊन गावातील दलित मागासवर्गीय लोकांना वेठीस धरण्याचे व त्यांना त्रास देण्याचे अत्यंत संतापजनक प्रकार हया ठिकाणी सुरु आहेत.

पोलीस पाटील भगवान माहूरे हे गावातील समाजकंटकांना हाताशी धरुन त्यांना दारु

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाजून अनुसूचित जातीच्या लोकांविरुध्द भडकविणे, जातीचा उल्लेख करुन शिवागाळ करण्यास प्रोत्साहन देणे, एवढेच नव्हे तर सार्वजनिक पानवठयाच्या नळावर अनुसूचित जातीच्या लोकांना पाणी भरु न देण्याचे आवाहन करुन गावात तनावसदृष्य परिस्थिती निर्माण करण्यात आली आहे, परिणामी गावातील अनुसूचित जातीच्या दलित मागासवर्गीयांमध्ये असुरक्षिततेचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आजही स्थानिक समाजकंटक महिला सरपंचावर दबाव आणून त्यांना पदाचा राजीनामा देण्याकरीता धमकावीत आहेत तर काही निर्दोष नागरिकांना भीतीमुळे गाव सोडून नागपूरमध्ये नातेवाईकांकडे आश्रय घेतला आहे.

भगवान शंकराची मूर्ती तोडफोड प्रकरणी गावातील काही समाजकंटक नावे लिलाधर तिडके, लेकराम हेमने, केवळराम गायधने, हीरामन नंदूरकर, आबाजी देशमुख, आसाराम न्हाने,रमेश चिचमलकर, वसंत माहूरे, रमेश निखाडे हे सर्व जबाबदार असून या दृष्टीने पुन्हा पोलीस तपास करुन ख-या गुन्हेगारांना अटक करावी, निर्दोष नागरिकांवर करण्यात आलेली कारवाई मागे घेण्यात यावी तसेच गावातील दलित मागावर्गीयांना शासनाने संरक्षण देण्याचे निर्देश द्यावेत यासाठी प्रस्तुत प्रकरण सभागृहात सादर करीत आहे.

-------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मालाड येथे ब्युटी केअरच्या नावाखाली होत असलेले लैंगिक शोषण

**मु.शी.**: मालाड येथे ब्युटी केअरच्या नावाखाली होत असलेले लैंगिक शोषण याबाबत श्री. अनिल परब यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मुंबई उपनगरातील मालाड येथील डॉ. प्रदीप परमार आणि त्यसांची पत्नी ब्युटी केअरच्या नावाखाली लैंगिक शोषण करीत असल्याच्या गुन्हयावरुन डॉ. प्रदीप परमार यांना दि. 25 नोव्हेंबर, 2005 रोजी अटक करण्यात आली. त्यांच्या या गुन्हयामध्ये साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नीला पोलिसांनी तातडीने अटक करण्याची कारवाई करण्याची आवश्यकता असतांना तिला फरार होण्यास मदत केली. अशा प्रकारे शारीरिक शोषण म्हणजेच बलात्कारच करणा-या आरोपींना मदत करणा-या त्यांची पत्नी हिला तातडीने अटक करुन तिच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता पालिसांनी केली टाळाटाळ, यामुळे नागरिकांचा कायदा व सुव्यवस्थेवरील उडालेला विश्वास, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

------------------

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नाशिक पिपल्स को-ऑप बँकेवर रिझर्व्ह बँकेने केलेल्या एकतर्फी कारवाईबाबत.

**मु.शी.**: नाशिक पिपल्स को-ऑप बँकेवर रिझर्व्ह बँकेने केलेल्या एकतर्फी कारवाईबाबत श्री.प्रतापराव सोनावणे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनावणे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रतापराव सोनावणे (नाशिक पदवीधर विभाग) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

नाशिक पिपल्स को ऑपरेटिव्ह बँक ही स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात असलेली नाशिक नगरीतील सर्वात जुनी सहकारी बँक आहे. या बँकेचे 1,56,000/- सभासद व 56,000 ठेविदार असून बहुतांशी मध्यमवर्गीय आहेत.

सर्वात जुनी व विश्वासू व नावाजलेल्या बँकेवर बँक रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादल्यामुळे जून 2004 पासून बँक अडचणीत आलेली आहे. तत्कालीन संचालक मंडळाने त्यांची भूमिका जबाबदारीने पार पाडलेली नाही हे दिसत असले तरी, रिझर्व्ह बँकेने मात्र एकतर्फी निर्णय घेऊन बँकेला संधी न देता फारच मोठी, फारच कडक कारवाई बँकेवर केली अशी सभासदांसची भावना आहे. याहीपेक्षा गंभीर स्वरुपाच्या चुका करणा-या अन्य बँकांपेक्षा नाशिक पिपल्स बँकेवर मात्र अति कडक कारवाई करुन ठेविदारांचे व सभासदांचे हीत पूर्ण धोक्यात आणले गेले आहे.

या परिस्थितीत महाराष्ट्र शासनानेच या लाखो सभासदांना व ठेविदारांना संरक्षण द्यावे. आधार द्यावा ही सर्वांचीय मागणी आहे. काहीही चूक नसताना निष्कारण भरडल्या जाणा-या सभासदांना, ठेविदारांना वाचविणे हे शासनाचे कर्तव्यच आहे.

या संदर्भात शासनाकडून सहज होऊ शकणा-या बाबी पुढीलप्रमाणे आहे.

1) माननीय सहकार मंत्री यांनी जाहीर केल्याप्रमाणे राज्यातील आजारी सहकारी संस्था वाचविण्यासाठी केंद्राने 17000 कोटी रुपयांची मदत देऊ केलेली आहे. त्यामधून नाशिक पिपल्स बँकेला तातडीने आवश्यक ती मदत करावी जेणेकरुन बँक पूर्ववत सुरु होऊ शकते. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2) ठाणे जनता बँकेने, पिपल्स बँकेच्या विलिनीकरणास अनुकूलता दाखविलेली आहे मात्र त्यांच्या काही तांत्रिक अडचणीसाठी शासनाने मदत केल्यास हा प्रश्न मार्गाला लागू शकतो.

3) नाशिक मर्चंट बँकेनेसुध्दा पिपल्स बँकेच्या विलिनीकरणास संमती दर्शविली आहे. माननीय सहकार मंत्र्यांच्या नुकत्याच झालेल्या नाशिकच्या दौ-र्यात मर्चंट बँकेने मंत्र्यांना निवेदन दिले आहे की शासनाने सवलतीच्या व्याज दराने काही काळासाठी,काही रक्कम उपलब्ध करुन दिली तर मर्चंट बँक या विलिनीकरणास तयार आहे हा सुध्दा व्यवहार्य मार्ग दिसत आहे.

4) माननीय सहकार मंत्र्यांनी माझ्या पत्राला उत्तर देतांना त्यांच्या दि.11.2.2005 रोजीच्या पत्रात, बँकेचे व्यवहार पाच वेगवेगळया पध्दतीने सुरु करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे असे म्हटले होते. परंतु आजतागायत यातील एकही सुधारणा आलेली नाही असे खेदाने नमूद करावे लागत आहे.

5) नाशिक महानगरीतील नागरिकांवर होत असलेल्या या मोठया संकटाकडे शासनाचे अक्षम्य दुलर्क्ष होत आहे, अन्याय होत आहे. अजूनही वेळ गेलेली नाही अशी परिस्थिती आहे. तेव्हा माननीय सहकार मंत्र्यांनी या विषयाकडे प्राधान्याने लक्ष देऊन न्याय द्यावा ही तमाम नाशिककरांची मागणी आहे.

शासनाची इच्छाशक्ती असेल तर या संकटावर निश्चित मार्ग निघू शकतो अशीच भावना या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

**पृ.शी.**: रूकडी,जिल्हा कोल्हापूर येथे दिनांक 3.3.2005 व 2.6.2005 रोजी धनगर वस्तीवर केलेला हल्ला.

**मु.शी.**: रूकडी,जिल्हा कोल्हापूर येथे दिनांक 3.3.2005 व 2.6.2005 रोजी धनगर वस्तीवर केलेला हल्ला याबाबत श्री.प्रकाश शेंडगे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभाद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मी विशेष उल्लेखाच्या निमित्ताने सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्यावर आरोप करणार आहे. श्री.आर.आर.पाटील यांनी गृहमंत्र्याचा कारभार सांभाळल्यानंतर महाराष्ट्रातील धनगर समाजावर दिवसढवळया हल्ल्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

**उपसभापती** : मी आपल्याला विशेष उल्लेख वाचावयास सांगितलेला आहे. तोच फक्त वाचावा. सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्यासंबंधी केलेला उल्लेख रेकॉर्डवरून काढून टाकण्यात यावा.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मौजे रुकडी ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथे दिनांक 03.03.2005 रोजी गावातील लोकांनी सामुहिकरित्या धनगरवस्तीवर दिवसाढवळया हल्ला करण्यात आला आहे. दोन मेंढरं सरपंचाच्या शेतात घुसली म्हणून संपूर्ण गावाने धनगर वस्तीवर हल्ला केला. संपूर्ण वस्ती उध्वस्त केली. जनावरांवर हल्ला केला. म्हाताऱ्याकोताऱ्यांवर हल्ला केला,घरातील सामान उध्वस्त केले,कौल फोडली, भिंती फोडल्या. संपूर्ण समाजाला बहिष्कृत

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

करण्यासंबंधीचा ठराव ग्रामपंचायतीत मंजूर झालेला आहे. खासदार श्रीमती निवेदिता माने यांचे गाव आहे. मी तेथे स्वत: भेट दिली. त्यावेळी त्यांनी मान्य केले की, धनगर समाजावर अन्याय इ ाालेला आहे. आम्ही त्यांची भरपाई करून देऊ. अद्यापि या समाजाला भरपाई मिळालेली नाही. आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, त्या समाजाला भरपाई मिळवून द्यावी.

**उपसभापती** : आपण आपली सूचना वाचावी. आपण अवांतर बोलत असल्यामुळे तुम्ही आपला वेळ स्वत:हून घालवत आहात.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, दिनांक 2 जून 2005 रोजी भरदिवसा गोळप, जि.रत्नागिरी येथील धनगर पाड्यावर केलेला सामूहिक हल्ला, परिणामी हल्ल्यात जबर जखमी झालेल्या लोकांचा आक्रोश व त्यामुळे पावस परिसरात निर्माण झालेली अशांतता, त्या पाठोपाठ मौज धनसळ, ता.पुसद, जि.यवतमाळ येथे झालेली जातीय दंगलीनंतर धनगर समाजाची फिर्याद नोंदवून न घेता समाजाच्या 98 महिला व वर्यावृध्दांवर पोलिसांनी लावलेले कलम 395 जामीन मिळालेल्या 27 व्यक्तींना ( पाच महिला ) गावात जाण्यास पोलिसांनी घातलेली बंदी त्यामुळे पुसद परिसरातील धनगर समाजामध्ये पसरलेला असंतोष तसेच जैथाणे निजामपूर ता.साखरी, जि.धुळे येथे झालेल्या अन्यायाविरुध्द दाद मागणाऱ्या धनगर समाजाविरुध्द पोलिसांनी केलेली उलट कारवाई अशाप्रकारे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील धनगर समाजाविरुध्द सामूहिक हल्ले मारहाण गावबंदी करणारे राजकीय समाजकंट व त्यांना साथ देणारे पोलीस यांना शासनाचे धोरण जबाबदार आहे. शासनाने (चराऊकुरणे) वन जमिनी धनगर समाजाच्या शेळ्या मेंढया चरण्यास मोकळ्या करुन न दिल्याने धनगर समाजाला अशा घटनांना वारंवार सामोरे जावे लागणे यामुळे राज्यातील धनगर समाजामध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे याबाबत विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे शहरात ब्युटीकेअरच्या नावाखाली सुरु असलेले अवैध धंदे.

**मु.शी.**: ठाणे शहरात ब्युटीकेअरच्या नावाखाली सुरु असलेले अवैध धंदे याबाबत श्री.अनंत तरे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, ठाणे शहरात ब्युटी केअर सेंटर, मसाजपार्लर व ब्युटीपार्लरच्या नावाखाली अनेक ठिकाणी अनैतिक धंदे सुरु आहेत. ज्या भागामध्ये असे अनैतिक धंदे चालतात त्याबाबत पोलीस कारवाई करण्यास असमर्थ ठरत आहेत. हे ब्युटी केअर सेंटर, मसाज पार्लर हे सोसायट्यांमध्ये आहेत. अशा ठिक्राणी परवानगी देताना शासनाने आणि प्राधिकाराने विचार करायला पाहिजे. अशा ब्युटीपार्लरच्या संदर्भात तक्रारी आल्यास त्याबाबत त्वरित कारवाई केली पाहिजे. तसेच पोलीस ज्याप्रमाणे काही ठिकाणी धाडी घालतात त्याप्रमाणे अशा ब्युटीपार्लर आणि मसाज पार्लरवर धाडी घातल्या पाहिजेत. त्याठिकाणी प्रत्यक्षात ब्युटीपार्लरचा व्यवसाय होता की अन्य व्यवसाय होतो हे पााहिले पाहिजे.

**उपसभापती** : ठाणे शहरामध्ये असे प्रकार कोठे चालतात त्याची माहिती सन्माननीय सदस्यांनी पोलिसांनी द्यावी आणि याबाबत शासनाने कोणती कारवाई केली हे पुढील अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सदनाला सांगावे.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयाकडे शासनाने केलेले दुर्लक्ष

**मु.शी.**: नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयाकडे शासनाने केलेले दुर्लक्ष याबाबत श्री.विलास अवचट यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.विलास अवचट ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभाती महोदय, मध्य भारतातील सर्वात मोठे संग्रहालय म्हणून प्रसिध्द असलेल्या नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयाकडे राज्य शासनाचे सतत दुर्लक्ष झालेले आहे. या संग्रहालयातील तीन दालने बंद असल्यामुळे या संग्रहालयास मिळणाऱ्या उत्पन्नात 25 टक्क्यांनी घट झालेली आहे. या संग्रहालयातील तीन दालनांसाठी 35 लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. परंतु शासनाच्या उदासिनतेमुळे हा निधी दिला जात नाही. निधी अभावी संग्रहालयातील विकास कामे बंद आहेत. यासाठी विदर्भ वैधानिक विकास महामंडळाने या दालनांसाठी 20 लाख रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे.याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुरुड, जि.रायगड, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.डी. वाय.जाधव यांस लाचलुचपत प्रतिबंध पथकाने केलेली अटक.

**मु.शी.**: मुरुड जि.रायगड, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.डी. वाय.जाधव यांना पंचायत राज समितीच्या नावाखाली पैसे घेताना लाचलुचपत प्रतिबंध पथकाने केलेली अटक याबाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत ग्रामविकास मंत्र्यांचे निवेदन.

श्री.रणजित कांबळे (ग्राम विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मुरुड जि.रायगड, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.डी.वाय.जाधव यांना पंचायत राज समितीच्या नावाखाली पैसे घेताना लाचलुचपत प्रतिबंध पथकाने केलेली अटक यासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधीचे निवेदन मी आपल्या अनुमतीने पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: माजी सैनिकांच्या कल्याण तदर्भ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री.नतिकोद्दीन खतिब ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव प्रस्तुत करतो की, माजी सैनिकांच्या कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून द्यावा.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध विधेयक.

**मु.शी.**: सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक-15, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक-15, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध विधेयक, 2003 यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त आपल्या अनुमतीने सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : सन 2003 चे वि.प.वि. क्रमांक-15 यावरील संयुक्त चिकित्सा समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: देवदासी प्रथा (नाहीशी करणे) विधेयक.

L.C. BILL NO. XXV OF 2005.

(A BILL TO PROVIDE FOR A COMPREHENSIVE LAW TO ABOLISH THE PRACTICE OF DEDICATION OF WOMEN AS DEVDASIS TO HINDU DEITIES, IDOLS, OBJECTS OF WORSHIP, TEMPLES OR RELIGIOUS INSTITUTIONS, AND TO PROTECT THE WOMEN SO DEDICATED AGAINST EXPLOITATION, AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्र.25, हिंदू देवता, मूर्ती, पूजा करावयाच्या प्रतिमा, देवळे किंवा धार्मिक संस्था यांना देवदासी म्हणून स्त्रिया अर्पण करण्याची प्रथा नाहीशी करण्यासाठी, आणि अशा प्रकारे अर्पण करण्यात आलेल्या स्त्रियांचे शोषण होण्यापासून संरक्षण करण्यासाठी, आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी सर्वसमावेशक कायदा करण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज सदनाचा शेवटचा दिवस आहे. रोज या सदनामध्ये 10-12 तास काम घेतले जात आहे. एखाद्या वेठबिगारीसारखे येथे काम होत आहे. परंतु आता केवळ विधेयक वाचावयाचे आणि ते पास करुन घ्यावयाचे असेल तर आम्ही सदनाबाहेर जातो. मी वारंवार कामगार सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये सांगितले आहे की, कोणतेही विधेयक सदनामध्ये आणण्यापूर्वी किमान 24 तास अगोदर ते सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन द्यावे. कालही आपले सभागृह रात्री उशिरापर्यंत सुरु होते, अशा परिस्थितीत आम्ही विधेयक कसे वाचणार ? त्यावर अभ्यास कसे करणार ? सुधारणा कशा सुचविणार ? आपण देवदासी प्रथेसंदर्भातील विधेयक या ठिकाणी आणू पाहत आहात. या विधेयकाच्या अनुषंगाने देवदासी प्रथा बंद होऊन, सुधारणा व्हावी या मताशी मी सहमत आहे. अभ्यासपूर्वक साधक-बाधक चर्चा न होता कायदा करणे योग्य नाही. हे वरिष्ठ सभागृह आहे. त्यामुळे एखादे विधेयक पास करताना त्यामध्ये जर त्रुटी राहिल्या असतील त्यासंदर्भात सूचना करण्यासाठी हे सभागृह आहे. केवळ शेवटचा दिवस असल्यामुळे भरपूर विधेयके आणून ती संमत करणे बरोबर होणार नाही.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हे विधेयक मागील अधिवेशनात पुरस्थापित केलेले आहे. सन्माननीय सरपोतदार साहेबांची सूचना मला मान्य आहे. त्यामुळे येथून पुढील अधिवेशनात जेव्हा अधिवेशन सुरु होईल तेव्हा अगोदर विधेयके आणण्यात येतील. कामकाज सल्लागार समितीमध्ये काम करीत असताना हा मुद्दा उपस्थित झाला होता हे खरे आहे. त्यामुळे अधिवेशनाच्या सत्र कालावधीत कोणती विधेयके घेणार आहोत याची एकत्रित यादी तयार करुन सन्माननीय सदस्यांना तीन-चार दिवस अगोदर पोहोचतील व त्यावर त्यांना अभ्यास करता येईल याबाबत खबरदारी घेतली जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : महोदय, नियमानुसार हे सभागृह पाच तास चालले पाहिजे.

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, राज्यातील 13-14 देवदासी संघटनांशी आम्ही या विधेयकाच्या अनुषंगाने चर्चा केली. सदनामध्ये जर सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्यांनी त्या कराव्यात.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, त्या अभ्यास गटाचा अहवाल मिळाला आहे काय ? कोणत्या संघटनांशी आपण चर्चा केली ? खरोखरच चर्चा केली काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हे विधेयक पूर्वी मंजूर केले होते. नंतर ते लॅप्स झाले. त्यानंतर काही संघटनांच्या माध्यमातून काही सूचना आलेल्या आहेत. अधिवेशनाचा कार्यकाळ संपल्यानंतर ऑर्डिनन्स काढला नाही तर विधेयक लॅप्स होते. त्यानुसार ते लॅप्स झाले आणि म्हणूनच आपण हे विधेयक या ठिकाणी पुन्हा सादर केलेले आहे. विधान सभागृहामध्ये या विधेयकाच्या अनुषंगाने चर्चा झाली होती. मागचे जसे विधेयक होते तसेच हे आहे, आताच्या विधेयकामध्ये केवळ शिक्षेच्या तरतुदीमध्ये सुधारणा केली आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : अशा प्रकारे सदनाचे कामकाज चालविणे योग्य आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,.......

श्री.मधुकर सरपोतदार: सभापती महोदय, मी आपल्यासमोर ज्या अडचणी मांडल्या आहेत त्याबाबतीत मला आपल्याकडून रुलिंग हवे आहे.हे रुलिग मिळाल्यानंतर भविष्यकाळात त्याचा आम्हाला उपयोग होईल.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या विधेयकाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर दोन वेळा बैठका झाल्या होत्या.त्यावेळी श्री.गोपीनाथ मुंडे हजर होते आणि त्या बैठकीमध्ये सर्वानी असा आग्रह धरला होता की, हे विधेयक लवकर मंजूर करण्यात यावे.

श्री मधुकर चव्हाण : त्यांनी हे विधेयक आणण्यास मान्यता दिली आहे. परंतु घाई घाईने हे विधेयक आणावे आणि मंजूर करावे असे त्यांनी संगितलेले नाही.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

प्रा.जोगेन्द्र कवाडे : हे विधेयक चांगले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : मी जो मुद्दा मांडलेला आहे त्यावर रुलिंग देण्यात यावे.आम्ही रोज दहा बारा तास काम करीत असतो.पाच तास कमकाज चालवावे असा नियम आहे. परंतु आम्ही त्यापेक्षा जास्त वेळ बसतो.सदनाचे कामकाज 12 तास चालावे असा आपण नियम करा त्या नियमाचे आम्ही पालन करु.

.**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, आपण अनुभवी आहात आणि आपण आपल्या अनुभवाचे बोल सभागृहात सांगत असता.सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना मी सांगतो की ,पाच तास कामकाजाची वेळ असतांना बारा तास कामकाज केले जाते. तेव्हा सात तास जास्त काम केल्याबद्दल ओव्हर टाईम देण्यात यावा.

श्री.मधुकर सरपोतदार : आम्हाला ओव्हर टाईम नको आहे.

**उपसभापती** : मी माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना ते सांगत आहे. पहिली गोष्ट अशी आहे की, माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले ते माननीय मंत्रिमहोदयांनी सुध्दा मान्य केलेले आहे व त्याप्रमाणे येथून पुढे जी विधेयके अधिवेशनात मांडावयाची आहेत त्याची पूर्व कल्पना सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल...

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री मधुकर सरपोतदार : सभापती महोदय,गेल्या वर्षीसुध्दा तसे सांगण्यात आले होते.या वर्षीसुध्दा पुन्हा तेच करण्यात येत आहे. कामकाज सल्लागार समितीच्या प्रत्येक बैठकीत मी हा विषय मांडत असतो.सभापती महोदय,आपण सुध्दा त्या बैठकीत उपस्थित असल्यामुळे आपल्याला त्याबाबतीत माहिती आहे.आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांना विधेयकाच्या बाबतीत अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे.त्याचबरोबर या ठिकाणी चर्चा करण्याची संधी मिळाली पाहिजे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेन्द्र कवाडे असे म्हणाले की, "हे विधेयक चांगले आहे." आमचे सुध्दा तेच म्हणणे आहे की,हे विधेयक चांगले आहे परंतु हे विधेयक वाचून त्यातील क्लॉजेसमध्ये काय म्हटलेले आहे? कोणता क्लॉज योग्य आहे ? कोणता अयोग्य आहे? यासंबंधीची चर्चा करण्याची संधी आम्हाला मिळाली पाहिजे. रोज बारा बारा तास कामकाज चालत असल्यामुळे आम्हाला अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही तेव्हा आम्हाला अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. आम्ही आज नागपूरमध्ये असलो काय किंवा मुंबईमध्ये असलो काय आम्हाला इतरही कामे असतात त्याचा सुध्दा विचार करण्यात यावा. आजचा दिवस हा अशासकीय कामकाजाचा आहे . त्या दिवशी विधेयके घेतली तर अशासकीय कामकाजावर अन्याय होतो.आज बराच उशीर झाला आहे आणि उद्या पासून अधिवेशन नसल्यामुळे ज्या सन्माननीय सदस्यांनी परतीची तिकिटे काढलेली आहेत ते सन्माननीय सदस्य निघून जातील त्यामुळे सभागृहात फक्त एक किंवा दोन सदस्य राहतील आणि कामकाज चालू राहील तेव्हा Is it proper ? Is it a way of functioning in the House? हा माझ्यासमोर प्रश्न आहे..

**उपसभापती** : याबाबतीत आता काय निर्णय घ्यावयाचा ?

श्री.मधुकर सरपोतदार : ही सगळी विधेयके पुढच्या अधिवेशनात घ्यावीत आणि आता अशासकीय कामकाज सुरु करण्यात यावे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात ती गोष्ट अगदी खरी आहे. परंतु वि.प.वि.क्रमांक 25 हे विधेयक यासाठी महत्त्वाचे आहे की, देवदासी प्रथेला प्रतिबंध करण्यासाठी म्हणून आपण हे विधेयक येथे आणलेले आहे. हे विधेयक आणण्यामध्ये दिरंगाई झ ालेली आहे हेही मला मान्य आहे. परंतु 1992 साली पहिल्यांदा या संदर्भात एक समिती गठित केली होती आणि त्यानंतर सातत्याने हे विधेयक असेच प्रलंबित राहत गेले. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना कळकळीची विनंती आहे की, यासाठी झाला तेवढा विलंब खूप झाला, आता अधिक विलंब होऊ नये यासाठी तरी हे विधेयक आपण सर्वांनी मंजूर करावे., त्यासाठी विधेयक सादर करण्यास अनुमती द्यावी.

श्री. मधुकर सरपोतदार : पण इतकी वर्षे आपण काय करीत होता ? अगोदरच हे विधेयक का आणले नाही ?

श्री. हर्षवर्धन पाटील : मी आपल्याला सांगितलेच आहे की, काहीना काही कारणांनी हे विधेयक असेच प्रलंबित राहत गेले आणि आता आणखी विलंब होऊ नये यासाठी आता आपण हे विधेयक मंजूर करू या अशी मी आपल्याला पुन्हा पुन्हा विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार तसेच माननीय विरोधी पक्षनेता श्री. फुंडकर साहेबांना मी सांगू इच्छितो की, आपण अधिवेशनाच्या अगोदरच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकता त्यामुळे मग आपल्यामध्ये समन्वय होत नाही. आपण त्यावेळी जर आला असता तर आपल्यामध्ये संवाद होऊ शकतो आणि मग आपल्याला कामकाजाबाबतही ठरविता येऊ शकते. ... तरीही मी माननीय सदस्यांना सांगतो की, यापुढे सभागृहामध्ये विधेयके आणण्यामध्ये विलंब होणार नाही, सदस्यांना सभागृहात मांडली जाणारी विधेयके लौकर मिळतील अशी व्यवस्था करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये देखील हेच आपण सांगितले होते आणि पुन्हा आता शेवटच्या दिवशी एकदम सारी विधेयके सभागृहात मांडून ती मंजूर करण्यास सरकार आम्हाला सांगत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहातील कामाचा आणि मुख्यमंत्र्यांच्या चहापानाचा संबंध काय ? त्याचा उल्लेख येथे कशासाठी करताहेत?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी हे केवळ यासाठीच म्हटले की, आपल्यामध्ये जाणेयेणे सुरू झाले की मग सभागृहात घ्यावयाच्या कामकाजासंबंधात देखील आपल्याला बोलता

..... 3आर 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ...

येईल, ठरविता येईल. इतकेच, बाकी काही नाही. तरी आता मी पुन्हा आपणा सर्वांना विनंती करतो की, देवदासी प्रथा बंद करण्यासाठीचे हे विधेयक आहे, त्यादृष्टीने हे महत्त्वाचे विधेयक आहे, तरी आपण ते संमत करण्यासाठी येथे मांडू द्यावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही मागणी इतकीच केली आहे की, अशा घाईघाईने विधेयके येथे मांडता कामा नयेत. आम्हाला त्यांचा अभ्यास करण्यास तरी वेळ दिला जावा. आता यानंतर अशासकीय कामकाज आपल्याला घ्यावयाचे आहे आणि त्यामध्ये 3 ठराव आहेत. सभापती महोदय, आम्ही एका एका दिवशी 5-5, 6-6 विधेयक मंजूर केली आहेत. तेव्हा आता या विधेयकासाठी इतकी घाई करण्याची काहीच गरज नाही. पुढील अधिवेशनामध्ये आपण हे विधेयक आणून मंजूर करून घ्यावे. यासाठी इतकी घाई कशासाठी करता आहात ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता तसेच सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. सरपोतदार साहेबांना माझी विनंती आहे की, हे विधेयक आणण्यास, ही प्रथा याद्वारे आपल्याला बंद करावयाची आहे, या गोष्टीस मूलत:च इतका विलंब झालेला आहे. त्याच्या कारणांमध्ये मी जाऊ इच्छित नाही. पण देवदासी प्रथा बंद करण्यासाठीचे हे विधेयक आहे. समाजातील ही देवदासी प्रथा बंद करावयाची आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण पुढील अधिवेशनापर्यंत हे विधेयक पुढे ढकलू नये. यापेक्षा मी अधिक काय सांगणार.

श्री. अरविंद सावंत : एवढे वाटते आहे तर मग आपण अधिवेशन वाढवावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी त्यांच्या तीव्र भावना येथे मांडल्या आहेत. मला असे वाटते की, एका गोष्टीचे पुन्हा पुन्हा रिपिटेशन होणे बरोबर नाही. यापुढे या सभागृहामध्ये कोणतेही विधेयक मंजुरीसाठी आणावयाचे असेल तर सरकार पक्षाने किमान दोन दिवस अगोदर तरी सर्व सन्माननीय सदस्यांच्या हातामध्ये विधेयक दिले पाहिजे जेणे करून त्यांना त्यावर अभ्यास करता येईल. कोणाला काही सूचना करावयाच्या असतील तर ते करू शकतील. माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांना मी विनंती करतो की, आजचे आपल्या विषय पत्रिकेवरील कामकाज लौकरात लौकर संपविण्याचा आपण प्रयत्न करू या. हे कामकाज पुढे ढकलण्यात देखील काही अर्थ नाही. शेवटी मी देखील तुमच्यातीलच एक घटक आहे. तेव्हा सदस्यांनीही थोडे समजून घ्यावे.

( यानंतर श्री.सरफरे ...3एस 1

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहाच्या नियमाप्रमाणे सभागृहाचे कामकाज 5 वाजता संपायला पाहिजे. आता अशासकीय कामकाज घेण्यात यावे. व त्यानंतर विधेयक घेण्यात यावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : मी विधेयक सभागृहापुढे मांडले आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझी एकच व्यथा आहे. अतिशय महत्वाचे आणि सर्वात मोठे असे हे विधेयक आहे. या विधेयकातील कोणत्याही तरतुदी आम्ही वाचलेल्या नाहीत. हा 1934 चा कायदा आहे. आणि स्वातंत्र्यप्राप्ती नंतर प्रथम याठिकाणी सुधारणा मांडण्यात येत आहे. त्यामुळे घाई घाईत आपण हे विधेयक संमत करीत आहात याबाबत आमची तक्रार आहे. एक तर आम्हाला अगोदर ही सुधारणा वाचायला मिळाली नाही. या विधेयकावर चर्चा करण्यापूर्वी आम्हाला या विधेयकाला काही सुधारणा सुचवायच्या आहेत, ती संधी आम्हाला मिळाली पाहिजे. त्यानंतर आपण हे विधेयक मंजूर करावे. या विधेयकाला आमचा विरोध नाही. यापैकी आपण काहीही न करता आपण हे विधेयक संमत करणार असाल तर ते करुन टाकावे. हे सर्वात सोपे काम आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 25 महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) विधेयक सभागृहासमोर विचारार्थ आणले आहे. देवदासीची प्रथा महाराष्ट्रातील 7-8 जिल्हयात मोठया प्रमाणात आढळते. विशेषत: महिलांमध्ये ही संख्या मोठया प्रमाणात दिवसें दिवस वाढायला लागली आहे. या संदर्भात कर्नाटक राज्याने एक प्रतिबंधक कायदा केला आहे. त्याच धर्तीवर आपल्या राज्यामध्ये सुध्दा देवदासींची प्रथा असल्यामुळे हा प्रतिबंधक कायदा आणण्याचे प्रयोजन आहे. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये या संदर्भात प्रस्तावना दिली आहे. त्यामध्ये देवदासी कुणाला संबोधित करायचे या संदर्भात सुध्दा डेफिनेशन क्लिअर केले आहे. दुर्दैवाने ही डेफिनेशन आजपर्यंत क्लिअर नव्हती ती यामध्ये नमूद केली आहे. या डेफिनेशनबरोबर आपण या विधेयकामध्ये उद्देश सुध्दा ठरवून दिला आहे. या संदर्भात या कायद्यामध्ये काही ठळक तरतुदी केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने देवदासी म्हणून समर्पण करणे बेकायदेशीर ठरेल. त्यांचे व्यवहार विधीग्राहय समजण्यात येतील. त्याचप्रमाणे राज्य स्तरावर नियंत्रण मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंबधीं कलम 6 मध्ये त्याची कार्ये व कर्तव्ये सुध्दा निश्चित केली आहेत. त्याचप्रमाणे या विधेयकाच्या माध्यमातून जिल्हा समित्यांची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

रचना करण्याचा निर्णय घेतला आहे. देवदासी प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या कर्तव्याबाबत सुध्दा या विधेयकात काही बाबी ठळकपणे नमूद केल्या आहेत. प्रत्येक जिल्हयामध्ये देवदासी प्रतिबंधक अधिकाऱ्याची नेमणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री. उत्तमप्रकाश खंदारे यांनी या संदर्भातील संघटनेचे नेतृत्व केले आहे. त्याचप्रमाणे गडहिंग्लजमध्ये श्री. बने नावाचे संघटनेचे काम करणारे व खालच्या सभागृहाचे सदस्य अध्यक्ष आहेत. त्यांनी सुध्दा या संदर्भात या खात्याचा मंत्री म्हणून माझ्याकडे अनेक प्रस्ताव सादर केले आहेत. या देवदासी प्रतिबंधक अधिकाऱ्याची जी कर्तव्ये आहेत, त्यामधील सर्वात महत्वाचे कलम म्हणजे अपराध सिध्द झ ााल्यानंतर शिक्षेची तरतूद केली आहे. ही प्रथा नष्ट करावयाची आहे, ही प्रथा महाराष्ट्रामध्ये वाढता कामा नये. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे. आणि त्यामुळे अशाप्रकारच्या प्रथा महाराष्ट्रामध्ये वाढायला लागल्या तर त्या संदर्भात किमान 2 व कमाल 5 वर्षापर्यंत शिक्षेची कारवाई व किमान 10 हजार ते कमाल 50 हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद या कायद्यात अंतर्भूत करण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, देवदासी विवाह अनुदान योजना ही अतिशय मागासलेल्या, दुर्गम असलेल्या व अडचणीत असलेल्या महिलांसाठी सुरु केली आहे. देवदासी व त्यांच्या मुलींसाठी ही अनुदान योजना सुरु केली आहे. त्याचप्रमाणे देवदासीच्या मुला-मुलींना गणवेश देणे, शालेय साहित्यासाठी अनुदान देण्याबाबतची योजना सुरु केली आहे. त्याचप्रमाणे समाज प्रबोधनाचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरु केली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/RJW/D पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:30

श्री.हर्षवर्धन पाटील . . . .

विशेषत: देवदासींच्या मुलींच्या किंवा मुलांच्या वसतीगृहासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून योजना सुरु करण्याचा आपण निर्णय घेतलेला आहे. देवदासींकरता बीज-भांडवल योजना आणि त्यांच्यासाठी घरकुल योजना अशा अनेक गोष्टींचा अंतर्भाव या नवीन कायद्यामध्ये केलेला आहे. माझी सदनाला अशी विनंती आहे की, आपण हे विधेयक मंजूर करावे. धन्यवाद.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

. . . .3 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आमचे नेते माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सुरुवातीलाच मुद्दा उपस्थित केला होता की, सदनामध्ये कोणतेही विधेयक मंजूर होत असताना त्यातील सर्व बाजू सदनासमोर मांडल्या गेल्या पाहिजेत. याठिकाणी जे विधेयक मांडण्यात आले आहे, त्याचा हेतू चांगला आहे. आपण या विषयामध्ये प्रा.विठ्ठल बने आणि अनेक समाजसुधारकांची नावे घेतलेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे 1994 पासून यासंबंधातील प्रयत्न सुरु आहेत. पण ज्याप्रकारे यासंबंधीचे विधेयक आमच्यासमोर येत आहे, त्याबद्दल मला अतिशय खेद वाटतो. दोन-तीन दिवस अगोदरपासून आम्ही हे विधेयक पुढच्या वेळी आणणार आहोत असे आपण उत्तर देत होतात आणि खरे सांगावयाचे तर या अधिवेशनामध्ये जेव्हा शक्य होईल तेव्हा थोडया वेळामध्ये वाचून आम्ही याविषयाच्या संदर्भातील मुद्दे मांडलेले आहेत. माननीय मंत्री महोदयांनी या विधेयकाच्या उद्दिष्टाबद्दल असे सांगितले की, देवदासींच्या मुलांसाठी वसतीगृहे काढणार आहोत. मला असे वाटते की, आम्ही देवदासी, मुरळी यांच्याबरोबर काम केले आहे. पण ज्यावेळी सेग्रीगेशन करुन देवदासींच्या मुलांचे किंवा मुलींचे हे वसतीगृह आहे अशी पाटी लागते, तेव्हा देवदासीं आणि समाजाच्या इतर लोकांमध्ये अंतर निर्माण होते. म्हणून तुम्ही त्यांच्यासंबंधात जे-जे कार्यक्रम राबविणार आहात, तेव्हा यादृष्टीने काळजी घेतली पाहिजे. आम्ही 100 मुरळींबरोबर काम केले आहे. त्यातील अनेकांची मुले-मुली डॉक्टर, वकील झालेली आहेत. पण प्रत्येकाने मोठे झाल्यावर असे सांगितले की, आम्हाला आमची आई मुरळी होती याची समाजाला ओळख करुन द्यावयाची नाही. म्हणजे एका अर्थाने ही प्रथा समाजाला कलंक असल्याचे मानले जाते, त्यांच्याबद्दल आपली भूमिका संवेदनशील नसेल तर ते कितपत योग्य आहे. आज स्त्रिया स्वत:ला देवदासी आणि मुरळी म्हणून नोंदवून घेण्यासाठी पुढे येत आहेत आणि नेमकी यांची संख्या किती आहे याबद्दल सुध्दा वाद निर्माण झाल्याचे दिसून येते.या कायद्याचा हेतू चांगला आहे.पण वर्षानुवर्षे हा विषय प्रलंबित राहीलेला आहे. यासाठी अनेक आयोग, अनेक महामंडळे नेमल्यानंतर या लोकांच्या मनात नैराश्य आल्याचे दिसून येते. म्हणून हा कायदा नामंजूर करण्याचा विरोधी पक्षाचा हेतू नाही. पण आपण ज्या पध्दतीने हे विधेयक मांडलेले आहे, ती राजकीय इच्छाशक्ती यापाठिमागे उभी राहीली असती तर सदनातून अनेक चांगल्या प्रकारच्या योजना समोर येऊ शकल्या असत्या. या विधेयकावर जास्त सन्माननीय सदस्यांनी बोलू नये अशी सदनातील बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांची इच्छा दिसते आणि आम्ही सदस्य जेव्हा एखाद्या विधेयकावर ----

. . . .3 टी-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

बोलतो, तेव्हा कळत न कळत अशी भावना मनात येते की, आपण उगाचच बोलत आहोत. म्हणून मी अतिशय व्यथित अंत:करणाने माझे म्हणणे येथे नोंदविते. पण हा प्रोटेस्ट किंवा माझी नाराजी, तसेच सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याचे गांभीर्य देखील सदनाच्या पटलावर आले पाहिजे असे मला वाटते. धन्यवाद.

-----

. . . .3टी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 22 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 25 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 25 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री.किल्लेदार . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी.

**उप** : मला जी माहिती मिळालेली आहे त्यामध्ये सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 90 हे विधानसभेने संमत केलेले नाही. ते विधेयक पुढे ढकललेले आहे. तसेच सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 89 ही विधानसभेने नाही. संमत केलेले त्यामुळे या सभागृहात त्यावर चर्चा होणार नाही. तेव्हा आता काय करायचे हे सभागृहाने ठरवावे.

अनेक सन्माननीय सदस्य : ती विधेयके पुढच्या अधिवेशनामध्ये घ्यावीत.

श्री.हर्षवर्धन पाटील : ही विधेयके पुढच्या अधिवेशनामध्ये घ्यायला हरकत नाहीत.

**उपसभापती** : ठीक आहे. सदरची विधेयके पुढच्या अधिवेशनामध्ये घेण्यात येतील. अशासकीय कामकाज पुढच्या अधिवेशनामध्ये घ्यायचे काय ?

काही सन्माननीय सदस्य : ठीक आहे. अशासकीय कामकाजही पुढच्या अधिवेशनामध्ये घ्यावे.

श्री.अनंत तरे : उपसभापती महोदय, आता अशासकीय कामकाज घ्यावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : यामध्ये फार वेळ जाईल. आता आपण मध्यंतरासाठी थांबू. यानंतर सायंकाळी 5-00 वाजता बैठक घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : ठीक आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 4.37 ते सायं. 5-00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

**--**

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**उपसभापती** : कामकाज पत्रिकेवर दाखविलेले अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनात घेण्यात येईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माझी फक्त एकच विनंती आहे की, आजच्या कामकाज पत्रिकेवर अशासकीय कामकाजाचा जो क्रम दाखविण्यात आला आहे तोच क्रम पुढील अधिवेशनाच्या वेळी जेंव्हा हे अशासकीय कामकाज घेण्यात येईल, तेंव्हा दाखविण्यात यावा.

**उपसभापती** : ठीक आहे.

हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो. एकुण बैठकीची संख्या 10 आहे. एकूण काम आपण **78** तास आणि **23** मिनिटे इतके केले आहे. यामध्ये वाया गेलेला वेळ **1** तास **22** मिनिटे आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज **77** तास झालेले आहे. रोजचे सरासरी कामकाज **7 तास 45** मिनिटे झालेले आहे.

***तारांकित प्रश्न :-***

एकूण **3467** तारांकित प्रश्नांच्या सूचना आल्या. या पैकी कार्यवाहीसाठी **2646** तारांकित प्रश्न घेण्यात आले. **873** प्रश्न स्वीकृत झाले व सभागृहात **46** तारांकित प्रश्नांना तोंडी उत्तरे देण्यात आली.

***नियम 93 अन्वये सूचना :-***

एकूण **119** सूचना प्राप्त झाल्या. यापैकी **54** सूचनांवर निवेदने करण्यात आली.

***लक्षवेधी सूचना -***

एकूण **995** सूचना प्राप्त झाल्या. यापैकी **104** सूचना मान्य झाल्या व **40** सूचनांवर चर्चा करण्यात आली.

***विशेष उल्लेख :-***

एकूण **48** विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्यात आल्या.

***विधेयके :-*** एकूण **17** विधेयके संमत करण्यात आली.

**माननीय उपसभापती** ........

***पूरक मागण्या*** - एकूण **9** तास **45 मि**. चर्चा झाली. **40** सम्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

***अर्धातास चर्चा :-***

एकूण **51** अर्धा तास चर्चेच्या सूचना आल्या. त्यापैकी **25** सूचना मान्य करण्यात आल्या व **08** सूचनांवर चर्चा करण्यात आली.

***अल्पकालीन चर्चा :- (एकूण 5 चर्चा )***

1) सक्तीच्या कर्जवसुलीमुळे शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या
( 5 तास 40 मि. चर्चा झाली. 15 सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

2) महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी करावयाची उपाययोजना.
( 3 तास 10 मि. चर्चा झाली. 16 सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.)

3) ऊसाला योग्य भाव मिळाला पाहिजे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना.
( 2 तास 15 मि. चर्चा झाली. 8 सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

4) कर्ज बाजारी झालेल्या शेतक-यांना कमी व्याजाने कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत.
( 2 तास 15 मि. चर्चा झाली. 8 सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.)

5) राज्यात जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेली अभूतपूर्व अतिवृष्टी.
( 2 तास 40 मि. चर्चा झाली. 16 सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला.

***नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -***

राज्यात भारनियमनामुळे निर्माण झालेली परिस्थिती व याबाबत करावयाची उपाययोजनाबाबत चर्चा.

3 तास 10 मि. चर्चा झाली. चर्चेत 9 सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

आज आपल्या अधिवेशनाची सांगता होत असताना आपले माननीय सभापती प्रकृती अस्वास्थ्यामुळे येथे उपस्थित राहू शकले नाहीत त्यामुळे आपल्या सर्वांचे आभार मानण्याची जबाबदारी माझ्यावर आलेली आहे. प्रथमत: मी आपले पीठासीन अधिकारी माननीय सभापती श्री शिवाजीराव देशमुखजी, सभागृहाचे नेते मा.मुख्यमंत्री श्री.विलासरावजी देशमुख, मा.उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील, संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील आणि इतर सर्व मान्यवर मंत्रीगण,विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचे आभार मानतो तसेच सभागृहातील सर्व

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय उपसभापती** ......

सन्माननीय सदस्य व मला सहकार्य करणारे सर्व तालिका सभापती ज्यांनी या आसनावरुन अतिशय चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे त्यांचेही आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. त्याचबरोबर विधानमंडळ सचिवालयातील माननीय सचिवांसह इतर सर्व अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, सुरक्षा अधिकारी या सर्वांचे मी आभार मानतो. पत्रकार व दूरदर्शनच्या विविध वृत्तवाहिन्या हे जरी सभागृहाचा भाग नसले तरी ते या संसदीय प्रणालीमध्ये महत्वपूर्ण असे काम करीत असतात तेव्हा त्यांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो. त्याचप्रमाणे विधिमंडळ सभागृहातील कामकाजातील प्रश्नोत्तराच्या तासाचे थेट प्रक्षेपण "सहारा समय" या वृत्त वाहिनीद्वारे दर्शकांपर्यंत नेले त्यांचेही मी मनापासून आभार मानतो.

आता मी सत्र समाप्तीसंबंधी माननीय राज्यपालांकडून आलेला संदेश वाचून दाखवितो.

यानंतर श्री. खर्चे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**उपसभापती** : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, " महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 13 मार्च, 2006 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे."

---------

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

**उपसभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे :-

" मी, एस. एम. कृष्णा, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे शनिवार, दिनांक 16,डिसेंबर, 2005 रोजी होणाऱ्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( 5 वाजून 07 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

----------

..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही